बुधवार
१७
जून २०२६

अकोला
पाने : ८ + ४
वर्ष : २०
अंक : ७५
स्वागत मूल्य ३ रुपये
www.ajinkyabharat.com

बातम्यांचा गतिमान पाठलाग
# अजिंक्य भारत


राजमाता जिजाऊ पुण्यतिथी

## थोडक्यात

### मंदा म्हात्रेंची फडणवीसांकडे तक्रार

**नवी मुंबई:** नवी मुंबईतील भाजपमधील अंतर्गत वाद पुन्हा एकदा उफाळून आला आहे. वनमंत्री गणेश नाईक आणि बेलापूरच्या भाजप आमदार मंदा म्हात्रे यांच्यातील राजकीय संघर्ष आता थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दरबारापर्यंत पोहोचला आहे. नवीन रुग्णालयाच्या उद्घाटन कार्यक्रमादरम्यान झालेल्या कथित धक्काबुक्कीच्या प्रकारानंतर मंदा म्हात्रे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेत आपली नाराजी व्यक्त केली. उद्घाटन कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिकेवरून सुरू झालेला वाद आता अधिक तीव्र झाला आहे. स्थानिक पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नाव निमंत्रण पत्रिकेतून वगळण्यात आल्याचा मुद्दाही यावेळी चर्चेत आला. या प्रकारावर आक्षेप घेत मंदा म्हात्रे यांनी हा केवळ शिंदे यांचाच नव्हे तर स्थानिक लोकप्रतिनिधींचाही अपमान असल्याचे म्हटले.

### प्रसूतीनंतर २५ वर्षीय महिलेचा मृत्यू

**चंद्रपूर:** जिल्ह्यातील जिवती तालुक्यातून हृदय पिळवटून टाकणारी घटना समोर आली आहे. खराब रस्त्यामुळे रुग्णवाहिका वेळेत गावात पोहोचू न शकल्याने प्रसूतीनंतर एका २५ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेमुळे ग्रामीण भागातील आरोग्य सुविधा आणि मूलभूत पायाभूत सुविधांवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. जिवती तालुक्यातील तेलंगणा सीमेवरील दुर्गम घोडनकप्पी गावात राहणाऱ्या संगीता गेडाम यांची आठव्या महिन्यात घरीच प्रसूती झाली. बाळाचा जन्म झाल्यानंतर त्यांना मोठ्या प्रमाणात रक्तस्राव सुरू झाला. कुटुंबीयांनी तत्काळ आरोग्य विभागाला माहिती दिली, मात्र गावाकडे जाणारा रस्ता अत्यंत खराब असल्याने रुग्णवाहिका घटनास्थळी पोहोचू शकली नाही. उपचाराअभावी संगीताचा दुर्दैवी मृत्यू झाला.

### पाकिस्तान समर्थित दहशतवादी नेटवर्क उध्वस्त

**नवी दिल्ली:** दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकाने पाकिस्तान-पुरस्कृत दहशतवादी आणि गुन्हेगारी नेटवर्कचा पर्दाफाश करून सात आरोपींना अटक केली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, हे नेटवर्क पाकिस्तानात वास्तव्यास असलेल्या शहजाद भट्टी आणि त्याचा साथीदार अजमल गुज्जर यांच्या सूचनेनुसार कार्यरत होते. तपासातून असे समोर आले की, ही टोळी पाकिस्तानमधून पंजाबमार्गे बेकायदेशीर शस्त्रे, दारूगोळा आणि अमली पदार्थ यांची तस्करी करून दिल्ली-एनसीआर भागात त्यांचा पुरवठा करत असे.या कारवाईदरम्यान पोलिसांनी आरोपींकडून पाच पिस्तूल, ४१ जिवंत काडतुसे, सात मोबाईल फोन आणि एक स्कॉर्पिओ गाडी जप्त केली.

# महाराष्ट्र ग्रामीण पेय जल धोरण २०२६ जाहीर

## मान्सूनने ओढ दिली; महाराष्ट्रात पाण्याची टंचाई

**मुंबई: दि.१६ वृत्तसंस्था**

राज्यात मान्सूनचे आगमन लांबल्याने आणि पावसाने ओढ दिल्यामुळे अनेक जिल्ह्यांमध्ये पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत असल्याचे चित्र असतानाच, आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या (कॅबिनेट) बैठकीत ग्रामीण जनतेला मोठा दिलासा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी सरकारने महाराष्ट्र ग्रामीण पेय जल धोरण २०२६ जाहीर केले आहे. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत हे नवे धोरण संपूर्ण राज्यात प्रभावीपणे राबवले जाणार आहे. राज्यातील ग्रामीण भागात दरवर्षी उन्हाळ्यात किंवा पाऊस लांबल्यास उद्भवणाऱ्या पिण्याच्या पाण्याच्या टंचाईवर केवळ तात्पुरत्या मलमपट्ट्या न करता, आता प्रभावी आणि कायमस्वरुपी उपाययोजनांवर विशेष भर दिला जाईल. त्यानुसार पेयजल योजनांचा शाश्वत विकास करण्याचा राज्य सरकारचा मानस आहे. ग्रामीण भागातील जुन्या आणि रखडलेल्या (पान २ वर)



### जात वैधता प्रमाणपत्र: सहा महिन्यांची अंतिम मुदतवाढ

स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये राखीव जागांवर निवडून आलेल्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची अंतिम मुदतवाढ देण्याचा महत्त्वाचा निर्णय राज्य मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. तसेच वैद्यकीय उपचारांमध्ये अचूकता यावी यासाठी निदान प्रणालीतील महत्वाचा असा प्रकल्प नागपूर येथे राबविण्याचा महत्त्वाचा निर्णय देखील राज्य मंत्रिमंडळात घेण्यात आला. राज्य मंत्रिमंडळाची बैठक मंगळवारी आज संपन्न झाली. या बैठकीत सहा महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. राज्य मंत्रिमंडळ बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

### राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मोठे निर्णय:

१) वैद्यकीय उपचारांमध्ये अचूकता यावी यासाठी निदान प्रणालीतील महत्वाचा असा प्रकल्प नागपूर येथे राबविण्यात येणार. त्यासाठी हाय एनर्जी मेडिकल सायक्लोट्रॉन प्रकल्प उभारणीस मान्यता. मध्य भारतातील एकमेव महत्वाकांक्षी प्रकल्प. गरजू नागरिकांना मोठा दिलासा मिळणार. विविध रोगांचे, आजारांचे निदान करण्यासाठी या प्रणालीचा वापर करता येणार. (वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग)


२) महाराष्ट्र स्वयंचलित प्रणाली धोरण-२०२६ जाहीर. हवाई, सागरी तसेच जमिनीवरील कृषि व अन्य ठिकाणच्या विविध कामांसाठी या स्वयंचलित प्रणालीतील उपकरणांची निर्मिती करण्यासाठीचे धोरण. जोखमीच्या आणि अवघड परिस्थितीतील कामांसाठी वापरता येणाऱ्या ड्रोनसह, विविध रोबोटसची निर्मिती या क्षेत्रातील संशोधन व विकास, मनुष्यबळ प्रशिक्षण आदी उपक्रमांना प्रोत्साहन मिळणार. (इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता विभाग)

३) राज्यात भारत नेट कार्यक्रम राबविण्यासाठी सुधारित पद्धतीस मंजुरी. हा कार्यक्रम राबविण्यासाठी ''महानेट डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड '' या नावाने विशेष हेतू वहन यंत्रणा (स्थापन करणार. (इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दिमत्ता विभाग)

४) विकसित भारत - जी राम जी (व्ही बी जी राम जी) योजनेची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी विकसित भारत - जी राम जी कायदा, २०२५ या कायद्याशी सुसंगत अशा तरतुदी महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ मध्ये करण्यात येणार. या तरतुदी तसेच अध्यादेश निर्गमित करण्यास मान्यता. (नियोजन विभाग)

## देशात मान्सूनला ब्रेक

### अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाची मोठी तूट!



**मुंबई: दि.१६ वृत्तसंस्था**

यंदा मान्सून वेळेपूर्वीच अंदमानात दाखल झाला. अगदी केरळमधून महाराष्ट्रापर्यंत देखील पोहोचला. मात्र, सुरुवातीला वेगाने वाटचाल करणाऱ्या मान्सूनला आता ब्रेक लागला आहे. १ ते १५ जून या कालावधीत राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये पावसाची मोठी तूट नोंदवली गेली आहे. ठाणे, रायगड, मुंबई, पुणे, सातारा, कोल्हापूर, नाशिक, जळगाव तसेच मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये सरासरीपेक्षा अत्यल्प पाऊस झाला आहे. काही जिल्ह्यांमध्ये तर पावसाची तूट ९० टक्क्यांहून अधिक नोंदवण्यात आली आहे. ४ ते १५ जूनदरम्यान राज्यात सरासरी ५३.७ मिमी पावसाची अपेक्षा असताना प्रत्यक्षात केवळ १९.२ मिमी पाऊस झाला. मात्र हवामान तज्ज्ञांच्या अंदाजानुसार २२ ते २९ जूनदरम्यान कोकण आणि राज्याच्या अंतर्गत भागात पावसाचा जोर वाढू शकतो. त्यामुळे जूनअखेरीस महाराष्ट्राला दिलासा मिळण्याची आणि शेतीसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होण्याची आशा व्यक्त केली जात आहे. भारताच्या बहुतांश भागासह महाराष्ट्रातील मान्सूनच्या वाटचालीत खंड (पान २ वर)

## राम मंदिरातील देणगी चोरी प्रकरणी ३ तक्रारी; ४२ संशयितांची केली चौकशी

**अयोध्या: दि.१६ वृत्तसंस्था**

अयोध्येतील राम मंदिरात अर्पण केलेल्या देणग्यांच्या चोरीबाबत मंगळवारी पोलिसांकडे तीन तक्रारी प्राप्त झाल्या. पहिली तक्रार धर्मसेनाचे संस्थापक संतोष दुबे यांनी, दुसरी उत्तर प्रदेश युवक काँग्रेसचे उपाध्यक्ष शरद शुक्ला यांनी आणि तिसरी करणी सेनेने दाखल केली. मात्र, पोलिसांनी अद्याप एफआयआर नोंदवलेला नाही.

मंगळवारी दुसऱ्या दिवशी विशेष तपास पथक सकाळी ११ वाजता तपासासाठी मंदिरात पोहोचले. त्यांच्यासोबत अयोध्या जिल्हाधिकारी शशांक त्रिपाठी आणि डॉ. गौरव ग्रोवर देखील आहेत. आजही पथक ट्रस्टच्या संशयित (पान २ वर)



### आतापर्यंत २ कोटींची वसुली

देणगी चोरी प्रकरणात आतापर्यंत ५ लोकांची नावे समोर आली आहेत - लवकुश, अवनीश, अनुकल्प, करुणे आणि रामशंकर. या लोकांच्या माहितीनुसार आतापर्यंत २ कोटी रुपयांची वसुली झाली आहे. हे सर्व दान केलेल्या रकमेच्या मोजणीच्या कामाशी संबंधित आहेत. लवकुश आणि अनुकल्प पोलीस कोठडीत आहेत.

## बँकांच्या मनमानी कारभाराला आळा

**नवी दिल्ली: दि.१६ वृत्तसंस्था**

भारतीय रिझर्व्ह बँकेने बँकांना त्यांच्या ग्राहकांची कोणत्याही प्रकारे दिशाभूल न करण्याचे सक्त निर्देश दिले आहेत. जर कोणतीही बँक असे करताना आढळली, तर तिच्यावर कठोर कारवाई केली जाईल. भारतीय रिझर्व्ह बँकेने बँकांसाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत. या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, कोणतीही बँक ग्राहकांवर कोणत्याही प्रकारची योजना लादू शकत नाही, तसेच ग्राहकांची दिशाभूल करून अशी कोणतीही कारवाई केली जाऊ शकत नाही. आरबीआयने १५ जून २०२६ रोजी ''भारतीय रिझर्व्ह बँक दुसरी सुधारणा निर्देश, २०२६'' जारी केले. ही मार्गदर्शक तत्त्वे सर्व व्यावसायिक बँकांना लागू आहेत. यात स्मॉल (पान २ वर)

## ऑपरेशन नव्हे, ही राजकारणातील मानवी खरेदी-विक्री शिवसेनेचे सर्व नऊ खासदार एकनिष्ठ - संजय राऊत



**मुंबई: दि.१६ वृत्तसंस्था**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे काही खासदार एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या संपर्कात असून ते लवकरच पक्षांतर करणार, अशा चर्चांनी महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात चांगलाच जोर धरला आहे. रविवारच्या 'मातोश्री' वरील बैठकीला केवळ ५ खासदार प्रत्यक्ष हजर असणे आणि त्यानंतर खासदार संजय देशमुख यांनी तडकाफडकी दिल्ली गाठून केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांची भेट घेणे, यामुळे या चर्चांना अधिक खतपाणी मिळाले. या संपूर्ण राजकीय घडामोडींवर शिवसेना नेते आणि खासदार संजय राऊत यांनी आज मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत अत्यंत आक्रमक आणि सविस्तर भूमिका मांडली. त्यांनी विरोधकांचा समाचार घेत शिवसेनेचे सर्व नऊ खासदार एकनिष्ठ असल्याचा पुनरुच्चार केला. (पान २ वर)

### 'उद्धव ठाकरेंनी सुनावल्याचे वृत्त खोटे; ते विधान चार वर्षांपूर्वीचे'!

बैठकीत उद्धव ठाकरे यांनी 'ज्यांना जायचे आहे त्यांनी खुशाल जावे' असे हताश वक्तव्य केल्याची चर्चा राऊत यांनी पूर्णपणे फेटाळून लावली. त्या बैठकीला आपण स्वतः पूर्ण वेळ उपस्थित असल्याचे सांगत राऊत म्हणाले की, उद्धव ठाकरेंच्या तोंडी हे वाक्य जाणीवपूर्वक कोंबण्यात आले आहे. हे विधान सध्याचे नसून, चार वर्षांपूर्वीचे आहे, जेव्हा आमदारांना हॉटेलमध्ये सुरक्षित ठेवलेले असतानाही काही जण पळून जात होते. त्यावेळी रागाच्या भरात त्यांनी असे म्हटले होते. या ताज्या बैठकीत अशा प्रकारची कोणतीही चर्चा झालेली नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.चालू वर्ष हे हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे जन्मशताब्दी वर्ष असल्याचे सांगत, दिल्लीच्या चरणी लीन झालेल्या या नेत्यांनी केवळ पक्षात खंजीर खुपसण्याचे कारस्थान रचले आहे, अशी टीका त्यांनी केली.

## भाजपकडून रोहित पवारांच्या आंदोलनस्थळाचे 'गोमूत्र शुद्धीकरण

### राजकीय वातावरण कमालीचे तापले!



**पंढरपूर: दि.१६ वृत्तसंस्था**

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या संपूर्ण कर्जमाफीच्या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी पंढरपूर येथे पुकारलेल्या दोन दिवसीय अन्नत्याग आंदोलनाने राज्याच्या राजकीय वर्तुळात नवा वाद पेटवला आहे. रोहित पवार यांच्या या आंदोलनाची दखल अखेर राज्य सरकारला घ्यावी लागली आणि राज्याचे संकटमोचक मानले जाणारे मंत्री गिरीश महाजन यांनी स्वतः आंदोलनस्थळी भेट देऊन रोहित पवार यांच्याशी चर्चा केली. मात्र, हे (पान २ वर)

### सक्षणा सलगर यांचा भाजपवर घणाघाती प्रहार



या संपूर्ण गोमूत्र प्रकरणावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या आक्रमक नेत्या सक्षणा सलगर यांनी तीव्र शब्दांत संताप व्यक्त केला आहे. प्रसारमाध्यमांशी बोलताना त्या म्हणाल्या, मला या गोष्टीचे अत्यंत आश्चर्य वाटते की, भाजपमधील देवेंद्र फडणवीस, गिरीश महाजन किंवा त्यांच्या प्रदेशाध्यक्षांनी आपल्या कार्यकर्त्यांच्या अशा वागण्याकडे गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे. आंदोलनस्थळी गोमूत्र शिंपडून हे लोक समाजात नेमके काय सिद्ध करू पाहत आहेत? सध्या देशामध्ये पेपर फुटीचे मोठे रॅकेट उघडकीस आले आहे, त्यावर या नेत्यांनी बोलायला हवे. परंतु, ज्वलंत मुद्द्यांवर बोलण्याची या लोकांची पात्रता उरलेली नाही. सलगर यांनी पुढे स्पष्ट केले की, रोहित पवार यांनी केलेले हे आंदोलन कोणत्याही वैयक्तिक किंवा पक्षीय स्वार्थासाठी नव्हते, तर ते राज्यातील पिचलेल्या शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी होते आणि हे संपूर्ण महाराष्ट्राने पाहिले आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यावरील टीकेचा समाचार घेताना सक्षणा सलगर म्हणाल्या की, शरद पवार यांचे देशातील आणि राज्यातील योगदान हे सूर्यासारखे लख्ख आहे. कोणीही उठून त्यांच्यावर चिखलफेक करणे म्हणजे सूर्यावर थुंकण्यासारखे आहे, ज्याने थुंकणाऱ्याचेच तोंड खराब होते.




### २१ जूनच्या नीट परीक्षेची पारदर्शकता जपण्यासाठी सरकार ॲक्शन मोडमध्ये

# देशभरात 'टेलीग्राम' ॲपवर तात्पुरती बंदी!

**नवी दिल्ली: दि.१६ वृत्तसंस्था**

राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा म्हणजेच 'नीट-युजी २०२६' च्या आगामी फेरपरीक्षेच्या सुरक्षिततेसाठी आणि पारदर्शकतेसाठी केंद्र सरकारने एक अत्यंत कठोर आणि अभूतपूर्व पाऊल उचलले आहे. देशातील नामांकित वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अत्यंत महत्त्वाची असलेली ही फेरपरीक्षा येत्या २१ जून रोजी आयोजित करण्यात आली आहे. ही परीक्षा कोणत्याही अडथळ्याविना आणि संपूर्ण निष्पक्षतेने पार पाडावी, यासाठी सरकारने लोकप्रिय मेसेजिंग ॲप 'टेलीग्राम'वर तात्पुरत्या स्वरूपात बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. ही बंदी २२ जूनपर्यंत लागू राहणार असून, या ॲपमधील 'मेसेज एडिट' (संदेश सुधारणा) हे वैशिष्ट्यपूर्ण फीचर ३० जूनपर्यंत पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे.अधिकच्या माहितीनुसार, सोशल मीडिया आणि विशेषतः टेलिग्राम चॅनेल्सचा गैरवापर करून काही समाजकंटक आणि फसवणूक करणाऱ्या टोळ्या सक्रिय झाल्या होत्या. हे गट "Paper Leaked NEET", "Re-NEET 2026" आणि ""Private Mafia" यांसारख्या संशयास्पद नावांनी टेलिग्रामवर चॅनेल्स चालवत होते. या चॅनेल्सच्या माध्यमातून निष्पाप विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना परीक्षेची मूळ प्रश्नपत्रिका आगाऊ उपलब्ध करून देण्याचे खोटे आमिष दाखवले जात होते आणि त्याबदल्यात हजारो ते लाखो रुपयांची बेकायदेशीर मागणी केली जात होती. या संदर्भात 'एनटीए'ने अत्यंत स्पष्ट शब्दांत खुलासा केला असून, नीट परीक्षेची मुख्य प्रश्नपत्रिका पूर्णपणे सुरक्षित व गोपनीय आहे आणि ती सध्या कोणाकडेही उपलब्ध नाही. त्यामुळे अशा प्रकारच्या कोणत्याही अपप्रचाराला किंवा फसवणुकीला बळी पडू नये, असे आवाहन संस्थेने केले आहे.




### टेलिग्रामच्या 'मेसेज एडिट' फीचरचा गैरवापर

तपासादरम्यान असे निष्पन्न झाले आहे की, अनेक प्रकरणांमध्ये टेलिग्रामच्या 'मेसेज एडिट' या सुविधेचा अत्यंत पद्धतशीर आणि चुकीच्या मार्गाने वापर करण्यात आला. सायबर गुन्हेगार आणि पेपर लीक करणाऱ्या टोळ्या परीक्षा संपल्यानंतर जुन्याच मेसेजमध्ये फेरबदल करत असत. परीक्षा संपल्यावर मूळ प्रश्नपत्रिका हाती येताच, ती जुन्या वेळेच्या मेसेजमध्ये समाविष्ट केली जायची. यामुळे सामान्य लोकांना आणि विद्यार्थ्यांना परीक्षा सुरू होण्यापूर्वीच पेपर लीक झाला होता, असा संभ्रम निर्माण होत असे. डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून रचला जाणारा हा खोटा बनाव रोखण्यासाठी आणि अफवांवर नियंत्रण मिळवण्यासाठीच सरकारने थेट टेलिग्रामवर तात्पुरती बंदी घालण्याचा कठोर निर्णय घेतला आहे.

# पान 1 वरून...

## देशात मान्सूनला ब्रेक...

पडला आहे. जूनच्या मध्यावर पावसाचे प्रमाण तब्बल ६४ टक्क्यांनी कमी असून महाराष्ट्रात हीच तूट ६९ टक्क्यांपर्यंत आहे. त्यामुळे पावसाळ्याच्या सुरुवातीलाच मोठ्या संकटांचा सामना करावा लागत आहे. 'इनसॅट-३ डीएस' उपग्रहाच्या चित्रांनुसार मध्य भारत, दक्षिण भारत आणि महाराष्ट्राचा मोठा भाग ढगविरहित दिसत आहे. मान्सून सक्रिय असल्याचे संकेत देणारे दाट ढग बहुतांश भागांत नसून, हिमालयीन प्रदेश, ईशान्य भारत आणि गंगेच्या मैदानाच्या उत्तरेकडील भागातच ढगांची सक्रियता दिसून येत आहे. अरबी समुद्रातून येणारे मान्सूनी ढगही कमकुवत आणि तुटक स्वरूपात असल्याचे निरीक्षण नोंदवले गेले आहे. हवामानातील बदलांमुळे मान्सूनची यंत्रणा काहीशी कमकुवत झाली आहे. ढगनिर्मितीची प्रक्रिया मंदावली आहे. त्यामुळे मान्सून देशात दाखल झाला असला तरी अपेक्षित पाऊस पडत नाही. मात्र हवामान विभागाने हा केवळ तात्पुरता खंड असल्याचे स्पष्ट केले आहे. १८ ते २० जूनदरम्यान दक्षिण कोकण किनारपट्टीवरून मान्सून पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. २२ ते २९ जूनदरम्यान पावसाची तीव्रता वाढण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला असला, तरी पुढील काही दिवस शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहेत.

## महाराष्ट्र ग्रामीण पेय जल धोरण...

पेयजल योजनांचे पुनरुज्जीवन केले जाणार आहे. या योजना केवळ कागदावर न राहता त्या दीर्घकाळ कशा कार्यरत राहतील (शाश्वत विकास), याकडे विशेष लक्ष दिले जाईल. आतापर्यंत पिण्याच्या पाण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या वेगवेगळ्या योजना स्वतंत्रपणे राबवल्या जात होत्या. नवीन धोरणानुसार, या सर्व विविध योजनांचे एकत्रिकरण केले जाईल, जेणेकरून निधीचा योग्य वापर होऊन धोरण अधिक गतीने आणि प्रभावीपणे राबवता येईल. ग्रामीण जनतेला केवळ पाणी मिळणे पुरेसे नसून, त्यांना स्वच्छ, निर्जंतुक आणि दर्जेदार पिण्याचे पाणी मिळावे यासाठी विशेष जलशुद्धीकरण प्रकल्प आणि वितरण व्यवस्थेचे नियोजन या धोरणांतर्गत करण्यात आले आहे. यामुळे ग्रामीण भागातील आरोग्याचा दर्जा सुधारण्यास मदत होईल. कॅबिनेट बैठकीतील या निर्णयामुळे राज्यातील टंचाईग्रस्त गावांना आणि वाड्या-वस्त्यांना येत्या काळात मोठा दिलासा मिळणार आहे.

## ऑपरेशन नव्हे, ही राजकारणातील...

'ऑपरेशन टायगर' संदर्भात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना संजय राऊत यांनी सत्ताधाऱ्यांवर कडाडून टीका केली. ते म्हणाले, ऑपरेशन हे केवळ रुग्णालयात होत असते. राजकीय नेते कधीपासून हातात कात्री आणि सुरी घेऊन शस्त्रक्रिया करायला लागले? याला राजकीय भाषेत 'ऑपरेशन' म्हणण्यापेक्षा 'फोडाफोडी' आणि मानवी खरेदी-विक्री म्हणणे अधिक संयुक्तिक ठरेल. गेल्या बारा वर्षांत देशात आणि महाराष्ट्रात केवळ हेच राजकारण सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला. तृणमूल काँग्रेसच्या खासदारांचे उदाहरण देत त्यांनी भाजपच्या वाढत्या राजकीय महत्त्वाकांक्षेवर निशाणा साधला, मात्र शिवसेनेच्या बाबतीत येणाऱ्या फुटीच्या बातम्या पूर्णपणे कपोलकल्पित आणि तथ्यहीन असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. उद्धव ठाकरे हे लोकप्रतिनिधींना वेळ देत नाहीत किंवा त्यांचा निधी व प्रवासाबाबत खासदारांमध्ये नाराजी आहे, या दाव्यांचा राऊत यांनी खरपूस समाचार घेतला. महाराष्ट्राच्या राजकारणात ज्येष्ठ नेते शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्याइतका सर्वसामान्य कार्यकर्ते व लोकप्रतिनिधींना सुलभतेने भेटणारा दुसरा कोणताही मोठा नेता नाही, असे ते म्हणाले.

## बँकांच्या मनमानी कारभाराला आळा...

फायनान्स बँका, पेमेंट बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका आणि स्थानिक क्षेत्र बँकांसाठी स्वतंत्र मार्गदर्शक तत्त्वे आहेत. आरबीआयचे हे निर्देश १ जानेवारी २०२७ पासून अंमलात येणार आहे. या निर्देशानंतर, बँकांना त्यांच्या प्रणाली सुधारण्यासाठी साडेसहा महिन्यांचा कालावधी दिला जाणार आहे. बँका अनेकदा कोणत्या ना कोणत्या प्रकारे ग्राहकांची दिशाभूल करतात. उदाहरणार्थ, एखादा ग्राहक काही चौकशीसाठी बँकेत जातो, पण त्याला एखादी योजना किंवा विमा पॉलिसी देऊ केली जाते. याशिवाय, ऑनलाइन सेवांमध्येही बरीच दिशाभूल करणारी माहिती असते, ज्यावर क्लिक केल्यावर ग्राहकाला त्याच्या संमतीशिवाय एखादे उत्पादन मिळते. ग्राहकांना अशा प्रकारांपासून वाचवण्यासाठी आरबीआयने ही मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत.

## भाजपकडून रोहित पवारांच्या...


आंदोलन संपल्यानंतर या ठिकाणी घडलेल्या एका धक्कादायक प्रकारामुळे आता नवा वाद निर्माण झाला असून, राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे.
आमदार रोहित पवार यांनी ज्या ठिकाणी दोन दिवस अन्नत्याग आंदोलन केले, त्याच पवित्र पंढरपूर तीर्थक्षेत्राच्या आंदोलनस्थळी भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येत गोमूत्र शिंपडल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. भाजप किसान मोर्चाचे प्रदेश सचिव माउली हळणवर यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी आंदोलनस्थळावर गोमूत्र शिंपडून परिसर 'स्वच्छ' केला. यावेळी भाजप कार्यकर्त्यांनी महाविकास आघाडी आणि रोहित पवार यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. ''या राजकीय आंदोलनामुळे पंढरपूरचे पावित्र्य भंग पावले असून विठ्ठलाची ही भूमी अशुद्ध झाली आहे,'' असा अजब दावा माउली हळणवर यांनी केला. या आंदोलनामुळे शहरात प्रचंड वाहतूक कोंडी झाली आणि आषाढी वारीच्या पूर्वसंध्येला आलेल्या भाविकांची मोठी गैरसोय झाली, असा आरोप करत या आंदोलनात सहभागी झालेल्या सर्व नेत्यांवर व कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणीही त्यांनी पोलीस प्रशासनाकडे केली. रोहित पवार यांचे हे आंदोलन सुरू असताना, विरोधकांनी मात्र त्यांच्यावर 'नाटकबाजी' करत असल्याचा घणाघाती आरोप केला.

## राम मंदिरातील देणगी चोरी...

कर्मचाऱ्यांची चौकशी करेल. पथकाने पहिल्या दिवशी सोमवारी ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय यांच्याकडून देणगी चोरीबाबत माहिती घेतली होती. याव्यतिरिक्त, ने ट्रस्ट सदस्य गोपाल राव यांना बोलावून त्यांची चौकशी केली. पथकाने ४२ संशयित कर्मचाऱ्यांचीही चौकशी केली होती. करणी सेनेचे प्रदेशाध्यक्ष अभिनव सिंह यांनी राम मंदिरातील अर्पण केलेल्या वस्तूंच्या चोरीचे वर्णन हिंदुत्वाची हत्या असे केले. अयोध्येत बोलताना ते म्हणाले, दोषींना तुरुंगात पाठवले पाहिजे. तपास करताना पोलीस सामान्यतः सामान्य लोकांना तुरुंगात डांबतात, तरीही या प्रकरणात आरोपी मात्र मोकाट फिरत आहेत.

# खासदारांसोबतच ठाकरेंचे आमदार देखील करणार बंड?

## आकडा आला समोर



**मुंबई, दि. १६ वृत्तसंस्था**

महाराष्ट्र राज्याच्या राजकीय वतुर्ळातून पुन्हा एकदा एक अत्यंत खळबळजनक आणि मोठी बातमी समोर येत आहे. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या पक्षातील खासदार लवकरच बंड पुकारण्याच्या तयारीत असल्याची जोरदार चर्चा सुरू झाली आहे.
मिळालेल्या माहितीनुसार, ठाकरे गटातील काही खासदार पक्षाला रामराम ठोकून आपला एक वेगळा गट स्थापन करू शकतात, असा दावा केला जात आहे. विशेष म्हणजे संसदेचे आगामी हिवाळी अधिवेशन सुरू होण्यापूर्वीच हे खासदार हा मोठा आणि धक्कादायक निर्णय घेऊ शकतात, असे सूत्रांकडून सांगितले जात आहे.
एकीकडे ठाकरे गटाच्या खासदारांच्या संभाव्य बंडाची जोरदार चर्चा सुरू असतानाच, आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पक्षातील एका बड्या नेत्याने या संपूर्ण प्रकरणावर एक सर्वात मोठा दावा केला आहे.
या नेत्याच्या दाव्यानुसार, केवळ खासदारच नव्हे तर उद्धव ठाकरे यांच्या पक्षातील आमदारदेखील मोठ्या प्रमाणावर बंडखोरी करणार आहेत. विशेष बाब म्हणजे, बंड पुकारणाऱ्या आमदार आणि खासदारांचा निश्चित आकडाही या नेत्याने जाहीर केला असून यामुळे राजकीय क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

**बंडखोरांचा आकडा समोर**

या संपूर्ण प्रकरणावर प्रकाश टाकत शिंदे गटाचे नेते तथा आमदार कृपाल तुमाने यांनी एक मोठा गौप्यस्फोट केला आहे. त्यांच्या दाव्यानुसार, संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरू होण्याच्या आधीच ठाकरे गटाचे एकूण ७ खासदार पक्षापासून वेगळे होऊन स्वतःचा नवा गट स्थापन करणार आहेत.
हे सातही खासदार या निर्णयापर्यंत पोहोचले असून त्यांची मानसिक तयारी झाली आहे, असे तुमाने यांनी म्हटले आहे. खासदारांसोबतच त्यांनी आमदारांबाबतही मोठा दावा केला आहे. उद्धव ठाकरे यांच्याकडे सध्या असलेल्या एकूण १६ आमदारांपैकी तब्बल १४ आमदार देखील पक्षातून बाहेर पडणार आहेत, असा धक्कादायक दावा त्यांनी केला आहे.
'ऑपरेशन टायगर' अंतर्गत चर्चा पूर्ण ठाकरे यांच्या पक्षात होणारी ही संभाव्य फूट येत्या अवघ्या सहा ते सात दिवसांत प्रत्यक्ष पाहायला मिळू शकते, असा विश्वासही तुमाने यांनी व्यक्त केला आहे. जर हा दावा खरा ठरला, तर ठाकरे यांच्या पक्षातील ही आजवरची सर्वात मोठी दुसरी फूट मानली जाईल.
या संदर्भात अधिक माहिती देताना तुमाने म्हणाले की, आमची संबंधित सातही खासदारांसोबतची अंतिम फेरीतील चर्चा पूर्ण झाली आहे. 'ऑपरेशन टायगर' अंतर्गत गेल्या अनेक दिवसांपासून या संदर्भात गुप्त बैठका आणि चर्चांचे सत्र सुरू होते. आता ही चर्चा पूर्णपणे संपली असून निर्णयाची अंमलबजावणी होण्याची वेळ आली आहे, असे मोठे विधान त्यांनी केले आहे.

**ठाकरे गटाने दावे फेटाळले; संजय राऊत आणि आदित्य ठाकरेंचा पलटवार**

दरम्यान, शिंदे गटाकडून केल्या जाणाऱ्या या दाव्यांना ठाकरे गटाने पूर्णपणे फेटाळून लावले आहे. पक्षात कोणतीही संभाव्य फूट पडणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. ठाकरे गटाचे नेते तथा खासदार संजय राऊत यांनी यावर प्रतिक्रिया देताना, आमच्या पक्षातील सर्व खासदार आमच्यासोबतच सुरक्षित आणि एकनिष्ठ आहेत, असे सांगितले आहे.
तर दुसरीकडे, आमदार आदित्य ठाकरे यांनी देखील या चर्चांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन करत, आमचे खासदार आम्हाला सोडून कुठेही जाणार नाहीत, असा ठाम विश्वास व्यक्त केला आहे. दोन्ही बाजूंकडून दावे-प्रतिदावे केले जात असल्यामुळे, आता भविष्यात नेमके काय होणार आणि महाराष्ट्राचे राजकारण कोणते नवीन वळण घेणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# रस्ते कंत्राटदारावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल

**मुंबई :** जिल्ह्यातील माळिशरस तालुक्यातील तांदुळवाडी गावाजवळ रविवारी दुपारी एका पिक-अप वाहन रस्त्याच्या कडेला असलेल्या शेतातील विहिरीत पडून अपघात झाला होता. याप्रकरणी पोलिसांनी एका रस्ते कंत्राटदारावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला आहे. जिल्ह्यातील माळिशरस तालुक्यातील तांदुळवाडी गावाजवळ एक पिक-अप वाहन रस्त्याच्या कडेला असलेल्या विहिरीत पडून चार महिला आणि चार मुलांसह एकूण आठ जण ठार झाले, तर सात जण जखमी झाले होते. या भागात रस्ते विकासाचे काम करणाऱ्या नवजोत गढोक यांच्या कंपनीचे नावही एफआयआरमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. पोलिसांनी सांगितले की, रस्त्याच्या कडेला शेतातील विहीर असल्याची माहिती असूनही कंत्राटदाराने अपघातस्थळी आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यात कसूर केली. महामार्गालगत विहीर असल्याची कंत्राटदाराला कल्पना होती, परंतु त्यांनी त्या ठिकाणी संरक्षक कठडे, धोक्याच्या सूचना देणारे फलक, गतिरोधक आणि रिफ्लेक्टर्स बसवले नाहीत.

# खरात, वैद्य ते मौलाना! पुरोगामी महाराष्ट्रातील ५३ भोंदूबाबांची यादी

**मुंबई, दि. १६ वृत्तसंस्था**

अशोक खरात प्रकरणानंतर राज्यभर अंधश्रद्धेविरोधात जनजागृती वाढली असून अनेक पीडित व्यक्ती पुढे येऊ लागल्या आहेत. काही ठिकाणी नागरिकांनी स्वतःहून तक्रारी केल्या, तर अनेक प्रकरणांमध्ये महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या प्रयत्नांमुळे गुन्हे दाखल झाले आहेत.
नाशिकमधील भोंदू अशोक खरात प्रकरणामुळे राज्यभर खळबळ उडाल्यानंतर अवघ्या सव्वा दोन महिन्यांत महाराष्ट्रात ५३ भोंदूबाबांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या प्रकरणांमध्ये महिलांचे लैंगिक शोषण, आर्थिक फसवणूक आणि अंधश्रद्धेच्या माध्यमातून नागरिकांची दिशाभूल केल्याचे गंभीर प्रकार समोर आले आहेत. त्यामुळे पुरोगामी महाराष्ट्रात भोंदूगिरीचे वाढते जाळे चिंतेचा विषय ठरले आहे. अशोक खरात प्रकरणानंतर राज्यभर अंधश्रद्धेविरोधात जनजागृती वाढली असून अनेक पीडित व्यक्ती पुढे येऊ लागल्या आहेत. काही ठिकाणी नागरिकांनी स्वतःहून तक्रारी केल्या, तर अनेक प्रकरणांमध्ये महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या प्रयत्नांमुळे गुन्हे दाखल झाले आहेत.
या ५३ प्रकरणांचा अभ्यास केला असता, विविध धर्मांशी संबंधित भोंदूबाबांविरोधात कारवाई झाल्याचे दिसून येते. त्यामुळे अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम केवळ एका धर्मापुरते मर्यादित असल्याचा आरोप पुन्हा एकदा खोटा ठरल्याचे अंनिसकडून सांगितले जात आहे. या घटनांमधून ग्रामीण भागाबरोबरच शहरी भागातील नागरिकही भोंदूबाबांच्या जाळ्यात अडकत असल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेषतः महिलांचे शारीरिक, मानसिक आणि आर्थिक शोषण झाल्याची अनेक प्रकरणे समोर आली आहेत. भीती, सामाजिक प्रतिष्ठा आणि बदनामीच्या धास्तीमुळे अनेक पीडित महिला अजूनही पुढे येण्यास तयार नसल्याचे दिसून येत आहे. मात्र, अशोक खरात प्रकरणानंतर अनेक महिलांना न्यायासाठी लढण्याचे धैर्य मिळाले आहे. त्यामुळे अजूनही अशा फसवणुकीचे बळी ठरलेल्या नागरिकांनी पुढे येऊन तक्रार करण्याची गरज असल्याचे सामाजिक कार्यकर्त्यांचे मत आहे.



समाजातील अंधश्रद्धा, फसवणूक आणि अमानुष प्रथा रोखण्यासाठी शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने १८ वर्षे संघर्ष केला. या लढ्यानंतर २०१३ मध्ये 'महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंधक कायदा' अस्तित्वात आला. असा कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले.
मात्र, या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात शासन अनेकदा अपयशी ठरत असल्याची टीका होत आहे. तरीही अंनिस आपल्या मर्यादित साधनसामग्रीतून जनजागृती, प्रबोधन आणि कायद्याची माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्याचे काम सातत्याने करत आहे.

# तुकाराम मुंढेंची पुन्हा बदली? मुख्यमंत्र्यांना थेट इशारा

**मुंबई, दि. १६ वृत्तसंस्था**

अन्न व औषध प्रशासन (एफडीए) आयुक्तपदी नियुक्ती झाल्यापासून तुकाराम मुंढे यांनी राज्यभर भेसळखोर आणि नियमभंग करणाऱ्यांविरोधात धडक कारवाई सुरू केली आहे.
अवघ्या काही दिवसांत कोट्यवधी रुपयांचा भेसळयुक्त माल जप्त करण्यात आल्याने अनेक व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे. अशातच त्यांच्या संभाव्य बदलीच्या चर्चांना वेग आला असून, अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने सरकारला थेट इशारा दिला आहे.
अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य विजय सागर यांनी सांगितले की, तुकाराम मुंढे यांची कारवाई ग्राहकांच्या हिताची असून त्यांना पूर्ण पाठिंबा आहे. व्यापारी वर्गाकडून त्यांच्या बदलीसाठी सरकारवर दबाव आणला जात असल्याची चर्चा आहे. मात्र सरकारने अशा कोणत्याही दबावाला बळी पडू नये, अशी मागणी त्यांनी केली.
यासाठी राज्यभर जनजागृती मोहीम, स्वाक्षरी अभियान राबविण्यात येणार असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना यासंदर्भात पत्रही देण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच या विषयावर चर्चा करण्यासाठी मुंढे यांची मंत्रालयात भेट घेणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

**एफडीएच्या कारवायांना वेग**

तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर एफडीएने राज्यभर मोठ्या प्रमाणावर कारवाया सुरू केल्या आहेत. यापूर्वी मनुष्यबळाच्या कमतरतेचे कारण देत मर्यादित कारवाया करणारा विभाग आता रोज छापे टाकत असल्याने अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. भेसळयुक्त अन्नपदार्थ, बनावट औषधे आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येत आहे.

# आंचलच्या आरोपांना सक्षमच्या आईचे प्रत्युत्तर; थेट चॅटिंगच दाखवले

**मुंबई, दि. १६ वृत्तसंस्था**

नांदेड मधील गाजलेल्या सक्षम ताटे हत्याकांडानंतर पुन्हा एकदा या प्रकरणाने नवे वळण घेतले आहे. सक्षमची प्रेयसी आंचल मामिडवार हिने सक्षमच्या लहान भावावर गैरवर्तनाचे गंभीर आरोप केल्यानंतर आता सक्षमच्या आईने माध्यमांसमोर येत हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. इतकेच नव्हे, तर आंचल आणि सक्षमच्या भावामधील मोबाईल चॅट दाखवत त्यांनी आपल्या मुलावरचे आरोप निराधार असल्याचा दावा केला आहे. सक्षमच्या हत्येनंतर काही महिने त्याच्या कुटुंबासोबत राहिल्यानंतर आपण घर सोडल्याचे सांगताना आंचलने गंभीर आरोप केले होते. सक्षमचा लहान भाऊ जाणीवपूर्वक आपल्याला स्पर्श करत होता, त्याच्या वागणुकीबद्दल आपण सक्षमच्या आईला सांगितले; मात्र कुटुंबीयांनी विश्वास ठेवला नाही, असा दावा आंचलने केला. पुढे काही अनुचित घडले असते, तरीही माझ्यावर विश्वास ठेवला गेला नसता, म्हणूनच मी घर सोडल्याचे तिने स्पष्ट केले. आंचलच्या आरोपांनंतर सक्षमच्या आईने माध्यमांशी संवाद साधत आपल्या दुसऱ्या मुलावर करण्यात आलेले आरोप फेटाळले. आमचं एक लेकरू आधीच गेलं आहे. आता दुसऱ्या मुलालाही बदनाम करू नये.
यावेळी त्यांनी आंचल आणि सक्षमच्या भावामधील मोबाईल चॅटही दाखवले. त्यामध्ये आंचलकडून बोल ना बाळाः अशा स्वरूपाचे संदेश पाठवण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. या चॅटवरून दोघांमध्ये नियमित संवाद होत असल्याचे दिसून येत असल्याचेही त्यांनी सांगितले. सक्षमच्या आईच्या मते, त्यांचा मुलगा आंचलला नेहमी वहिनी म्हणूनच संबोधायचा आणि तिच्याशी आदराने वागत होता. त्यामुळे त्याच्यावर करण्यात आलेले गैरवर्तनाचे आरोप पूर्णपणे खोटे असल्याचा त्यांनी पुनरुच्चार केला.

# पवनराजे निंबाळकर हत्याकांड प्रकरणात मोठी अपडेट समोर

**मुंबई, दि. १६ वृत्तसंस्था**



महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक वतुर्ळाला हादरवून सोडणाऱ्या बहुचर्चित पवनराजे निंबाळकर हत्याकांड प्रकरणात आज, १६ जून रोजी एक अत्यंत महत्त्वाची अपडेट समोर आली आहे.
गेल्या दोन दशकांपासून प्रलंबित असलेल्या या खटल्याचा अंतिम निकाल आज मुंबईतील विशेष सत्र न्यायालयाकडून जाहीर होण्याची दाट शक्यता वर्तवली जात होती. मात्र, न्यायालयाने आज निकाल न देता पुढील तारीख जाहीर केल्यामुळे या प्रकरणाचा फैसला आता आणखी काही दिवस लांबणीवर पडला आहे.

**कोर्टात काय घडले?**

आज मुंबईतील विशेष सत्र न्यायालयात या खटल्याची महत्त्वाची सुनावणी पार पडली. या खटल्यातील मुख्य आरोपी आणि माजी खासदार पद्मसिंह पाटील यांच्यासह सर्व ९ आरोपींना न्यायालयासमोर हजर करण्यात आले होते. माजी खासदार पद्मसिंह पाटील यांची प्रकृती अत्यंत खालावलेली असल्याने, त्यांना विशेष वैद्यकीय सुविधेसह रुग्णवाहिकेतून (एम्बुलन्स) सेशन कोर्टात आणण्यात आले होते.
दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि प्रदीर्घ प्रतिक्षेनंतरही आज न्यायालयाने अंतिम निकाल वाचन केले नाही. ङ्गनिकालाची प्रत पूर्णपणे तयार करण्यासाठी न्यायालयाला आणखी काही दिवसांचा अवधी आवश्यक आहे, असे स्पष्ट करत न्यायमूर्तींनी या प्रकरणाचा अंतिम निकाल आता २० जून रोजी सुनावला जाईल, असे जाहीर केले.
पवनराजे निंबाळकर यांच्या हत्येची ही थरारक घटना तब्बल २० वर्षांपूर्वी घडली होती. या दोन दशकांच्या काळात या हायप्रोफाइल खटल्यामध्ये अनेक नाट्यमय घडामोडी घडल्या. साक्षीदारांच्या उलटतपासण्या, विविध तांत्रिक याचिका आणि कायदेशीर विलंबाच्या चक्रव्यूहामुळे हा खटला वर्षानुवर्षे रेंगाळत गेला. या प्रकरणात माजी खासदार पद्मसिंह पाटील यांच्यासह एकूण ९ जणांवर हत्येचा कट रचल्याचा आणि अंमलबजावणी केल्याचा गंभीर आरोप आहे. निकालाच्या पार्श्वभूमीवर पवनराजे निंबाळकर यांचे सुपुत्र आणि खासदार ओमराजे निंबाळकर यांनी न्यायालयाच्या आवारात प्रसारमाध्यमांशी बोलताना आपल्या तीव्र आणि भावूक भावना व्यक्त केल्या.ङ्गमाझे वडील पवनराजे निंबाळकर साहेब आणि त्यांचे निष्पाप चालक समद काझी यांची अत्यंत निष्ठूरपणे हत्या करून आज सुमारे २० वर्षे पूर्ण झाली आहेत. आमची दोन्ही कुटुंबे आजही न्यायाच्या प्रतीक्षेत डोळे लावून बसली आहेत. आज न्यायदेवता योग्य न्याय करेल आणि ज्यांनी रक्ताच्या नात्याला काळीमा फासला, त्यांचा आज फैसला होईल अशी आम्हाला मोठी अपेक्षा होती.ङ्ख
ओमराजे यांनी पुढे बोलताना या लढाईचे स्वरूप स्पष्ट केले आणि म्हणाले, ङ्गहा खटला केवळ एका हत्येचा खटला नाही, तर मस्तवाल राजकीय शक्ती आणि पैशाच्या मस्तीवर सर्वसामान्य लोकांना आपले गुलाम समजणाऱ्या, लोकांच्या जीवाची काहीच किंमत न करणाऱ्या आणि रक्ताच्या नात्याचा क्रूरपणे घात करणाऱ्या विकृत मानसिकतेविरुद्धचा हा आमचा प्रदीर्घ संघर्ष आहे.ङ्ख
न्यायालयाने दिलेल्या नवीन तारखेनुसार आता येत्या २० जून रोजी या ऐतिहासिक आणि वादग्रस्त खटल्याचा निकाल लागणार आहे. या निकालाकडे केवळ निंबाळकर कुटुंबाचेच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राच्या राजकीय वतुर्ळाचे लक्ष वेधले गेले आहे.

## मोर्चेबांधणी

## राजकारणात मोठी उलथापालथ !

# कॉंग्रेसला पडले सर्वात मोठे खिंडार




**मुंबई, दि. १६ वृत्तसंस्था**

राज्यात सध्या विधान परिषद निवडणुकीचे वारे जोरात वाहत असून राजकीय वातावरण कमालीचे तापले आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांनी आपली मोर्चेबांधणी तीव्र केली असून, मतांची बेगमी करण्यासाठी नगरसेवकांना आपल्या बाजूने वळवण्याचे प्रयत्न युद्धपातळीवर सुरू आहेत.
निवडणुकीच्या या धामधुमीत मोठ्या प्रमाणावर राजकीय घोडेबाजार आणि पक्षांतराचे नाट्य पाहायला मिळत आहे. यामध्ये सध्यातरी सत्ताधारी महायुतीला मोठे यश मिळताना दिसत असून, विरोधकांना मात्र एकामागून एक धक्के बसत आहेत.
गोंदिया, अकोला, हिंगोली आणि बुलढाणा या जिल्ह्यांमध्ये काँग्रेस आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला मोठे खिंडार पडले असून, अनेक नगरसेवक सत्ताधाऱ्यांच्या गळाला लागल्याने राजकीय वतुर्ळात प्रचंड खळबळ उडाली आहे.
गोंदिया-भंडारा विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर स्थानिक स्वराज्य संस्थांमधील लोकप्रतिनिधी फोडण्याचे राजकारण रंगात आले आहे. गोंदिया जिल्ह्यातील देवरी तालुक्यातील काँग्रेस पक्षाचे एक जिल्हा परिषद सदस्य आणि दोन नगरसेवक हे भाजपच्या गळाला लागल्याची खात्रीशीर माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.
विशेष म्हणजे, पक्षांतराची ही शक्यता केवळ चर्चेपुरती मर्यादित नसून, हे तिन्ही लोकप्रतिनिधी भाजपच्या इतर नगरसेवकांसोबत गुप्त ठिकाणी सहलीला गेल्याचे समजते. या घडामोडींमुळे गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यातील काँग्रेसच्या गोटात चिंतेचे वातावरण पसरले असून राजकीय हालचालींना वेग आला आहे.
अकोला जिल्ह्यात महायुतीमधील अंतर्गत आणि बाहेरील पक्षांना धक्का देणारी एक मोठी घडामोड घडली आहे. बार्शी टाकळी नगरपंचायतीमधील तब्बल १० नगरसेवकांनी एकत्र येत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत (शिंदे गट) जाहीर प्रवेश केला. यामध्ये काँग्रेसच्या ४, अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या २ आणि ४ अपक्ष नगरसेवकांचा समावेश आहे.
शिवसेना जिल्हाप्रमुख चंद्रशेखर पांडे गुरुजी यांच्या पुढाकाराने हा संपूर्ण पक्षप्रवेश मुंबईतील मुख्यमंत्र्यांच्या 'नंदनवन' या अधिकृत निवासस्थानी पार पडला. विधान परिषद निवडणुकीच्या तोंडावर अकोल्यात झालेल्या या 'खेला'मुळे काँग्रेस आणि अजित पवार गटाला मोठा झटका बसला आहे. नागपूर विधान परिषद निवडणुकीची लढत अत्यंत प्रतिष्ठेची झाली आहे. महाविकास आघाडीकडून काँग्रेसचे अतुल लोंढे हे अधिकृत उमेदवार म्हणून मैदानात आहेत, तर महायुतीकडून भाजपचे राजीव पोतदार त्यांच्यासमोर उभे आहेत. अशा अटीतटीच्या लढतीत (चरहरीरीहींर झेश्रळींळली) प्रत्येक मत महत्त्वाचे झाले असतानाच, हिंगणा नगरपंचायतीमधील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे ६ नगरसेवक अचानक 'नॉट रिचेबल' झाले आहेत. मतदानाच्या तोंडावरच हे नगरसेवक गायब झाल्याने महाविकास आघाडीचे टेन्शन कमालीचे वाढले असून, याचा फटका लोंढे यांच्या उमेदवारीला बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे.
बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर नगरपालिकेत जिल्ह्यासह राज्याचे लक्ष वेधून घेणारी एक मोठी उलथापालथ झाली आहे. येथील काँग्रेसच्या ११ पैकी तब्बल ९ नगरसेवकांनी थेट शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नगराध्यक्ष किशोर गारोळे यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवत त्यांना अधिकृत पाठिंबा जाहीर केला आहे. या नगरसेवकांनी पत्रकार परिषद घेऊन आपल्या निर्णयाची घोषणा केली.
यापूर्वी झालेल्या मेहकर नगरपालिका निवडणुकीत शिवसेना (ठाकरे गट), शिवसेना (शिंदे गट) आणि काँग्रेस हे तिन्ही पक्ष स्वतंत्र लढले होते. त्यावेळी ठाकरे गटाचे ७ नगरसेवक निवडून आले होते आणि त्यांनी नगराध्यक्षपद मिळवले होते.
काँग्रेसकडे ११ तर शिंदेसेनेकडे ९ नगरसेवक होते. सुरुवातीला सत्ता स्थापनेसाठी काँग्रेस आणि शिंदेसेनेने एकत्र येत गट स्थापन केला होता आणि उपाध्यक्षपदासह सर्व समित्या आपल्या ताब्यात ठेवल्या होत्या.
मात्र, केवळ सहा महिन्यांतच शहराच्या विकासाचे कारण देत काँग्रेसच्या गटात मोठी फूट पडली. नगरपालिका उपाध्यक्षांसह ९ नगरसेवकांनी आता थेट ठाकरे गटाला पाठिंबा दिला आहे. यामुळे नगरपालिकेत महाविकास आघाडीचे संख्याबळ ७ वरून थेट १६ वर पोहोचले असून, त्यांना स्पष्ट बहुमत मिळाले आहे. तर दुसरीकडे विरोधी बाकावर असलेल्या शिंदे सेनेला हा अतिशय मोठा धक्का मानला जात आहे.
मेहकर हा मतदारसंघ केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांचे 'होम टाऊन' (गृह मैदान) म्हणून ओळखला जातो. या मतदारसंघातून त्यांचा आमदार सलग तीन वेळा निवडून आलेला आहे. अशा बालेकिल्ल्यात आता आमदार ठाकरे गटाचा आणि नगरपालिकेची सत्ताही पूर्णपणे ठाकरे गटाच्या वर्चस्वाखाली आल्याने, या राजकीय भूकंपाची चर्चा संपूर्ण महाराष्ट्रभर रंगली आहे.

## महत्त्वाचे

### मोदींचा मोबाईल मध्यरात्री अचानक खणाणला



**नवी दिल्ली:** गेल्या काही दिवसांपासून कोट्यवधी भारतीयांच्या मोबाईलमध्ये अचानक सायरन वाजत आहेत. मोबाईलच्या स्क्रिनवर इमर्जन्सी मेसेज दिसत आहेत. याला सेल ब्रॉडकास्ट अलर्ट सिस्टिम म्हटलं जातं. केंद्र सरकारनं पुढील आदेशापर्यंत ही यंत्रणा बंद केली आहे. देशभरात यशस्वी चाचणी झाल्यानंतर ही सेवा १२ जून २०२६ नंतर पुढील आदेश येईपर्यंत रोखण्यात आलेली आहे. आपत्कालीन संदेश पाठवून नागरिकांना अलर्ट करण्याची सेवा थांबवण्यात आली आहे. मध्यरात्रीच्या सुमारास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मोबाईल नंबरवर एमर्जन्सी अलर्ट गेला होता. या अजब घटनेनंतर सरकारला ही सेवा रोखण्याचा निर्णय घ्यावा लागल्याची माहिती समोर आली आहे. याबद्दलचं वृत्त द हिंदूनं दिलं आहे.हरियाणा, उत्तर प्रदेशच्या आपत्ती व्यवस्थापन विभागांनी मध्यरात्रीच्या सुमारास अलर्ट जारी केला होता.

# उरलेल्यांनी रिपब्लिकन पक्षात यावे

## टीएमसीच्या खासदार-आमदारांना आठवलेंचे आवाहन

**नवी दिल्ली : दि. १६ वृत्तसंस्था**

पश्चिम बंगालच्या राजकारणात मोठ्या घडामोडी घडत आहेत. अश्यातच, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी तृणमूल काँग्रेसच्या उर्वरित खासदार आणि आमदारांना रिपब्लिकन पक्षात प्रवेश करण्याचे आवाहन केले आहे. तृणमूल काँग्रेसमधील कथित बंडखोरीच्या पार्श्वभूमीवर त्यांनी ही प्रतिक्रिया दिली.



रामदास आठवले यांनी म्हटले की, ''तृणमूल काँग्रेसचे काही खासदार पक्ष सोडण्याच्या तयारीत असल्याची माहिती आधी मिळाली असती तर त्यांनी त्यांना रिपब्लिकन पक्षात येण्याचे आवाहन केले असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा असलेल्या रिपब्लिकन पक्षात तृणमूल काँग्रेसच्या उर्वरित खासदारांनी सहभागी व्हावे,'' असे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी दावा केला की, ''तृणमूल काँग्रेसच्या २० खासदारांनी पक्षाचे नेतृत्व सोडून स्वतंत्र राजकीय भूमिका स्वीकारली आहे. या पार्श्वभूमीवर उर्वरित खासदारांनीही रिपब्लिकन पक्षात प्रवेश करण्याचा विचार करावा,'' असे आवाहन त्यांनी केले.

रामदास आठवले यांनी केवळ खासदारांनाच नव्हे तर पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेसच्या आमदारांनाही रिपब्लिकन पक्षात येण्याचे आवाहन केले. तृणमूल काँग्रेसविरोधात भूमिका घेणाऱ्या आमदारांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर आधारित राजकारणासाठी मध्ये सहभागी व्हावे, असे त्यांनी म्हटले.

आठवले यांनी तृणमूल काँग्रेसमधील असंतोषासाठी ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वशैलीला जबाबदार धरले. त्यांच्या नेतृत्वाखालील दबावामुळे अनेक लोकप्रतिनिधी उघडपणे भूमिका घेऊ शकत नव्हते, असा दावा त्यांनी केला. मात्र बदललेल्या राजकीय परिस्थितीत काही खासदार आणि आमदारांनी वेगळी वाट निवडल्याचे त्यांनी नमूद केले.

तृणमूल काँग्रेसमधून बाहेर पडलेल्या लोकप्रतिनिधींनी घेतलेल्या निर्णयाचे स्वागत करताना रामदास आठवले यांनी पुन्हा एकदा उर्वरित खासदार आणि आमदारांना रिपब्लिकन पक्षात येण्याचे आवाहन केले. त्यांच्या या विधानानंतर पश्चिम बंगालच्या राजकारणातील घडामोडींवर नव्याने चर्चा सुरू झाली आहे.

## ट्रम्प यांचा दावा फुसका! करारात अखेरच्या क्षणी गेम

**तेहरान : दि. १६ वृत्तसंस्था**

अमेरिका आणि इराण यांच्यात गेल्या १०७ दिवसांपासून सुरू असलेल्या भीषण युद्धाचा शेवट करण्यासाठी शांती कराराची घोषणा झाली. या करारानंतर जगानं सुटकेचा निश्वास टाकला. आता या घटनाक्रमात नाट्यमय वळण आलं आहे. युद्ध संपल्याची घोषणा झाल्यानंतर अवघ्या काही तासांनंतर इराणनं एक मोठा दावा केला आहे. होर्मुझ सामुद्रधुनीतून होणाऱ्या व्यावसायिक जहाजांकडून इराण आणि ओमान कर किंवा महसूल आकारू शकतात, अशी तरतूद अमेरिकेसोबत झालेल्या करारात असल्याचा दावा इराणनं केला आहे.

इराणची सरकारी वृत्तसंस्था फार्सनुसार, अखेरच्या क्षणी



ऐतिहासिक कराराच्या मसुद्यात काही महत्त्वाचे आणि मोठे बदल केले गेले. त्यामुळे अमेरिका बॅकफूटवर गेली. अखेरच्या क्षणी गेम झाल्यानं २० टक्के तेल वाहतूक होत असलेल्या होर्मुझच्या सामुद्रधुनीवरील इराणचं वर्चस्व अधिक मजबूत होणार आहे.

इराणी सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, चर्चा अंतिम टप्प्यात असताना कराराच्या मसुद्यात बदल करण्यात आला. त्यामुळे इराणला फायदा झाला. मसुद्यात करण्यात आलेल्या बदलांमुळे होर्मुझच्या सामुद्रधुनीवरील इराण आणि ओमानचं सार्वभौमत्व अधोरेखित झालं आहे.

## अमेरिका इराणला देणार नुकसानभरपाई?

### ३०० अब्ज डॉलरच्या चर्चेने खळबळ

**नवी दिल्ली : दि. १६ वृत्तसंस्था**

अमेरिका आणि इराणमध्ये शांतता करारावर अंतिम चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे. १९ जूनला दोन्ही देशांचे प्रतिनिधी स्वित्झर्लंडच्या जिनिव्हा येथे अंतिम करारावर स्वाक्षरी करतील. पण यापूर्वीच एक मोठा वाद निर्माण झाला आहे. इराणला अमेरिकेकडून मिळणाऱ्या कथित ३०० अब्ज डॉलरच्या चर्चांना उधाण आले आहे. यामुळे तणाव निर्माण झाला असून हा वाद व सुटल्यास करार होणार नाही असे सांगितले जात आहे.

कथित चर्चांनुसार, अमेरिका इराणच्या पुनर्बांधणीसाठी आणि विकासासाठी ३०० अब्ज डॉलर्सची रक्कम देणार आहे. अमेरिकेच्या मते, ही एख प्रकारची गुंतवणूक असून ती पायाभूत सुविधांवर खर्च केली जाईल आणि याचा चांगला फायदा होईल. पण अमेरिकेने



याला पुर्नबांधणी निधी म्हटले आहे.

पण इराण च्या मते, ही रक्कम युद्धात हार झाल्यामुळे नाइलाजाने दंडाच्या स्वरुपात देण्याचे अमेरिकेने मान्य केले आहे. इराणचे वाटाघाटी चर्चेचे प्रमुख मेहदी मोहम्मद यांनी याला नुकसानभरपाई संबोधले आहे. युद्धात झालेल्या पायाभूत सुविधांच्या नुकसानीची भरपाई अमेरिका यातून करत आहे. याला इराण अमेरिकेवरील मोठा विजय मानत आहे.

दरम्यान अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला कोणतेही पैसे दिले जाणार नसल्याचे सांगितले. त्यांनी ट्रुथ सोशल मीडियावर पोस्ट करत म्हटले की, इराणने कोणत्याही प्रकारची अण्वस्त्रे न बाळगण्याचे आश्वासन दिले आहे. पण अमेरिका इराणला ३०० दशलक्ष डॉलरची बातमी खोटी आहे. ही बातमी डेमोक्रॅट्सने पसरवली आहे.

मात्र, ट्रम्प यांनी ३०० अब्ज ऐवजी, ३०० दशलक्ष डॉलरचा उल्लेख केल्यामुळे मोठी खळबळ उडाली आहे. अमेरिका इराणला नेमकी किती रक्कम देणार आहे? नुकसान भरपाई देणार आहे का? असे प्रश्न निर्माण झाले आहेत.

यापूर्वी अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जेडी व्हान्स यांनी एका मुलाखतीत अमेरिका इराणला थेट पैसे देणार नसल्याचे सांगितले होते. तर अरब देशांचा गट इराणला मदत करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते. परंतु यासाठी इराणला करारतील सर्व अटी पाळाव्या लागतील असेही त्यांनी नमूद केले.

## साधी ग्राम पंचायत न जिंकलेल्या पक्षात आता अचानक २० खासदार

**कोलकाता: दि. १६ वृत्तसंस्था**

पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकीनंतर मोठा राजकीय भूकंप झाला. राज्यात १५ वर्षे सत्ता भोगणाऱ्या तृणमूल काँग्रेसचे बहुतांश आमदार, खासदार फुटले. लोकसभेतील पक्षाच्या २८ पैकी २० बंडखोर खासदारांनी रविवारी अनपेक्षित खेळी केली. अर्थात नॅशनलिस्ट सिटिझन्स पार्टी ऑफ इंडिया या अज्ञात पक्षात बंडखोरांनी प्रवेश केला. यानंतर कोणाच्याही ध्यानीमनी नसताना, एक अज्ञात पक्ष लोकसभेतील पाचव्या क्रमांकाचा पक्ष ठरला.

नॅशनलिस्ट सिटिझन्स पार्टी ऑफ इंडियाची नोंदणी त्रिपुरात झालेली आहे. निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार हा पक्ष मान्यताप्राप्त नाही. पक्षाला निवडणूक आयोगाकडून कोणतीही अधिकृत मान्यता मिळालेली नाही. २०२३ मध्ये ग्राम पंचायत निवडणुकीत या पक्षानं बंगालमध्ये २ उमेदवार दिले होते. दोघेही पराभूत झाले. दोघांना




मिळून केवळ ८२२ मतं मिळाली. या पक्षाला आतापर्यंत ग्राम पंचायत निवडणूकदेखील जिंकता आलेली नाही.

अर्थात नॅशनलिस्ट सिटिझन्स पार्टी ऑफ इंडिया च्या बंगालमधील नोंदणीकृत पत्त्यावर पाहिलं असता, हावडा जिल्ह्यातील संकरेल परिसरात एक साधारण घर दिसून येतं. हे घर उत्तीय कुंडू आणि त्यांची पत्नी शेवली कुंडू यांच्या नावावर आहे. हे दाम्पत्य ८ वर्षांपूर्वी नदिया जिल्ह्यातून येऊन इथे स्थायिक झालं. घराच्या मुख्य प्रवेशद्वारावर एक फलक आबे. त्यात उत्तीय कुंडू यांच्या नावाखाली बांग्ला वृत्तपत्राचे खासदार, गणिताचे शिक्षक, ऑडिटर, आरोग्य सल्लागार आणि योग स्वयंसेवक असा उल्लेख आहे. तर शेवली कुंडू यांच्या नावाखाली कोलकाता उच्च न्यायालयाच्या वकील आणि भूखंड सर्व्हे डिप्लोमाधारक अशी ओळख आहे.

घराच्या एका भिंतीवर जागो बिस्वा अशी घोषणा लिहिलेली आहे. तर दुसऱ्या भिंतीवर असंघटित महिला कामगार संघ असं लिहिलेलं आहे.

शेजाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, या घरातून एक एनजीओदेखील चालवली जाते. ही संस्था महिला बचत गटांना प्रशिक्षण देते. सोमवारी सकाळपासून या घराबाहेर केंद्रीय राखीव पोलीस दलाचे जवान मोठ्या संख्येनं पाहायला मिळाले. तृणमूलच्या २० बंडखोर खासदारांना आसरा देणाऱ्या अर्थात नॅशनलिस्ट सिटिझन्स पार्टी ऑफ इंडिया ची सध्या सर्वत्र चर्चा आहे. सोमवारी पक्षानं सोमवारी सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली. २० लोकसभा मतदारसंघांसह अर्थात नॅशनलिस्ट सिटिझन्स पार्टी ऑफ इंडिया बंगालमधील सर्वात मोठी संसदीय शक्ती बनली आहे, असा उल्लेख पोस्टमध्ये आहे. पक्षानं एक ग्राफिकदेखील शेअर केलं आहे. त्यात बंगालमधील ४२ लोकसभेच्या जागांचं वर्गीकरण आहे. त्यात अर्थात नॅशनलिस्ट सिटिझन्स पार्टी ऑफ इंडियाकडे २०, भाजपकडे १२, तृणमूल काँग्रेसकडे ८ आणि काँग्रेसकडे १ जागा आहे.

### मावशीने इन्स्टावर गुपचूप झालेल्या लग्नाचे फोटो पाहिले अन् मृत्यूचे गूढ उकलले

**बंगळुरू:** नात्याचा थरकाप उडवणारा शेवट झाला आहे. महिलेच्या पतीला तिच्या दुसऱ्या लग्नाची कुणकुण लागली. त्यानंतर त्यानं पत्नीला संपवलं. आरोपीनं हे प्रकरण आत्महत्येचं असल्याचं दाखवण्याचा प्रयत्न केला. पण त्यात त्याला अपयश आलं. ही घटना कर्नाटकची राजधानी बंगळुरुत घडली आहे. मृत महिलेचं नाव भवानी असं आहे. ती तुलनीनगरात वास्तव्यास होती. जवळच असलेल्या एका मोबाईलच्या दुकानात ती काम करायची. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भवानी रिक्षानं कामाला जायची. चंद्रशेखरच्या रिक्षातून तो बऱ्याचदा प्रवास करायची. याच प्रवासादरम्यान दोघांची ओळख झाली. मैत्रीचं रुपांतर पुढे प्रेमात झालं. काही महिन्यांनी त्यांनी एका मंदिरात गुपचूप लग्न केलं. लग्नानंतरही दोघे वेगवेगळे राहायचे. भवानी आणि चंद्रशेखर उर्फ चंदन यांनी आपापल्या कुटुंबांना लग्नाबद्दल सांगितलं होतं. भवानीचे कोणाशी तरी प्रेम संबंध आहेत, इतकीच माहिती तिच्या आई, वडिलांना होती. पण तिनं चंदनशी लग्न केल्याचं कुटुंबाला माहीत नव्हतं. कुटुंबानं तिच्यासाठी स्थळ पाहण्यास सुरुवात केली. एक मुलगादेखील पसंत केला. कुटुंबाच्या दबावामुळे भवानी लग्नासाठी तयार झाली. याबद्दल चंदनला समजताच त्यानं आक्षेप घेतला.

## २० सहकारी, फार्महाऊस पार्टी, मध्यरात्री एकाचा संशयास्पद मृत्यू

**हैदराबाद : दि. १६ वृत्तसंस्था**

तेलंगणात चौतुप्पल येथील एका फार्महाऊसवरील स्विमिंग पूलमध्ये २७ वर्षीय सॉफ्टवेअर कर्मचारी गंडला रामू याची बॉडी आढळल्यानंतर अपघाताने बुडून मृत्यू झाल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला. मात्र त्याच्या वडिलांनी पोलिसांत दिलेल्या तक्रारीत त्याच्या सहकाऱ्यांनीच त्याची हत्या केल्याचा आरोप केला आहे. त्यांनी सहा जणांची नावे नमूद केली आहेत.

चौतुप्पलचे डीएसपी मधुसूदन रेड्डी यांनी टाइम्स ऑफ इंडियाला सांगितले की, मृत व्यक्तीच्या शरीरावर कोणतीही बाह्य किंवा अंतर्गत दुखापत, किंवा गळ्याभोवती फास बसल्याच्या खुणाही आढळल्या नाहीत. शवविच्छेदनाचा सविस्तर अहवाल आणि डायटम चाचणीचा अहवाल येणे अद्याप बाकी असले, तरी डॉक्टरांनी अधिकाऱ्यांना कळवले आहे की, मृत्यूचे प्राथमिक कारण बुडणे हेच असल्याचे दिसून येत आहे. अमली पदार्थांच्या सेवनाची शक्यता पडताळून पाहण्यासाठी पोलिसांनी पार्टीला उपस्थित असलेल्या सर्व १९ जणांची नार्कोटिक्स स्क्रीनिंग केली. ''सर्व चाचण्यांचे अहवाल नकारात्मक आले आहेत. कोणीही अमली पदार्थांचे सेवन केले नव्हते'' असे डीएसपींनी सांगितले. मात्र या गेट टूगेदरमध्ये मृत गंडला रामूसह सर्व २० जणांनी मद्यपान केले होते, ही कॉमन गोष्ट आढळली असल्याचा तपास अधिकाऱ्यांनी दुजोरा दिला. उप्पल येथील एका खाजगी कंपनीत काम करणारा गंडला रामू आपल्या १९ सहकाऱ्यांसह आणि टीम लीडरसोबत वीकेंडच्या सहलीसाठी चौतुप्पल येथील एका फार्महाऊसवर गेला होता.


## 'आम्हाला पाकिस्तानवर विश्वास नाही'

### इस्रायल असमाधानी, पाकच्या भूमिकेवर टीका

**नवी दिल्ली : दि. १६ वृत्तसंस्था**

अमेरिका-इराणमध्ये येत्या आठवड्यात स्वित्झर्लंडच्या जिनिव्हा येथे शांतता करारवर अंतिम स्वाक्षरी करण्यात येणार आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी याची घोषणा केली असून होर्मुझ मार्ग खुला केल्याचेही त्यांनी सांगितले. मात्र, या करारवर इस्त्रायल असमाधानी आहे. इस्त्रायलचे भारतातील राजदूत रुवेन यांनी अमेरिका-इराणमध्ये मध्यस्थीची भूमिका निभावणाऱ्या पाकिस्तानवर अविश्वास व्यक्त केला आहे.

एएनआय वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत अझर यांनी इस्त्रायलचा पाकिस्तानवर विश्वास नसल्याचे म्हटले. त्यांच्या मते, पाकिस्तानची आतापर्यंतची भूमिका नींदनीय राहिली आहे. पाकिस्तानने पॅलेस्टिनींच्या



समर्थनार्थ अनेक वेळा इस्त्रायलला विरोध केला आहे. पाकिस्तानच्या इस्त्रायलविरोधी वक्तव्यांकडे त्यांनी लक्ष वेधले. यामुळे यात काही नवीन नाही असेही ते म्हणाले. दरम्यान इस्त्रायल-पाकिस्तानमध्ये संबंध नसतानाही पाकिस्तान मध्यस्थीची भूमिका बजावू शकतो यावर त्यांनी टीका केली.

त्यांनी म्हटले की, पाकिस्तानचे आमच्यासोबत गेल्या अनेक दशकांपासून तणावाचे संबंध राहिले आहेत. गेल्या एप्रिल महिन्यात पाकिस्तानचे संरक्षण मंत्री आसिफ ख्वाजा यांनी इस्त्रायलला कॅन्सर संबोधत मानतेसाठी धोकादायक ठरवले होते. त्यांनी इस्त्रायलसाठी अपशब्दांचा वापर केला होता. यावर अझर यांनी नाराजी व्यक्त करत पाकिस्तानच्या तटस्थ भूमिका आणि विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उभे केले.

दुसरीकडे इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी देखील अमेरिका-इराण शांतता कराराला विरोध केला आहे. इस्त्रायल या कराराचा भाग नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. तसेच इराणला कोणत्याही प्रकारची अण्वस्त्रे बाळगू दिली जाणार नाही असे त्यांनी ठणकावून सांगितले. नेतन्याहूंनी युद्ध अजूनही सुरु असल्याचा इशारा दिला.

तसेच ट्रम्प यांच्याशी संबंधावर भाष्य करताना म्हटले की, आम्ही दोघे अनेक मुद्द्यावर एकमत होतो, पण याचा अर्थ सर्वच मुद्द्यांवर समहती असेल असे नाही. इराणवर इस्त्रायलची भूमिका वेगळी असू शकते असे त्यांनी म्हटले.

### मे महिन्यात घाऊक महागाईचा दर ४३ महिन्यांच्या उच्चांकावर

**नवी दिल्ली:** सामान्य जनतेवर महागाईचा बोजा सातत्याने वाढत असून धान्य, भाजीपाला, कपड्यांपासून ते प्रवासापर्यंत सर्वच गोष्टी खिशाला जड होऊ लागल्या आहेत. अशातच मे महिन्यातील घाऊक महागाईचे आकडे समोर आले आहेत. मे महिन्यात घाऊक महागाईचा दर गेल्या ४३ महिन्यांतील उच्चांकी पातळीवर म्हणजेच ९.६% वर पोहोचला आहे. एप्रिलमध्ये हा दर ८.२६% होता, तर यापूर्वी सप्टेंबर २०२२ मध्ये तो १०.७०% इतका नोंदवला गेला होता. वाणिज्य मंत्रालयाने सोमवारी जारी केलेल्या आकडेवारीनुसार, सप्टेंबर २०२२ नंतरची ही सर्वात मोठी वाढ आहे. दुसरीकडे, किरकोळ महागाई मे महिन्यात वाढून ३.९३% झाली आहे, जी एप्रिलमध्ये ३.४८% होती. गेल्या ५ महिन्यांत पहिल्यांदाच किरकोळ महागाई रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या ४% च्या लक्ष्याच्या अगदी जवळ पोहोचली आहे.

**सामजस्य करार** | 'या' महत्त्वपूर्ण करारांवर स्वाक्षऱ्या

# पंतप्रधान मोदींचा स्लोव्हाकिया दौरा ठरला ऐतिहासिक

**नवी दिल्ली:दि.१६ वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी नुकतेच स्लोव्हाकिया दौऱ्यावर गेले होते. या दौऱ्यात त्यांनी भारत-स्लोव्हाकियाचे संबंध मजबूत केले. या दौऱ्यात त्यांना स्लोव्हाकियाने सर्वोच्च नागरी पुरस्कार 'द ऑर्डर ऑफ द व्हाइट डबल क्रॉस(फर्स्ट क्लास)' गौरविण्यात आले. १९९३ मध्ये स्लोव्हाकियाला स्वातंत्र मिळाले होते. यामुळे पतप्रधान मोदी स्लोव्हाकियाला भेट देणारे भारताचे पहिले पंतप्रधान ठरले आहे. यामुळे या दौऱ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.



या दौऱ्यात दोन्ही देशांमध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण अशा ११ सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या आहेत. तसेच तीन मोठ्या घोषणाही करण्यात आल्या आहेत.

या भेटीत दोन्ही देशांता कुशल कामगार आणि व्यावसायिकांच्या स्थलांतरासाठी कामगार सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. तसेच व्हिसा प्रक्रिया सुलभ करण्यावरही भर देण्यात आला. याशिवाय संरक्षण क्षेत्रात सहकार्य वाढविण्यासाठी देखील स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

तसेच डिजिटल तंत्रज्ञान क्षेत्रातही एआय, सेमीकंडक्टर, सहकार्य प्रस्थापित करण्याचे मान्य झाले. नागरिकांच्या सुविधेसाठी दोन्ही देशांनी नियमित कॉन्सुलर चर्चा सुरु करण्यावर सहमती झाली, ज्यामुळे व्हिसा प्रक्रिया अधिक सुलभ होईल. सायबर सुरक्षा, उर्जा शिक्षण, कनेक्टिव्हीटी क्षेत्रांवरही भर देण्यात आला.

दोन्ही देशांमध्ये दहशतवादविरोधी संयुक्त गट स्थापन करण्याचा निर्णय झाला. स्लोव्हाकियाने भारताच्या संयुक्त राष्ट्र सुरक्षापरिषदेतील स्थायी सदस्यत्वाला पाठिंबा दिला. ऑटोमोबाईल आणि इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात गुंतवणूकीच्या नव्या संधी शोधण्याचे दोन्ही बाजूंनी मान्य करण्यात आले. तसेच थेट हवाई सेवा देखील सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला. पाणी व्यवस्थापन, हवामानशास्त्र आणि जलविज्ञान क्षेत्रात सहकार्य वाढविण्यावर भर देण्यात आला. तसेच भेटीदरम्यान दोन्ही देशांमध्ये मोठी घोषणाही करण्यात आली. दोन्ही देशांनी सर्वसमावेश संबंध वाढविण्याचा निर्णय घेतला.

यानंतर पंतप्रधान फ्रान्समध्ये होणाऱ्या शिखर परिषदेला १६ आणि १७ जून रोजी उपस्थित राहणार आहेत. याचा उद्देश नवोपक्रम आणि विकासाच्या क्षेत्रात प्रमुख भागीदारांशी संबंध अधिक मजबूत करणे आहे. यापूर्वी त्यांनी १४ जून रोजी फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांची भेट घेतली आहे. या भेटीत भारत-फ्रान्स भागीदारी बळकट करणाऱ्यावर चर्चा झाली.

## लेकाचे पार्थिव पाहून आईचा श्वास थांबला

**भोपाळ: दि.१६ वृत्तसंस्था**

लेकाच्या अकाली जाण्याचा धक्का आईला सहन झाला नाही. लेकाचा निष्प्राण देह पाहून माऊलीनं मान टाकली आणि तिनंही जगाचा निरोप घेतला. अवघ्या काही मिनिटांच्या अंतरानं मायलेकाचा शेवट झाला. यानंतर संपूर्ण कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. सोमवारी दोघांची अंत्ययात्रा एकाचवेळी काढण्यात आली. हा प्रसंग पाहून उपस्थितांचे डोळे पाणावले. ही हृदयद्रावक घटना मध्य प्रदेशच्या इंदूरमधील भंडारी मिल परिसरात असलेल्या श्रीनाथ विहार अपार्टमेंटमध्ये घडली.

पेशानं कॉम्प्युटर डिझायनर असलेल्या ५५ वर्षीय राजुल शर्मा यांचं रविवारी निधन झालं. राजुल यांच्या निधनानं कुटुंबाला जबर धक्का बसला. त्यावेळी राजुल यांच्या आई किरण शर्मा (७५) त्यांच्या लेकीच्या घरी होत्या. किरण यांची कन्या एरोड्रम रोड परिसरात वास्तव्यास आहे. मुलाच्या निधनाबद्दल समजल्यावर किरण यांना धक्का बसेल याची चिंता सगळ्यांना होती. त्यामुळे त्यांना लेकाच्या मृत्यूबद्दल एकाचवेळी सगळं सांगण्यापेक्षा त्यांना हळूहळू घरी नेण्याचा निर्णय घेतला.

कुटुंबाच्या सदस्यांनी किरण शर्मा यांना श्रीनाथ विहार येथील फ्लॅटवर नेलं. लेकाचा निपचित पडलेला देह पाहून किरण स्वत:ला सावरु शकल्या नाहीत. राजुलचा निष्प्राण देह पाहून किरण यांना अश्रू अनावर झाले. त्या हमसून हमसून रडू लागल्या. त्यांनी लेकाच्या डोक्यावरुन मायेनं हात फिरला. त्यानंतर त्या अचानक बेशुद्ध होऊन जमिनीवर कोसळल्या.

कुटुंबियांनी, नातेवाईकांनी किरण यांना तातडीनं रुग्णालयात नेलं. डॉक्टरांनी त्यांना तपासलं. पण तोपर्यंत बराच उशीर झाला होता.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी डी. बी. कार्पोरेशन लिमिटेड, दिव्य मराठी, एन.एच.६, बनारसी धाब्याजवळ, बोरगाव मंजू, अकोला - ४४४००१ येथे मुद्रित करून अजिंक्य भारत, सुगत भवन, बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला- ४४४००१ येथे प्रकाशित केले.✻ **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (✻पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

# कबीर खडा बाजार में, मांगे सब की खैर



अध्यात्म

डॉ. विजय जाधव
वाशीम संपर्क: ९८८१५२७६६०

इतिहासाची पाने उलटत असताना, काही क्रांतियोद्ध्यांचे जीवन, संघर्षाने भरलेले दिसते. ते प्रस्थापित वाटांवरून न चालता आपल्या नवीन वाटा तयार करीत असतात. अगदी याउलट परंपरावाद्यांचे असते. ते नवीन वाटा स्वीकारण्यास तयार होत नाहीत. 'ठेविले अनंते तैसेचि राहावे' ही त्यांची जीवनशैली असल्याने क्रांतियोद्ध्यांना ते नानाप्रकारे छळतात. त्यांचे जीवन संपविण्यासही मागेपुढे पाहत नाहीत. 'बदलणे ही काळाची गरज आहे' हे तत्त्व त्यांना मान्य नसते. यासाठी ते जात, देव, धर्म यांची ढाल म्हणून वापर करीत असतात. परंतु क्रांतियोद्धे प्रस्थापितांना जुमानत नाहीत; ते समाजहित आणि मानवी मूल्यांची जोपासना करणारे असल्याने आपला संघर्ष चालूच ठेवतात. बऱ्याच वेळेस त्यांचे विचार, त्यांचे कार्य रुजण्यास विलंब होतो. मात्र त्यात ते यशस्वी होतात व समाजात मानवाधिष्ठित मूल्ये रुजवून जातात. यामध्ये पंधराव्या शतकात संत कबिरांनी मांडलेला विचार, दाखविलेला सन्मार्ग अतिशय उपयुक्त ठरलेला आहे. आजच्या काळातही लाखो लोक त्यांच्या विचारांवर चालतात.

संत कबीर हे केवळ प्रख्यातच नव्हते, तर ते प्रबोधनकार कवी होते. त्यांची जीवनविषयक संपूर्ण माहिती उपलब्ध नाही. त्यांच्याविषयी अनेकानेक आख्यायिका मात्र प्रसिद्ध आहेत. जन्मापासून मृत्यूपर्यंत जात, देव, धर्म, गुरु या सर्वांबद्दल अभ्यासकांची वेगवेगळी मते आहेत. इ. स. १३९८ मध्ये शुक्ल पौर्णिमेस, सोमवारी त्यांचा जन्म वाराणसी काशी येथे झाल्याचे सांगितले जाते, तर मृत्यूसंबंधी विवाद आहेत. साधारणतः १५१८ मध्ये गोरखपूर जवळील 'मगहर' या गावी त्यांचा मृत्यू झाल्याचे सांगितले जाते. एकूण १२० वर्षे त्यांना आयुष्य लाभल्याचे दिसून येते.


तत्कालीन अवस्थेत विधवांची स्थिती अतिशय भयावह होती. घरातीलच पुरुष मंडळी तिच्यावर अत्याचार करीत असायचे आणि अत्याचारांमधून दिवस गेले तर गावाच्या चौकात विवस्त्र करून तिला बांधले जायचे... शिवाय गावातील लोक दगडधोंड्यांचा मारा करून तिला संपवून टाकायचे. कितीतरी विधवा बाळाला जन्म देऊन निर्जन स्थळी ठेवून द्यायच्या. अशाच एका ब्राह्मण विधवेच्या पोटी कबीर यांचा जन्म झाला. लोकलाजेस्तव तिने काशीजवळील 'लहरतारा' तलावापाशी त्याला सोडून दिले. पुढे खूप खूप वर्षांनंतर महात्मा फुले यांनी अशा विधवा स्त्रियांना बाळंतीण होण्यासाठी आपले घर खुले केले होते हे विशेष!.. पण त्या अतिशय कर्मठ काळात मुसलमान समाजाच्या नीरू आणि नीमा नावाच्या कोष्ट्याने कबीरांचा सांभाळ केल्याची दंतकथा प्रसिद्ध आहे. पुढे चालून त्यांनी नाथपंथ स्वीकारला. ते विवाहित होते. 'लाई' त्यांच्या पत्नीचे नाव असून 'कमाल' आणि 'कमली' हे त्यांची मुले होत. असे काहींचे मत आहे, तर काहींनी ते अविवाहित असल्याचेही सांगितले आहे.

तसे तर संत कबीर हे कोणत्या एका धर्माशी निगडित नव्हते. हिंदू, मुसलमान, सूफी, योगमार्गी, नाथपंथी या सर्व प्रवाहांचा त्यांच्यावर प्रभाव आढळतो.

'मासी कागज छुओ नही, कलम गही नहि हाथ'
चारिउ युग का महातमा, मुखहि जनाई बात''

त्यांनी सांगितल्याप्रमाणे ते निरक्षर होते; परंतु ज्ञानी व बहुश्रुत होते. त्यांच्या सर्व रचना मौखिक होत्या. पुढे त्यांच्या अनुयायानी त्या शब्दबद्ध केल्याचे सांगितले जाते. 'ऐकावे जनाचे, करावे मनाचे' या उक्तीप्रमाणे त्यांनी कोणत्याही विशिष्ट धर्माचा अंगीकार न करता स्वानुभवाला अर्थात स्वतःच्या ज्ञानालाच अधिक महत्त्व दिले होते. त्यांची भक्ती प्रेमावर आधारलेली असून प्रेमाने जग जिंकता येते यावर त्यांची निष्ठा होती. त्यांनी आपल्या जीवनात शुद्ध चरित्र निर्वैरता, निष्कामता, अनासक्ती व सात्त्विक राहणे आदि बाबींना अधिक महत्त्व दिल्याचे दिसून येते.

मनुष्यत्वाला त्यांनी महत्त्व दिले असून जातपात, कुलाभिमान, रूढी, व्रतवैकल्ये, आणि कर्मकांड इत्यादी बाबींवर त्यांचा विश्वास नव्हता. धर्माच्या आडून समाजात दुही पसरविणाऱ्यांवर त्यांनी कडाडून हल्ले केले. ते प्रचंड प्रतिभासंपन्न होते. त्यांनी आपल्या दोह्यांमधून, दृष्टांतातून, प्रतिमा, प्रतिकांतून, युक्तीवादातून आणि स्वानुभवातून असामान्य शैलीची साक्ष पटविली आहे. संत कबीर समाजद्रष्टे होते. समाजातील विविध व्यक्तिमत्त्वांचे, सूक्ष्मनिरीक्षणांचे दर्शन त्यांनी घडविले आहे. धर्मांच्या कर्मकांडात अडकून न पडता मानवतावादी तत्त्वे रुजविण्याचे त्यांनी प्रयत्न केले होते. त्यामुळे अनेक जाती-धर्मांचे, हिंदू मुसलमान समाजाचे लोक त्यांचे अनुयायी होते. त्यांची भाषा 'परबी हिंदी' होती. अनेक बोलींतील शब्द त्यांच्या शैलीमध्ये आढळतात. तीतव्रज, अवधी, खडीबोली, भोजपुरी, फारसी, अरब आदि बोलीतील शब्द त्यांच्या काव्यात आढळतात. त्यांच्या भाषेवर खडीबोलीचा प्रभाव दिसून येतो. 'साधूक्कडी' असे त्यांच्या भाषेला म्हटले जाते. त्यांची भाषा समिश्र स्वरूपाची आहे. अलंकाराने युक्त असलेली त्यांची शैली सर्वश्रुत असून हिंदी साहित्यात कवी म्हणून त्यांचे स्थान श्रेष्ठ आहे.



भाग-१

पंधराव्या शतकात समाजात जातीय उतरंड अतिशय जोर धरत होती. स्पृश्य-अस्पृश्य, भेदाभेद मंगळ-अमंगळ अशी विषमता सर्वत्र पसरलेली होती. अनेक भोंदू बाबांनी धर्मांचे आधार घेऊन आपली दुकाने थाटली होती. समाजातील अंधश्रद्धा शिगेला पोहोचली होती. जन्म, पुनर्जन्म, मोक्ष, स्वर्ग, नर्क याची प्रचंड भीती सामान्य माणसाच्या मनात निर्माण झालेली होती. या अवस्थेत सर्व अनिष्ट प्रथा, परंपरा बाजूला सारून समाजात समानता प्रस्थापित व्हावी, माणसाला माणसासारखे वागविले जावे, माणसाचे कर्म श्रेष्ठ आहे हे डोळ्यांपुढे ठेवून जगावे... यासाठी संत कबिरांनी केलेला जागर तमाम मानव जातीसाठी महत्त्वपूर्ण ठरतो. त्यांनी निर्मिलेले एकूण एक दोहे मानवासाठी कल्याणकारी ठरलेले आहेत. हजारो पंथ, हजारो संत, हजारो मार्ग असताना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संत कबिरांना बुद्धानंतर दुसरे गुरु मानले यावरून त्यांचे महत्त्व सिद्ध होते.

संतांच्या जीवनातील विचार त्यांचे थोरपण सिद्ध करीत असतात. विचारशून्य, चमत्कार करणारे, पाखंडी साधू हे समाजाला लुटण्याची कामे करतात. थोर संतांच्या जीवनातील विचार काढून टाकल्यास त्यांचे जीवन रिक्त होईल; परंतु त्यांचे विचार अंगीकारल्यास तमाम मानव जातीचे भले झाल्याशिवाय राहणार नाही. या धर्तीवर विचार केल्यास संत कबीर आणि त्यांचे विचार मानवाला निःसंदेह समृद्धीवर नेणारे आहेत.

मानवी जीवनात वाणीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. ज्यांचे बोलणे गोड ते कोणालाही जिंकू शकतात. गोड बोलणाऱ्याचे सर्व लोक पाईक होतात. या संदर्भात संत कबीर म्हणतात,

'ऐसी वाणी बोलिए, मन का आपा खोये
औरन को शीतल करे, आपहु शीतल होय''

माणसाने आपली वाणी गोड ठेवावी. ज्यामुळे मनातील अहंकार गळून पडतील. आपण बोलत असताना आपले बोलणे इतरांना गोड वाटले पाहिजे, इतरांना आनंद मिळाला पाहिजे व आपले मनही त्यामुळे शांत व समाधानी झाले पाहिजे.

'केल्याने होत आहे रे,आधी केलेची पाहिजे'. आपले कर्तव्य आपण विलंब न लावता, आळस न करता करीत राहिलो पाहिजे. आजचे उद्यावर ढकलण्याने काम तडीस जात नाही. यावर संत कबीर म्हणतात,

कल करे सो आज, आज करेसो अब
पल मे प्रलय होयेगा, बहुरी करेगा कब

जे उद्या करायचे आहे, ते आज करा आणि जे आज करायचे आहे, ते आताच करा! आयुष्याचा काय भरवसा? आपला कधीही शेवट होऊ शकतो. म्हणून वेळ वाया न घालवता आपले कर्तव्य आपण पूर्ण केले पाहिजे. कबीर म्हणतात की, मानवी जीवन अमूल्य आहे. पृथ्वीच्या पाठीवर फक्त माणसालाच बोलता येते. स्वतःचा विकास करता येतो. आपल्या देशाला, समाजाला आपण निश्चित काहीतरी देऊ शकतो; परंतु आजही हजारो लोक फक्त खाण्यापिण्यात वेळ वाया घालवीत आहेत.

'रात गवांई सोय कर, दिवस गंवायो खाय
हिरा जनम अमोल था, कौडी बदले जाय''

रात्र झोपण्यात आणि दिवस खाण्यात घालविणे म्हणजे हिऱ्यासारखे मिळालेले अनमोल जीवन व्यर्थ घालविणे होय. भौतिक सुख, वासना यात माणसे वेळ घालवितात! यापेक्षा काय वाईट असू शकते? आजच्या काळात कित्येक तरुण मुलेमुली तासन्तास मोबाईलवर रिल्स पाहण्यात वेळ घालवितात. आई-वडिलांनी काबाडकष्ट करून दिलेल्या पैशांची उधळपट्टी करतात. वय गेल्यावर बसतात बोंबलत!... मानवी जीवन वारंवार मिळत नाही. त्याचा फायदा घ्या. जी गोष्ट जमत नाही तिचा वारंवार सराव करा आणि हवे ते हस्तगत करून घ्या. पंधरा वर्षांचे वैभव सूर्यवंशी केवळ स्वतःच्या कर्तृत्वावर भारतीय क्रिकेट टीममध्ये सिलेक्ट होऊ शकतो. याचा गांभीर्याने आजच्या तरुणांनी विचार करणे गरजेचे आहे.

'मन चंगा तो कठौती मे गंगा' संत रविदास म्हणतात, माणसाचे मन चांगले असेल तर त्याला काशी तीरथ जाण्याची गरज नाही. कठोरीमध्ये सुद्धा गंगेचे दर्शन होऊ शकते. सारे खेळ मनाचे आहेत. मन स्थिर असणे गरजेचे आहे. बहिणाबाई चौधरी म्हणतात,

'मन वढाय वढाय, उभ्या पिकातलं ढोर
किती हाकला हाकला, फेरी येते पिकांवर'

मन अतिशय चंचल आहे. त्याला कितीही हाकला ते पुन्हा तिथेच येऊन ठेपते; परंतु ज्याचे (क्रमशः)

# राष्ट्रनिष्ठा, स्वाभिमान आणि सामाजिक समरसतेचे प्रतीक : महाराणा प्रताप

प्रा. सुधाकर इंगळे
नागपूर

भारत हा विविधतेने नटलेला देश असून या देशाची संस्कृती, अस्मिता आणि स्वाभिमान ही जगाच्या पातळीवर वेगळी ओळख निर्माण करून देणारी आहे. या देशाच्या संस्कृतीच्या रक्षणासाठी अनेकांनी आपली बलिदाने दिली आहेत. स्वाभिमानपूर्वक लढा दिला आहे, अशाच स्वाभिमानपूर्वक संघर्षाचे प्रतकि म्हणून आपल्या समोर महाराण प्रताप यांचा चेहरा समोर येतो. अशा या वीर स्वाभिमानी महाराणा प्रताप यांची ४८६ वी जयंती १७ जून रोजी साजरी होत आहे. त्यानिमित्ताने त्यांच्या व्यक्तिमत्वाची ओळख करून देण्यासाठीच हा लेखप्रपंच.

भारतीय इतिहासातील तेजस्वी, प्रेरणादायी व स्वाभिमानाचे प्रतीक असलेल्या महाराणा प्रताप यांची जयंती ही केवळ एका महान राजाचा स्मृतिदिन नसून ती राष्ट्रभक्ती, स्वातंत्र्यप्रेम, त्याग आणि कर्तव्यनिष्ठेचा जागर करण्याचा दिवस आहे. कारण संकटांच्या पर्वतासमोरही न झुकणारा आणि मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी अखंड संघर्ष करणारा योद्धा म्हणून महाराणा प्रताप यांचे नाव भारतीयांच्या मनामनात आजही अजरामर आहे.

महाराणा प्रताप यांचा जन्म ९ मे १५४० (विक्रम संवत १५९७ जेष्ठ शुक्ल तृतीया) रोजी राजस्थानातील कुंभलगड या दुर्गम किल्ल्यावर झालेला होता. मेवाडच्या राजघराण्यातील महाराणा उदयसिंह व माता जयवंता बाई यांच्या उदरी जन्मलेल्या प्रतापांनी बालपणापासूनच शौर्य, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेचे संस्कार आत्मसात केले होते. पुढे ते मेवाडचे राज्यकर्ते झाल्यानंतर त्यांनी आपल्या राज्याच्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्याकामी दिल्लीच्या तख्तावरील



सामर्थ्यशाली बादशाहशी आयुष्यभर संघर्ष केला होता.

अस लेगो अणदाग पाघ लेगो अणनामी।
गौ आडा गवडाय, जीको बहतो धुरवामी ।।
नवरोजे नह गयो, नगौ आतसां नवल्ली।
नगौ झरोखा हेठ, जेठ दुनियाण। दहल्ली।।
गहलोत राण जीती गयो, दसग मुंद रसना डसी ।
निनास मूक भरीया नयन, तो मृत शहा प्रतापसी।।

(याचा अर्थ - ज्याने आपल्या घोड्यांना डाग लागू दिले नाहीत, ज्याने स्वतःची पगडी कोणापुढे झुकविली नाही, आज तो गात गात निघून गेला, जो हिंदुस्थानच्या ओझ्याची गाडी डाव्या बाजूने ओढत होता, जो कधीही नौरोजच्या जलाशयात गेला नाही, जो कधी शाही डेऱ्यात गेला नाही, ज्याच्या झरोक्याचा धाक सर्व जगाला आहे ,अशा झरोक्याच्या खाली तो कधी उभा राहिला नाही ,असा राणा प्रताप विजयी होऊन निघून गेला. त्यांच्या जाण्याने बादशहाने आपले तोंड घट्ट मिटले व ते स्तब्ध झाले. एक उसासा सोडून त्यांचे डोळे पाण्याने भरले. हे प्रताप तुझ्या मरणाने असे झाले.)

यावरून राणा प्रतापांच्या जाण्यामुळे मेवाडच्या जनतेला जेवढे दुःख झाले होते, तेवढेच दुःख बादशहा अकबराला सुद्धा झाल्याचे यातून स्पष्ट होते. किंबहुना आपल्या शत्रूला सुद्धा आपल्या जाण्याची हुरहुर लागावी, अशा प्रकारचे राणा प्रतापांचे व्यक्तिमत्व असल्याचे यातून सिद्ध होते. राणा प्रतापांचे जीवन आपल्याला स्वाभिमानाचे महत्त्व शिकवते. परिस्थिती कितीही कठीण असली तरी तत्त्वांशी तडजोड करू नये, हा संदेश त्यांनी आपल्या आचरणातून दिला. आजच्या काळात भ्रष्टाचार, स्वार्थ आणि सामाजिक विघटन यांसारख्या आव्हानांवर मात करण्यासाठी महाराणा प्रताप यांचे विचार अत्यंत उपयुक्त आहेत. आज भारताला शौर्याबरोबरच चारित्र्य, राष्ट्रनिष्ठा, सामाजिक बांधिलकी आणि कर्तव्यपरायणतेची गरज आहे. महाराणा प्रताप यांचे जीवन या सर्व मूल्यांचे मूर्तिमंत उदाहरण आहे. युवकांनी त्यांच्या संघर्षातून जिद्द, त्यांच्या राष्ट्रभक्तीतून देशप्रेम आणि त्यांच्या सामाजिक दृष्टिकोनातून समरसतेचे धडे घेण्याची आवश्यकता आहे. महाराणा प्रताप हे केवळ राजस्थानचे किंवा राजपूत समाजाचेच नरेश नव्हते , तर ते संपूर्ण भारताचे प्रेरणास्थान आहेत. त्यांचे जीवन आपल्याला स्वातंत्र्य, स्वाभिमान आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा देत राहील. त्यामुळे त्यांच्या जयंतीनिमित्त आपण राष्ट्रहिताला प्राधान्य देण्याचा, सामाजिक एकात्मता जपण्याचा आणि आपल्या कर्तव्यांचे प्रामाणिकपणे पालन करण्याचा संकल्प करूया. याशिवाय 'स्वाभिमानासाठी जगणे आणि राष्ट्रासाठी संघर्ष करणे, हीच महाराणा प्रतापांना खरी आदरांजली ठरेल.'

# निसर्ग

हिरवळ दाटली अंगणी
बहरला वेल जाईचा
अलगद मिटले डोळे
सुगंध येता मातीचा.

झुळूक वाऱ्याची मनाला
गेली शांत करून
अलगद ओठांवरती गेले
आपसूक स्मित फुलून

नभात येती पाठोपाठ
पक्षांच्या माळा
मन ही हरपून जाई
बघता खुलतांना पाकळ्या

कौलांवरती हलणारी ती
वेल किती साजरी
फुलांनी बहरून गेली
वाटे नवी नवरी लाजरी

दवबिंदू ते पानांवरचे
तांयांसम चमकती
अप्रूप वाटे किती न्याहाळू
फुलांच्या रंग संगती

कोळी पालवी बघा
लाल गुलाबी थोडी
फळे रसाळ चाखता
अविट त्यांची गोडी

खट्याळ ती फुलपाखरे
उडती इकडून तिकडे
प्रसन्न मनमोहक वातावरण
माझ्या चोहीकडे

शामल मेघ येता दाटून
बरसती पाऊस धारा
पारणे फिटती डोळ्यांचे
बघता निसर्ग सारा.

- सौ. अर्चना प्रमोद हेलोडे.




# ओळख पक्ष्यांची : नारंगी



हा पक्षी नारंगी डोक्याचा थ्रश (Geokichla citrina) आहे, जो त्याच्या विशिष्ट नारंगी डोक्यावरून आणि राखाडी पंखांवरून ओळखला जातो.हा एक लहान, एकांतप्रिय पक्षी असून तो बहुतेकदा भारतीय उपखंड आणि आग्नेय आशियातील सावलीच्या, दमट भागांमध्ये आढळतो.ही प्रजाती तिच्या बासरीसारख्या गाण्यासाठी आणि इतर पक्ष्यांच्या आवाजाची नक्कल करण्याच्या क्षमतेसाठी ओळखली जाते.

(छायाचित्र : चंद्रकांत पाटील)

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 426



संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे शब्दकोडे आपणचं तयार करा. मदतीकरिता काही शब्द चौकटीत दिलेले आहे.

**संकेत शब्द :–**

**दोन अक्षरी**
अर्थ, अस्त, कडी, कळ, काष्ठ, केका, जड, डक, तप, तमा, तय, दाई, देव, नर, नव, नाज, पद्य, बेट, मत, मानी, रस, राख, रीम, लव, वट, वर्ष, वार, वारी, सभा, ससा, सुख, सुरी

**तीन अक्षरी**
कबंध, कवच, कळप, जावई, तदीय, दायक, नकार, नर्मदा, नाहक, नोकर, पलिता, पासंग, पिनाक, बेभान, मालिनी, रकाना, रावण, वादंग, वारस, विवर, वीरता, शीतल, समज, समान, समीक्षा, साधन, सामना, सायास, सुदामा, सुमन, संकट, संदेश, स्तवन

**चार अक्षरी**
आकर्षण, आमरस, एककल्ली, कालवण, काळवीट, चणचण, जागरण, तसदीक, तारांबळ, नसवार, नामदेव, नीरांजन, पायवाट, पितामह, बडदास्त, मनगट, मनोरम, मरुस्थल, रणवाद्य, रवरव, वरमाय, वाटसरु, विवरण, विवाहित, शरमिंदा, संविधान, हिमालय

**पाच अक्षरी**
नाडीपरीक्षा, मीनकेतन, यमयातना, रगडमल्ली, रचनाकार, वतनदार, सावरकर

**सहा अक्षरी**
दाम करी काम, नगर भवानी


(उत्तर पुढील अंकी)

**मागील महाशब्दकोडेचे उत्तर**

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क | ष्ट | | सो | | य | म | न | | त | वं | ग | | ये | | वा |
| पि | | | ह | रि | ज | न | | कों | | त | व | | ग | रा | डा |
| ला | जा | हो | म | | मा | | व | डी | ल | | ळी | | ये | | |
| ष | | का | | घ | न | नी | ळ | | ह | | | अं | ग | र | खा |
| ष्ठी | | र | पे | ट | | | सा | ख | र | भा | त | | स | हा | ण |
| चा | र | | | स्था | व | र | | र्च | | तु | | प | री | ट | |
| यो | ज | ना | | प | र | व | ड | | ए | क | वि | रा | | | खा |
| ग | नी | म | | ना | द | | | च | क | ली | | चा | रु | गा | त्री |
| | च | | ग | | क्षि | ति | ज | | वा | | का | का | | त्र | |
| वि | र | ज | ण | | णा | | म | दा | र | | स | व | | | व |
| ज | | न | क | ली | | | द | न | | सा | व | ळा | गों | ध | ळ |
| या | च | क | | ला | | अ | ग्नि | प | री | क्षा | | क | | र | ण |
| | म | | व | | अ | ग्र | | त्र | | त | | र | म | णे | |
| श | क | टा | सू | र | | ले | क | | ज | | जा | णे | | पा | रा |
| क | दा | | धा | म | | ख | ल | ब | त | | दू | | भा | र | त |
| ट | र | | रा | णी | | | म | | न | ल | | रां | ग | णे | |

Uday Munde - 8446302691

## महाशब्दकोडे 809



**आडवी विधाने :–** 1) सर्वोत्कृष्ट खेळाडूस महाराष्ट्र शासनातर्फे देण्यात येणारा सर्वोच्च पुरस्कार
6) देशाची संत्रानगरी
8) रामायणात रावणाच्या मुलाचे नाव
11) पुन्हा पुन्हा तेच ते बोलणे
12) कमी दर्जाचे 14) ओलसर
15) दुसरे झाड लावण्यासाठी पहिल्या झाडाची तोडलेली फांदी
17) लेखाची नक्कल
18) गडाच्या चारही बाजूला बांधलेली संरक्षक भिंत बांधून गड संरक्षित करणे
21) मूल्य, भाव 22) सारखे, समान
24) अनेक कविंनी आपल्या कविता रसिकांसमोर सादर करणे
26) कृश, सडसडीत शरीरयष्टीचा
28) स्वयंपाक करतांना चुलीत जाळण्यासाठी असलेली लाकडे
29) वार्ता, बातमी, समाचार
30) साधे जेवण
32) थोडेसे खोल असलेले
34) फिकीर, पर्वा
36) युद्धात शत्रुपक्षाला अडकविण्यासाठी केलेली सैन्याची एक प्रकारची चक्राकार रचना
39) सौदामिनी, विद्युल्लता
41) घर, राहणे, आसरा
43) घाईघाईने 46) शिव, शंकर
47) दुसऱ्यापेक्षा वरचढ असणे
50) बुद्धि, ज्ञान
51) शोषून घेणारा 53) वारा, वायू
54) मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि गुजरात राज्यातून वाहणारी पश्चिम वाहिनी नदी
56) सर्वांशी मिळून मिसळून राहणे
59) दोष दर्शन, टीका
61) एकाच विषयाच्या अनेक मुद्यांवर अनेकांनी आपले विचार मांडणे
63) वर्ण, रंग 65) वंदन, नमस्कार
66) ओळख पत्र 68) सूर्य, दिवाकर
70) बरेच दिवस टिकणारा
72) उद्यानंतर येणारा दिवस
73) रायगडावरील एक उंच कडा
75) करणारा 76) मंदिर, देऊळ
77) दोन वस्तू एकमेकांवर आदळणे
78) कृपावंत होऊन एखादी वस्तू देणे
79) देण्याघेण्याचा व्यवहार
81) लोकांनी एकत्र येऊन आपापसात संयुक्त भांडवलावर काढलेले दुकान
83) अमर्याद 85) गमन करणे
87) दह्याला फोडणी घालून केलेला एक पातळ रुचकर पदार्थ
88) वाममार्गाने पूजा अर्चा करणारा, औघड
90) मोठा भाऊ
92) कापसाची केलेली एकवीस पदरांची वात
95) चप्पल, वहाण 96) अर्धांगवायू
98) सूट, सवलत
99) लग्नात मिरविणारी नवरदेवाची आई
100) साक्षीदाराने न्यायालयात दिलेली जबानी
101) डग्ग्याचा सोबती

**उभी विधाने :–**
1) शेराचा सोळावा भाग
2) युद्धातील अतुलनीय शौर्याकरीता भारत सरकारने दिलेले पदक
3) लहान बाळाच्या गालाला लावण्यात येणारा काजळाचा ठिपका
4) पृथ्वीखालचा लोक, पाताळ
5) काही कारणास्तव होऊ न शकणारे, रद्द झालेले
7) उगवती दिशा, प्राची
8) परदेशी स्त्रीचे एक संबोधन
9) एका रोगाचे नाव
10) विडीचा झुरका
13) नटात श्रेष्ठ असलेला
14) मूल्य, किंमत, प्रत्येक
16) खोड, दुर्गुण
17) गणितात सिद्ध करण्याची गोष्ट
19) विद्रोह, दंगा
20) हिंदूंचा सर्वात मोठा सण
21) लाक्षणिक अर्थाने रेंगाळत केले जाणारे काम
23) एक वजनी माप
25) विशेष उल्लेखनीय बाब
27) नाव उतरुन जाण्याजोगी लहान खाडी
28) नेहमी, निरंतर
29) मसलत, चर्चा, वाईट मनुष्य
31) शनिच्या फेऱ्याचा हा काळ काही व्यक्तिंना फार कष्टाचा जातो अशी धारणा आहे
33) स्त्रियांनी केसांत माळावयाची फुलांची माळ
35) महिना
37) युद्धात केलेली अडचणीची रचना
38) लढाईत निकराचा हल्ला करताना मराठमावळे उच्चारीत ती घोषणा
40) वेश्या, वारांगना
41) पूर्णपणे, काहीही बाकी न राहता
42) दिवस, घाव
44) अमिताभ बच्चन, गोविंदा, रजनीकांतचा एक सफल हिंदी चित्रपट
45) अशोकाच्या झाडांचे उपवन
48) अनेक लोकांनी सहकारी तत्वावर परस्परांना सहाय्य करण्यासाठी काढलेले अधिकोष
49) करावे की करु नये अशा संभ्रमात सापडणे
52) जातीचा गुण, अर्क
54) रीन उलटा करा 55) फिर्याद, हक्क
57) सुख–दुःख जाणणारे इंद्रिय
58) सूर्य (इं.) 59) शब्दार्थ वगैरेचे स्पष्टीकरण
60) पायी जाण्यासारखा मार्ग
61) वृत्तपत्र संस्थेतील एक पदभार
62) प्रत्येक महिन्यात
64) नाही म्हणणे, नापसंती दर्शविणे
67) हेर, खंदक
69) असमर्थ, विव्हळ
71) मेंढ्याचा समूह
74) मुसलमानांचे थडगे
80) वेढा देणे, वेढणे
82) पर्यंत (हिंदी)
84) पाप, दुष्कर्म
85) त्रास देणारे, जाच करणारे
86) घोड्यावर चढून बसलेला
88) पोलिसांनी गुन्हेगाराला पकडणे
89) चिंता, भीतीकारक संभावना
91) पति, नवरा 92) फळातील रसाळ भाग
93) प्रेत, कलेवर
94) फिकीर, पर्वा
96) एक लाख ही संख्या
97) शरीरातील धातूंपैकी एक
(उत्तर पुढील अंकी)

**मागील महाशब्दकोड्याचे उत्तर**

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| को | कि | ळ | | मी | | व्या | धी | ग्र | स्त | | के | | च | र | क |
| च | र्ऱ | | | ठ | सा | | व | ह | न | | श | | र | म | णी |
| वा | | अ | न | मो | ल | | र | | | आ | व | र | ण | | स |
| न | व | खा | | ह | स | रा | | सं | | | सु | त | | स | |
| | स | डा | | न्या | | जा | | पू | र्व | व | त | | | म | धू |
| प्र | ती | | श्री | | | | क | र्ण | | र्तु | | त | न | य | |
| | गृ | ह | मं | त्री | | गो | ल | | का | ळ | वी | ट | | सू | त |
| दे | ह | | त | | वे | ळा | प | त्र | क | | र | | का | च | |
| | | कुं | | क | | बे | | य | | शि | | क | ड | क | |
| सु | ल | भ | | सो | य | री | क | | पु | र | ण | | वा | | आ |
| स्वा | | का | | टी | | ज | | सा | | ग | | का | त | | प्ते |
| ग | | र | ज | | म | | ज | न | ग | ण | म | न | | क | ष्ट |
| त | थ्य | | ना | | नो | ब | ल | | म | ती | | मं | ग | ळ | |
| म् | | क | र्द | न | का | ळ | | ध | न | | स | त्र | | सू | |
| | सो | पा | न | | म | | | मा | | मा | मा | | पा | त्र | ता |
| च | प | ळ | | वि | ना | श | का | ल | | घ | न | दा | ट | | क |

Uday Munde - 8446302691

महत्त्वाचे

## चंद्रपुरातील वस्तू व सेवा कर भवनाचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण

**चंद्रपूर :** चंद्रपूर शहराच्या प्रशासकीय सुविधांमध्ये महत्त्वाची भर घालणाऱ्या वस्तू व सेवा कर भवनाचे लोकार्पण १८ जून रोजी सकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दूरदृश्यप्रणालीद्वारे करणार आहेत. तसेच वित्त व नियोजन राज्यमंत्री आशिषजी जयस्वाल हे उपस्थित राहणार असून, पालकमंत्री अशोकजी उईके हेही दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी होतील.चंद्रपूर जिल्ह्याच्या प्रशासकीय विकासात महत्त्वाची भर घालणारे स्वतंत्र व अत्याधुनिक वस्तू व सेवा कर (जीएसटी) भवन साकारण्यात आमदार सुधीर मुनगंटीवार यांची दूरदृष्टी आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा निर्णायक ठरला आहे. वित्तमंत्री म्हणून कार्यरत असताना त्यांनी चंद्रपूरमध्ये स्वतंत्र व सुसज्ज जीएसटी भवन उभारण्याचा निर्णय घेतला होता. त्यांच्या पुढाकारामुळे १५ मे २०१७ रोजी या प्रकल्पासाठी २१ कोटी ४३ लाख रुपयांची प्रशासकीय मान्यता मंजूर करण्यात आली.त्यानंतर इमारत बांधकामाच्या दरसूचित झालेल्या वाढीमुळे २४ जानेवारी २०२४ रोजी २९ कोटी ९९ लाख ८० हजार रुपयांची सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली. आ.मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांमुळे साकारलेले हे अत्याधुनिक भवन आता लोकार्पणासाठी सज्ज झाले आहे.

## चंद्रपूर शहर पाणीटंचाईने त्रस्त! ४-४ दिवस नळांना पाणी नाही

**चंद्रपूर:** शहरात पाणीटंचाईचे संकट दिवसेंदिवस गंभीर होत असून नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. शहरातील अनेक भागांमध्ये नियमित नळपाणीपुरवठा विस्कळीत झाल्याने महानगरपालिकेला दररोज ८० ते १०० टँकर रस्त्यावर उतरवावे लागत आहेत. मात्र टँकरचे पाणीही वेळेवर मिळत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.शहरातील वाढत्या तापमानामुळे पाण्याची मागणी वाढली असून अनेक भागांतील बोअरवेल आटल्या आहेत. काही ठिकाणी जलस्रोतांची पातळी खालावल्याने पाणीपुरवठ्यावर परिणाम झाला आहे. परिणामी अनेक प्रभागांमध्ये पिण्याच्या पाण्याची गंभीर टंचाई निर्माण झाली आहे.पाणीटंचाईच्या झळा सर्वाधिक महिलांना सहन कराव्या लागत आहेत. अनेक महिलांनी संताप व्यक्त करत सांगितले की, नियमितपणे नळाचे बिल भरूनही तीन ते चार दिवस नळांना पाणी येत नाही. टँकरची मागणी केल्यानंतरही दोन-तीन दिवस प्रतिसाद मिळत नसल्याने पाण्यासाठी भटकंती करावी लागते. घरात लहान मुले असताना पिण्याचे व वापराचे पाणी मिळवणे अत्यंत कठीण झाले आहे.नागरिकांच्या म्हणण्यानुसार, शहरातील अनेक भागांत दोन ते तीन दिवसांनंतरच पाणीपुरवठा होत आहे.

# चंद्रपूर काँग्रेसमधील वडेट्टीवार-धानोरकर संघर्ष पुन्हा ऐरणीवर

## १६ नगरसेवकांचे विभागीय आयुक्तांना पत्र

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**नागपूर, दि. १६ :** चंद्रपूर महापालिकेतील काँग्रेसमधील अंतर्गत संघर्ष पुन्हा एकदा उफाळून आला आहे. खासदार प्रतिभा धानोरकर समर्थक १६ नगरसेवकांनी गटनेता बदलण्याच्या मागणीसाठी नागपूर विभागीय आयुक्तांची भेट घेतल्याने पक्षातील वडेट्टीवार-धानोरकर वाद नव्याने चर्चेत आला आहे.

चंद्रपूर महापालिकेतील काँग्रेस गटातील बहुसंख्य नगरसेवकांनी विद्यमान गटनेता राजेश अडूर यांच्या विरोधात ठराव मंजूर केल्याचा दावा करत मंगळवारी नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयात धाव घेतली. धानोरकर समर्थक १६ नगरसेवकांनी स्वतंत्र गट स्थापन



करण्याची प्रक्रिया सुरू करत नव्या गटनेत्याच्या निवडीसाठी हालचाली वेगाने सुरू केल्या आहेत. सुरेंद्र आडबाले यांची गटनेतेपदी नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी विभागीय आयुक्तांकडे केली आहे.

दुसरीकडे, विद्यमान गटनेता राजेश अडूर यांनी धानोरकर समर्थक नगरसेवकांवर पक्षाच्या व्हीपचे उल्लंघन केल्याचा आरोप केला आहे. संबंधित १६ नगरसेवकांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी विभागीय आयुक्तांकडे केली आहे. काँग्रेस गटातील एकूण २७ नगरसेवकांपैकी १६ नगरसेवक धानोरकर गटासोबत असून ११ नगरसेवक विजय वडेट्टीवार समर्थक असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे गटनेतृत्वाच्या प्रश्नावर दोन्ही गटांमध्ये संघर्ष तीव्र झाल्याचे दिसून येत आहे.

या घडामोडींवर प्रतिक्रिया देताना राजेश अडूर यांनी काही नगरसेवकांना आर्थिक प्रलोभने देऊन आणि दबाव टाकून विभागीय आयुक्त कार्यालयात आणण्यात आल्याचा गंभीर आरोप केला. विभागीय आयुक्तांवरही दबाव टाकण्याचा प्रयत्न होत असल्याचा दावा त्यांनी केला. या आरोपांमुळे काँग्रेसमधील अंतर्गत वाद अधिकच चिघळण्याची चिन्हे दिसत आहेत. मात्र धानोरकर समर्थकांनी हे आरोप फेटाळून लावत नगरसेवकांनी स्वेच्छेने निर्णय घेतल्याचा दावा केला आहे.

खासदार प्रतिभा धानोरकर यांनी या वादावर प्रतिक्रिया देताना हा संघर्ष वैयक्तिक नसल्याचे स्पष्ट केले. हा वाद माझा किंवा विजय वडेट्टीवार यांचा नाही. काँग्रेसच्या नगरसेवकांनी त्यांच्या राजकीय भूमिकेनुसार निर्णय घेतला आहे, असे त्या म्हणाल्या. दरम्यान, चंद्रपूर महापालिकेत काँग्रेसकडे लक्षणीय संख्याबळ असूनही पक्षाला महापौरपद मिळविता आले नव्हते. त्यावेळी पक्षातील गटबाजीचा लाभ भाजपला झाल्याची चर्चा रंगली होती. आता गटनेता बदलाच्या मागणीमुळे काँग्रेसमधील सत्तासंघर्ष पुन्हा एकदा उघड झाला असून पक्षश्रेष्ठी या वादावर कोणती भूमिका घेतात, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# मान्सूनच्या विलंबाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी घाईघाईने पेरणी करू नये

## प्रशासनाचा शेतकऱ्यांना महत्त्वपूर्ण सल्ला

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**भंडारा, दि. १६ :** जिल्ह्यात मान्सूनच्या आगमनाची प्रतीक्षा कायम असताना जिल्हा प्रशासनाने शेतकरी बांधवांना घाईघाईने पेरणी न करण्याचे महत्त्वपूर्ण आवाहन केले आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार जून महिन्यात राज्यातील अनेक भागांमध्ये पावसात खंड पडण्याची तसेच अपेक्षेपेक्षा कमी पाऊस होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे केवळ सुरुवातीच्या पावसावर विश्वास ठेवून पेरणी केल्यास बियाणे वाया जाण्याचा आणि दुबार पेरणीचा धोका निर्माण होऊ शकतो, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

**पावसाची स्थिती निश्चित झाल्यानंतरच निर्णय घ्या**

जिल्हा प्रशासनाने शेतकऱ्यांना हवामान विभागाच्या अंदाजाचा नियमित आढावा घेण्याचे आवाहन केले असून, पावसाची स्थिती निश्चित झाल्यानंतरच पेरणीचा निर्णय घ्यावा, असे सांगितले आहे. सध्या मान्सूनच्या आगमनासाठी आणखी काही दिवस प्रतीक्षा करावी लागण्याची शक्यता असल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. येत्या आठवड्यात राज्यातील वातावरण पावसासाठी अधिक अनुकूल होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे शेतकरी बांधवांनी काही दिवस संयम बाळगून योग्य वेळ साधूनच पेरणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

**थोडा संयम, थोडी प्रतीक्षा**

हवामानाचा अंदाज पाहूनच योग्य निर्णय घ्या,'' असा संदेश प्रशासनाकडून देण्यात आला आहे. तसेच ''थोडा संयम, थोडी प्रतीक्षा हीच यशस्वी पेरणीची दिशा'' असल्याचेही नमूद करण्यात आले आहे.जिल्हा प्रशासनाने जनहितार्थ ही सूचना प्रसारित केली असून, शेतकऱ्यांनी अफवा किंवा अंदाजांवर विश्वास न ठेवता अधिकृत हवामान माहितीच्या आधारेच शेतीविषयक निर्णय घ्यावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पुणे-नागपूर वंदे भारतमध्ये मोठा बदल, प्रवासी क्षमता वाढणार

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**नागपूर, दि. १६ :** पुणे-नागपूर (अजनी) वंदे भारत एक्स्प्रेसला प्रवाशांकडून मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद लक्षात घेऊन रेल्वे प्रशासनाने गाडीची क्षमता दुप्पट करण्याचा निर्णय घेतला आहे. सध्याच्या आठ डब्यांमध्ये आणखी आठ डबे जोडण्याचा प्रस्ताव रेल्वे बोर्डाकडे पाठविण्यात आला असून, त्यास लवकरच मंजुरी मिळण्याची शक्यता आहे.



पुणे आणि नागपूर या राज्यातील दोन महत्त्वाच्या शहरांना जोडणारी वंदे भारत एक्स्प्रेस १० ऑगस्ट २०२५ रोजी सुरू करण्यात आली. सुरूवातीपासूनच या गाडीला प्रवाशांचा मोठा प्रतिसाद मिळत असून, बहुतांश फेऱ्यांमध्ये आसनक्षमता पूर्ण भरत आहे. विशेषतः सुट्ट्यांचा हंगाम, सणासुदीचे दिवस आणि सप्ताहअखेरच्या काळात या गाडीसाठी मोठ्या प्रमाणात आरक्षण होत असल्याने अनेक प्रवाशांना प्रतीक्षा यादीचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर अतिरिक्त डबे जोडण्याची मागणी सातत्याने पुढे येत होती.प्रवाशांची वाढती संख्या आणि आरक्षणातील ताण लक्षात घेऊन पुणे रेल्वे विभागाने गाडीतील डब्यांची संख्या वाढविण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. सध्या आठ डब्यांची असलेली ही वंदे भारत एक्स्प्रेस १६ डब्यांची करण्याचा प्रस्ताव मध्य रेल्वे मुख्यालयामार्फत रेल्वे बोर्डाकडे पाठविण्यात आला आहे. प्रस्तावाला तत्त्वतः सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याची माहिती रेल्वे सूत्रांनी दिली. मंजुरीनंतर आवश्यक तांत्रिक आणि परिचालन प्रक्रिया पूर्ण करून अतिरिक्त डबे जोडले जाणार आहेत.

**प्रवाशांना मिळणार मोठा दिलासा**

डब्यांची संख्या वाढल्यानंतर एकाच वेळी दुप्पट प्रवाशांना प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे प्रतीक्षा यादीवरील ताण कमी होण्यास मदत होईल. सणासुदीच्या काळात किंवा अचानक प्रवासाची गरज निर्माण झाल्यास प्रवाशांना कन्फर्म तिकीट मिळण्याची शक्यता वाढेल. व्यावसायिक, विद्यार्थी, नोकरदार तसेच वैद्यकीय कारणांसाठी प्रवास करणाऱ्या नागरिकांनाही याचा मोठा फायदा होणार आहे.

**नागपूर-पुणे प्रवास अधिक सुलभ**

वंदे भारत एक्स्प्रेसमुळे पुणे आणि नागपूरदरम्यानचा प्रवास अधिक वेगवान आणि आरामदायी झाला आहे. आधुनिक सुविधा, वेळेची बचत आणि स्वच्छतेमुळे या गाडीला प्रवाशांची विशेष पसंती मिळत आहे. वाढत्या लोकप्रियतेमुळेच गाडीची क्षमता वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# 'वाघ्या हळद'ला जागतिक ओळख मिळवून देण्यासाठी प्रशासनाची मोहीम; जीआय टॅग प्रक्रियेला गती

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**चंद्रपूर, दि. १६ :**चंद्रपूर जिल्ह्यातील पारंपरिक आणि वैशिष्ट्यपूर्ण 'वाघ्या हळद'ला राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वतंत्र ओळख मिळवून देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेतला आहे. या अनुषंगाने जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी वरोरा तालुक्यातील बोडखा आणि बारव्हा गावांना भेट देत हळद उत्पादक शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी उत्पादन, प्रक्रिया, पॅकेजिंग, विपणन आणि जीआय टॅगसंदर्भातील विविध बाबींचा आढावा घेत शेतकऱ्यांना प्रशासनाच्या सर्वतोपरी सहकार्याची ग्वाही दिली.



चंद्रपूर जिल्ह्याची ओळख असलेल्या 'वाघ्या हळद'च्या गुणवत्तेमुळे तिला देशांतर्गत तसेच जागतिक बाजारपेठेत मोठी मागणी निर्माण होण्याची क्षमता असल्याचे जिल्हाधिकारी वसुमना पंत यांनी यावेळी नमूद केले. हळदीचे उत्पादन वाढविण्याबरोबरच तिचे मूल्यवर्धन, आकर्षक पॅकेजिंग आणि प्रभावी विपणन यावर भर देण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.दौऱ्यादरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी हळद लागवडीच्या विविध टप्प्यांची माहिती घेतली. शेतकऱ्यांकडून उत्पादन प्रक्रियेतील अडचणी, वाढता उत्पादन खर्च, बाजारभावातील अस्थिरता, साठवणुकीच्या सुविधा आणि विक्री व्यवस्थेतील समस्या याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. शेतकऱ्यांनी आपल्या अडचणी मांडत प्रशासनाकडून आवश्यक मदतीची अपेक्षा व्यक्त केली.यावर जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित विभागांना आवश्यक सूचना देत शेतकऱ्यांच्या समस्यांवर सकारात्मक तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे स्पष्ट केले. तसेच कृषी क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान, संशोधनाधारित शेती पद्धती आणि बाजारपेठेपर्यंत थेट पोहोच निर्माण करण्यासाठी प्रशासन आवश्यक सहकार्य करेल, असे आश्वासन दिले.'वाघ्या हळद'ला भौगोलिक मानांकन अर्थात जीआय मिळवून देण्याच्या दृष्टीने आवश्यक प्रक्रिया गतीमान करण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. टॅग प्राप्त झाल्यास या हळदीची वेगळी ओळख निर्माण होऊन तिचे ब्रँडिंग अधिक प्रभावी होईल. परिणामी शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला अधिक चांगला बाजारभाव मिळण्यास मदत होणार आहे.

# तब्बल तीन बिबट्यांचा खात्मा करणारा हल्लेखोर बिबट जेरबंद

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**चंद्रपूर, दि. १६ :**बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणिसंग्रहालयातील बिबट सफारीत घुसून तीन बिबट्यांचा बळी घेणाऱ्या हल्लेखोर नर बिबट्याला वन विभागाने सोमवारी पहाटे जेरबंद केले. रविवारी घडलेल्या या धक्कादायक घटनेनंतर वन विभाग, प्राणिसंग्रहालय प्रशासन आणि वन कर्मचाऱ्यांनी रात्रभर शोधमोहीम राबवून अखेर या बिबट्याला पकडण्यात यश मिळवले

गोरेवाडा जंगलातील हा नर बिबट रविवारी दुपारच्या सुमारास प्राणिसंग्रहालयाचे कुंपण ओलांडून बिबट सफारी परिसरात शिरला होता. तेथे त्याचा सफारीतील बिबट्यांशी संघर्ष झाला. या संघर्षात प्राणिसंग्रहालयातील दोन नर आणि एका मादी बिबट्याचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच वन विभागाने तातडीने परिसराची पाहणी केली. तपासणीदरम्यान तिन्ही बिबट्यांचे मृतदेह आढळून आले. त्यानंतर राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या नियमांनुसार मृत बिबट्यांवर अंत्यसंस्कार करण्यात आले.

गोरेवाडा जंगलातील हा नर



बिबट रविवारी दुपारच्या सुमारास प्राणिसंग्रहालयाचे कुंपण ओलांडून बिबट सफारी परिसरात शिरला होता. तेथे त्याचा सफारीतील बिबट्यांशी संघर्ष झाला. या संघर्षात प्राणिसंग्रहालयातील दोन नर आणि एका मादी बिबट्याचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच वन विभागाने तातडीने परिसराची पाहणी केली. तपासणीदरम्यान तिन्ही बिबट्यांचे मृतदेह आढळून आले. त्यानंतर राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या नियमांनुसार मृत बिबट्यांवर अंत्यसंस्कार करण्यात आले.अखेर सोमवारी पहाटे हल्लेखोर बिबट्याला जेरबंद करण्यात वन विभागाला यश आले. या कारवाईमुळे इतर प्राण्यांवरील संभाव्य हल्ल्यांचा धोका टळल्याचे प्राणिसंग्रहालय प्रशासनाने सांगितले.

**नाम स्पष्टीकरण सुचना**

सर्वसाधारण को सुचित किया जाता है कि, मेरा नाम कुछ दस्तावेजो मे "Atul Omprakash Agrawal" तथा कुछ दस्तावेजो मे "Atulkumar Omprakash Agrawal" अंकीत है. उक्त दोनो नाम एक ही व्यक्ती के है. अतः भविष्य मे "Atul Omprakash Agrawal" एवं "Atulkumar Omprakash Agrawal" को एक ही व्यक्ति का नाम माना जाए.

दिनांक १५.०६.२०२६

घोषणाकर्ता

अनुपकुमार ओमप्रकाश अग्रवाल, अकोला चक्की के सामने,स्टेशन विभाग मुर्तिजापूर ता. मुर्तिजापूर जि. अकोला, महाराष्ट्र

अधिवक्ता

(ॲड.तिलक के सोमाणी)

**लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, अकोला**

**ई- निविदा सुचना क्र. ०२**

**सन २०२६-२७**

जिल्हा जलसंधारण अधिकारी, लघुपाटबंधोर विभाग, जिल्हा परिषद, अकोला येथील जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत **कोल्हापुरी पध्दतीचा बंधारा क्र. ०१ बांधकाम करणे मौजे निंबी मालोकार ता. अकोला** या कामाचे निविदा प्रक्रिया हि जलसंपदा विभाग शा.नि.दिनांक. १८/१०/२०२३ व दिनांक, ०१/०८/२०२५ जलसंधारण विभाग शा.नि.०३/०१/२०२३ ग्रामविकास विभाग शा.नि. दिनांक. २३/०९/२०१३ व दिनांक. ०८/१०/२०२१ च्या अनुषंगाने राबविण्यांत येत आहे. ई - निविदा प्रक्रिया मधुन योग्य त्या प्रवर्गा कडुन खुल्या ऑनलाईन ई निविदा मागविण्यांत येत आहेत. सदर ई निविदा सुचना क्र.०२ सन २०२६-२०२७ दिनांक. १७ जुन २०२६ रोजी सविस्तरपणे खालील संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत आलेली आहे.

Main Portal-https://mahatenders.gov.in

**जिल्हाजिलसंधारण अधिकारी, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, अकोला**

**अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला**

**जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय, बुलढाणा**

**महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, बुलढाणा-४४३००१**

**इक्बाल चौक, जामा मस्जिद समोर, बुलढाणा.**

क्र.मरावमं/जिअव/चौकशी/२६२/१७०/२०२६ दिनांक: ०४/६/२०२६

**(जाहीर प्रगटन)**

उम्मीद अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये वक्फ संस्थेच्या योग्य प्रशासनाकरिता योजना मंजूर करणेबाबत.

वक्फ संस्थेचे नाव व पत्ता :- मुस्लिम मस्जिद, उकळी बु. मौजे उकळी बु. ता. संग्रामपूर जि. बुलढाणा

(MSBW/BLD/ २७७/२०१६ दि. २८.०४.२०१६)

उपरोक्त वक्फ संस्था महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात नोंदणीकृत असून अर्जदार शेख रहीम शेख करीम यांनी दिनांक ४/५/२०२६ रोजीच्या अर्जान्वये सदर संस्थेच्या व्यवस्थापनाकरिता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे प्रारूप योजना दाखल केलेली आहे. प्रारूप योजनेतील तरतूदीनुसार विश्वस्तांचा कार्यकाळ ५ वर्षाचा असून व्यवस्थापन समिती निवडीची रित निवडणुक अशी आहे. योजनेमध्ये नमूद प्रस्तावित व्यवस्थापन समिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | पद | वय (वर्षे) |
|---|---|---|---|
| १. | शेख रहीम शेख करीम | अध्यक्ष | ३३ |
| २. | शे. मजीत शे. रज्जाक | उपाध्यक्ष | ५२ |
| ३. | शेख अहमद शेख समद | सचिव | ३४ |
| ४. | समीर मुनीर पटेल | कोषाध्यक्ष | २८ |
| ५. | याकुब शाह मलंग शाह | सदस्य | ५३ |
| ६. | सलीम शाह अय्युब शाह | सदस्य | ३४ |
| ७. | मुजिब अ. नवी पटेल | सदस्य | ४८ |
| ८. | अमोल अ. लतीफ भालेराव | सदस्य | ४१ |

सदर प्रारूप योजनेबाबत काही तक्रारी, आक्षेप असल्यास संबंधितांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसाच्या आत, जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय बुलढाणा, एकबाल चौक, जामा मस्जिद समोर, बुलढाणा, ता. जि. बुलढाणा - ४४३००१ येथे आपले म्हणणे लिखित स्वरूपात दाखल करावे. विहीत वेळेनंतर आक्षेप प्राप्त झाल्यास त्याची दखल घेण्यात येणार नाही. याची दक्षता घ्यावी.

**(अतिक अ. शेख)**

**जिल्हा वक्फ अधिकारी, बुलढाणा**

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**ई-निविदा सुचना-१८/२०२६-२७**

१. **च सं ई.जि १६२ कोड ३००००६९५८५ :-** औ.वि.के. पारस चक्रमाला संधारण विभाग येथे वार्षीक ओव्हरहॉल दरम्यान विविध एच टि फास्टनर्स चा पुरवठा करणे(Esti. रू :- ४.१८ लाख, EMD रू:- ७६८२/-)

२. **ज प्र ई.नि १६३ कोड ३००००६९५८६ :-**औ. वि. के. पारस येथे पिण्याच्या पाण्याच्या प्रकल्पासाठी (PTP-५) आणि सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पासाठी (STP/WTP) लॅमेला ट्युब सेटलर मिडीयाचा पुरवठा करणे. (Esti. रू : १७.३४ लाख, EMD रू :- २०८४०/-)

३. **एम पी डी ई.नि १६४ कोड ३००००६९५८१ :-** औ.वि.के. पारस २५० मे वॅ येथे एम ई आर सी च्या नविन मार्गदर्शना मार्फत विविध विभागासंबंधी CAPEX स्किम (डि पी आर आणि नॉन डिपीआर) ची थर्ड पार्टी कडुन तपासणी करिता सेवा पुरविण्याचा कंत्राट. (Esti. रू :- ५.९९ लाख, EMD रू :- ९४९९/-)

४. **बा. सं ई.नि १६५ कोड ३००००६९७८८ :-** औ.वि. के. पारस २५० मे वॅ संच ३ AOH दरम्यान कॅपलॉक स्कॅफोल्डींग उभारणे आणि फस्टपास मधील बॉयलर ट्यूबचे जेट क्लिनींग कामाचा कंत्राट. (Esti. रू : २२.८५ लाख, EMD रू : २६३५७/-)

५. **को हा वि ई.मि १६६ कोड ३००००६९७४५ :-** औ.वि.के. पारस २x२५० मे वॅ कोळसा हाताळणी विभागा करिता कन्व्हेअर बेल्ट सेफ्टी उपकरणे जसे पुल कॉर्ड स्विच आणि प्रॉक्झीमीटी स्विच चा पुरवठा करणे. (Esti. रू : २.७५ लाख, EMD रू : ६२६०/-)

६. **उ वि ई.नि १६७ कोड ३००००६९७६१ :-** औ.वि. के. पारस येथे C&I विभागातील सदोष इलेक्ट्रॉनिक काड्‌र्सची संपूर्ण दुरूस्ती व चाचणीच्या कामाचा कंत्राट. (Esti. रू. :- ४.०९ लाख, EMD रू :- ७५९९/-)

७. **बा सं ई.नि १६८ कोड ३००००६९७१७ :-** औ.वि.के. पारस २५० मे वॅ संच ३ AOH दरम्यान जी आय क्लॅडींग नेटल शीट चा पुरवठा करणे. (Esti. रू :- ३.९९ लाख, EMD रू :- ७४९६/-)

८. **रा हा वि ई.नि १६९ कोड ३००००६९७२६ :-** औ.वि.के. पारस संच ३ येथे कॅपिटल ओव्हरहॉल दरम्यान ECO/APH/ डक्ट हॉपर्स, फ्लशिंग बॉक्स डिस्चार्ज हेडन पाईपलाईन, कॉमन ट्रफ इ. ची फॅब्रीकेशन, उभारणी आणि दुरूस्तीच्या कामाचा कंत्राट. (Esti. रू : ६.१६ लाख, EMD रू :-९६६०/-)

९. **बा सं ई.नि १७० कोड ३००००६९७१२ :-** औ.वि.के. पारस संच ३ AOH दरम्यान बीबीडी कोल मिलच्या क्लासिफायर हाउसिंग इंटरनल कोन (पीएन-०२) ची खरेदी आणि आउटलेट व्हेंचुरी (पीएन-०८) असेब्लीचा पुरवठा करणे. (Esti. रू: ५.६१ लाख, EMD रू :- ९११०/-)

१०. **बा सं ई.नि १७१ कोड. ३००००६९७२० :-** औ. वि. के. पारस २X२५० में वॅ संच ३ बॉयलरच्या AOH दरम्यान केमिकल बॉन्डेड प्लॅस्टिक रिफ्रॅक्टरीचा पुरवठा करणे.(Esti. रू.:- २.९७ लाख, EMD रू :- ६४७६/-)

११. **को हा वि ई. नि १७२ कोड ३००००६९७०१:-** औ. वि. केंद्र पारस २५० मे वॅ येथील राखड हाताळणी विभागातील कन्वेयर बेल्ट ड्राईव्हच्या ई डी कपलिंग खरेदी करण्याचा कंत्राट. (Esti. रू:- ९.३५ लाख, EMD रू :- १२८५४/-)

१२. **बा सं ई.नि १७३ कोड ३००००६९७७४ :-** औ.वि.के. पारस २५० मे वॅ ३ संचाचे ओव्हरहॉल देखभाली मध्ये एच पी गेट / ग्लोब व्हॉल्वच्या सर्व्हिसिंगच्या कामाचा कंत्राट- (Esti. रू:- २.६६लाख, EMD रू :- ६९६१/-)

**१) ई निविदा अ.क्र. १ ते १२ विक्रिचा कालावधी दि. १७.०६.२०२६ ते ०७.०७.२०२६ सादर करण्याची दि ०८.०७.२०२६ वेळ १६.०० वा.**

**टीप.** सविस्तर माहिती करीता कृपया आमची वेबसाईट पहावी **https://eprocurement.mahagenco.in**

**मुख्य अभियंता औ. वि. केंद्र, पारस**

**अकोला महानगरपालिका, अकोला**

**पुर्व झोन कार्यालय**

**जाहीर सुचना**

अकोला महानगरपालिका अंतर्गत पुर्व झोन कार्यालय मधील प्रभागातील परिक्षेत्रातील वृक्ष तोडणे परवानगी मिळणे बाबत निवेदने व विनंती अर्ज प्राप्त झाले आहेत. वृक्ष तोडण्या विरूध्द नागरिकांची काही हरकत व सुचना असल्यास पुढील सात दिवसाच्या आत क्षेत्रीय कार्यालय पुर्व झोन, अकोला महानगरपालिका अकोला येथे पुराव्यासह हरकत दाखल करावी. अन्यथा खालील प्रमाणे वृक्ष तोडण्याबाबत वृक्ष प्राधिकरण समिती गुणवत्तेवर निर्णय घेऊन पुढील कार्यवाही करणार कृपया याची नोंद घ्यावी.

| अ.क्र | अर्जदाराचे नाव व पत्ता | वृक्ष प्रकार | संख्या | वृक्ष तोडण्याची कारणे |
|---|---|---|---|---|
| १ | स्वच्छता निरीक्षक, प्रभाग क्र. ६, पुर्व झोन, मनपा अकोला | सुकलेले झाड | ०२ | रतनलाल प्लॉट चौकातील एसबीआय एटीएम समोरील सदर झाड वाळलेले असून वादळीवाऱ्यामुळे पडण्याची शक्यता आहे. |
| २ | स्वच्छता निरीक्षक, प्रभाग क्र. ६, पुर्व झोन, मनपा अकोला | सुकलेले झाड | ०१ | सुकलेले झाड रेल्वे स्टेशन चौक ते गट्टम प्लांट चौक रोडवरील कटयारमल बिछायत समोरील श्रीकांत सातरकर यांचे घरासमोरील सदर झाड वाळलेले असून वादळीवाऱ्यामुळे पडण्याची शक्यता आहे. |
| ३ | स्वच्छता निरीक्षक, प्रभाग क्र. ६, पुर्व झोन, मनपा अकोला | कडुनिंब | ०१ | रेल्वे स्टेशन चौक ते गट्टम प्लांट रोड वरील हॉटेल शगुन समोरील सदर झाड वाळलेले असून वादळीवाऱ्यामुळे पडण्याची शक्यता आहे. |
| ४ | पंढरी किसन ढोले, कमला नेहरू नगर, अकोला | जांभुळ | ०१ | फांद्या घरावर पडत असल्यामुळे झाड तोडणे आवश्यक आहे. |

**प्र. सहाय्यक आयुक्त**

**क्षेत्रिय कार्यालय पुर्व**

**अकोला महानगरपालिका, अकोला**

महत्त्वाचे

## सोशल मिडियावर 'दादा'ची बदनामी

**नवी दिल्ली:** पश्चिम बंगालमधून एक मोठी बातमी समोर येत आहे. भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार आणि बीसीसीआयचा अध्यक्ष डावखुरा फलंदाज सौरव गांगुलीने एका फेसबुक पोस्टविरुद्ध पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. सौरव गांगुली भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार आहे. तसेच तो बीसीसीआयचा माजी अध्यक्ष देखील आहे. त्याने सोशल मिडियावरील एका पोस्टविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. त्याने कोलकाता पोलिस ठाण्यात अधिकृत तक्रार दाखल केली आहे. फेसबुक पेज विरोधात त्याने तक्रार दाखल केली आहे.
सौरव गांगुलीने सोशल मिडियावरील एका मोठ्या पेजविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. यामध्ये त्याने माझ्याविरुद्ध सातत्याने खोटी, चुकीची आणि अपमानास्पद माहिती दिली जात असून, माझी प्रतिमा बिघडवण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप केला आहे. सौरव गांगुलीने ठाकूरपुर पोलिस स्टेशनमध्ये लेखी तक्रार केली आहे. यामध्ये त्याने आपल्या तक्रारीत त्याने त्या पेजचा देखील उल्लेख केल्याचे समजते आहे.

## श्रीलंकन खेळाडूच्या 'या' दोन शब्दांमुळे भडकला सूर्यवंशी

**नवी दिल्ली:** भारत 'अ' आणि श्रीलंका 'अ' यांच्यातील सुपर ओव्हर सामन्यादरम्यान झालेल्या भयंकर राड्याने सध्या क्रिकेट जगताला हादरवून सोडले आहे. या वादाचा केंद्रबिंदू असलेला भारताचा १५ वर्षीय फलंदाज वैभव सूर्यवंशी हा प्रतिस्पर्धी संघाच्या खेळाडूवर का धावून गेला? याचे धक्कादायक कारण आता समोर आले आहे. क्रिकबझच्या हवाल्याने मिळालेल्या माहितीनुसार, श्रीलंकेच्या एका खेळाडूने केलेल्या आक्षेपार्ह शेरेबाजीमुळे हा संपूर्ण वाद पेटला होता.खराब प्रकाशामुळे पंचांचा नकार असतानाही कर्णधार तिलक वर्माच्या आग्रहाखातर हा सुपर ओव्हर सामना खेळवण्यात आला होता. या सामन्यात श्रीलंकेच्या १७ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना भारतीय संघ केवळ ९ धावाच करू शकला. भारताचा पराभव झाल्यानंतर वैभव सूर्यवंशी कमालीच्या निराशेत पॅव्हेलियनकडे परतत होता.

# फिफा वर्ल्ड कपमध्ये मोठा उलटफेर!

## पदार्पण करणाऱ्या केप व्हर्डेने स्पेनला गोलशून्य बरोबरीत रोखले


**नवी दिल्ली: दि.१६ वृत्तसंस्था**



फिफा वर्ल्ड कपच्या ग्रुप 'एच'च्या सलामीच्या सामन्यात फुटबॉल जगतातील सर्वात मोठा उलटफेर पाहायला मिळाला. युरोपियन चॅम्पियन आणि माजी विश्वविजेत्या स्पेनला, वर्ल्ड कपमध्ये पहिल्यांदाच पाऊल ठेवणाऱ्या केप व्हर्डे संघाने ०-० अशा ऐतिहासिक बरोबरीत रोखले. अटलांटा येथील मर्सिडीज-बेंझ स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात केप व्हर्डेच्या अभेद्य बचावाने इतिहास रचला.सामन्यात सुरुवातीपासूनच स्पेनने अपेक्षेप्रमाणे चेंडूवर ७४ टक्के नियंत्रण राखले. त्यांनी केप व्हर्डेच्या गोलपोस्टवर एकूण २३ शॉटस् मारले, यातील ८ शॉटस् ऑन-टार्गेट होते. मात्र, केप व्हर्डेच्या बचाव फळीने अप्रतिम ब्लॉक्स करत स्पेनला गोल करू दिला नाही. स्पेनचे मुख्य प्रशिक्षक लुईस डी ला फुएंटे यांनी ७१ व्या मिनिटाला गॅव्हेच्या जागी यामालला उतरवले. त्यापाठोपाठ डॅनी ओल्मो आणि निको विल्यम्स यांनाही संधी दिली; परंतु केप व्हर्डेच्या लोपेस आणि बॉर्जेस यांनी उत्कृष्ट टॅकल करत स्पेनचे आक्रमण निष्प्रभ केले.केप व्हर्डे चा कर्णधार आणि ४० वर्षीय गोलकीपर वोझिन्हा या सामन्याचा खरा हिरो ठरला. त्याने स्पेनचे तब्बल ८ मोठे गोलचे प्रयत्न हाणून पाडले. पहिल्या हाफमध्ये त्याने फ`रान टॉरेसचे सलग तीन प्रयत्न अपयशी ठरवले. यामाल आणि ओल्मोची रणनीती देखील स्पेनला काहीच यश मिळवून देऊ शकली नाही.

## यंकर वाद, हुटिंग आणि तणावादरम्यान इराणने अमेरिकेत खेळला पहिला सामना





**नवी दिल्ली: दि.१६ वृत्तसंस्था**

तीव्र तणाव आणि व्यापक वादाच्या पार्श्वभूमीवर, इराणने न्यूझीलंडविरुद्ध २-२ अशा रोमांचक बरोबरीने आपल्या फिफा विश्वचषक मोहिमेला सुरुवात केली. सोफी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात इराणने दोनदा पिछाडीवर पडल्यानंतर पुनरागमन केले. अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यात युद्ध सुरू झाल्यापासून इराणचे विश्वचषक चक्र अशांत राहिले आहे. गट फेरीचे सामने अमेरिकेबाहेर हलवण्याची इराणची मागणी फिफाने फ`टाळल्यानंतर अखेरीस इराणने या स्पर्धेत खेळण्याचा निर्णय घेतला. सुरक्षेच्या कारणास्तव, इराणी संघाने आपला सराव तळ ॲरिझोनाहून तिजुआना येथे हलवला आणि सामन्याच्या केवळ एक दिवस आधी ते अमेरिकेत दाखल झाले.लॉस एंजेलिस स्टेडियमवर मोठ्या संख्येने परदेशस्थ इराणी चाहते जमले होते. सामन्यापूर्वीचे वातावरण भावनिक आणि तणावपूर्ण होते. राष्ट्रगीत सुरू असताना, अनेक चाहत्यांनी सरकारविरोधात निषेध म्हणून पाठ फिरवली आणि घोषणाबाजी केली, तर शेकडो इराणी-अमेरिकन लोकांनी स्टेडियमबाहेर निदर्शने केली.
फिफा क्रमवारीत २० व्या क्रमांकावर असलेल्या इराणविरुद्ध, ८५ व्या क्रमांकावर असलेल्या न्यूझीलंडने अपेक्षेपेक्षा खूपच चांगली कामगिरी केली. सामन्याच्या सातव्या मिनिटाला, न्यूझीलंडचा कर्णधार ख्रिस वूडच्या पासवर एलिजा जस्टने एका अप्रतिम व्हॉलीने गोल करून चाहत्यांना चकित केले. त्यानंतर इराणने जोरदार पुनरागमन केले आणि ३२ व्या मिनिटाला, रामिन रझाईयानने बॉक्सच्या उजव्या बाजूने एक अप्रतिम गोल करून सामना १-१ असा बरोबरीत आणला.दुसऱ्या हाफमध्येही तीच परिस्थिती कायम राहिली. ५४ व्या मिनिटाला, एलिजा जस्टने पुन्हा एकदा कर्णधार ख्रिस वूडकडून पास घेऊन गर्दीतून चेंडू जाळ्यात टाकला आणि न्यूझीलंडला २-१ अशी आघाडी मिळवून दिली. पण इराणने हार मानली नाही. ६४ व्या मिनिटाला, मोहम्मद मोहेब्बीने रामिन रझाईयानच्या अचूक लांब पासवर गोल करून सामना २-२ असा बरोबरीत आणला. अंतिम शिट्टी वाजल्यानंतर, दोन्ही संघांतील खेळाडूंनी खिलाडूवृत्ती दाखवत एकमेकांना मिठी मारली, तर इराणी खेळाडूंनी त्यांच्या हजारो चाहत्यांचे आभार मानण्यासाठी मैदानाला प्रदक्षिणा घातली.

## नंदनी शर्माची भारतीय महिला संघात निवड

**नवी दिल्ली: दि.१६ वृत्तसंस्था**



आयसीसी महिला टी-२० वर्ल्ड कप २०२६ चा थरार सुरू झाला असून बीसीसीआयने जाहीर केलेल्या भारतीय संघात एका नावाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. ते नाव म्हणजे वेगवान गोलंदाज नंदिनी शर्मा गल्ली क्रिकेटपासून सुरू झालेला तिची ही कहाणी आणि थेट टीम इंडियाच्या जर्सीपर्यंतचा तिचा हा थक्क करणारा प्रवास नेमका कसा होता?
नंदिनी शर्मा महिला प्रीमियर लीगमुळे खऱ्या अर्थाने चर्चेत आली. २४ वर्षीय नंदिनीचा जन्म चंदीगडमध्ये झाला. २४ वर्षीय या खेळाडूचा समावेश बीसीसीआयने थेट भारतीय महिला क्रिकेट संघात टी २० वर्ल्ड कपसाठी केला आहे. त्यामुळे अनकॅप्ड खेळाडूला बीसीसीआयने संधी दिल्याने संपूर्ण क्रिकेट जगताचे लक्ष वेधून घेतले आहे.नंदनी शर्माचा प्रवास थक्क करणारा आहे. तिची भारतीय संघात निवड झाल्याने संपूर्ण चंदीगडसह देशभरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. 'डब्ल्यूपीएल २०२६' मुळे नंदिनी शर्मा खऱ्या अर्थाने प्रकाशझोतात आली. दिल्ली कॅपिटल्सच्या संघाने लिलावादरम्यान २० लाख रुपयांच्या मूल किंमतीमध्ये संघात सामील करून घेतले होते.

## आज एकाच दिवशी टीम इंडियाचे तब्बल ३ मोठे सामने



**नवी दिल्ली: दि.१६ वृत्तसंस्था**


भारतीय क्रिकेट चाहत्यांसाठी बुधवार, १७ जून हा दिवस अत्यंत रोमांचक आणि ऐतिहासिक ठरणार आहे. सध्या टीम इंडियाचे वेगवेगळे संघ जगातील विविध मैदानांवर आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळण्यात व्यस्त आहेत. एका बाजूला अफगाणिस्तानचा वरिष्ठ संघ भारत दौऱ्यावर आहे, तर दुसऱ्या बाजूला युवा खेळाडूंचा समावेश असलेला भारत 'अ' संघ श्रीलंका दौऱ्यावर तिरंगी मालिका खेळत आहे. याचदरम्यान इंग्लंडमध्ये आयसीसी महिला टी-२० वर्ल्ड कप २०२६ चा थरार रंगला आहे. विशेष म्हणजे, या तीनही स्पर्धांमध्ये बुधवार, १७ जून रोजी भारताचे तीन वेगवेगळे संघ एकाच दिवशी मैदानात उतरणार आहेत. सकाळपासून ते रात्री उशिरापर्यंत चाहत्यांना क्रिकेटचा नॉन-स्टॉप ओव्हरडोज मिळणार आहे. त्यामुळे कोणत्याही सामन्याचा थरार चुकू नये म्हणून या सर्व सामन्यांची अचूक वेळ आणि शेड्युल आधीच नोंदवून ठेवा.बुधवारच्या या महाशेड्यूलची सुरुवात युवा खेळाडूंच्या सामन्याने होईल. युवा फलंदाज तिलक वर्माच्या नेतृत्वाखाली भारत 'अ' संघ सध्या श्रीलंकेत तिरंगी ५० षटकांची मालिका खेळत आहे. या मालिकेतील भारताचा शेवटचा आणि अत्यंत महत्त्वाचा लीग सामना अफगाणिस्तान 'अ' संघाविरुद्ध खेळवला जाणार आहे. भारतीय संघासाठी हा सामना 'करो या मरो' असा असेल. भारताने पहिल्या सामन्यात श्रीलंकेचा पराभव केला होता, मात्र दुसऱ्या सामन्यात अफगाणिस्तानने भारताला धूळ चारली. त्यानंतर श्रीलंकेविरुद्धचा तिसरा सामना ५० षटकांत टाय झाला आणि सुपर ओव्हरमध्ये टीम इंडियाला पराभवाचा सामना करावा लागला. आता अंतिम फेरीत धडक मारण्यासाठी भारताला हा सामना कोणत्याही परिस्थितीत जिंकावाच लागेल. हा वनडे सामना भारतीय वेळेनुसार सकाळी १०:०० वाजता सुरू होईल आणि सायंकाळी ६:०० वाजेपर्यंत संपण्याची शक्यता आहे. दिवसातील दुसरा मोठा सामना भारत आणि अफगाणिस्तानच्या वरिष्ठ राष्ट्रीय संघांमध्ये खेळवला जाईल. दोन्ही देशांमध्ये सध्या ३ एकदिवसीय सामन्यांची मालिका सुरू आहे. मालिकेतील पहिल्या सामन्यात टीम इंडियाने एकतर्फी विजय नोंदवला होता. आता कर्णधार शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली भारतीय वरिष्ठ संघ दुसरा सामना जिंकून मालिका खिशात घालण्याच्या उद्देशाने मैदानात उतरेल. हा हाय-व्होल्टेज ५० षटकांचा सामना दुपारी १:३० वाजता सुरू होईल आणि रात्री ८:३० वाजेपर्यंत चालेल.संध्याकाळच्या सत्रात क्रिकेटप्रेमींचे लक्ष थेट इंग्लंडमध्ये सुरू असलेल्या आयसीसी महिला टी-२० विश्वचषकाकडे असेल. पहिल्याच सामन्यात कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा धुव्वा उडवल्यानंतर, आत्मविश्वासाने रसरसलेला हरमनप्रीत कौरचा भारतीय महिला संघ आपल्या दुसऱ्या सामन्यासाठी सज्ज झाला आहे. या सामन्यात भारताचा सामना नेदरलँड्सविरुद्ध होणार आहे. हा टी-२० सामना असल्याने तो संध्याकाळी ७:०० वाजता सुरू होईल आणि रात्री १०:३० वाजेपर्यंत संपेल.या ऐतिहासिक वेळापत्रकाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे संध्याकाळी ७:०० ते रात्री ८:०० वाजे दरम्यान क्रिकेट चाहत्यांची मोठी चांदी होणार आहे. या एका तासाच्या कालावधीत शुभमन गिलचा पुरुष संघ अफगाणिस्तानविरुद्ध वनडे सामन्याच्या अंतिम टप्प्यात खेळत असेल, तर दुसरीकडे हरमनप्रीत कौरची महिला ब्रिगेड वर्ल्ड कपमध्ये नेदरलँड्सविरुद्ध पहिल्या षटकाचा सामना करत असेल. एकाच वेळी दोन भारतीय संघ वेगवेगळ्या देशांत मैदानात बाजी मारताना पाहणे चाहत्यांसाठी पर्वणीच ठरेल.

## दुग्धजन्य पदार्थ महागले

**नवी दिल्ली:** पेट्रोल, डिझेल आणि एलपीजी सिलिंडरच्या अलीकडील वाढलेल्या दरवाढीमुळे सर्वसामान्यांचे बजेट विस्कळीत झाले आहे. लोक महागाईबद्दल बरीच तक्रार करताहेत. पण माहिती आहे का? या मोठ्या गोष्टींचा विचार करता लहान गोष्टींकडे आपण लक्षच दिला नाही. ज्यांनी आपल्या खिशाला कधीच कात्र लावली आहे. गेल्या १५ दिवसांत इतर अनेक वस्तूंच्या किमतीही वाढल्या आहेत, ज्याबद्दल आपल्यापैकी बहुतेकांना कदाचित माहिती नसेल. चला तर मग जाणून घेऊयात नेमक्या कोणत्या अशा गोष्टी आहेत ज्यांनी मागील १५ दिवसांत आपला दर बदलला आणि महाग झाल्यात.गेल्या काही दिवसांपासून अमूल गोल्डचे १-लिटरचे पॅकेट महाग झाले आहे. त्याची किंमत आता ६८ रुपयांवरून ७० रुपये झाली आहे. अमूल ताझाची किंमतही ५५ रुपयांवरून ५७ रुपये झाली आहे. मदर डेअरीच्या फुल क्रीम दुधाची (१ लिटर) किंमत ६९ रुपयांवरून ७२ रुपये झाली आहे. त्याचबरोबर, मदर डेअरीच्या म्हशीच्या दुधाच्या दरातही ५ रुपयांची वाढ झाली असून, त्याची किंमत पूर्वी ७५ रुपये प्रति लिटरवरून ८० रुपये झाली आहे.घाऊक बाजारात मालवाहतुकीच्या दरात झालेल्या वाढीचा इतका परिणाम झाला आहे की, किरकोळ विक्रेत्यांनी सुटा तांदूळ आणि डाळींचे दर प्रति किलो ५-७ रुपयांनी वाढवले आहेत. मॅरिकोने आपल्या प्रमुख खाद्यतेल, सफोलाच्या दरात ६-११ टक्क्यांनी वाढ केली आहे.

# गावांमध्ये काम मिळेना ; ग्रामीण बेरोजगारीत वाढ

**नवी दिल्ली: दि.१६ वृत्तसंस्था**



जगभरात महागाईचे आकडे खुपच बिघडत चालले आहेत. त्याचबरोबर भारताची आकडेवारीदेखील चिंताजनक आहे. बेरोजगारीचा दर पुन्हा एकदा वाढला आहे. मे महिन्यात त्यात ५.५ टक्क्यांची वाढ झाली. एप्रिलमध्ये ५.२ टक्के असलेला बेरोजगारीचा दर आता ५.५ टक्क्यांवर पोहोचला आहे. गेल्या ११ महिन्यांतील ही सर्वाधिक वाढ आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, शहरांमधील परिस्थितीत थोडी सुधारणा झाली असली तरी, ग्रामीण भागातील परिस्थिती बिघडत आहे. ग्रामीण भागातील लोकांना काम मिळत नाहीये आणि यामुळे रोजगार बाजारात संकट निर्माण झाले आहे. एप्रिलमध्ये ४.६ टक्के असलेला ग्रामीण बेरोजगारीचा दर आता ५.१ टक्क्यांवर पोहोचला आहे. दरम्यान, शहरी बेरोजगारीचा दर कमी झाला आहे. पूर्वी ६.६ टक्के असलेला हा आकडा मे महिन्यात ६.४ टक्क्यांवर आला आहे. यावरून शहरांमध्ये रोजगाराच्या चांगल्या संधी असल्याचे दिसून येते. हे देखील लक्षात घेण्यासारखे आहे की, बेरोजगारीचा दर सलग चौथ्या महिन्यात वाढला आहे. गेल्या ११ महिन्यांतील ही सर्वोच्च पातळी मानली जात आहे. केवळ बेरोजगारीच वाढली नाही, तर काम करणाऱ्या लोकांचे प्रमाणही कमी झाले आहे. फोर्स पार्टिसिपेशन सहभाग दर एप्रिलमधील ५५ टक्क्यांवरून मे महिन्यात ५४.४ टक्क्यांपर्यंत घसरला. कामगार-लोकसंख्या गुणोत्तर () देखील ५२.२ टक्क्यांवरून ५१.४ टक्क्यांपर्यंत घसरले. याचा अर्थ असा की, रोजगार निर्मितीचा वेग श्रम बाजारात प्रवेश करणाऱ्या लोकांच्या संख्येपेक्षा मागे आहे.
अलीकडील आकडेवारी दर्शवते की ग्रामीण भागातील महिलांसाठी रोजगाराच्या संधी अत्यंत मर्यादित आहेत. तरुणांमध्येही बेरोजगारी ही चिंतेची बाब आहे. हे आता केवळ पुरुष आणि महिलांपुरते मर्यादित राहिलेले नाही; बेरोजगारीचा दर कोणत्याही देशाच्या आर्थिक आरोग्यासाठी धोका निर्माण करतो. वाढलेल्या रोजगारामुळे उत्पन्न वाढते, ज्यामुळे उपभोग आणि आर्थिक क्रियाकलापांना चालना मिळते. पण वाढत्या बेरोजगारीचा परिणाम ग्राहक खर्चावर होऊ शकतो आणि आर्थिक वाढीस अडथळा येऊ शकतो.

व्यापार जगत

## दागिने खरेदी करणे आणखी महागणार?

**मुंबई : दि.१६ वृत्तसंस्था**



इराण आणि अमेरिका-इस्त्रायल यांच्यातील तणावामुळे भारतीय परकीय चलन साठ्यावर दबाव वाढला होता. कच्च्या तेलासोबतच सोने-चांदीच्या परदेशातून केल्या जाणाऱ्या आयातीमुळे इंपोर्ट बिलात झालेली वाढ पाहून पंतप्रधान मोदींनी वर्षभर सोनं खरेदी टाळण्याचे आवाहन केले तसेच सरकारने दोन्ही मौल्यवान धातूंच्या आयातीवरील शुल्कात वाढ झाली. त्याचवेळी, आता सरकारने सोने-चांदीच्या आयातीवर आणखी एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.
तुम्हीपण सोने-चांदी खरेदी करण्याचा प्लॅन करत असाल तर ही बातमी तुमच्या कामाची आहे. देशांतर्गत बाजारातून सोने किंवा चांदी खरेदी करणाऱ्यांना सरकारच्या या नवीन निर्णयाचा मोठा धक्का बसू शकतो. गेल्या महिन्यात सोन्या-चांदीच्या आयातीवरील शुल्क वाढ केल्यानंतर आता सरकारने या दोन्ही मौल्यवान धातूंच्या किमतींमध्ये लक्षणीय वाढ जाहीर केली आहे. केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमा शुल्क मंडळ म्हणजे अधिकृत अधिसूचनेनुसार नवीन किमती तात्काळ प्रभावाने लागू केल्या गेल्या आहेत.विशेष म्हणजे अवघ्या तीन दिवसआधीच केंद्र सरकारने सोन्याचा मूळ आयात दर ८० डॉलर आणि चांदीचा दर २७६ डॉलरने कमी केला होता, पण आता सरकारने आपल्याच निर्णयावर यूटर्न घेतला आणि पुन्हा दर वाढवले.भारताच्या परकीय चलन साठ्यावरील वाढता दबाव पाहता सरकारने आयातीवर दरवाढीचा पर्याय निवडला असून गेल्या दोन महिन्यांत सरकारने सोन्यावरील आयात शुल्काच्या तरतुदी कडक करण्याची ही दुसरी वेळ आहे. गेल्या महिन्यात सरकारने सोने आणि चांदीवरील आयात शुल्क १५% पर्यंत वाढवले होते.पश्चिम आशियात अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव आणि संघर्षामुळे देशाच्या परकीय चलन साठ्यावर दबाव आला होता, जजो कमी करण्यासाठी आणि अनावश्यक आयात रोखण्यासाठी सरकारने देशाबाहेर जाणाऱ्या पैशाच्या प्रवाहावर अंकुश ठेवण्यासाठी गेल्या दोन महिन्यांत दुसऱ्यांदा कठोर आयात शुल्क वाढवण्याचे उपाययोजना लागू केले.सध्याच्या परिस्थितीत, सोने-चांदीच्या गुंतवणूकदारांनी आयात धोरणातील वारंवार होणाऱ्या बदलांशी संबंधित काही धोके समजून घेणे आवश्यक आहे. यापैकी पहिला म्हणजे मोठ्या प्रमाणात मालसाठा बाळगणाऱ्या दागिन्यांच्या किरकोळ विक्रेत्यांच्या नफ्यात अस्थिरता निर्माण होऊ शकते. आयात शुल्कात सतत होणाऱ्या बदलांमुळे मालसाठ्याच्या मूल्यांकनात अनिश्चितता निर्माण होऊ शकते.याशिवाय दुसरा धोका म्हणजे की मागणीत कमी येऊ शकते. वाढलेले आयात शुल्क मुळे स्थानिक किरकोळ दरात लक्षणीय वाढ झाली, तर दागिने खरेदीवरील खर्चही कमी होईल.

## आयसीआयसीआय प्रू सिग्नेचर सिक्युअर लाँच

**मुंबई : दि.१६ वृत्तसंस्था**

आयसीआयसीआय प्रुडेंशियल लाईफ इन्शुरन्सने आयसीआयसीआय प्रू सिग्नेचर सिक्युअर लाँच केले आहे, जो इन-बिल्ट (अंगभूत) हमीयुक्त मॅच्युरिटी लाभासह भारतीय आयुर्विमा क्षेत्रातील पहिली युनिट लिंक्ड इन्शुरन्स प्लॅन (युलिप) आहे.आयसीआयसीआय प्रू सिग्नेचर सिक्युअर हा एक नॉन पार्टिसिपेटिंग लिंक्ड इंडिव्हिज्युअल सेव्हिंग्ज लाईफ इन्शुरन्स प्लॅन आहे आणि कर-कार्यक्षम हमीयुक्त लाभांचे आश्वासन शोधणाऱ्या ग्राहकांसाठी याची रचना करण्यात आली आहे. हे उत्पादन एक सोपा प्रस्ताव मांडते - एकच वेळ गुंतवणूक करा, पॉलिसीच्या मुदतीत लाईफ कव्हरद्वारे सुरक्षित राहा आणि पाच वर्षांच्या शेवटी मॅच्युरिटी लाभ मिळवा. मॅच्युरिटीवर, ग्राहकाला फंडाचे मूल्य किंवा हमीयुक्त मॅच्युरिटी लाभ यापैकी जी रक्कम जास्त असेल ती मिळते, ज्यामुळे हमीयुक्त परिणामाचे आश्वासन मिळते.या लाँचवर भाष्य करताना आयसीआयसीआय प्रुडेंशियल लाईफ इन्शुरन्सचे चीफ प्रॉडक्ट ऑफिसर श्री. विकास गुप्ताय म्हणाले, ''हमीयुक्त परतावा शोधणारे ग्राहक पारंपारिकपणे मुदत ठेवी, बाँड्स आणि इतर हमीयुक्त-परतावा उत्पादनांसारख्या साधनांवर अवलंबून असतात. पण, ग्राहक आता अशा सोल्यूशन्सच्या शोधात आहेत, जे त्यांना हमीयुक्त परतावा आणि आर्थिक संरक्षणासोबतच कर-पश्चात अधिक चांगले परिणाम मिळवून देण्यास मदत करू शकतील. आयसीआयसीआय प्रू सिग्नेचर सिक्युअरची रचना हीच गरज पूर्ण करण्यासाठी करण्यात आली असून, एकाच प्रस्तावामध्ये युलिपचे फायदे, इन-बिल्ट हमीयुक्त मॅच्युरिटी लाभ आणि लाईफ कव्हर यांचा मेळ घालण्यात आला आहे.''

## थोडक्यात

### घरफोडी करणाऱ्या आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

**नागपूर :** घरफोडी करणाऱ्या आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे. पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत वुडलँड को-ऑपरेटिव्ह सोसायटी, दाभा, नागपूर येथे राहणारे फिर्यादी नारायण बनराम केळकर (वय ६६ वर्षे) हे आपल्या राहत्या घराला कुलूप लावून परिवारासह पुष्कर, राजस्थान येथे गेले होते. ३ ते ८ जूनच्या दरम्यान चोरट्यांनी बेडरूममधील अलमारीमधील रोख तसेच सोन्याचे वेगवेगळे दागिने, असा एकूण ३ लाख २० हजार किमतीचा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोउपनि पठाण यांनी अज्ञात आरोपीविरुद्धगुन्हा दाखल केला आहे.

### घातक शस्त्र बाळगणाऱ्यास अटक

**नागपूर :** घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक करण्यात आली आहे. लकडगंज पोलिसांचे पथक ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असताना बालाजी मंदिर चौकलकडगंज येथे एका संशयास्पद इसमास हटकले असता तो पळू लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले त्याने आपले नाव सलमान खान गफार खान ( मोमीनपुरा) असे सांगितले. पंचांसमक्ष त्याची अंगझडती घेतली असता आरोपीच्या ताब्यातून लोखंडी टोकदार भाल्याचे पाते मिळून आले.आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने शस्त्र बाळगून समक्ष मिळून आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने गुन्हा दाखल करून आरोपीस अटक केली आहे.

### मेरे महबूब ना जा'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

**नागपूर :** स्वरधारा परिवारातर्फे आयोजित करण्यात आलेल्या 'मेरे महबूब ना जा' या हिंदी चित्रपट गीतांच्या बहारदार कार्यक्रमाला नागपूरकर रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमात सुवर्णकाळातील अनेक अजरामर हिंदी चित्रपट गीतांचा सुरेल खजिना उलगडला गेला. त्यामुळे उपस्थित रसिकांना स्वरानंदाची अविस्मरणीय अनुभूती मिळाली. कार्यक्रमाची संकल्पना, आयोजन, संयोजन तसेच गायनाची जबाबदारी चंद्रशेखर तासगांवकर यांनी सांभाळली. कार्यक्रमाची सुरुवात शालिनी शुक्ला यांच्या सरस्वती वंदनेने झाली. संजय कुलकर्णी यांनी तांत्रिक सहाय्याची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. कार्यक्रमाच्या अखेरपर्यंत श्रोत्यांची उपस्थिती कायम राहिल्याने स्वरधारा परिवाराच्या या उपक्रमाला उत्स्फूर्त दाद मिळाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

### महिला बचत गटांना सरकारी जमीन

**नागपूर :** राज्यातील महिला बचत गटांसाठी राज्य सरकारने मोठी योजना जाहीर केली आहे. महसूल विभागाच्या पडीत जमिनींचा वापर करून महिलांना रोजगार देण्यासाठी प्रत्येक पात्र बचत गटाला १ हेक्टर (अडीच एकर) जमीन ५ वर्षांच्या लीजवर दिली जाईल. सोबतच, प्रत्येकी १ लाख रुपयांचे अनुदानही दिले जाणार असल्याची घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. या जमिनीवर चारा, बांबू किंवा नेपियर गवताची लागवड करता येईल. जिल्हा नियोजन समिती किंवा खनिज प्रतिष्ठानमधून हा निधी उपलब्ध केला जाईल.

# केंद्रीय शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा घेणारच

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. १६ : केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजनीमा न दिल्यास देशातील वेगवेगळ्या शहरांमध्ये शांततामय मार्गांनी आंदोलन करण्यात येणार आहे. तरीही राजीनामा न दिल्यास येत्या २० जून रोजी दिल्लीत संपूर्ण देशभरातील विद्यार्थी एकत्र येऊन शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा मागण्यात येईल त्याशिवाय माघार घेणार नाही, असा निर्धार अभिजीत दीपके यांनी व्यक्त केला**

## अभिजीत दीपके यांचा नागपुरात इशारा



ते नागपुरात पत्रकार परिषदेत बोलत होते.यावेळी त्यांनी काँग्रेसवरही सडकून टीका केली. सातत्याने परीक्षांमध्ये होणारे घोटाळे, विद्यार्थी आत्महत्या, सत्ताधा०यांकडे जबाबदारीची उणीव यामुळे तरुणांमध्ये प्रचंड असंतोष आहे. माझ्यावर राजस्थानातील जयपूरमध्ये झालेला हल्ला हा वाढत्या बेरोजगारीचे कारण आहे. त्यांना थोडे पैसे देऊन त्यांच्याकडून असे कामे करून घेतले जाते. त्यांना नोकरी असती तर त्यांनी कधीही असा प्रकार केला नसता. बेरोजगारीसाठी काँग्रेसही जबाबदार आहे. काँग्रेसने चुका केल्या म्हणूनच जनतेने भाजपाला सत्तेत बसवले; परंतु त्यांच्याकडूनही निराशाच झाली, असेही दीपके म्हणाले.

आंदोलन करणे हा प्रत्येकाचा अधिकार आहे भारताला १९४७ मध्ये जेव्हा स्वातंत्र्य मिळाले त्यासाठी मोठे आंदोलन उभे झाले होते आणि लोकशाहीचे सरकार स्थापन झाले. लोकशाही व्यवस्था टिकवायची असेल तर आंदोलन ही बाब आवश्यक आहे. आम्ही आंदोलन करतो याचा संबंध नेपाळ किंवा श्रीलंका येथील आंदोलनाशी जोडण्याचे काहीही कारण नाही. भाजपाचीच लोक केवळ देशप्रेमी आणि इतर सर्व देशद्रोही कशी होऊ शकतात, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

# भेसळप्रकरणी दोषींविरुद्ध ठोस कारवाई करा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. १६ :** अन्न पदार्थांच्या भेसळीतून नागरिकांच्या जीवीताला निर्माण झालेले धोके टाळण्यासाठी कोणत्याही परिस्थितीत भेसळ रोखण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत. यासाठी कायद्याचा प्रभावी अंमल करुन भेसळ रोखण्यासाठी आजवर घेतलेल्या नमुन्यांची दिलेल्या वेळेत तपासणी करून दोषींविरुद्ध ठोस कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी अन्न व औषध विभागाच्या अधिका०यांना दिले.

अन्न व औषध प्रशासन विभागाची त्रैमासिक आढावा बैठक जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी मागील तिमाहीतील कामकाजाचा आढावा घेण्यात आला. अन्नपदार्थांचे नमुना संकलन, तपासणी, परवाना व नोंदणी प्रक्रिया तसेच जनजागृती उपक्रमांवर चर्चा करण्यात आली. जिल्ह्यातील नागरिकांना सुरक्षित,



दर्जेदार अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत, यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाने अन्नसुरक्षा कायद्याची प्रभावी अंमलबजावणी केली पाहिजे. अलिकडच्या काळात चीजच्या नावाखाली चीज अनालॉगचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. यात पनीर या उत्पादनांबाबत ग्राहकांमध्ये संभ्रम निर्माण होऊ नये, यासाठी संबंधित विक्रेते व हॉटेल व्यवसायीकांनी आपल्या हॉटेलच्या आस्थापनांनी दर्शनी भागावर स्पष्ट माहिती देणारे फलक लावावेत, असे निर्देश जिल्हाधिका०यांनी दिले.

अन्नपदार्थांमधील भेसळ रोखण्यासाठी तपासणी मोहिमा अधिक तीव्र करण्याची आवश्यकता आहे. विशेषतः दूध व दुग्धजन्य पदार्थ, मिठाई, खाद्यतेल, मसाले, बेकरी पदार्थ आणि इतर दैनंदिन वापरातील अन्नपदार्थांची नियमित तपासणी करून संशयित नमुने प्रयोगशाळेत पाठविण्यात यावेत, असे त्यांनी सांगितले. नियमांचे उल्लंघन आणि भेसळ करणा०यांविरोधात कठोर कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. बैठकीत नागरिकांमध्ये अन्नसुरक्षेबाबत जागृती, जनजागृती उपक्रम, तसेच परवानाधारक खाद्य व्यवसायिकांच्या नियमित तपासणीबाबतही चर्चा झाली. नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड होणार नाही, यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाने अधिक दक्षतेने काम करावे, असे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी स्पष्ट केले. अन्न व औषध प्रशासन विभागाचे सहाय्यक आयुक्त (अन्न) रो.रा. शहा यांच्यासह वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

# मनपा 'रुग्णालय परिसर स्वच्छता' अभियान उत्साहात

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. १६ :** नागपूर महानगरपालिकेतर्फे पर्यावरण संवर्धन पंधरवड्यानिमित्त २१ जून पर्यंत राबविण्यात येणाऱ्या 'विशेष स्वच्छता अभियान' अंतर्गत सर्व दहा झोनमधील ५१ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि १०२ शहरी आरोग्य व आरोग्यवर्धिनी केंद्रांसह आयसोलेशन रुग्णालय आणि शासकीय व खाजगी रुग्णालय परिसरात "रुग्णालय परिसर स्वच्छता" अभियान उत्साहात राबविण्यात आले.

स्थायी समिती सभापती शिवानी दाणी-वखरे यांनी आयसोलेशन रुग्णालयास भेट देऊन स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित केले. पर्यावरण संवर्धन व सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने स्वच्छता अत्यंत महत्त्वाची असून नागपूर महानगरपालिका शहरातील सर्व आरोग्य संस्थांमध्ये अशा प्रकारचे स्वच्छता व

## पर्यावरण संवर्धन पंधरवडा निमित्त विशेष अभियान



जनजागृतीपर उपक्रम सातत्याने राबवित असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

महापौर निता ठाकरे, उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी-वखरे, सत्तापक्षनेते नरेंद्र बोरकर, मनपा आयुक्त डॉ. विपीन, विरोधी पक्षनेता संजय महाकाळकर, अतिरिक्त आयुक्त श्री. अंकित यांच्या निर्देशानुसार शहरातील विविध भागातील रुग्णालयांची साफसफाई मोहीम यशस्वीपणे राबविण्यात आली. आरोग्य विभागाचे आरोग्य कर्मचारी तसेच घनकचरा कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला. अभियानाअंतर्गत लक्ष्मीनगर, धरमपेठ, हनुमाननगर, धंतोली, नेहरूनगर, गांधीबाग, सतरंजीपुरा, लकडगंज, आशीनगर आणि मंगळवारी झोनमधील सर्व आरोग्य केंद्रांच्या परिसरात विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. यावेळी रुग्णालय परिसराची साफसफाई, घनकचऱ्याची योग्य विल्हेवाट, कचरा वर्गीकरण तसेच स्वच्छतेबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली. अभियानात वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, मुख्य स्वच्छता अधिकारी डॉ. गजेंद्र महल्ले, अतिरिक्त वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. नरेंद्र बहिरवार, साथरोग अधिकारी डॉ.गोवर्धन नवखरे, माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. सरला लाड, आयसोलेशन रुग्णालयाच्या प्रमुख डॉ. मेघा जैतवार, क्षयरोग तज्ञ डॉ. शिल्पा जिचकर,झोनल अधिकारी डॉ. ख्वाजा, मलेरिया फायलेरिया अधिकारी डॉ. मंजुषा मठपती, डॉ.एम.एस.यू चे वरिष्ठ सार्वजनिक आरोग्य तज्ञ डॉ. वीरेंद्र वानखेडे, झोनल वैद्यकीय अधिकारी डॉ. शीतल वंदिले, , यूपीएचसी कॉटन मार्केटचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अनुराग मिश्रा तसेच इंडियन मेडिकल असोसिएशन चे अध्यक्ष डॉ. सचिन गाटे व इतर कर्मचारी उपस्थित होते. मनपाच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात विविध झोनमधील वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी, परिचारिका, स्वच्छता कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला. स्वच्छ व निरोगी परिसर निर्माण करण्याच्या उद्देशाने नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अभियानाअंतर्गत आरोग्य संस्थांच्या परिसराची विशेष स्वच्छता करण्यात आली. तसेच कचऱ्याची योग्य विल्हेवाट, कचरा वर्गीकरण, जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन आणि स्वच्छतेचे महत्त्व याबाबत नागरिक, रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांमध्ये जनजागृती करण्यात आली.

# हत्याप्रकरणातील आरोपीला अटक

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**कुही, दि. १६ :** कुही पोलिसांनी गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे हत्याच्या गुन्ह्यातील आरोपीला अटक केली

माहितीनुसार,अंजना विनायक तुमडाम (रा. आकोली, ता. कुही) यांनी आपले पती विनायक लक्ष्मण तुमडाम (वय ६५ वर्षे, रा. आकोली, ता. कुही) यांना मौजा भोजापूर शिवार देशी भट्टीजवळ १३ जून २०२६ च्या दुपारी १ ते १४ जून २०२६ च्या सायंकाळी ५ वाजताच्या दरम्यान अज्ञात व्यक्तीने धारदार शस्त्राने वार करून खून केल्याची तक्रार नोंदविली होती. सदर प्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध कुही ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला. वरिष्ठ पोलिस अधीक्षक हर्ष ए. पोद्दार, अपर पोलिस अधीक्षक अनिल म्हस्के, उमरेड उपविभागीय पोलीस अधिकारी भाग्यश्री धिरबस्सी यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक राजेंद्र पाटील (प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कुही) यांच्या नेतृत्वात कुही पोलिसांनी गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे १५ जून २०२६ रोजी आरोपी नामे विजय वासुदेव तुमडाम (वय ३५ वर्षे, रा. आकोली, ता. कुही) यास पाचगाव हद्दीतून ताब्यात घेतले. यातील मृतक हा आरोपीचा नातेवाईक असून घरगुती कारणावरून आरोपीने मृतकाचा खून केल्याची माहिती दिली.

# जागतिक वृद्ध छळ-प्रतिबंधक जागृती दिनानिमित्त राष्ट्रीय अहवाल

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. १६ :** जागतिक वृद्ध छळ-प्रतिबंधक जागृती दिन २०२६ निमित्त हेल्पएज इंडियातर्फे मणीबेन एम.पी. शाह महिला महाविद्यालयात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी "हवामान बदलाचा सामना करण्यास सक्षम वृद्धत्व : काळजी, प्रतिष्ठा आणि स्वावलंबन सुनिश्चित करणे" या राष्ट्रीय अहवालाचे प्रकाशन झाले.

हेल्पएज इंडियाचे सह-संचालक राम नाईक यांनी पाहुण्यांचे स्वागत केले, तर कार्यक्रम सह-संचालक व्हॅलेरियन पेस यांनी सादरीकरणाद्वारे अहवालाची माहिती दिली. प्रमुख वक्ते 'सिल्व्हर इनिंग्ज'चे संस्थापक-अध्यक्ष शैलेश मिश्रा यांनी 'वृद्ध-स्नेही समाज'



### प्रभावी जनजागृती

**ज्येष्ठ नागरिकांची काळजी, संरक्षण आणि त्यांना मुख्य प्रवाहात सामावून घेण्याबाबत प्रभावी जनजागृती करण्यात आली. हवामान बदलाच्या आव्हानांचा सामना करताना त्यांना सुरक्षित, सन्माननीय आणि स्वावलंबी जीवन जगता यावे, यासाठी समाजाच्या सामूहिक जबाबदारीवर यात भर देण्यात आला.**

निर्माण करण्याचे आवाहन केले. यानंतर डॉ. सायगीता चित्तुरू, डॉ. अर्चना पाटकी, डॉ. नागनाथ नरसिंहन प्रेम आणि डॉ. भालचंद्र पेढंबकर यांच्या सहभागाने परिसंवाद रंगला. यात हवामान बदल, स्मृतिभ्रंश (डिमेन्शिया), छळ रोखण्याचे उपाय आणि भावनिक व सामाजिक आधाराच्या गरजेवर सखोल चर्चा झाली. राम नाईक यांनी संचालन केले व डॉ. रेखा शेलार यांनी आभार मानले.

# सिरोलीत पांदण रस्त्यावर अतिक्रमण

## जेसीबीने रस्ता केला मोकळा, गावकऱ्यांची अडचण मिटणार?

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**कुही, दि. १६ :** तालुक्यातील मौजा सिरोली रिठी येथे शेताला लागून असलेल्या सार्वजनिक पांधण रस्त्यावर अतिक्रमण करून रस्त्याची रुंदी कमालीची कमी केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या अतिक्रमणामुळे शेतकरी आणि गावकऱ्यांना येण्या-जाण्यासाठी मोठ्या प्रमाणावर अडथळा निर्माण झाला होता. अखेर महसूल प्रशासनाने या जागेचा प्रत्यक्ष 'मौका पंचनामा' करत जेसीबीच्या साहाय्याने रस्ता मोकळा केला आहे.

मा. तहसीलदार अमित घाटगे यांच्या आदेशान्वये १६ जून २०२६ रोजी दुपारी एक वाजताच्या सुमारास महसूल अधिकाऱ्यांनी मौजा सिरोली



येथील सर्व्हे क्र. २५ च्या लगत असणाऱ्या रुयाड-सिरोली-बानोर पांधण रस्त्याची प्रत्यक्ष चौकशी केली. या चौकशीदरम्यान अर्जदार (गावकरी) आणि गैरअर्जदार श्रावण चिंतामण सेलोकर उपस्थित होते. यावेळी मंडळ अधिकारी राजेश बारापत्रे व तलाठी मोहन पवार यांनी महसूल प्रशासनातर्फे प्रत्यक्ष पाहणी केली. श्रावण सेलोकर यांचे शेत सर्व्हे नं. २५/१ (आराजी १.६१ हे.) असून, या शेताच्या उत्तरेकडील धुऱ्याला लागूनच हा पांधण रस्ता आहे. अधिकाऱ्यांच्या पाहणीत शासकीय नकाशातील अंदाजे ५० फुटांचा रस्ता अतिक्रमणामुळे केवळ ४ ते ५ फुटांचा उरल्याचे दिसले. गैरअर्जदाराने मागील वर्षापासून वाहीजुपी करून या रस्त्यावर ताबा मिळवल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला. लगतचे शेतकरी विष्णू भैय्याजी देशमुख यांच्या मते, "हा रस्ता पूर्वी पूर्व दिशेला मोठा होता, परंतु अतिक्रमणामुळे तो अरुंद झाला." दुसरे शेतकरी बबनजी पुनाराम मोहतुरे यांनी सांगितले की, "यांच्या शेतापासून सर्व्हे नंबर २१ च्या दक्षिण कडील धुऱ्याने ही पांधण पुढे गेली आहे." काही शेतकऱ्यांनी आपलेही शेत पांधण रस्त्यावर अंशतः येत असल्याचे मान्य केले. दुसरीकडे, गैरअर्जदार श्रावण सेलोकर यांनी आरोप फेटाळत ६ जानेवारी २०१८ च्या अधिकृत मोजणीनुसारच हद्द कायम असल्याचा दावा केला. प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणीत अतिक्रमण झाल्याचे स्पष्ट होताच, उपस्थित कास्तकार आणि पंचांसमक्ष मौका पंचनामा केला. तसेच तातडीने जेसीबीद्वारे अतिक्रमण हटवून रस्ता मोकळा केला. आता या पांधण रस्त्याची शासकीय मोजणी करून अंतिम हद्द कायम करण्यात येणार आहे.

# तांत्रिक कामांमुळे आज 'येथे' वीज नाही

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नागपूर, दि. १६ :** पावसाळ्यादरम्यान शहरातील वीज पुरवठा अधिक सक्षम आणि अखंडित राहावा, या उद्देशाने महावितरणच्या वतीने नवीन वितरण रोहित्र उभारणी, आरएमयू चार्जिंग, झाडांच्या फांद्यांची छाटणी आणि यंत्रणेच्या आवश्यक देखभालीची कामे१७ जून रोजी केली जाणार आहेत. या कामांमुळे शहरातील काही भागांत सकाळच्या सत्रात तीन ते चार तासांसाठी वीज पुरवठा तात्पुरता बंद राहणार आहे.

सुरळीत आणि दर्जेदार वीज सेवा मिळावी यासाठी ही तांत्रिक कामे अत्यंत महत्त्वाची असून, नागरिकांनी या काळात सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणने केले आहे.

## अनेक भागांत मान्सूनपूर्व देखभाल व दुरुस्ती

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

या नियोजित कामांमुळे कॉंग्रेसनगर विभागात बुधवारी सकाळी ७ ते ११ या वेळेत शिवणगाव, सीआरपीएफ कॅम्प, विट्ठबाबा नगर, तुकोडोजी चौक, ग्याकी, हिरणवार लेआउट, आनंद नगर आणि घरकुल परिसरातील वीज पुरवठा बंद राहील. तसेच सकाळी ८ ते १२ या वेळेत सरस्वती विहार, लोखंडे नगर, पठाण लेआउट, संभाजी नगर, भांगे लॉन, भागश्री लेआउट, कॉसमॉस टाऊन, द्रोणाचार्य नगर, गोरले ले-आऊट, दीनदयाल नगर, स्वावलंबी नगर, सरस्वती ले-आऊट, सुजाता ले-आऊट, कापसे ले-आऊट, पडोळे चौका मागील भाग, मॉडर्न सोसायटी, विद्याविहार,ले-आऊट, प्रताप नगर चौक, नवनिर्माण, खामला जुनी वस्ती, सिंदी कॉलनी, मिलिंद नगर, प्रताप नगर, रेल्वे कॉलनी, व्यंकटेश नगर, कोतवाल नगर, शांती निकेतन आणि शिव नगर परिसरातील वीज पुरवठा बंद असेल.

महाल विभागांतर्गत मानेवाडा रिंगरोड, शिवमंदिर परिसर, जय दुर्गा सोसायटी, जयंती मॅन्शन, पायल पल्लवी सोसायटी, इंदिरा नगर, राजाबक्षा हनुमान मंदिर, जाटतरोडी, रामबाग, मूर्ती कारखाना, जयंती मैदान, पराते फ्लोर मिल, रामबाग पाण्याची टाकी, नेहरू नगर, ओम नगर, सुदामपुरी, कबीर नगर, मिरे लेआउट आणि सक्करदरा चौक परिसरात सकाळी ८ ते ११ या वेळेत वीज पुरवठा बंद राहील. सिव्हिल लाईन्स विभागातील बोरगाव, पटेल नगर, आदिवासी नगर, दशरथ नगर, द्विवेदी कॉलनी, समशुद्दीन लेआउट, रामदेव बाबा टेकडी, फागो लेआउट, राजाराम सोसायटी, रोज कॉलनी, अयप्पा नगर, गांधी लेआउट, दत्त नगर आणि विठ्ठल रुख्मिणी नगर भागात सकाळी ८ ते १२, तर सीपीडब्ल्यूडी क्वार्टर्स, कम्युनिटी हॉल, एसएफएस कॉलेज, वॉटर पंप, मानवता नगर आणि टीव्ही टॉवर चौक परिसरात सकाळी ८ ते ११ या वेळेत वीज पुरवठा बंद राहणार आहे.

याव्यतिरिक्त बुटीबोरी औद्योगिक क्षेत्रातील ग्राहकांसाठी सकाळी १० ते सायंकाळी ५ दरम्यान टप्प्याटप्प्याने वीज पुरवठ्यात बदल केले जातील. यामध्ये फूड पार्क परिसर, के झोन (सकाळी १० ते ५), बी आणि जे झोन (सकाळी १० ते २) व डी, सी आणि टी झोन (दुपारी २ ते ५) या वेळेत कामे पूर्ण केली जातील.

### यंत्रणा सज्ज

**महावितरणने सर्व नागरिकांना आणि औद्योगिक ग्राहकांना या वेळेची नोंद घेऊन आपली आवश्यक कामे वेळेत पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे, जेणेकरून कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही. मान्सूनच्या काळात नागरिकांना अखंडित वीज सेवा देण्यासाठी महावितरण यंत्रणा सज्ज करण्यात येत आहे.**

### रक्तदान शिबिर, ७० युनिट रक्तसंकलन

**नागपूर, दि. १६ :** नागपूर येथे विश्व रक्तदाता दिनानिमित्त इंडियन मुस्लिम फार्मा फाउंडेशनच्या वतीने मोमीनपुरा येथील अन्सार कम्युनिटी हॉलमध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ७० रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केल्यामुळे ७० युनिट रक्त संकलित झाले, ज्याचा लाभ सुमारे २१० गरजू रुग्णांना होणार आहे. या कार्यक्रमाला नगरसेवक वसीम खान, डॉ. मोहम्मद फैजल (विभागप्रमुख, अस्थिरोग विभाग, IGMC) तसेच सीए दाऊद खान हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. मान्यवरांनी रक्तदात्यांचे कौतुक करून रक्तदान ही मानवतेची सर्वोच्च सेवा असल्याचे सांगितले. आयुष ब्लड बँकेच्या तांत्रिक सहकार्याने हे शिबिर यशस्वी झाले असून भविष्यातही असे सामाजिक उपक्रम राबवण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

अजिंक्य भारत •

# आपलं अकोला

अकोला, बुधवार, दि. १७ जून २०२६ www.ajinkyabharat.com


## मनपाची २३ जून रोजी सर्वसाधारण सभा

**अकोला:** महापालिकेची आगामी सर्वसाधारण सभा मंगळवार, दि. २३ जून रोजी आयोजित करण्यात आली आहे. या सभेत विविध प्रलंबित विकासकामांवर वादळी चर्चा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सर्वसाधारण सभेमध्ये प्रामुख्याने शहरातील मुख्य रस्त्यांचे रुंदीकरण, अमृत योजनेची कामे आणि प्रलंबित पायाभूत सुविधांच्या मंजुरीचे विषय अजेंड्यावर असणार आहेत. गेल्या काही दिवसांत शहरातील रस्ते विकास कामांना गती देण्यासाठी आणि निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या कंत्राटदारांवर कारवाई करण्याबाबत लोकप्रतिनिधींकडून सातत्याने मागण्या होत आहेत. त्या पार्श्वभूमीवर या सभेत प्रशासकीय पातळीवर काय निर्णय घेतले जातात, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. महापालिकेच्या उत्पन्नाचे स्रोत वाढवणे, मालमत्ता कर वसुलीची सद्यस्थिती आणि १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून प्रस्तावित असलेल्या नव्या विकासकामांच्या आराखड्याला मंजुरी देणे हे विषय पटलावर ठेवण्यात येणार आहेत.

### महत्त्वाचे

## मिफ्फ २०२६ मध्ये अकोल्याच्या साहिल इंगळेचा लघुपट



**अकोला :** मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या ( २०२६) निमित्ताने दादासाहेब फाळके चित्रनगरीतर्फे मुंबईत १९ निवडक मराठी लघुपट व माहितीपटांचा विशेष महोत्सव आजपासून सुरू झाला आहे. या प्रतिष्ठेच्या महोत्सवात अकोल्याचा तरुण दिग्दर्शक साहिल इंगळे याच्या 'अ डॉल मेड अप ऑफ क्ले' या लघुपटाचा भारतीय प्रीमियर (पहिला खेळ) होणार आहे. हा लघुपट १८ जून रोजी सकाळी ११:३० वाजता मुंबईतील एनएफडीसी च्या ऑडी-१ मध्ये दाखवला जाईल. विशेष म्हणजे, साहिलच्या या कलाकृतीने गेल्या वर्षी कान्स चित्रपट महोत्सव २०२५ च्या अत्यंत प्रतिष्ठेच्या ला सिनेफ विभागात भारताचे प्रतिनिधित्व केले होते आणि या विभागात निवडला गेलेला तो एकमेव भारतीय चित्रपट होता.

# बाभुळगावात जातीय तणाव

## पुतळ्याचा अवमान केल्याप्रकरणी ३३ जणांवर गुन्हा

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १६ :** अकोल्यातील बाभुळगाव परिसरात सोमवारी (१५ जून) रात्री घडलेल्या सामूहिक हल्ल्याच्या घटनेने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. टिपू सुलतान चौक व तक्षशिला बौद्ध विहार परिसरात झालेल्या या प्रकारात चाकू, तलवारी व लाठ्यांनी हल्ला करून काही जणांना जखमी करण्यात आल्याचा आरोप असून, जातिसूचक शिवीगाळ तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचा अवमान केल्याप्रकरणी एमआयडीसी पोलिसांनी ३३ नामजद आरोपींसह इतरांविरुद्ध गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राष्ट्रसंत तुकडोजी नगर, बाभुळगाव येथील क्षितिज अविनाश इंगळे (१९) या विद्यार्थ्याने दिलेल्या तक्रारीवरून हा गुन्हा नोंदविण्यात आला. तक्रारीनुसार, १५ जून रोजी रात्री



सुमारे ८ वाजण्याच्या सुमारास किरकोळ वादातून आरोपींनी बेकायदेशीर जमाव जमवून तक्रारदार व त्याच्या सहकाऱ्यांवर जीवघेणा हल्ला केला.

**या आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल:**
अतीसिफ पठाण, अताउल्ला जब्बार खान ऊर्फ सादिक पठाण, शेरू पठाण, सजावर पठाण, शेख शाहरुख शेख अमीर, शेख अकील शेख सादिक, वाहेद खान पठाण, अरसलान शेख, समीर शेख, शाहरुख, राहील शेख, अरसलाम हुसेन, बाजील निजाम पठाण, जादू, शोएब पठाण, सुहान पठाण, सोनू पठाण, कंवर पठाण, शफीक पठाण, गोलू शेख, साहिल शाह, अरसलाम शेख, साहिल पठाण, मिर्झा खान, मोहित मोहम्मद, अतीक पठाण, सोहेल खान, नजीम बेग, नईम शाह, नझल बेग, आरिफ शेख, जमीर पठाण, अयान पठाण, शाहरुख पठाण यांच्यासह इतर जण.

### धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप

तक्रारीनुसार आरोपींकडे चाकू, लाठ्या व तलवारीसारखी घातक शस्त्रे होती. या हल्ल्यात काही जण जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार करण्यात आले. आरोपींनी अश्लील व जातिसूचक शिवीगाळ केली तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचा अवमान करून सामाजिक व धार्मिक भावना दुखावल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे.

### दोषींच्या अटकेसाठी पोलीस ठाण्यासमोर ठिय्या

महापुरुषांचा अवमान करणाऱ्या दोषींवर कडक कायदेशीर कारवाई करून त्यांना तात्काळ अटक करण्यात यावी आणि त्यांची गावातून धिंड काढण्यात यावी, या मागणीसाठी सम्राट अशोक सेनेचे आकाश शिरसाट यांच्या नेतृत्वात कार्यकर्त्यांनी आणि ग्रामस्थांनी एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या प्रवेशद्वारासमोर ठिय्या आंदोलन मांडले. आंदोलनादरम्यान आंदोलकांनी जोरदार घोषणाबाजी केल्यामुळे सुरुवातीला काही काळ तणाव निर्माण झाला होता. मात्र, आंदोलकांच्या आक्रमक भूमिकेनंतर पोलिसांनी तातडीने दखल घेत गुन्हे दाखल केले आणि ३ ते ४ संशयितांना ताब्यात घेतले. दोषींवर कठोर कारवाई न झाल्यास जिल्हाभर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी संघटक आकाश शिरसाट व भीमसैनिकांनी दिला आहे. सध्या बाभुळगावात शांतता असून परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.



# १.७२ कोटींचा मलमपट्टी प्रयोग फसला



अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १६ :** शहरातील मुख्य सिमेंट रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी महानगरपालिकेने तब्बल १ कोटी ७२ लाख रुपयांचा निधी खर्च केला खरा, पण हा खर्च केवळ मलमपट्टी ठरल्याचे आजच्या प्रत्यक्ष स्थितीवरून स्पष्ट होत आहे. तत्कालीन आयुक्त कविता द्विवेदी यांच्या कार्यकाळात काढलेली निविदा आणि त्याद्वारे झालेली कामे निकृष्ट दर्जाची ठरल्याने, आजही अकोलेकरांना जीवघेण्या खड्ड्यांतूनच प्रवास करावा लागत आहे. विशेष म्हणजे, दोष दायित्व कालावधी (डीएलपी) असतानाही काम न करणाऱ्या मूळ कंत्राटदारावर कोणतीही कारवाई झाली नाही.

तत्कालीन आयुक्त अजय लहाने यांच्या कार्यकाळात कोट्यवधींचा निधी आणून शहरातील मुख्य रस्त्यांचे काँक्रिटीकरण करण्यात आले होते. मात्र, अवघ्या सहा महिन्यांतच या रस्त्यांची चाळण झाली. त्यानंतर तत्कालीन प्रभारी आयुक्त आस्तिककुमार पाण्डेय यांनी या रस्त्यांचे सोशल ऑडिट केले होते, मात्र पुढे काहीच ठोस कारवाई झाली नाही. मूळ कंत्राटदाराने कायदेशीर जबाबदारी झटकल्यानंतर, मनपाचे शहर अभियंता आणि संबंधित विभागाच्या ढिसाळ नियोजनामुळे तत्कालीन आयुक्त कविता द्विवेदी यांनी नवीन निविदा काढून १ कोटी ७२ लाख रुपये खर्च केले. पण आजची स्थिती पाहता हा संपूर्ण निधी पाण्यात गेल्याचे चित्र आहे.

शहरातील अग्रसेन चौक ते दुर्गा चौक दरम्यान दुरुस्तीनंतरही रस्त्याची अवस्था बिकटच आहे. मुख्य डाकघर ते सिव्हिल लाईन्स चौक या मार्गाची दुरवस्था कायम आहे, तर टॉवर चौक ते रतनलाल प्लॉट चौक या रस्त्यावरील खड्डे जैसे थे आहेत. याशिवाय माळीपुरा चौक ते लकडगंज या रस्त्यावरील खड्ड्यांचे क्युरिंग अद्यापही प्रलंबित आहे.

अशोक वाटिका ते सरकारी बगीचा या मार्गावर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासमोर (जीएमसी) १५० ते २०० मीटर परिसरात रस्त्याच्या वरच्या लेयरवर मोठे खड्डे पडले आहेत. कंत्राटदाराने स्वतःच्या खर्चाने ही दुरुस्ती करणे कायद्याने बंधनकारक असताना, मनपाच्या अधिकाऱ्यांनी मात्र त्याला अभय दिले आहे. दुसरीकडे, शहरातील सर्वात गजबजलेल्या गोरक्षण रोडवर खोल खड्डे पडले आहेत. हीच अवस्था नेहरू पार्क ते आकाशवाणी दरम्यानच्या रस्त्याची झाली असून, सिव्हिल लाईन्स चौकातही रस्त्याची अक्षरशः दुरवस्था झाली आहे.

### त्या कंत्राटदारावर मेहेरबानी कोणाची?

काँक्रिट रस्त्यांची दुरवस्था झाल्यानंतर संबंधित कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकणे किंवा त्याच्या सुरक्षा ठेवीतून ही दुरुस्ती करून घेणे गरजेचे होते. ही बाब तत्कालीन आयुक्त कविता द्विवेदी यांनी मनपा शहर अभियंता नीला वंजारी यांच्या निदर्शनास आणून दिली होती. मात्र, अभियंता विभाग आणि संबंधित अधिकाऱ्यांनी कंत्राटदारावर कुठलीही दंडात्मक कारवाई केली नाही. त्यामुळे या कंत्राटदारावर नेमकी कोणाची मेहेरबानी आहे? असा सवाल आता उपस्थित होत आहे.

## अकोल्यात कोळी समाजाचा भव्य जनआक्रोश मोर्चा




**अकोला:** जात प्रमाणपत्र आणि वैधता प्रमाणपत्र सुलभ पद्धतीने मिळावे, तसेच रक्त नात्यातील व्यक्तींना ते तातडीने देण्यात यावे, या मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य कोळी महासंघाच्या वतीने अकोल्यात भव्य जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात अकोल्यासह संपूर्ण विदर्भातील हजारो कोळी महादेव समाजबांधव मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले होते. आंदोलकांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देत प्रशासनाला मागण्यांचे निवेदन सुपूर्द केले. ''सरकारने या मागण्यांवर त्वरित सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा येत्या पावसाळी अधिवेशनावर लाखोंच्या संख्येने महामोर्चा काढून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल,'' असा थेट इशारा कोळी महासंघाचे विदर्भ प्रमुख सुरेश पाटकर यांनी दिला आहे.

## घरासमोर झोपलेल्या तरुणावर जीवघेणा हल्ला

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १६ :** सिव्हिल लाईन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मोठी उमरी येथील कुंभारवाडा परिसरात घरासमोर झोपलेल्या एका तरुणावर चार जणांनी धारदार चाकूने जीवघेणा हल्ला केल्याची गंभीर घटना उघडकीस आली आहे. या हल्ल्यात फिर्यादीसह त्याचा भाऊ गंभीर जखमी झाला असून सिव्हिल लाईन पोलिसांनी चार आरोपींविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी सुमित सुभाष गवळी (वय २०, रा. कुंभारवाडा, मोठी उमरी, अकोला) यांनी दिलेल्या तक्रारीवरून अर्जुन बिल्लेवार, यश वानखडे, सुरेंद्र तायडे आणि अभिजीत खदेकर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटना १४ जून २०२६ रोजी मध्यरात्री १२ वाजण्याच्या सुमारास घडली. फिर्यादी सुमित गवळी हे त्यांच्या घरासमोर झोपलेले असताना आरोपी तेथे आले. आरोपींनी त्यांना जबरदस्तीने उठवून मारहाण करण्यास सुरुवात केली. यावेळी आरोपींनी त्यांचे केस कापले तसेच खाली पाडून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

यानंतर आरोपींकडील धारदार चाकूने सुमित यांच्या कमरेच्या उजव्या बाजूस, मांडीवर तसेच गुप्तांगाजवळील नाजूक भागावर वार करण्यात आले. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले. दरम्यान, सुमित यांचा भाऊ त्यांना वाचविण्यासाठी धावून आला असता आरोपींनी त्याच्यावरही चाकूने हल्ला केला. त्याच्या चेहऱ्याच्या डाव्या बाजूस, डाव्या हाताच्या बोटांवर आणि डाव्या मांडीवर चाकूचे वार करण्यात आले. त्यामुळे तोही गंभीर जखमी झाला. घटनास्थळी दोघेही रक्तबंबाळ अवस्थेत असताना परिसरातील नागरिक मदतीसाठी धावून आले. मात्र आरोपींनी हातातील चाकू नागरिकांकडे रोखून, ''मदतीला आलात तर तुमचीही अशीच अवस्था करू,'' अशी धमकी दिल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रकरणी सिव्हिल लाईन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक तनुजा खोब्रागडे करीत आहेत.

## मुंबई-अमरावती दरम्यान विशेष एकेरी रेल्वेगाडी धावणार

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १६ :** प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेता मध्य रेल्वे प्रशासनाने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (मुंबई) ते अमरावती दरम्यान विशेष एकेरी रेल्वेगाडी चालविण्याचा निर्णय घेतला आहे. विदर्भातील प्रवाशांची सोय लक्षात घेऊन मध्य रेल्वेने ही विशेष सेवा उपलब्ध करून दिली असून, उन्हाळी व सणासुदीच्या काळातील प्रवासी गर्दी कमी करण्यास याचा मोठा फायदा होणार आहे. या विशेष गाडीमुळे विदर्भातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

गाडी क्रमांक ०११५५ विशेष एकेरी रेल्वेगाडी दिनांक १८ जून २०२६ व १९ जून २०२६ रोजी (एकूण दोन



फेऱ्या) छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून रात्री १२.२० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी दुपारी १२.३० वाजता अमरावती येथे पोहोचेल. या प्रवासादरम्यान ही विशेष रेल्वेगाडी दादर, ठाणे, कल्याण, नाशिक रोड, मनमाड, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मूर्तिजापूर आणि बडनेरा या महत्त्वाच्या स्थानकांवर थांबेल. प्रवाशांच्या सुविधेसाठी या गाडीत एकूण १८ डबे असणार आहेत, ज्यांची रचना खालीलप्रमाणे आहे: २ वातानुकूलित तृतीय श्रेणी डबे, ८ शयनयान डबे, ६ सामान्य द्वितीय श्रेणी डबे, २ सामान्य द्वितीय श्रेणी सह रक्षक ब्रेक व्हॅन डबे असणार आहेत. या विशेष रेल्वेगाडीचे आरक्षण १७ जून २०२६ पासून सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर तसेच आयआरसीटीसीच्या अधिकृत संकेतस्थळावर सुरू होणार आहे.

## सिरप-आधारित औषधांची डॉक्टरांच्या चिट्ठीशिवाय विक्री बंद?

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १६ :** महाराष्ट्रात अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली भेसळयुक्त अन्नपदार्थ, बनावट औषधे आणि नियमबाह्य विक्री करणाऱ्यांविरोधात धडक कारवाई सुरू असतानाच आता सिरप-आधारित औषधांच्या विक्रीबाबत मोठी चर्चा सुरू झाली आहे. खोकल्याच्या सिरपसह विविध सिरप स्वरूपातील औषधांचा गैरवापर रोखण्यासाठी केंद्र सरकार कठोर नियम लागू करण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर येत आहे.

राज्यात अन्न व औषध प्रशासनाकडून सुरू असलेल्या तपासण्या, छापेमारी आणि परवाना अटींचे उल्लंघन करणाऱ्या विक्रेत्यांवर होत असलेल्या कारवाईमुळे औषध व्यवसायात खळबळ उडाली आहे. याच पार्श्वभूमीवर



डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय औषधांची विक्री ( विक्री) नियंत्रित करण्याबाबत सरकार गंभीरपणे विचार करत असल्याचे सांगितले जात आहे.

तज्ज्ञांच्या मते, काही खोकल्याच्या सिरप आणि इतर औषधांचा गैरवापर वाढत असल्याने नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत आहे. चुकीच्या प्रमाणात किंवा वैद्यकीय सल्ल्याशिवाय औषधे घेतल्याने दुष्परिणाम होऊ शकतात. त्यामुळे औषधांच्या विक्रीवर नियंत्रण आणणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. मात्र या संभाव्य निर्णयाला विरोधाचाही सूर उमटू लागला आहे. ग्रामीण भागातील नागरिक, ज्येष्ठ व्यक्ती तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना साध्या सर्दी-खोकल्यासाठीही डॉक्टरांचा सल्ला घेणे खर्चिक ठरू शकते. त्यामुळे सर्व प्रकारच्या सिरप औषधांवर निर्बंध आणल्यास सामान्य नागरिकांची गैरसोय होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, तुकाराम मुंढे यांच्या धडक कारवाईमुळे औषधांच्या विक्री व्यवस्थेतील अनेक त्रुटी समोर आल्या आहेत. त्यामुळे औषधांच्या मुक्त विक्रीवर अधिक नियंत्रण ठेवण्याची गरज निर्माण झाल्याचे काही आरोग्य क्षेत्रातील जाणकारांचे मत आहे. तर दुसरीकडे, गैरवापर करणाऱ्यांवर कारवाई करणे आणि सामान्य नागरिकांना आवश्यक औषधे सहज उपलब्ध करून देणे यामध्ये संतुलन राखणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे मत व्यक्त होत आहे.

या पार्श्वभूमीवर आता एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होत आहेनागरिकांच्या आरोग्याच्या सुरक्षेसाठी कठोर नियम आवश्यक आहेत का, की सरकारने गैरवापर रोखताना सामान्य लोकांच्या सोयीचाही अधिक विचार करायला हवा होता? सध्या या विषयावर आरोग्य क्षेत्र, औषध विक्रेते आणि सामान्य नागरिकांमध्ये व्यापक चर्चा सुरू असून सरकारच्या अंतिम निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

टीप: बातमी प्रकाशित करण्यापूर्वी केंद्र सरकार किंवा औषध नियंत्रक प्राधिकरणाने प्रत्यक्षात असा अधिकृत आदेश जारी केला आहे का, याची पडताळणी करणे आवश्यक आहे. सध्या दिलेल्या मजकुरात तो निर्णय प्रस्तावित/चर्चेच्या स्वरूपात मांडलेला दिसतो.

**बोजवारा** | नालेसफाई संथगतीने, प्रभागांमधील नाल्या तुडुंब!

## १ कोटी ९ लाख रुपयांचा ठेका देऊनही परिस्थिती 'जैसे थे'

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १६ :** पावसाळा अगदी तोंडावर आला असतानाही अकोला महानगरपालिका क्षेत्रातील मान्सूनपूर्व नालेसफाईची कामे अत्यंत संथगतीने सुरू असल्याचे चित्र आहे. यंदा महापालिकेच्या वतीने १ कोटी ९ लाख रुपयांपेक्षा अधिक खर्च करून शहरातील लहान-मोठ्या २७५ नाल्यांच्या सफाईचा ठेका देण्यात आला आहे. मात्र, मान्सूनच्या आगमनाची वेळ झाली तरी अद्याप बहुतांश कामे अपूर्णच आहेत. त्यामुळे ही नालेसफाई वेळेत कधी पूर्ण होणार? असा संतप्त प्रश्न नागरिक विचारत आहेत. सद्यस्थिती पाहता, अनेक प्रभागांमधील नाल्यांची अवस्था अत्यंत दयनीय असून, प्रशासनाचा ढिसाळ कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. दरवर्षी पावसाळा सुरू होण्यापूर्वी



महापालिकेच्या वतीने नालेसफाईचे नियोजन केले जाते. यंदा मोठ्या नाल्यांच्या सफाईचा ठेका बांधकाम विभागाने दिला आहे, तर लहान नाल्यांची सफाई स्वच्छता विभागांतर्गत करण्यात

**पूल ठरतोय मुख्य अडथळा! बार्शीटाकळी मार्गावरील पुलाजवळ नाल्याची वेळेत सफाई न झाल्यामुळे या ठिकाणी पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहात मोठा अडथळा निर्माण झाला आहे. पहिल्याच मुसळधार पावसात जर पाण्याचा निचरा झाला नाही, तर हे पाणी नदीत न जाता संपूर्ण परिसरात पसरते. त्यामुळे महापालिका प्रशासनाने कोट्यवधी रुपयांच्या निधीचा योग्य वापर करून, केवळ कागदी घोडे न नाचवता प्रत्यक्ष जमिनीवर उतरून काम करावे; विशेषतः पूरप्रवण भागातील नाल्यांची सफाई युद्धपातळीवर पूर्ण करावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.**

येत आहे. मात्र, या दोन विभागांमध्ये समन्वय नसल्याचे स्पष्ट दिसत आहे. अद्यापही अनेक प्रभागांतील नाल्या गाळाने आणि कचऱ्याने तुडुंब भरलेल्या आहेत. काही ठिकाणी तर कचऱ्याचे ढीग साचल्यामुळे नाल्यांचे अस्तित्वच गायब झाले असून, सांडपाणी मिळेल त्या वाटेने वाहत आहे. यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. दक्षिण झोनमधील कौलखेड परिसरातील प्रभाग क्रमांक १९ मधील परिस्थिती सर्वात गंभीर आहे. येथील नवीन खेतान नगर आणि बसंत नगर येथून वाहणाऱ्या मुख्य नाल्याची अद्याप साधी सफाईही झालेली नाही. वस्तुस्थिती पाहता, हा नाला भर उन्हाळ्यातही कचऱ्यामुळे चोकअप होऊन तुडुंब भरून वाहत आहे. नाल्यामध्ये गाळ, प्लॅस्टिक आणि काडीकचरा मोठ्या प्रमाणात साचला आहे. कौलखेड हा भाग पूरप्रवण क्षेत्र म्हणून ओळखला जातो. दरवर्षी मुसळधार पाऊस झाल्यास येथील अनेक वस्त्यांमध्ये आणि लोकांच्या घरांत पुराचे पाणी शिरते.

## जिल्ह्यात गॅस पाईपलाईनच्या कामाला वेग

### बार्शीटाकळीपासून होणार सुरुवात

अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १६ :** घरगुती इंधनटंचाईच्या अडचणींवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी गॅस पाईपलाईन हा सुरक्षित, किफायतशीर आणि अत्यंत महत्त्वाचा स्त्रोत ठरणार आहे. याच पार्श्वभूमीवर अकोला जिल्ह्यात बार्शीटाकळी येथे पाईपलाईनद्वारे गॅस पुरवठ्याच्या कामाला लवकरच सुरूवात होणार आहे. या प्रकल्पाच्या नियोजनाबाबत आज जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या दालनात एक महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

या बैठकीला तहसीलदार रवींद्र कापशीकर, जिल्हा पुरवठा अधिकारी



रवींद्र यन्नावार, अदानी टोटल गॅस लि. चे सुरेंद्र खाडे, राष्ट्रपाल वाहुरवाघ यांसह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. अकोला शहर आणि जिल्ह्यातील इतर महत्त्वाच्या भागांमध्ये गॅस पाईपलाईन आणण्याच्या दृष्टीने प्रशासकीय पातळीवर वेगाने हालचाली सुरू आहेत. या पाइपलाइनच्या माध्यमातून केवळ घरगुतीच नव्हे, तर व्यावसायिक आणि औद्योगिक क्षेत्रालाही अखंडित इंधनपुरवठा केला जाणार आहे. जिल्ह्यात सर्वात आधी बार्शीटाकळी येथे हा प्रकल्प साकारणार असून, यासाठी आवश्यक असलेली जागा निश्चिती व इतर तांत्रिक प्रक्रिया तात्काळ पूर्ण करून घेण्याचे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

### नोंदणी प्रक्रिया लवकरच सुरू होणार

बार्शीटाकळी येथे गॅस पाईपलाईनच्या कामासाठीची प्राथमिक तयारी अंतिम टप्प्यात असून, नागरिकांसाठी घरगुती गॅस जोडणीची नोंदणी प्रक्रिया लवकरच सुरू करण्यात येणार असल्याची माहिती अदानी टोटल गॅस लि. चे सुरेंद्र खाडे यांनी या बैठकीत दिली.

महत्त्वाचे

## रोशन काळेची इंडियन बँकेत अधिकारीपदी निवड!



**जानोरी मेळ:** येथील अल्पभूधारक शेतकरी सोपान भिकाजी काळे यांचे सुपुत्र रोशन काळे यांची इंडियन बँकेत अधिकारी पदावर निवड झाली आहे. पहिल्याच प्रयत्नात त्यांनी हे यश संपादन केले असून, चालू वर्ष २०२६ मध्ये शासकीय सेवेत रुजू होणारे ते गावातील दुसरे तरुण ठरले आहेत.रोशन काळे यांचे प्राथमिक शिक्षण श्री संत सखाराम महाराज विद्यालयात झाले. त्यानंतर त्यांनी अकोला येथील समर्थ कॉलेजमधून माध्यमिक आणि वयाळा येथील मानव इंजिनिअरिंग कॉलेजमधून अभियांत्रिकीची पदवी पूर्ण केली. पदवीनंतर त्यांनी स्पर्धा परीक्षांचा अभ्यास सुरू केला. सामाजिक व धार्मिक कार्यक्रमांपासून दूर राहत त्यांनी संपूर्ण लक्ष अभ्यासावर केंद्रित केले होते. त्यांच्या या सहा वर्षांच्या निरंतर परिश्रमाला यश आले आहे.या यशाचे श्रेय त्यांनी आपले आई-वडील, भाऊ आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाला दिले आहे. एका छोट्या ग्रामीण भागातून रोशन यांनी मिळवलेल्या या यशामुळे काळे कुटुंबासह संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामीण भागातील इतर विद्यार्थ्यांनीही यापासून प्रेरणा घेऊन स्पर्धा परीक्षांच्या क्षेत्रात यश मिळवावे, अशी इच्छा गावकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

## मूर्तिजापुरात १८ जूनला भव्य रक्तदान शिबिर




**मूर्तिजापूर :** ''रक्तदान हेच श्रेष्ठ दान'' या भावनेतून स्थानिक श्याममित्र परिवाराच्या वतीने जागतिक रक्तदाता दिनानिमित्त गुरुवार, १८ जून रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर चिखली गेट रोडवरील श्री श्याम धाम मंदिर येथे सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत पार पडणार आहे. अपघातग्रस्त, गंभीर आजारी रुग्ण किंवा शस्त्रक्रियेसाठी रक्ताची नितांत गरज असलेल्या व्यक्तीला आपल्या रक्तामुळे नवजीवन मिळू शकते. वैद्यकीय क्षेत्रात रक्ताला कोणताही कृत्रिम पर्याय उपलब्ध नसल्याने प्रत्येक रक्तदात्याचे योगदान अमूल्य ठरते. हीच सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी मूर्तिजापूर शहरातील युवक व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून रक्तदान करावे, असे आवाहन श्याममित्र परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

# सोनोरीत स्मार्ट मीटरला तीव्र विरोध; आंदोलनाचा इशारा!

## कंत्राटदारांच्या अरेरावीमुळे सोनोरी ग्रामस्थांचा संताप

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मूर्तिजापूर, दि. १६ :** तालुक्यातील सोनोरी येथे महावितरण आणि कंत्राटदारांकडून सुरू असलेल्या स्मार्ट वीज मीटर बसविण्याच्या सक्तीच्या प्रक्रियेला ग्रामस्थांनी तीव्र विरोध केला आहे. एकीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस गोरगरिबांवर स्मार्ट मीटरची सक्ती केली जाणार नाही असे जाहीर करत असताना, दुसरीकडे मात्र कंत्राटदार गावात फिरून शेतकरी व शेतमजुरांच्या घरी बळजबरीने हे मीटर लावत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. या सक्तीच्या विरोधात संतप्त ग्रामस्थांनी ग्रामपंचायत कार्यालयावर एकत्र येत जोरदार प्रदर्शन केले. सोनोरी गावात आजवर वीज चोरी अथवा मीटर संदर्भात कोणतीही तक्रार आलेली नाही. गावात प्रामुख्याने मोलमजुरी करणारे कुटुंब राहतात. सर्वसामान्य ग्राहकांना जेथे आधी एक हजार रुपये बिल येत होते, तेथे आता थेट पाच हजार रुपयांपर्यंत बिले येत असल्याने नागरिकांमध्ये प्रचंड आक्रोश निर्माण झाला आहे. या गंभीर समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते अम्मू खान, सरपंच नाजेरा परवीन सिकंदर खान, उपसरपंच भूषण कोकाटे यांच्यासह सर्व सदस्य आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने या विरोध प्रदर्शनात सहभागी झाले होते. मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा गावकऱ्यांनी दिला आहे.




❑ गावात आतापर्यंत लावलेले सुमारे १०० स्मार्ट मीटर एका महिन्याच्या आत काढून पूर्वीचेच मीटर पुन्हा बसवावेत. प्रशासनाने ही मागणी मान्य न केल्यास समस्त ग्रामस्थांच्या वतीने सामूहिक आमरण उपोषण छेडण्यात येईल.

**- अम्मू खान उर्फ अहमद खान,** समाजसेवक, सोनोरी.

### सोनोरी ग्रामपंचायत सक्तीविरोधात ठराव घेणार

आमच्या गावात सर्वसामान्य शेतकरी आणि शेतमजूर राहतात. महावितरणच्या कंत्राटदारांनी गावात स्मार्ट मीटरसाठी कोणतीही बळजबरी करू नये. सध्याच्या चालू मीटरमध्ये कोणताही दोष नसताना गरिबांना विनाकारण आर्थिक भुर्दंड का दिला जात आहे? या सक्तीच्या विरोधात सोनोरी ग्रामपंचायतीच्या वतीने जाहीर ठराव घेण्यात येईल, अशी माहिती सरपंच नाजेरा परवीन सिकंदर खान यांनी दिली.

## कारवाईच्या भीतीने अकोटातील अनेक प्रतिष्ठाने बंद

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोट, दि. १६ :** अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांनी पदभार स्वीकारताच राज्यभर सुरू केलेल्या धडक कारवायांचा मोठा परिणाम अकोट शहर व तालुक्यात दिसून येत आहे. भेसळयुक्त अन्नपदार्थ, दुग्धजन्य पदार्थ आणि प्रतिबंधित गुटखा विक्रेत्यांविरोधातील संभाव्य मोहिमेमुळे स्थानिक बाजारपेठेतील अनेक व्यावसायिक धास्तावले असून, कारवाईच्या भीतीपोटी काहींनी आपली दुकाने स्वतःहून बंद ठेवल्याची जोरदार चर्चा शहरात सुरू आहे.

नुकतीच जवळील चौहट्टा बाजार येथे अन्न सुरक्षा पथकाने मोठी कारवाई केली. या पार्श्वभूमीवर, अकोट शहरातही अशीच अचानक छापेमारी होण्याची शक्यता असल्याने काही व्यावसायिकांनी कायदेशीर कचाट्यात सापडू नये म्हणून आपली प्रतिष्ठाने काही काळासाठी बंद ठेवल्याचे पाहायला मिळत आहे.

अचानक दुकाने बंद झाल्याने बाजारात विविध चर्चांना उधाण आले असून, दुग्धजन्य पदार्थांचा पुरवठाही काही प्रमाणात प्रभावित झाला आहे. दरम्यान, भेसळ आणि गुटख्याचा अवैध व्यापार रोखण्यासाठी मुख्य सूत्रधारांवर थेट मकोका अंतर्गत कठोर कारवाई करण्याचे कडक निर्देश आयुक्त मुंडे यांनी दिले आहेत.

### नाव गोपनीय राहणार; येथे करा तक्रार!

अन्नपदार्थांत किंवा दुग्धजन्य पदार्थांमध्ये भेसळ असल्याचा संशय असल्यास नागरिकांनी १८०० २२२ ३६५ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा. माहिती देणाऱ्यांचे नाव पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## अतिक्रमण न हटविल्यास बीडीओ कार्यालयात आत्मदहनाचा इशारा



अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मुंडगाव, दि. १६:** दिलेले लेखी आश्वासन पाळून गावातील अतिक्रमण न हटविल्यास अकोटचे गटविकास अधिकारी (बीडीओ) यांच्या दालनातच १९ जून रोजी आत्मदहन करण्याचा इशारा अमिनपूर येथील त्रस्त ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे दिला आहे. गावठाणातील जागेसाठी यापूर्वी केलेल्या चार दिवसांच्या आमरण उपोषणानंतर, ग्रामपंचायतीने १५ दिवसांत अतिक्रमण काढण्याचे लेखी आश्वासन दिले होते.

मात्र, त्यानंतर प्रशासकीय स्तरावर दिरंगाई झाल्याने चार महिने उलटूनही कारवाई झाली नाही, असा आरोप सिंधुबाई सोनोने, तोताराम सरकटे व सुरेश सरकटे यांनी केला आहे. अखेर १८ जूनपर्यंत अतिक्रमण न काढल्यास आत्मदहनाचा पवित्रा घेणाऱ्या आंदोलनकर्त्यांनी या संभाव्य प्रकाराला प्रशासकीय यंत्रणेला जबाबदार धरले असून, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व पोलीस प्रशासनाला निवेदने सादर केली आहेत.

❑ प्रशासनाने आम्हाला केवळ आश्वासने देऊन आमची फसवणूक केली आहे. जर दिलेल्या तीन दिवसांत गावातील अतिक्रमण पूर्णपणे काढण्यात आले नाही आणि आम्हाला जागा मिळाली नाही, तर आम्ही तिघेही थेट गटविकास अधिकाऱ्यांच्या कार्यालयात आत्मदहन करू.

**- सिंधू सोनोने, तोताराम व सुरेश सरकटे,** तक्रारदार ग्रामस्थ

❑ अतिक्रमणधारकाला २४ तासांत जागा खाली करण्याची अंतिम नोटीस बजावली आहे. त्यांनी मुदतीत अतिक्रमण स्वतःहून न हटवल्यास पोलिसांच्या मदतीने ते निष्कासित करण्यात येईल. या कायदेशीर प्रक्रियेसाठी मला केवळ तीन दिवसांचा अवधी द्यावा.

**-सैय्यद नजाकत,** ग्रामसेवक, मुंडगाव.

❑ ग्रामपंचायत स्तरावर या प्रकरणी गांभीर्याने पावले उचलली जात आहेत. येत्या तीन दिवसांत सदर अतिक्रमण प्रशासकीय नियमांनुसार काढण्यात येईल. तसेच नियमानुसार कायदेशीर कारवाई करून पात्र लाभार्थ्यांना जागा देण्याचे नियोजन केले जाईल.

**- सधू अनिल गाढे,** प्रभारी सरपंच, मुंडगाव.

## हिवरखेड पोलिसांची मोठी कारवाई; अवैध डिझेल जप्त

अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**हिवरखेड, दि. १६:** हिवरखेड-सोनाळा मार्गावरील टी-पॉइंटजवळ हिवरखेड पोलिसांनी १५ जून रोजी सापळा रचून एका बोलेरो पिकअप वाहनातून वाहतूक केला जाणारा अवैध डिझेलचा साठा जप्त केला आहे. या धडक कारवाईत पोलिसांनी संशयास्पद डिझेल आणि वाहन असा एकूण ५ लाख ५८ हजार १९० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला.

वाहन क्रमांक (माहिती उपलब्ध नाही) मधून अवैध डिझेलची वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. या आधारे पोलिसांनी टी-पॉइंटजवळ पाळत ठेवून संशयास्पद महिंद्रा बोलेरो पिकअप वाहनाची कायदेशीर झडती घेतली. यावेळी वाहनात १ लाख ५८ हजार १९० रुपये किमतीचे अंदाजे १६०० लीटर अवैध डिझेल आढळून आले. पोलिसांनी डिझेलसह ४ लाख रुपये किमतीचे वाहन जप्त केले आहे. या प्रकरणी पोलिसांनी संशयास्पद आरोपी विकास चंदन घोगडे (वय २८) आणि निर्भयकुमार जवाहरप्रसाद मिश्रा (वय ३७, दोन्ही रा. सावलीखेडा, ता. धारणी) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम २८७ सह कलम ३ व ७ अत्यावश्यक वस्तू अधिनियमानुसार गुन्हा दाखल केला आहे. तेल्हारा तहसील कार्यालयाच्या पुरवठा निरीक्षण अधिकारी अंजली कावरे यांच्या अधिकृत फिर्यादीवरून हिवरखेड पोलिसांनी हा गुन्हा नोंदवला असून पुढील कायदेशीर तपास सुरू आहे.

## सामाजिक अंकेक्षणाबाबत तक्रार; तहसीलदारांकडे निवेदन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**तेल्हारा, दि. १५ :** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (मनरेगा) सुरू असलेल्या सामाजिक अंकेक्षण (सोशल ऑडिट) प्रक्रियेत काही व्यक्तींकडून कथितरीत्या पैशांची मागणी केली जात असल्याचा आरोप करत, तेल्हारा तहसीलदार यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे. कार्ला येथील शेतकरी नेते कुलदीप बाजारे यांच्यासह रवी गवळी, दिगंबर बाजारे, रवींद्र बाजारे आणि विक्की सपकाळ यांनी या संदर्भात पुढाकार घेतला आहे.

तक्रारदारांनी प्रशासनाला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, कार्ला गावात सामाजिक अंकेक्षणासाठी आलेल्या काही संबंधित प्रतिनिधींनी केळी लागवड आणि घरकुल लाभार्थ्यांकडून ठरावीक रक्कमेची मागणी केली. पैसे न दिल्यास योजनेच्या लाभापासून वंचित ठेवण्याचा दबाव टाकला जात असल्याचा दावाही तक्रारीत आहे. अवकाळी वादळामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या केळी उत्पादकांनी या प्रकाराबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली असून, चौकशीची मागणी केली आहे. सदर आरोप तक्रारदारांनी निवेदनात केले असून, वस्तुस्थिती संबंधित यंत्रणेच्या चौकशीनंतरच स्पष्ट होणार आहे.



❑ मनरेगा कामांचे सामाजिक अंकेक्षण करणाऱ्या कर्मचाऱ्यांविषयी तक्रार प्राप्त झाली आहे. या अनुषंगाने नियमानुसार योग्य ती चौकशी करून पुढील अहवाल वरिष्ठ कार्यालयाकडे सादर केला जाईल.

**- संदीप झाडोकार** (सहायक कार्यक्रम अधिकारी, तेल्हारा)

## अजनी खुर्द गावात घडत आहेत बालकीर्तनकार!

### श्रीगुरुदेव सेवामंडळाच्या वतीने तीनही मुलींचा कौतुक सोहळा संपन्न

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**बार्शीटाकळी, दि. १६ :** तालुक्यातील अजनी खुर्द या छोट्याशा ग्रामीण भागात कु. अनुश्री उमेश धोत्रे, कु. गौरी संदीप कावरे आणि कु. सोनल हरिदास कावरे या तीन मुली वारकरी संप्रदायाचे शिक्षण घेत असून त्यांनी कीर्तनास सुरुवात केली आहे. या तिघीही महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार कु. शिवलीलाताई पाटील यांच्याकडे संप्रदायाचे धडे गिरवत आहेत.

विशेष म्हणजे, तिघींच्याही घरात कीर्तनाचा कोणताही वारसा नाही. मात्र गावात स्व. नागोराव पाटील धोत्रे यांच्या संस्कारातून अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवामंडळ गेल्या ५० वर्षांपासून कार्यरत आहे. येथे श्री सोपीनाथ महाराज संस्थानच्या माध्यमातून दर सोमवारी, एकादशीला भजनाचे कार्यक्रम आणि दरवर्षी फेब्रुवारीत ग्रामगीता सप्ताहाचे अखंड आयोजन केले जाते. पूर्वी ह.भ.प. गोसावी महाराज आणि ह.भ.प. शेषराव महाराज हागे यांनी येथील व्यासपीठ सांभाळले. गेल्या ९ वर्षांपासून भौरद येथील ह.भ.प. डॉ. अशोक महाराज तावरे कथा सांगत असून, त्यांच्या मार्गदर्शनामुळे गावात आध्यात्मिक परिवर्तन झाले आहे. याच संस्कारातून या तीन बालकीर्तनकारांनी गावाची ओळख निर्माण केली आहे.

पवित्र अधिक मासानिमित्त या तिघी गावात आल्या असता, अ. भा. श्रीगुरुदेव सेवामंडळाच्या वतीने मंगळवार, १६ जून रोजी श्री सोपीनाथ महाराज संस्थान येथे त्यांचा कौतुक सोहळा पार पडला. याप्रसंगी जीवन प्रचारक डॉ. अशोक रत्नपारखी, तालुका सेवाधिकारी देविदास कावरे, तालुका प्रचार प्रमुख धनंजय ढोरे, साहित्यिक तुळशीराम बोबडे, हरिदास रत्नपारखी, भुजंगराव देशमुख, सुरेशराव सावरकर, प्रकाश कळंब आणि संस्थानचे व्यवस्थापक सुधाकरराव कावरे यांच्यासह ग्रामस्थ व महिला भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ही माहिती मंडळाचे तालुका प्रसिद्धी प्रमुख प्रदीप पाटील गावंडे यांनी दिली.

वरुणराजा रुसला | महान परिसरात कपाशीवर डवरणीचा पहिला फेर!

## पावसाअभावी बागायतदार शेतकरी चिंतेत; कोरडवाहू शेतकऱ्यांचे डोळे आभाळाकडे

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**महान, दि. १६ :** चालू जून महिन्याच्या सुरुवातीला पाण्याच्या उपलब्धतेनुसार महान आणि परिसरातील बहुतांश बागायतदार शेतकऱ्यांनी कपाशीची लागवड केली होती. ठिबक सिंचन आणि स्प्रिंकलरच्या माध्यमातून पाणी देऊन शेतकऱ्यांनी कपाशी उगवूनही आणली. मात्र, मृग नक्षत्र सुरू होऊन आठवडा उलटल्यानंतरही दमदार पावसाने दडी मारल्यामुळे निसर्गाच्या लहरीपणाचा फटका कपाशी उत्पादकांना बसत असून वरुणराजा रुसल्याने शेतकरी चिंताक्रांत झाला आहे.

सध्या उन्हाचा कडाका आणि उष्णतेचे प्रमाण जास्त असल्याने विहिरी व कूपनलिकांची भूजल पातळी झपाट्याने खालावत आहे. परिणामी, उगवून आलेल्या कपाशीला पाणी कसे द्यावे, असा प्रश्न निर्माण झाला आहे. तीव्र उन्हामुळे काही ठिकाणी कपाशीची झाडे पिवळी पडत असून पाण्याअभावी सुकू लागली आहेत. महान परिसरात यंदा शेकडो एकरांवर कपाशीची लागवड झाली असून आजमितीस या पिकाला १५ दिवस पूर्ण झाले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी कपाशी पिकाला डवरणीचा (डुब्यांचा) पहिला फेरही दिला आहे. पुढील आठवड्यात पिकाला रासायनिक खतांचा पहिला डोस द्यावा लागणार आहे. त्यासाठी जमिनीत पुरेशा ओलाव्याची गरज असल्याने शेतकरी वर्ग आता मुसळधार पावसाची आतुरतेने वाट पाहत आहे. दुसरीकडे, कोरडवाहू शेतकऱ्यांनी शेती मशागतीची कामे आटोपून जमीन पेरणीयोग्य केली असून, धूळपेरणी व खरिपाच्या मुख्य पेरणीसाठी सर्व नजरा आभाळाकडे लागल्या आहेत.

❑ आमच्या कृषी केंद्रात खते, बियाणे आणि कीटकनाशके पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत. मात्र, मृग नक्षत्र लागूनही पाऊस पडत नसल्याने बाजारात शांतता आहे. सध्या शेतकरी पाऊस आल्याशिवाय कोणत्याही बियाण्यांची किंवा रासायनिक खतांची खरेदी धाडसाने करत नसल्याचे चित्र आहे.

**- सतीश लवंगे,**
सतीश कृषी सेवा केंद्र, महान

❑ गेल्या आठ दिवसांपासून पावसाने दडी मारल्यामुळे शेतकऱ्यांच्या खरेदीला ब्रेक लागला आहे. गेल्या वर्षी या काळात बियाणे खरेदीसाठी कृषी केंद्रांवर एकच गर्दी झाली होती; मात्र यंदा जोपर्यंत दमदार पाऊस होत नाही, तोपर्यंत शेतकरी खते व बियाणे खरेदी करणार नसल्याचे दिसते.

**- प्रवीण गाढवे,**
जय गजानन कृषी सेवा केंद्र, महान

## बोरगाव मंजू ठाणेदारपदी सुनील वानखडे रुजू

अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**अकोला, दि. १६ :** जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या आदेशानुसार पोलीस दलात अंतर्गत बदल्या करण्यात आल्या आहेत. या फेरबदलानुसार,

बोरगाव मंजू पोलीस ठाण्याच्या प्रभारी पदाची सूत्रे पोलीस निरीक्षक सुनील वानखडे यांनी अधिकृतपणे स्वीकारली आहेत. मावळते ठाणेदार अनिल गोपाल यांची बुलढाणा येथे बदली झाल्याने रिक्त झालेल्या जागेवर वानखडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

नूतन ठाणेदार सुनील वानखडे हे यापूर्वी अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर शहर पोलीस ठाण्यात कार्यरत होते. त्याशिवाय त्यांनी बुलढाणा, यवतमाळ, वाशिम आणि अमरावती जिल्ह्यांत विविध पदांवर आपली दीर्घ सेवा बजावली आहे.बोरगाव मंजू पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या कुरणखेड, बोरगाव टाऊन व दाळंबी यासह विविध बीटमध्ये सध्या शांतता असली, तरी परिसरात छुप्या पद्धतीने चालणारे अवैध धंदे डोके वर काढत आहेत. महामार्गावरून होणारी गोवंशाची अवैध वाहतूक, वरली मटका, ऑनलाईन जुगार, बेकायदेशीर दारू व गांजा विक्री, तसेच छुप्या पद्धतीने होणारी वृक्षतोड आणि अवैध खणन रोखण्याचे मुख्य आव्हान नूतन ठाणेदारांसमोर असणार आहे.

## महत्त्वाचे

### आफ्रिकन मागूर माशांची तस्करी उघडकीस

**वाशिम :** समृद्धी महामार्गावरून भारत सरकारने प्रतिबंधित केलेल्या आणि अत्यंत धोकादायक मानल्या जाणाऱ्या आफ्रिकन मागूर माशांची मोठी तस्करी होत असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. कारंजा जवळील पोहा गावाजवळ एका ट्रकचा अपघात झाल्यानंतर हा सर्व प्रकार उघड झाला. या प्रकरणी कारंजा ग्रामीण पोलिस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोहा गावाजवळ एक ट्रक अपघातग्रस्त झाला होता. या ट्रकाची तपासणी केली असता, त्यात भारत सरकारने मानवी आरोग्यासाठी घातक असल्यामुळे पूर्णपणे प्रतिबंधित केलेल्या आफ्रिकन मागूर माशांचा मोठा साठा आढळून आला. या प्रतिबंधित माशांची बेकायदेशीर वाहतूक व तस्करी केल्याप्रकरणी १३ जून रोजी कारंजा ग्रामीण पोलिस ठाण्यात तीन जणांविरुद्ध विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस करीत आहेत. अपघातग्रस्त ट्रकमध्ये सुमारे तीन टन मृत माशांचा साठा होता. मानवी आरोग्यास अत्यंत अपायकारक ठरू शकणाऱ्या या माशांची माहिती मिळताच, जिल्हा मत्स्य व्यवसाय विभागाने तातडीने कारवाई करत या संपूर्ण साठ्याची सुरक्षितपणे विल्हेवाट लावली आहे.

### वाशिम जिल्ह्यात ३५ रिक्त केंद्रप्रमुखांची पदे भरण्याचा मार्ग मोकळा!

**वाशिम:** जिल्हा परिषद शाळांच्या शैक्षणिक व्यवस्थेला बळकटी देणाऱ्या केंद्रप्रमुख पदभरतीचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. सर्वोच्च न्यायालयाने २६ मे रोजी दिलेल्या महत्त्वपूर्ण आदेशानुसार ही भरती प्रक्रिया पार पडत असून, यामुळे गेल्या तब्बल बारा वर्षांपासून रखडलेला केंद्रप्रमुख पदांचा प्रश्न आता सुटणार आहे. जिल्ह्यात केंद्रप्रमुखांच्या एकूण ५१ रिक्त पदांपैकी ३५ पदे तातडीने भरली जाणार असल्याने इच्छुक शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. राज्य शासनातर्फे घेण्यात आलेल्या समूह साधन केंद्र समन्वयक तथा केंद्रप्रमुख मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा-२०२४ मध्ये जिल्ह्यातील सुमारे ५६३ शिक्षकांनी सहभाग घेतला होता. फेब्रुवारी महिन्यात पार पडलेल्या या परीक्षेचा निकाल १३ मार्च रोजी जाहीर करण्यात आला. त्यानंतर जिल्ह्यातील रिक्त ३५ पदांसाठी अडीचपट प्रमाणानुसार ८० गुणवत्ताधारक शिक्षकांची यादी प्रसिद्ध करण्यात आली. या उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या वतीने जिल्हा परिषद सभागृहात पूर्ण करण्यात आली असून, यामध्ये प्रत्यक्षांत ४४ उमेदवारांची कागदपत्र पडताळणी झाली आहे.

# आधी आईवर तलवारीने वार; नंतर मुलाची निर्घृण हत्या

## आठ जणांवर गुन्हा दाखल तर तिघे पोलिसांच्या ताब्यात

**अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**रिसोड, दि. १६ :** शहरातील हिंगोली मार्गावरील माणुसकी नगर भागात १५ जून रोजी मध्यरात्री साडेबारा वाजेच्या सुमारास एक रक्ताळलेला थरार घडला. जुन्या वादाचा राग मनात धरून, रस्त्यावरील नालीच्या ढाप्यावर गाढ झोपेत असलेल्या ३८ वर्षीय युवकाचा डोक्यावर दगड आणि लोखंडी रॉडने जबर वार करून निर्घृण खून करण्यात आला. भगवान सुभाष गायकवाड असे मृतकाचे नाव आहे. या घटनेच्या काही तास आधीच आरोपींनी मृतकाच्या आईवर तलवारीने वार करून त्यांना गंभीर जखमी केले होते. एकाच रात्री घडलेल्या या प्राणघातक हल्ल्यामुळे आणि हत्येमुळे संपूर्ण रिसोड शहरात प्रचंड खळबळ उडाली आहे. या प्रकरणी रिसोड पोलिसांनी आठ जणांविरोधात हत्येसह विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केला असून तिघांना ताब्यात घेतले आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, माणुसकी नगर येथील रहिवासी सौ. बाली बळीराम गायकवाड यांनी रिसोड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या शेजारी राहणारा प्रमोद संजय अंभोरे आणि त्याचे इतर सात साथीदार नेहमीच गायकवाड कुटुंबाशी किरकोळ कारणावरून वाद घालत असत.

१५ जून रोजी संध्याकाळी सात वाजेच्या सुमारास, बाली गायकवाड यांचे दीर अनिल गायकवाड हे फोनवर जोरजोरात बोलत होते. याच कारणाचा राग धरून प्रमोद अंभोरे, दीपक अंभोरे, गजानन बाजड, मनीषा अंभोरे, सीता अंभोरे, शितल मानवतकर, आदित्य मानवतकर आणि संजय अंभोरे यांनी अनिल यांना लाथाबुक्क्यांनी व लाठीकाठीने बेदम मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिली. हा वाद सोडवण्यासाठी अनिल यांची आई विमल सुभाष गायकवाड



तिथे गेल्या. दरम्यान, आरोपींनी थेट विमल यांच्या पायावर तलवारीने जोरदार वार करून त्यांना गंभीर जखमी केले.

तलवारीच्या वारामुळे विमल गायकवाड या रक्ताच्या थारोळ्यात पडल्या. त्यांना तातडीने रिसोड येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी वाशिम आणि त्यानंतर अकोला येथील रुग्णालयात हलवण्यात आले. कुटुंबातील मुख्य सदस्य जखमी विमल यांच्यासोबत दवाखान्यात गेल्यामुळे संध्याकाळी पोलिसात तक्रार देता आली नाही. इतर सदस्य रात्री जेवण करून घरी झोपले.

मृतक भगवान गायकवाड हे रात्रीच्या वेळी घरासमोरील रस्त्यावर असलेल्या नालीच्या सिमेंटच्या ढाप्यावर अंथरूण टाकून झोपले होते. आईवर झालेल्या हल्ल्याच्या धक्क्यातून कुटुंब सावरत असतानाच, मध्यरात्री साडेबारा वाजेच्या सुमारास शेजाऱ्याने धावत येऊन कुटुंबाला उठवले. भगवान यांच्यावर कोणीतरी अज्ञात व्यक्तीने हल्ला केल्याचे त्यांनी सांगितले. कुटुंबाने बाहेर येऊन पाहिले असता भगवान हे रक्ताच्या थारोळ्यात पडले होते. त्यांचा जागीच मृत्यू झाला होता. जुन्या भांडणाचा वचपा काढण्यासाठीच प्रमोद अंभोरे व त्याच्या इतर सात साथीदारांनी भगवान यांच्या डोक्यावर दगड किंवा लोखंडी रॉड मारून त्यांचा खून केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस उपविभागीय अधिकारी नवदीप अग्रवाल आणि रिसोड पोलीस ठाण्याचे ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांनी तातडीने फौजफाट्यासह घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात पाठवला. या गुन्ह्याचा छडा लावण्यासाठी फॉरेन्सिक लॅब (न्यायवैद्यक शाखा) आणि श्वान पथकालाही पाचारण करण्यात आले होते.

रिसोड पोलिसांनी या प्रकरणी आरोपींवर भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३(१), १८९(२), १९०, १९१(२), १९१(३), ११८, ११५(२) आणि ३५२ नुसार गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणातील तीन संशयितांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून पुढील तपास सहायक पोलीस उपनिरीक्षक संतोष आघाव, पोलीस उपनिरीक्षक वसंत तहकीक आणि त्यांचे पथक करत आहे.

## जागतिक बालकामगार विरोधी दिनानिमित्त कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम

**अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**वाशिम, दि. १६ :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व जिल्हा विधिज्ञ मंडळाच्या संयुक्त विद्यमाने जागतिक बालकामगार विरोधी दिनानिमित्त दिशा मुलींचे निरीक्षण गृह, बाल न्याय मंडळ, वाशिम येथे कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या गीताने करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव व्ही. जी. चौखंडे उपस्थित होते. त्यांनी यावेळी उपस्थितांना




'पोक्सो कायदा : सुरक्षित बचपन, सुरक्षित भविष्य' या विषयावर सविस्तर मार्गदर्शन करून बालकांच्या संरक्षणासंबंधीच्या कायदेशीर तरतुदींची माहिती दिली.

कार्यक्रमास द्वितीय सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) तथा मुख्य दंडाधिकारी, बाल न्याय मंडळ, श्रीमती ए. आर. फक्राबादकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी बाल न्याय (काळजी व संरक्षण) कायद्याबाबत मार्गदर्शन करताना बालकांच्या हक्कांचे संरक्षण आणि न्यायव्यवस्थेतील विविध तरतुदींविषयी माहिती दिली.

यावेळी ॲड. महेंद्र भालेकर यांनी बालकामगार प्रतिबंधक कायद्याविषयी मार्गदर्शन करून बालमजुरी निर्मूलनासाठी समाजातील प्रत्येक घटकाने जागरूक राहण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, प्रास्ताविक व आभार प्रदर्शन ॲड. श्रीमती शुभांगी खडसे, सहाय्यक न्यायरक्षक यांनी केले. कार्यक्रमास दिशा मुलींच्या निरीक्षण गृहातील मुली तसेच कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाढीव टप्पा अनुदानासाठी २२ जून पासून आझाद मैदान मुंबई येथे आंदोलन

**अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**मानोरा, दि. १६ :** राज्यातील अंशतः अनुदानित शाळांना १०० टक्के वाढीव टप्पा अनुदान द्यावे.या मागणी साठी मुंबई येथील आझाद मैदानावर दिनांक २२ जून पासून बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात येणार आहे.

शिक्षक समन्वय संघाचे वतीने होणाऱ्या या आंदोलनात अमरावती विभागातील शिक्षक,कर्मचारी यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे.असे आवाहन राज्य संघटक पुंडलिक राहटे , म. रा.विना अनुदानित शाळा कृती समितीचे विभागीय संघटक उपेंद्र बाबाराव पाटील,विभागीय अध्यक्ष सुधाकर वाहूरवाघ,सुरेश शिरसाट,संतोष वाघ, प्रशांत कव्हर,आर. जी. पठाण, भैरव भेंडे, विनोद इंगळे, विजय देशमुख, सुनील देशमुख, गोपाल चव्हाण यांनी केले आहे.

राज्यातील अंशतः अनुदानित २०,४०,६०,८० टक्के अंशतः अनुदान असणाऱ्या शाळांना १ जून २०२६ पासून १०० टक्के अनुदान मिळणे अपेक्षित होते.मात्र सरकार याबाबत गंभीर नसून दिलेले आश्वासन पाळत नाही.

त्यामुळे अंशतः अनुदानित शिक्षक,कर्मचारी यांच्यात रोष निर्माण झाला आहे.२२ जुन आंदोलनासंदर्भात अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यात यवतमाळ ,अमरावती ,अकोला, वाशिम, बुलढाणा या ठिकाणी सभेचे आयोजन करण्यात आले आहे. त्रुटी पूर्तता केलेल्या शाळांना २५ ऑगस्ट २०२५ च्या शासन निर्णयानुसार समान टप्पा अनुदान द्यावे,पटसंख्या कमी असल्याच्या कारणावरून अपात्र ठरवण्यात आलेल्या शाळांच्या सन २०२३ - २४, २०२४- २५ च्या संचमान्यतेचा विचार करुन अनुदान देण्यासाठी शुद्धिपत्रक काढावे,अघोषित शाळांना न्याय द्यावा,जुनी पेन्शन योजना लागू करावी,सेवा निवृत्तीचे वय ६० वर्ष करावे,वैद्यकीय प्रतिपूर्तीचा लाभ द्यावा. मागण्या मान्य न झाल्यास तेथेच ठिय्या आंदोलन करण्यात येईल. अशी माहिती उपेंद्र बाबाराव पाटील यांनी दिली आहे.

## पीएम-कुसुम सौर कृषी पंप लाभार्थ्यांसाठी कार्यशाळांचे आयोजन

**अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**वाशिम, दि. १६ :** जिल्हा विधी सेवा प्राधिकरण वजागतिक पर्यावरण दिन अभियानांतर्गत ५ जुलै २०२६ पर्यंत महाउर्जामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या अभियानादरम्यान पीएम-कुसुम योजना घटक-ब अंतर्गत प्रलंबित सौर कृषी पंप आस्थापनेला गती देण्यासाठी तसेच आस्थापित सौर कृषी पंपांबाबतच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी महाऊर्जामार्फत विशेष कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे.

वाशिम जिल्ह्यात तालुका व ग्रामपंचायत स्तरावर या कार्यशाळा आयोजित करण्यात येणार असून दि. १६ जून २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता वाशिम तालुक्यातील तामसी येथील ग्रामपंचायत कार्यालयात, दुपारी १२ वाजता मालेगाव तालुक्यातील पांगरी नवघरे येथील ग्रामपंचायत कार्यालयात तसेच दि. १७ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता रिसोड तालुक्यातील केनवड येथील ग्रामपंचायत कार्यालयात कार्यशाळा होणार आहेत.

MEDA महाऊर्जा

> ■ वाशिम जिल्ह्यातील पीएम-कुसुम योजनेतील सर्व सौर कृषी पंप लाभार्थ्यांनी या शिबिरांना व कार्यशाळांना उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन उपलब्ध सुविधांचा लाभ घ्यावा.
>
> **- विजय काळे**
> जिल्हा व्यवस्थापक, महाऊर्जा, यवतमाळ.

पीएम-कुसुम योजना घटक-ब अंतर्गत सौर कृषी पंप प्राप्त लाभार्थ्यांच्या पंप दुरुस्तीविषयक तक्रारी, तांत्रिक अडचणी तसेच प्रलंबित सौर कृषी पंप आस्थापनेबाबतच्या समस्यांची नोंदणी या कार्यशाळांमध्ये करण्यात येणार आहे. संबंधित शेतकऱ्यांनी कार्यशाळांना उपस्थित राहून आपल्या तक्रारी नोंदवाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

## मानोरा आयटीआयमध्ये वसतिगृह सुरू करण्याची मागणी!

**अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**मानोरा, दि. १६ :** शहरातील संत सेवालाल महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आयटीआय मध्ये वसतिगृह व भोजनाची व्यवस्था करावी तसेच संगणक ऑपरेटर आणि प्रोग्रामिंग सहाय्यक (कोपा) बॅच सुरू करावी, अशी मागणी भाजपा किसान मोर्चा पोहरादेवी मंडळाचे अध्यक्ष सुदाम वासुदेवराव तायडे यांनी मुख्यमंत्री कार्यालयाचे ओएसडी अमोल पाटणकर यांना निवेदन सादर करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

मानोरा शहरात आयटीआय कॉलेज गेल्या १६ वर्षांपासून प्रशस्त इमारतीत कार्यरत असून एकूण १२० विद्यार्थी येथे प्रशिक्षण घेत आहेत. मात्र, या ठिकाणी वसतिगृह व भोजनाची व्यवस्था नसल्याने आर्थिकदृष्ट्या



कमकुवत विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत आहे. विशेषतः मुलींना रोज ये - जा करण्यासाठी अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे आयटीआय येथे तातडीने वसतिगृह सुरू करण्यात यावे,

तालुक्यातील विद्यार्थ्यांना संगणक ऑपरेटर आणि प्रोग्रामिंग सहाय्यक या ट्रेडचे प्रशिक्षण घेण्यासाठी बाहेरील तालुक्यात जावे लागते. यामुळे वेळ व पैशाचा अपव्यय होत आहे. स्थानिक विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन आयटीआय कॉलेज मध्येच कोपा बॅच सुरू करावी, अशी मागणीही सुदाम तायडे यांनी केली आहे. यासंदर्भात तातडीने कार्यवाही होऊन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**प्रशासकीय उदासिनता** | **मानोरा ते रामेश्वर मार्गावरील पांदण रस्त्यांची दयनीय अवस्था**

# मुख्यमंत्री पांदण रस्ता योजना कागदावरच; शेतकरी पुन्हा चिखलात अडकणार

**अजिंक्य भारत** । प्रतिनिधी

**मानोरा, दि. १६ :** एकीकडे शासन मुख्यमंत्री पांदण रस्ता योजनेचा मोठा गाजावाजा करून ग्रामीण भागातील शेतरस्ते चकाचक करण्याचे दावे करत आहे. मात्र, मानोरा तालुक्यातील मानोरा ते रामेश्वरकडे जाणाऱ्या शेतशिवारातील पांदण रस्त्यांची प्रत्यक्ष स्थिती पाहिल्यास या दाव्यांमधील फोलपणा स्पष्टपणे दिसून येतो. पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असतानाही या रस्त्यांची दुरुस्ती करण्यात आलेली नाही. त्यामुळे ऐन पेरणीच्या हंगामात शेतीमाल आणि शेती अवजारे नेण्यासाठी शेतकऱ्यांना जीवघेणी कसरत करावी लागणार आहे.



तालुक्यातील बहुतांश अर्थव्यवस्था पूर्णपणे शेतीवर अवलंबून आहे. शेतात जाण्यासाठी पक्के रस्ते असणे ही काळाची गरज असताना, प्रशासनाच्या उदासीनतेमुळे आणि लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे पांदण रस्ते दुरवस्थेच्या गर्तेत सापडले आहेत. विशेषतः मानोरा ते रामेश्वर दरम्यानचा मुख्य पांदण रस्ता पूर्णपणे खड्डेमय झाला आहे. मातीचे रस्ते असल्याने पावसाचे पाणी साचून काही दिवसांतच याचे रूपांतर चिखलाच्या दलदलीत होणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना बैलगाडी, ट्रॅक्टर किंवा इतर कृषी यंत्रसामग्री शेतात नेणे अशक्य होणार आहे.

शेतकऱ्यांच्या व्यथा मांडताना परिसरातील भूमिपुत्रांनी सांगितले की, रस्ते नसल्यामुळे पेरणीसाठी लागणारी खते आणि बियाणे खांद्यावर किंवा डोक्यावर वाहून नेण्याशिवाय आमच्याकडे पर्याय उरत नाही. इतकेच नव्हे, तर अचानक उद्भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीत शेतातून एखादा रुग्ण किंवा वृद्ध व्यक्तीला दवाखान्यात पोहोचवण्यासाठी वाहनेही येऊ शकत नाहीत. ही परिस्थिती शेती व्यवसायासाठी अत्यंत घातक ठरत आहे.

एका बाजूला शासनाच्या मुख्यमंत्री पांदण रस्ता योजनेअंतर्गत तालुक्यातील प्रत्येक रस्ता खडीकरण करून सुस्थितीत करण्याचे आश्वासन लोकप्रतिनिधींकडून वारंवार दिले जाते. मात्र, श्रेयवादाच्या लढाईत आणि प्रशासकीय दिरंगाईत शेतकरी मात्र भरडला जात आहे. निवडणुकीच्या काळात आश्वासनांचा पाऊस पाडणारे नेते आता या गंभीर प्रश्नाकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप संतप्त शेतकऱ्यांकडून केला जात आहे.

पावसाळा सुरू होण्यापूर्वी युद्धाच्या पातळीवर या रस्त्यांची दुरुस्ती करण्यात यावी, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे. आता जिल्हा प्रशासन याकडे गांभीर्याने लक्ष देणार की, बळीराजाला पुन्हा एकदा कंबरडे मोडणाऱ्या चिखलातून वाट काढावी लागणार, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. शेतकऱ्यांच्या संयमाचा अंत न पाहता तातडीने या पांदण रस्त्यांच्या कामाला गती देणे ही काळाची गरज बनली आहे.

## केंद्र व राज्य शासनाच्यावतीने दोन महत्त्वपूर्ण आर्थिक सर्वेक्षणांना सुरुवात




**वाशिम:** केंद्र सरकारच्या सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या वतीने राज्यभरात दोन महत्त्वपूर्ण सर्वेक्षणे राबविण्यात येत आहेत. यामध्ये नियतकालिक कामगार शक्ती सर्वेक्षण आणि असंघटित क्षेत्रातील उद्योग-आस्थापनांचे वार्षिक सर्वेक्षण यांचा समावेश आहे. एप्रिल २०२६ ते मार्च २०२७ या कालावधीत चालणाऱ्या या मोहिमेचा वाशिम जिल्ह्यात जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या हस्ते नुकताच शुभारंभ करण्यात आला. महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन आणि राज्य शासनाच्या अर्थ व सांख्यिकी आयुक्तालयाच्या सहकार्याने ही सर्वेक्षणे केली जात आहेत. जिल्ह्यातील नागरिकांनी सर्वेक्षणासाठी येणाऱ्या अधिकृत कर्मचाऱ्यांना अचूक माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी यावेळी केले. नागरिकांच्या सक्रिय सहभागामुळे जिल्ह्याची खरी सामाजिक व आर्थिक स्थिती शासनापर्यंत पोहोचण्यास मदत होईल, असेही त्यांनी नमूद केले. राज्यातील जिल्हानिहाय अचूक व विश्वासार्ह आकडेवारी उपलब्ध करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. या सर्वेक्षणांच्या माध्यमातून गोळा होणाऱ्या माहितीचा उपयोग भविष्यात शासनाला विविध विकासात्मक योजना आणि धोरणे आखण्यासाठी होणार आहे.

महत्त्वाचे

## जीवन परघरमोर यांची बाळापूर तालुका उपाध्यक्षपदी निवड



**जानोरी मेळ** : ग्राम रोजगार सेवक सहाय्यक संघटना महाराष्ट्र राज्यच्या बाळापूर तालुका उपाध्यक्षपदी जीवन परघरमोर यांची निवड करण्यात आली आहे. अकोला जिल्ह्याच्या सरहद्दीवर असलेल्या काजीखेड-स्वरूपखेड गट ग्रामपंचायतीमध्ये ते रोजगार सेवक म्हणून कार्यरत आहेत. परघरमोर यांनी २०१३ मध्ये रोजगार सेवक म्हणून कामाला सुरुवात केली असून, त्यांना या क्षेत्रातील १३ वर्षांचा अनुभव आहे. यापूर्वी त्यांच्या कार्यकाळात त्यांच्या पत्नीने स्वरूपखेड ग्रामपंचायतीचे सरपंचपद भूषवले होते. त्या दीड वर्षांच्या कालावधीत गावात विविध विकासकामे करण्यात आली. निंबा अंदुरा सर्कल अंतर्गत कृषी आणि ग्रामविकास क्षेत्रातील विविध योजना राबविण्यात त्यांनी काम केले आहे. बाळापूर तालुक्यातील ६६ ग्रामपंचायतींच्या कार्यक्षेत्रातील रोजगार सेवकांच्या संघटनात्मक कामातील सहभाग लक्षात घेऊन, संघटनेने त्यांच्यावर तालुका उपाध्यक्षपदाची ही नवीन जबाबदारी सोपवली आहे.

## निधन वार्ता

### भास्करराव सांगळे



**कवठा बु.**: अकोट तालुक्यातील कवठा बुद्रुक येथील रहिवासी भास्करराव माणिकराव सांगळे यांचे मंगळवार, १६ जून रोजी रात्री १.३० वाजताच्या सुमारास अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. ते ६६ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर आज बुधवारी शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, एक मुलगा, सून आणि नातवंडे असा मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या निधनाने कवठा परिसरावर शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# चौहट्टा बाजारात अन्न व औषध प्रशासनाचा धडक छापा

## भेसळयुक्त दुधाचा साठा जप्त; तुकाराम मुंडेंच्या आदेशानंतर अकोला विभाग ॲक्शन मोडमध्ये

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोट, दि १६ : राज्यात भेसळयुक्त आणि अन्नपदार्थांच्या बेकायदेशीर विक्रीविरोधात अन्न व औषध प्रशासन विभागाचे नूतन आयुक्त तुकाराम मुंडे यांनी घेतलेल्या आक्रमक भूमिकेनंतर आता जिल्हा स्तरावरही त्याचे पडसाद उमटू लागले आहेत. अकोट तालुक्यातील चौहट्टा बाजार येथील मे. श्रीकृपा दूध डेअरी अँड स्वीट मार्ट या प्रतिष्ठानवर अन्न व औषध प्रशासनाने मंगळवार, १६ जून रोजी धडक कारवाई करत संशयास्पद दुधाचा साठा जप्त केला. या धडक कारवाईमुळे परिसरात भेसळ करणाऱ्या व्यापाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.**



मिळालेल्या अधिकृत माहितीनुसार, अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या विशेष आदेशान्वये संपूर्ण राज्यात अन्नपदार्थांमधील भेसळ रोखण्यासाठी विशेष मोहीम राबवली जात आहे. याच मोहिमेअंतर्गत अकोला अन्न व औषध प्रशासनाचे सहाय्यक आयुक्त (अन्न) दे. गो. वीर यांच्या थेट मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी र. द्वा. सोळंके यांच्या पथकाने चौहट्टा बाजार येथील मेन रोडवर असलेल्या श्रीकृपा दूध डेअरीवर अचानक छापा टाकला.

या पेढीची कसून तपासणी केली असता, तेथे विक्रीसाठी ठेवण्यात आलेल्या मिक्स मिल्क या अन्नपदार्थात भेसळ असल्याचा संशय पथकाला आला. कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करत पथकाने विश्लेषणासाठी दुधाचे नमुने ताब्यात घेतले. तसेच, ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ खेळला जाऊ नये याकरिता, भेसळीच्या संशयावरून तेथील उर्वरित ३३ लीटर दुधाचा साठा जागीच जप्त केला. जप्त करण्यात आलेल्या या साठ्याची एकूण किंमत २,३१० रुपये असल्याची माहिती सहाय्यक आयुक्त दे. गो. वीर यांनी अधिकृत पत्रकाद्वारे दिली आहे. जप्त केलेले नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवण्यात आले असून, अहवाल प्राप्त झाल्यानंतर संबंधितांवर कायद्यानुसार पुढील कठोर फौजदारी कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### आरोग्याशी खेळणाऱ्यांची गय नाही!

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या कडक अंमलबजावणीच्या पॅटर्नमुळे अकोला जिल्ह्यातही अन्न सुरक्षा पथके सक्रिय झाली आहेत. नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या अन्न भेसळ करणाऱ्यांवर अशीच निरंतर आणि आक्रमक कारवाई करण्याची मागणी आता सर्वसामान्य जनतेतून होत आहे.

# अकोला येथील शासकीय आयटीआयमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू

## एकूण ८८८ जागा उपलब्ध; ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

अजिंक्य भारत । प्रतिनिधी




**अकोला, दि १६ :** स्थानिक रतनलाल प्लॉट येथील सम्राट चंद्रगुप्त मौर्य शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत (आयटीआय) शैक्षणिक वर्षाची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. केंद्रीय ऑनलाईन पद्धतीनुसार प्रवेश अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत २१ जून असून, अर्जांची निश्चिती (कन्फर्मेशन) २२ जूनपर्यंत करता येणार आहे. जास्तीत जास्त दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी या प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन संस्थेचे प्राचार्य तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी संतोष साळुंके यांनी केले आहे.

प्रवेश प्रक्रियेविषयी माहिती देताना संस्थेचे प्रसिद्धी प्रमुख अरविंद पोहरकर यांनी सांगितले की, इच्छुकांनी प्रथम admission. dvet.gov.in या संकेतस्थळावर जाऊन ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे. त्यानंतर हा अर्ज आयटीआय संस्थेत येऊन निश्चित (व्हेरीफाय) करावा लागेल. अर्ज निश्चितीनंतर उमेदवारांना विविध अभियांत्रिकी व बिगर अभियांत्रिकी अभ्यासक्रमांसाठी (ट्रेड्स) पर्याय फॉर्म (ऑप्शन फॉर्म) भरता येईल. या संदर्भातील सर्व मार्गदर्शन व माहिती केंद्राची सोय संस्थेत उपलब्ध करून देण्यात आली आहे.

संस्थेचे प्रवेश प्रमुख विनोद पायघन यांनी दिलेल्या माहितीनुसार, यंदाही प्रवेशासाठी विद्यार्थ्यांचा सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. या शासकीय आयटीआयमध्ये विविध अभ्यासक्रमांच्या एकूण ८८८ जागा उपलब्ध आहेत. प्रवेशाची माहिती गरजू विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी संस्थेच्या वतीने विशेष समित्या कार्यरत आहेत. प्रवेश अर्ज भरताना किंवा इतर कोणतीही तांत्रिक अडचण आल्यास विद्यार्थ्यांनी थेट शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अकोला येथे संपर्क साधावा, असे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# 'कोटपा' कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई

## डाबकी रोड परिसरातील १५ दुकानांवर पडला हातोडा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोला, दि १६ :** तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ प्रतिबंधक कायदा २००३ (कोटपा) च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा तंबाखू नियंत्रण कक्षाच्या वतीने मंगळवार, १६ जून रोजी विशेष मोहीम राबविण्यात आली. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. आरती कुलवाल व आरएमओ डॉ. गीता पांडे यांच्या मार्गदर्शनात तसेच डाबकी रोड पोलीस ठाण्याचे ठाणेदार दीपक कोळी यांच्या निर्देशानुसार डाबकी रोड परिसरात ही दंडात्मक कारवाई करण्यात आली.

या मोहिमेत पोलीस विभाग, आरोग्य विभाग आणि मराठवाडा ग्रामीण विकास संस्थेच्या संयुक्त पथकाने एकूण १५ तंबाखूजन्य पदार्थ विक्री करणाऱ्या दुकानांची तपासणी करून कारवाई केली. कोटपा कायद्यातील कलम ४, ५, ६ (अ, ब) व कलम ७ नुसार सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करणे, शैक्षणिक संस्थांच्या १०० मीटर परिघात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणे, तसेच १८ वर्षांखालील मुलांना तंबाखूजन्य पदार्थ विकणे या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईचा बडगा उगारण्यात आला.

प्रशासकीय स्तरावर सध्या सुरू असलेल्या या धडक कारवाईचे व्यसनमुक्तीसाठी धडपडणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांनी स्वागत केले आहे. मात्र, शहरात गेल्या अनेक वर्षांपासून छुप्या आणि सर्रास पद्धतीने होणाऱ्या प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांच्या अवैध विक्रीवर यापूर्वी अशा कारवाया का होत नव्हत्या, असा सूर नागरिकांमधून उमटत आहे. सदर कारवाई जिल्हा सल्लागार डॉ. प्रीती कोगदे, धम्मसेन शिरसाट, जानराव अवघड, एमजीव्हीएसचे मंगेश गायकवाड, पोलीस हेड कॉन्स्टेबल मुन्ना ठाकूर आणि पोलीस कॉन्स्टेबल मंगेश गीते यांच्या पथकाने केली.

### केवळ इव्हेंट नको; वर्षभर कठोर अन् गोपनीय मोहिमेची गरज!

राज्यात सनदी अधिकारी तुकाराम मुंडे यांनी राबविलेल्या धडक मोहिमांचे स्मरण करत, अकोल्यातही आता संबंधित यंत्रणेला जाग आल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. या कारवाईमुळे यंत्रणा ॲक्शन मोडमध्ये आल्याचे दिसत असले, तरी डाबकी रोडसारख्या मोठ्या परिसरात केवळ १५ दुकानांवरच झालेली कारवाई तंबाखूमुक्तीसाठी धडपडणाऱ्यांच्या भुवया उंचावणारी ठरली आहे. कारवाईची माहिती आधीच लीक झाली होती की काय, अशी शंका व्यक्त करत, केवळ विशिष्ट दिनापुरती औपचारिकता न करता संपूर्ण शहरातील छुप्या अड्ड्यांचा शोध घेण्याची मागणी होत आहे. शैक्षणिक संस्थांच्या परिसरात होणाऱ्या नियमांच्या उल्लंघनाकडे वर्षभर डोळेझाक का केली जाते, असा रास्त सवाल उपस्थित करत प्रशासनाने पूर्ण गोपनीयतेने, कोणत्याही दबावाला बळी न पडता कोटपा कायद्याची अंमलबजावणी सातत्याने करावी, तरच युवा पिढीला व्यसनाधीनतेपासून वाचवणे शक्य होईल.

# पंढरपूर वारीसाठी रस्ते दुरुस्ती व वारकऱ्यांना सुविधा द्या – ह.भ.प. गणेश महाराज शेटे

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**अकोट, दि १६ :** आगामी आषाढी एकादशी सोहळ्यानिमित्त पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकरी भाविकांचा प्रवास सुकर व्हावा, यासाठी पायदळ वारी मार्ग व पालखी मार्गाची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी. तसेच वाहतूक, आरोग्य, सुरक्षा आणि इतर आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी विश्व वारकरी सेनेचे राज्याध्यक्ष तथा वरूळ जऊळका येथील योग योगेश्वर संस्थानचे अध्यक्ष ह.भ.प. गणेश महाराज शेटे यांनी केली आहे.

आषाढी एकादशीनिमित्त अमरावती विभागातून मोठ्या प्रमाणावर पायदळ वारी दिंड्या अकोट-अकोला-शेगाव मार्गे पंढरपूरकडे प्रस्थान करतात. या दिंड्यांच्या मार्गक्रमणादरम्यान मार्गावर मोठी गर्दी होत असते. विविध गावांतील भाविक रस्त्यांवर व फाट्यांवर पालखीचे पूजन करून भक्तीमय वातावरणात वारकऱ्यांचे स्वागत करतात. यंदा अकोट परिसरातून २० जूनपासून मोठ्या प्रमाणावर पायदळ दिंड्यांचे प्रस्थान होणार आहे.

विशेष म्हणजे, दर गुरुवारी शेगाव येथेही मोठ्या संख्येने भाविक पायदळ व वाहनाने दर्शनासाठी जात असतात; मात्र शेगाव मार्गाची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून अनेक ठिकाणी मोठे खड्डे पडले आहेत. यावर्षी अद्याप समाधानकारक पाऊस न झाल्याने उष्णतेचा प्रभाव कायम राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांच्या सोयीसाठी जिल्हा प्रशासन व लोकप्रतिनिधींनी या मार्गावर तातडीने आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी विश्व वारकरी सेनेतर्फे करण्यात आली आहे.



❑ अकोट परिसर हा संतांच्या पदस्पर्शाने पुनीत झाला आहे. या परिसरातून पंढरपूर आषाढी वारीसाठी जाणाऱ्या दिंड्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. या दिंड्यांमध्ये शेतकरी, शेतमजूर, सर्वसामान्य भाविक आणि विशेषतः महिलांचा मोठा सहभाग असतो. त्यामुळे प्रशासनाने या मार्गावर तातडीने सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

**- ह.भ.प. गणेश महाराज शेटे,** राज्याध्यक्ष, विश्व वारकरी सेना

# किशोर खंडारे रक्तमित्र पुरस्काराने सन्मानित



**मूर्तिजापूर** : येथील नियमित रक्तदाते किशोर खंडारे यांना जागतिक रक्तदाता दिनानिमित्त यवतमाळच्या धैर्य सोशल वेल्फेअर फाउंडेशनच्या वतीने रक्तमित्र पुरस्कार देऊन यथोचित गौरव करण्यात आला. रोटरी शताब्दी भवनात संपन्न झालेल्या या दिमाखदार सोहळ्यात आमदार बाळासाहेब मांगूळकर यांच्या हस्ते खंडारे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. किशोर खंडारे हे २००५ पासून अविरतपणे रक्तदानाचे मानवतावादी कार्य करत आहेत. त्यांनी आतापर्यंत अनेकवेळा उत्स्फूर्तपणे रक्तदान करून गरजू रुग्णांची रक्ताची गरज भागवली आहे. याशिवाय आपल्या आरोग्य सेवेच्या माध्यमातूनही ते रुग्णांना निरंतर सेवा देत असतात. त्यांचे हेच सामाजिक योगदान लक्षात घेऊन संस्थेने त्यांना या पुरस्कारासाठी निवडले.या सोहळ्याला निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुभाष ढोले, समाजसेवक भाई अमन, कमलेश बघेल आणि सारिका शहा यांची मंचावर प्रमुख उपस्थिती होती.

# २२ जूनला अधिवेशनाच्या दिवशी शेतकरी अन्नत्याग करणार!

अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मूर्तिजापूर, दि. १६ :** राज्य शासनाचे आगामी अधिवेशन २२ जूनपासून सुरू होत आहे. याच अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी सरकारला विविध मागण्यांची आणि दिलेल्या आश्वासनांची आठवण करून देण्यासाठी मूर्तिजापूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या वतीने तीव्र अन्नत्याग जनआंदोलन उभारण्यात येणार आहे. ''एक व्हा, एकत्र लढा'' अशी हाक देत तालुक्यातील शेतकरी आपल्या हक्कांसाठी रस्त्यावर उतरणार आहेत.

या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील शेतकऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. यामध्ये खालील प्रमुख मागण्यांवर शासनाचे लक्ष वेधण्याचा निर्णय घेण्यात आला:

**१७,५०० रुपयांच्या आश्वासनाची आठवण:** मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांना हेक्टरी १७,५०० रुपये पीकविमा देण्याचे आश्वासन दिले होते. या वचनपूर्तीची सरकारला तीव्र आठवण करून देण्यासाठी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी हे अन्नत्याग आंदोलन पुकारण्यात आले आहे.

**पीकविम्यातील अन्यायाविरुद्ध उच्च न्यायालयात धाव:** वर्ष २०२५-२६ च्या पीकविमा योजनेतील तीन ट्रिगरची अट वगळून केवळ उपग्रह (सॅटेलाईट) पाहणीद्वारे उत्पादन ठरवण्याच्या जाचक नियमाविरोधात शेतकरी आता उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार आहेत. या नियमामुळे तालुक्यातील ६ महसूल मंडळे विम्यापासून वंचित राहिली असून, काही शेतकऱ्यांना एकरी केवळ ३०० रुपये एवढा तुटपुंजा विमा मिळाला आहे.

**सरसकट कर्जमाफी व नव्याने कर्जवाटप:** शेतकऱ्यांचा सात-बारा कोरा करून त्यांना सरसकट कर्जमाफी देण्यात यावी. तसेच चालू खरीप हंगामाच्या पेरणीपूर्वी सर्व पात्र शेतकऱ्यांना पुन्हा नव्याने पीक कर्जवाटप करण्यात यावे.

**५०,००० रुपयांचा प्रोत्साहन निधी तातडीने द्या:** नियमित कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांना जाहीर झालेला ५०,००० रुपयांचा प्रोत्साहन निधी पेरणीपूर्वी तात्काळ बँक खात्यात जमा करण्यात यावा.

**खतांचा पुरेसा पुरवठा:** हंगामाच्या तोंडावर युरिया आणि डीएपी खतांचा तुटवडा भासत आहे. कोणतीही सक्ती किंवा लिंक जोडण्याची अट न लावता शेतकऱ्यांना खते उपलब्ध करून द्यावीत. या बैठकीला प्रगती शेतकरी मंडळाचे अध्यक्ष राजूभाऊ वानखडे, जनमंचचे अध्यक्ष प्रा. सुधाकर गौलखेडे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे कैलास साबळे, न्यू यंग क्लबचे मुना नाईक नवरे, अरुण बोंडे, श्रीकृष्ण गुल्हाने, अजबराव वहिले, नंदकिशोर भवानिया, प्रफुल मालदुरे, अनंत शेटे, प्रवीण किरकर, दिगंबर टाले यांच्यासह तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अस्तित्वाच्या लढ्यात सहभागी होण्याचे आवाहन

हा लढा कोणा एकाचा नसून तमाम शेतकरी बांधवांच्या अस्तित्वाचा आहे. आपल्या हक्काचा पीकविमा, कर्जमाफी आणि खतांचा पुरवठा मिळवण्यासाठी २२ जूनच्या अन्नत्याग जनआंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे,'' असे आवाहन करण्यात आले आहे.

इम्पॅक्ट | अकोटमधील अतिक्रमण मोहीम थंडावली!

# पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर मुख्याधिकाऱ्यांचे आदेश; नागरिकांना दिलासा

अजिंक्य भारत । प्रतिनिधी




अजिंक्य भारत इम्पॅक्ट

**अकोट, दि. १६ :** नगर पालिकेच्या वतीने शहरात गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेली अतिक्रमण हटाव मोहीम अखेर तात्पुरती थांबविण्यात आली आहे. पावसाळ्याचे दिवस लक्षात घेता गरिबांना वेठीस धरणारी ही मोहीम तूर्तास थांबवावी, या संदर्भात दैनिक अजिंक्य भारतने १४ जून रोजी सविस्तर वृत्त प्रकाशित करून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. या जनहितार्थ वृत्ताची गंभीर दखल घेत मुख्याधिकारी शशिकांत बाबर यांनी १५ जून रोजी मोहीम तात्पुरती स्थगित करण्याचे लेखी आदेश दिले आहेत.

पावसाळ्याच्या दिवसांत अचानक केलेल्या कारवाईमुळे लहान मुले, वृद्ध आणि महिलांचे उघड्यावर प्रचंड हाल होऊ शकतात, तसेच जप्त केलेले किंवा पाडलेले साहित्य पावसात भिजून गरिबांचे मोठे आर्थिक नुकसान होऊ शकते, अशी रास्त भीती वृत्तातून व्यक्त करण्यात आली होती. यासोबतच पावसाळ्याच्या तोंडावर पालिकेने आपले संपूर्ण मनुष्यबळ आणि यंत्रणा पूर नियंत्रण, आपत्ती व्यवस्थापन, साथीचे आजार रोखणे आणि शहरातील नालेसफाईच्या कामांमध्ये लावणे अधिक गरजेचे आहे, याकडेही लक्ष वेधले गेले होते. मुख्याधिकाऱ्यांच्या या सकारात्मक आदेशानंतर अतिक्रमण पथक प्रमुखांनी शहरातील कारवाई पूर्णपणे थांबवली असून, यामुळे शहरातील छोटे व्यावसायिक, दुकानदार आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. खऱ्या अर्थाने अजिंक्य भारतने जनतेचा आवाज प्रशासनापर्यंत पोहोचविल्यामुळेच पालिकेला ही मोहीम थांबवावी लागली, अशी भावना व्यक्त करत अकोट शहरातील नागरिकांनी वृत्तपत्राचे विशेष आभार मानले आहेत.

❑ शहरात अतिक्रमण हटाव मोहीम अतिशय वेगाने सुरू होती. मात्र, पावसाळा आणि नागरिकांची गैरसोय लक्षात घेता मुख्याधिकारी साहेबांनी दिलेल्या आदेशानुसार १५ जूनपासून ही मोहीम तात्पुरत्या स्वरूपात पूर्णपणे थांबविण्यात आली आहे.

**- विजय भोंडे,** अतिक्रमण पथक प्रमुख, नगर परिषद, अकोट.

### मोठ्या अतिक्रमणांकडे डोळेझाक का? नागरिकांचा सवाल

शहरातील अंजनगाव रोडवरील मच्छी मार्केट आणि दूरध्वनी केंद्रासमोरील एका मोठ्या व्यावसायिक संकुला (कॉम्प्लेक्स) समोरील अतिक्रमणामुळे वाहतूक नेहमीच विस्कळीत होते आणि वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात. पालिकेने केवळ गरिबांच्या टपऱ्या आणि खोक्यांवर तत्परतेने कारवाई केली; मात्र या मोठ्या अनधिकृत बांधकामांकडे पूर्णपणे डोळेझाक केल्याने प्रशासनाच्या पक्षपाती कारभारावर नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

**महत्त्वाचे**

### मोटार पंप चोरीच्या घटनांमध्ये वाढ

**लाखनवाडा :** परिसरात शेतीतील विहिरींवरील मोटार पंप चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. याच पार्श्वभूमीवर लाखनवाडा येथील शेतकरी मनोज राजू बनसोड यांच्या शेतीतील विहिरीवरील मोटार पंप अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, मनोज राजू बनसोड यांच्या शेतीचा गट क्रमांक ३६० असून, तेथील विहिरीमध्ये बसविण्यात आलेला मोटार पंप दि. ८ जून रोजी अज्ञात व्यक्तींनी चोरी करून नेला. या प्रकरणी त्यांनी येथे तक्रार दाखल केली आहे. लाखनवाडा व परिसरातील शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, अलीकडील काळात मोटार पंप चोरीच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढल्या असून त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. वारंवार होणाऱ्या चोरीमुळे शेतकरी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनांची गांभीर्याने दखल घेऊन पोलिस प्रशासनाने रात्रीची गस्त वाढवावी, चोरी करणाऱ्या टोळीचा शोध घेऊन कठोर कारवाई करावी आणि शेतकऱ्यांच्या मालमत्तेचे संरक्षण करावे, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

### अधिक मासानिमित्त गो पूजन


**खामगाव:** स्थानिक गोसेवा, गोरक्षण माहेश्वरी महिला मंडळाच्या वतीने महेश नवमी व अधिक मासानिमित्त घाटपुरी येथील गौरक्षण - संस्थेमध्ये अन्नकुट अमावस्येला गोपुजन करण्यात आले. यावेळी भजन, आरती करून गोमातेला साडी व नैवेद्य अर्पण करण्यात आला. तसेच गोरक्षण संस्था चालक व कर्मचाऱ्यांचा शाल, श्रीफळ, रूमाल व साडी देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंडळाचे अध्यक्ष सौ. ममता पनपालिया, सचिव सौ. कविता टावरी, कोषाध्यक्ष सौ. कल्पना चांडक सह पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले.

### धनादेश अनादर प्रकरणी तीन महिने कारावास

**खामगांव:** स्थानिक खामगाव निधी लि. या संस्थेकडून कृष्णा गोपाल गवळी याने व्यवसायकरिता कर्ज घेतले होते. कर्जाची परतफेड करण्यासाठी त्याने संस्थेला आपल्या बँक ऑफ बडोदामधील खात्याचा रु.७२,००० चा धनादेश १ डिसेंबर २०२० रोजी दिला होता. परंतु खात्यात पुरेशी रक्कम नसल्यामुळे धनादेश अनादरीत झाला. त्यामुळे खामगाव निधी लिमिटेड तर्फे ॲड. जयंत पाटील यांच्या मार्फत कलम १३८ एनआयॲक्ट नुसार नोटीस दिली होती. मात्र कृष्णा गवळी याने नोटीसची पुर्तता केली नाही त्यामुळे संस्थेने विद्यमान न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग कोर्ट नं.३ यांचे न्यायालयात कृष्णा गवळी विरुध्द किरकोळ फौजदारी प्रकरण दाखल केले होते. प्रकरणाच्या सुनावणी दरम्यान न्यायालयाने संस्थेचे प्राधिकृत अधिकारी सिध्दांत देशमुख यांचा साक्ष पुरावा व वकीलांचा युक्तीवाद ग्राह्य धरून कृष्णा गोपाल गवळी याला दोषी ठरवित तीन महिने कारावास व १० हजार रुपये दंडाची शिक्षा था सुनावली आहे. संस्थेतर्फे ॲड. जयंत पाटील यांनी बाजु मांडली,अशी

**निधनवार्ता**

### गजानन टिकार



**खामगांव:** शहरातील प्रतिष्ठित नागरिक तसेच भवानी पेट्रोलियमचे संचालक गजाननराव टिकार (७२) यांचे आज १६ जून २६ रोजी सकाळी ९.४० वा.च्या सुमारास वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, ३ मुले, १ मुलगी व बराच मोठा आप्त परिवार आहे.

# अवैध मद्यविक्री विरोधात धडक मोहीम; ११० गुन्हे, १४.६८ लाखांचा मुद्देमाल जप्त

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि. १६ :** पुणे जिल्ह्यात मिथेनॉलमिश्रित विषारी दारू सेवनामुळे घडलेल्या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाने बुलढाणा जिल्ह्यात अवैध मद्यनिर्मिती, वाहतूक आणि विक्रीविरोधात विशेष मोहीम राबवून मोठी कारवाई केली आहे. २९ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत करण्यात आलेल्या कारवाईत ११० गुन्हे नोंदविण्यात आले असून १०८ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच ९ वाहने जप्त करून एकूण १४ लाख ६८ हजार ४४५ रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या बुलढाणा, देऊळगाव राजा, खामगाव आणि भरारी पथकातील अधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील विविध हातभट्टी केंद्रे आणि अवैध मद्यविक्रीच्या ठिकाणांवर छापे टाकले. भिलवाडा, डोंगरखंडाळा, सुंदरखेड, बोराखेडी, मातला, बोरी आडगाव, देवघाबा, उंबरखेड शिवार, कोलवड, रणथम, जामोद, सुनगाव, गवळीपूरा, शहापूर, मानसगाव, शिरोळा, खामखेड आणि कवठळ आदी भागांत ही कारवाई करण्यात आली.

ही मोहीम डॉ. राजेश देशमुख (आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य), प्रसाद सुर्वे (सह आयुक्त, अंमलबजावणी व दक्षता), डॉ. पराग नवलकर (विभागीय उपआयुक्त, अमरावती विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच चारुदत्त हांडे (अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, बुलढाणा) यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आली.

दरम्यान, जिल्ह्यातील अनुज्ञप्तीधारकांकडून नियमांचे काटेकोर पालन व्हावे यासाठी विशेष सूचना देण्यात आल्या आहेत. विना मद्यसेवन परवाना मद्यविक्री, अल्पवयीनांना मद्य उपलब्ध करून देणे किंवा निर्धारित वेळेपेक्षा आधी अथवा नंतर मद्यविक्री केल्यास संबंधितांवर तात्काळ कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा विभागाने दिला आहे.

राज्य उत्पादन शुल्क विभागाने नागरिकांनाही अवैध मद्यविक्री, हातभट्टी, हॉटेल-धाब्यांमधील बेकायदेशीर मद्यव्यवहार अथवा वाहतुकीबाबत माहिती देण्याचे आवाहन केले आहे. यासाठी टोल फ्री क्रमांक १८००२३३९९९९, व्हॉट्सॲप क्रमांक ८४२२००११३३ तसेच विभागाच्या ऑनलाइन पोर्टलवर तक्रार नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. ''अवैध मद्यविक्री व हातभट्टी निर्मूलनासाठी जिल्ह्यातील कारवाई यापुढेही अधिक तीव्र करण्यात येणार आहेत,'' असे राज्य उत्पादन शुल्क विभागाने स्पष्ट केले आहे.

## तुपकरांच्या बेमुदत अन्नत्याग आंदोलनाला ऑल इंडिया पँथर सेनेचा पाठिंबा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**बुलडाणा दि.१६ :** शेतकऱ्यांच्या सरसकट कर्जमुक्ती, हक्काच्या पीकविमा तसेच विविध प्रलंबित प्रश्नांसाठी शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी सुरू केलेल्या बेमुदत अन्नत्याग आंदोलनाला समाजातील विविध घटकांचा वाढता पाठिंबा मिळत असून, आज ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दीपक केदार यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन या लढ्याला जाहीर पाठिंबा दिला.

आंदोलनस्थळी रविकांत तुपकर यांची भेट घेतल्यानंतर बोलताना दीपक केदार यांनी राज्य सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणांवर जोरदार टीका केली. शेतकऱ्यांच्या सरसकट कर्जमुक्ती, हक्काच्या पीकविमा आणि इतर प्रलंबित प्रश्नांबाबत सरकारची भूमिका ही केवळ आश्वासनांची फसवणूक असल्याचा आरोप त्यांनी केला. निवडणुकीत 'सातबारा कोरा' करण्याचे आश्वासन देऊन सत्तेत आलेल्या सरकारने आज शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडल्याची टीकाही त्यांनी यावेळी केली. रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वाबाबत बोलताना दीपक केदार म्हणाले की, शेतकऱ्यांप्रती असलेली त्यांची तळमळ, संघर्षशील भूमिका आणि न्यायासाठी लढण्याची वृत्ती ही प्रेरणादायी आहे. ''शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी राज्यभर निर्णायक लढा उभारण्याची ताकद रविकांतभाऊंमध्ये आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले पाहिजे,'' असे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले. या आंदोलनाला ऑल इंडिया पँथर सेनेचा पूर्ण पाठिंबा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. हा संघर्ष अधिक व्यापक करण्यासाठी आणि राज्यभरातील शेतकऱ्यांना संघटित करण्यासाठी ऑल इंडिया पँथर सेना सक्रियपणे सहभागी होईल, अशी ग्वाहीदेखील त्यांनी दिली.

## मोरखेड शिवारातील सिंगल फेज वीजपुरवठ्याची वेळ बदलण्याची मागणी; स्वाभिमानीचा आंदोलनाचा इशारा

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**मलकापूर दि.१६:** मौजे मोरखेड शिवारातील शेतकरी व शेतात वास्तव्यास असलेल्या कुटुंबांच्या समस्यांचा विचार करून सध्या रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत दिला जाणारा सिंगल फेज वीजपुरवठा संध्याकाळी ६ ते सकाळी ३ वाजेपर्यंत करण्यात यावा, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

यासंदर्भात महावितरणचे कार्यकारी अभियंता तायडे साहेब यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात शेतकऱ्यांना रात्री उशिरापर्यंत अंधाराचा सामना करावा लागत असल्याने तसेच शेतीसह दैनंदिन कामकाजात अडचणी निर्माण होत असल्याने वीजपुरवठ्याची वेळ बदलण्याची मागणी करण्यात आली. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष निलेश नारखेडे यांनी सांगितले की, मोरखेड शिवारातील शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांकडे महावितरण प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे. अन्यथा स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा १९ जूनला बुलडाण्यात

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**बुलडाणा दि.१६ :** राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर या १९ जून रोजी बुलढाणा येथे येत आहेत. महिला सुरक्षा, महिला अत्याचार प्रकरणे, महिला व बालकल्याणाशी संबंधित योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेणार आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयाने त्याांच्या दौऱ्याची अधिकृत तयारी सुरू केली असून विविध विभागांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.

रहाटकर या १९ जून रोजी सकाळी छत्रपती संभाजीनगर येथून बुलढाण्यात दाखल होणार आहेत. दुपारी १२ वाजता रामजी हॉल येथे भेट देऊन दुपारी २ वाजता जिल्हा प्रशासन आणि पोलिस विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक घेणार आहेत. दुपारी ४ वाजता त्याा जिल्हा कारागृहाला भेट देणार असून तेथील महिला कैद्यांच्या सुविधांची पाहणी करण्याची शक्यता आहे. दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालयाने महिला व बालविकास, समाजकल्याण, पोलिस, आरोग्य तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकाऱ्यांना सज्ज राहण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती आहे. महिला अत्याााचार, बालविवाह, लैंगिक अत्याचार, महिला सक्षमीकरण योजना आणि तक्रार निवारण व्यवस्थेचा आढावा या बैठकीत घेतला जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. महिला सुरक्षेच्या प्रश्नांवर राष्ट्रीय पातळीवरील सर्वोच्च संस्थेच्या अध्यक्षांचा हा दौरा होत असल्याने जिल्ह्यातील प्रलंबित महिला विषयक प्रश्न, संवेदनशील प्रकरणे आणि योजनांच्या अंमलबजावणीबाबत प्रशासनाला उत्तर द्यावे लागणार आहे. त्यामुळे या दौऱ्याकडे जिल्ह्यातील महिला संघटना, सामाजिक कार्यकर्ते आणि प्रशासनाचे विशेष लक्ष लागले आहे.

## पोलिसांची तत्पर कारवाई; चोरीस गेलेली सोन्याची पोत फिर्यादी महिलेला परत

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**शेगाव दि.१६** शेगाव शहर पोलीस स्टेशनने तत्पर कारवाई करत चोरीस गेलेली ४५ हजार रुपये किमतीची सोन्याची पोत फिर्यादी महिलेला परत केली.दिनांक ११ मे २०२६ रोजी फिर्यादी अनुसया सखाराम डुकरे पाटील (वय ७०, रा. सावरगाव, ता. चिखली, जि. बुलढाणा) या परतवाडा संभाजीनगर बसमध्ये चढत असताना त्यांची सोन्याची पोत चोरीस गेली होती.

या प्रकरणी आरोपी सपना उर्फ कीर्ती रोहित गायकवाड (वय २४, रा. भोन, ता. संग्रामपूर) हिच्या ताब्यात सदर सोन्याची पोत आढळून आली. याप्रकरणी शेगाव शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा क्रमांक ३६६/२०२६ कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांनी आरोपी महिलेला अटक केली होती. आज सदर गुन्ह्यातील चोरीस गेलेला मुद्देमाल मा. निमिष मेहेत्रे साहेब यांच्या उपस्थितीत फिर्यादी यांच्या ताब्यात देण्यात आला. यावेळी पोलीस हेड कॉन्स्टेबल शाम आघव, पोलीस हेड कॉन्स्टेबल गजेंद्र रोहणकर, महिला पोलीस कॉन्स्टेबल शितल कपाटे तसेच पोलीस कॉन्स्टेबल नरेश तायडे उपस्थित होते.

## अवैध धंद्याच्या विरोधात शिवसेना तालुकाप्रमुखाचा आंदोलनाचा इशारा

**चिखली दि.१६ :** चिखली शहर आणि तालुक्यात सध्या गांजा, मटका, अवैध दारू आणि जुगारासारख्या अवैध धंद्यांनी अक्षरशः थैमान घातले आहे. या धंद्यांकडे पोलीस प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याने तरुण पिढी व्यसनाधीन होत आहे. या कारभाराचा निषेध करत, येत्या २२ जूनपर्यंत अवैध धंदे बंद न झाल्यास जिल्हाधिकारी किंवा तहसील कार्यालयासमोर उघडपणे अमली पदार्थाची विक्री करून जेल भरो आंदोलन करण्याचा इशारा शिवसेनेचे (विद्यार्थी सेना) चिखली तालुका प्रमुख ओमराजे गायकवाड यांनी दिला आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार, शहरात गुन्हेगारी प्रवृत्ती बोकाळली आहे. स्थानिक पोलिसांच्या हप्तेखोरीमुळे गुन्हेगारांचे धाडस वाढले असून, सर्वसामान्य नागरिक हतबल झाले आहेत. ''पोलीस प्रशासन झोपेचे सोंग घेत आहे का?'' असा संतप्त सवाल करत, या निवेदनातून प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. सोमवार, दि. २२ जून २०२६ पर्यंत संपूर्ण अवैध धंदे आणि जुगार अड्डे पोलिसांनी कायमचे बंद करावेत. मागणी मान्य न झाल्यास, प्रशासनाच्या निष्क्रीयतेचा निषेध म्हणून स्वतः रस्त्याावर उतरून अमली पदार्थांची विक्री करून आंदोलन केले जाईल. या आंदोलनातून निर्माण होणाऱ्या कोणत्याही कायदा-सुव्यवस्थेच्या परिस्थितीला पोलीस आणि जिल्हा प्रशासन पूर्णपणे जबाबदार राहील. हे निवेदन केवळ प्रशासनाला दिलेली विनंती नसून, चिखलीच्या उद्ध्वस्त होणाऱ्या तरुण पिढीसाठी पुकारलेले हे एक थेट आंदोलन असल्याचे ओमराजे गायकवाड यांनी स्पष्ट केले आहे. आता प्रशासन यावर काय ठोस भूमिका घेते, याकडे संपूर्ण चिखलीकरांचे लक्ष लागले आहे.

**अपघात** बचावकार्यात विलंब झाल्याने संताप;पोलिस स्टेशन आवारात जमाव

# विहिरीच्या फार्माखाली दबून मजुराचा मृत्यू

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**खामगाव दि.१६ :** शहरालगतच्या साजनपुरी शिवारात नव्याने बांधण्यात येत असलेल्या स्व. भाऊसाहेब फुंडकर खाजगी बाजार समितीच्या मागील बाजूस सुरू असलेल्या विहिरीच्या बांधकामादरम्यान झालेल्या अपघातात एका मजुराचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून बचावकार्यात झालेल्या विलंबाबाबत मृताच्या नातेवाईकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अटाळी येथील काही मजूर नेहमीप्रमाणे सोमवारी सकाळी विहिरीच्या बांधकामाच्या कामासाठी आले होते. विहिरीत फार्माचे बांधकाम सुरू असताना अचानक फार्मा घसरून खाली कोसळला. यावेळी भगवान दांदडे (वय ३६) हे मजूर फार्माखाली दबले गेले. विहिरीत सुमारे ४० फूट पाणी असल्याने बचावकार्याला मोठा अडथळा निर्माण झाला. सकाळी सुमारे १०.३० वाजता ही घटना घडली. घटनेची माहिती मिळताच बचाव पथक, तहसील प्रशासनाचे कर्मचारी तसेच शिवाजीनगर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. मात्र विहिरीतील पाणी उपसण्याचे काम प्रत्यक्षात दुपारी २ वाजेच्या सुमारास सुरू झाल्याने बचावकार्यात विलंब झाल्याची भावना व्यक्त करण्यात आली. यामुळे मृताच्या कुटुंबीयांनी प्रशासनाविरोधात नाराजी व्यक्त केली. घटनेनंतर परिसरात मोठी गर्दी झाली होती. अपघात नेमका कशामुळे झाला आणि सुरक्षेच्या उपाययोजनांमध्ये काही त्रुटी होत्या का, याबाबत चौकशीची मागणी होत आहे.

**विहीर अतिक्रमित नाल्यात?**

**दरम्यान, संबंधित विहीर नाल्याच्या जागेत खोदण्यात आल्याची चर्चा परिसरात सुरू आहे. खाजगी बाजार समितीच्या बांधकामासाठी पाण्याची व्यवस्था करण्याच्या उद्देशाने ही विहीर खोदण्यात येत असल्याचे सांगितले जात आहे. मात्र संबंधित जागेची मालकी व नाल्याच्या हद्दीबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. यासंदर्भात तलाठी मोरे यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी नाला क्षेत्राबाबत स्पष्ट माहिती देण्याऐवजी संदिग्ध उत्तर दिल्याचे नागरिकांनी सांगितले. त्यामुळे महसूल विभागाने संपूर्ण नोंदी सार्वजनिक करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.**



अजिंक्य भारत

# आपलं खामगांव

बुलडाणा, बुधवार, दि.१७ जून २०२६ www.ajinkyabharat.com



## महत्त्वाचे

### अधिक महात्म्य ग्रंथ पारायणाची सांगता

**मंगरूळ नवघरे :** तालुका चिखली, जिल्हा बुलढाणा येथील मंगरूळ नवघरे गावामध्ये अधिक मासानिमित्त श्री पांडुरंग महाराज संस्थान येथे आयोजित करण्यात आलेल्या अधिक महात्म्य ग्रंथ पारायणाची सांगता सोमवार, दि. १५ जून २०२६ रोजी मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. गेल्या एक महिन्यापासून सुरू असलेल्या या ग्रंथ पारायणात ह.भ.प. श्री गोपाल महाराज गुरव यांच्या अमृतमय व मधुर वाणीतून दररोज ग्रंथ वाचन व निरूपण करण्यात आले. या काळात परिसरातील असंख्य भाविकांनी उपस्थित राहून ग्रंथश्रवणाचा लाभ घेतला. पारायणाच्या समारोप प्रसंगी ३१ व्या कलश अध्यायाचे वाचन करण्यात आले. त्यानंतर महाआरती, हरिनाम संकीर्तन व धार्मिक कार्यक्रम पार पडले. यावेळी हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. या कार्यक्रमात महिला व पुरुष भाविकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारावून गेला असून कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री पांडुरंग महाराज संस्थानचे पदाधिकारी,व महिला मंडळ व भाविकांनी परिश्रम घेतले.

### स्वरूप सोनुनेचे एमएचटी-सीईटी परीक्षेत यश



**सिंदखेड राजा :** राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे (सीईटी सेल) जाहीर झालेल्या एमएचटी सीईट- २०२६ (पीसीएम) परीक्षेच्या निकालात स्थानिक महसूल सहाय्यक श्री. संजय सोनुने यांचे सुपुत्र चिरंजीव स्वरूप संजय सोनुने याने ९७.१६ पर्सेंटाईल (९७.१६ ) गुण प्राप्त करून दैदिप्यमान यश संपादन केले आहे. त्याच्या या उत्तुंग यशामुळे सोनुने कुटुंबासह संपूर्ण परिसरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला. अत्यंत प्रतिष्ठेच्या आणि आव्हानात्मक मानल्या जाणाऱ्या या परीक्षेत स्वरूपने सुरुवातीपासूनच चिकाटी आणि कठोर परिश्रम घेतले होते. वडिलांचे कष्ट आणि स्वतःची अभ्यासातील एकाग्रता यांच्या बळावर त्याने अभ्यासाचे उत्तम नियोजन केले. याच कष्टाचे चीज करत त्याने ९७.१६ पर्सेंटाईल गुणांसह यशाचे शिखर सर केले आणि आपल्या कुटुंबाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. स्वरूपने मिळवलेले हे यश केवळ कौतुकास्पद नसून इतर विद्यार्थ्यांसाठीही अत्यांत प्रेरणादायी आहे. त्याच्या या यशाबद्दल चाणक्य परिवार तसेच परिसरातील मान्यवर, नातेवाईक आणि मित्रपरिवाराकडून त्याचे विशेष कौतुक केले जात आहे, तसेच त्याच्या पुढील उज्ज्वल शैक्षणिक वाटचालीसाठी आणि भविष्यातील स्वप्नांसाठी अनंत शुभेच्छा व आशीर्वाद देण्यात येत आहेत.

### गुळवे यांना आदर्श प्राचार्य पुरस्कार

**मासरूळ :** शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न आणि उत्कृष्ट शैक्षणिक नेतृत्वाबद्दल येथील शिवसाई ज्ञानपीठ व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य प्रा. ए. बी. गुळवे यांना महाराष्ट्र सह्याद्री रत आदर्श प्राचार्य पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार वितरण समारंभ १४ जून रोजी पत्रकार भवन, पुणे येथे पार पडला. अभिनेते सुनील गोडबोले, राष्ट्रपती पुरस्कार व पद्मविभूषण सन्मानप्राप्त तबलावादक डॉ. प्रकाश गायकवाड, अभिनेत्री आर्या घारे, डॉ. नितीन धवणे पाटील, मराठी चित्रपट अभिनेत्री कोमल बोडके यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रा. गुळवे यांनी शैक्षणिक क्षेत्रत केलेले बहुमूल्य योगदान, विद्यार्थ्यांना दिलेले योग्य मार्गदर्शन, शाळेच्या प्रगतीसाठी केलेले प्रयत आणि प्रभावी प्रशासकीय नेतृत्व याची दखल घेऊन त्यांना या पुरस्काराने गौरविण्यात आले.

# पाणी समस्या: नगरपरिषदेवर धडकला जनआक्रोश मोर्चा; अधिकाऱ्यांची तारांबळ

अजिंक्य भारत/ कैलाश काळे



**मलकापूर दि १६ :** गेल्या अनेक वर्षांपासून मलकापूर शहराला भेडसावत असलेल्या तीव्र पाणीटंचाईच्या प्रश्नावर आज नागरिकांच्या संयमाचा बांध फुटला असून ''मलकापूरचे नागरिक'' या नात्याने शहरात भव्य जनआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले. शहरातील नूतन विद्यालयाच्या प्रांगणातून निघालेला हा मोर्चा नगरपरिषद कार्यालयावर धडकला. मोर्चामध्ये सुमारे ६०० ते ७०० नागरिक सहभागी झाले होते. विशेष म्हणजे महिलांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती. नगरपरिषद कार्यालयात झालेल्या सभेमध्ये नगराध्यक्ष अतिकउर रहमान, उपनगराध्यक्ष अनिल गांधी, शिक्षण सभापती भाई अशांत वानखेडे, आरोग्य सभापती राजू पाटील, नगरसेवक ॲड. शाहीद शेख, मुख्याधिकारी संजय केदार यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. मात्र खाली आंदोलन कर्त्यांना उत्तर देण्यासाठी नगराध्यक्ष खाली उतरलेच नाही.

यावेळी नागरिकांनी पाणीपुरवठ्याबाबतच्या विविध समस्या अधिकाऱ्यांसमोर मांडल्या. विशेषतः महिलांनी १४ - १५ दिवसांनी येणारे नळ, साठवलेल्या पाण्यात होणारे जंतू, त्यामुळे उद्भवणाऱ्या आरोग्य समस्या आणि वाढता आर्थिक भार याविषयी अत्यंत भावनिक शब्दांत आपली व्यथा मांडली. ''रोजगार नाही, पाणी नाही, अशा परिस्थितीत आम्ही जगायचे तरी कसे?'' असा थेट सवाल महिलांनी पदाधिकारी व अधिकाऱ्यांना केला. नागरिकांच्या प्रश्नांना उत्तरे देताना पदाधिकारी व अधिकाऱ्यांची चांगलीच तारांबळ उडाल्याचे चित्र पाहायला मिळाले. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नांमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी असल्याचे यावेळी स्पष्टपणे दिसून आले. मोर्चादरम्यान नागरिकांच्या वतीने नगरपरिषद प्रशासनाला निवेदन सादर करण्यात आले. यामध्ये जीर्ण झालेली पाणीपुरवठा व्यवस्था बदलणे, गळती रोखणे, अवैध नळजोडण्या बंद करणे, अमृत योजनेचा निधी उपलब्ध करून घेणे, शहराच्या गरजा पूर्ण होईपर्यंत बाहेरील भागांना वाढीव पाणीपुरवठा न करणे, पाणीपुरवठ्याचे झोननिहाय नियोजन करणे, प्रभागनिहाय पाण्याच्या टाक्या उभारणे, एक्स्प्रेस फिडरची क्षमता वाढविणे, जॅकवेलचे तातडीने देखभाल दुरुस्ती करणे तसेच फिल्टर प्लांटचे सक्षमीकरण करण्यासह एकूण ११ प्रमुख मागण्या करण्यात आल्या. या आंदोलनाचे नेतृत्व सामाजिक कार्यकर्ते ओम शिंदे यांनी केले. शहरातील प्रमुख मार्गांवरून अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने मोर्चा काढण्यात आला. नगरपरिषद कार्यालयात झालेल्या चर्चेनंतर मुख्याधिकारी संजय केदार यांनी पाणी प्रश्नावर तातडीने उपाययोजना करण्यासंदर्भात लेखी आश्वासन देण्याचे मान्य केल्यानंतर आंदोलनकर्त्यांनी आंदोलन स्थगित केले.

# डोणगाव-आरेगाव रस्त्याचे सिमेंटीकरण; राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्याकडे मागणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**डोणगांव दि. १६ :** डोणगाव ते आरेगाव या प्रमुख मार्ग वर मोठ्या प्रमाणावर रहदारी असते. या मार्गावर शाळा आणि धार्मिक स्थळे असल्याने विद्यार्थी, महिला आणि वृद्ध नागरिकांची सातत्याने वर्दळ असते. नागरिकांची हीच गैरसोय दूर करण्यासाठी या रस्त्याचे तातडीने सिमेंटिकरण करण्यात यावे, अशी आग्रही मागणी बुलडाणा जिल्हा भा.रा. काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष शैलेश सावजी यांनी सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री ना. इंद्रनीलजी नाईक यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

राज्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात शैलेश सावजी यांनी म्हटले आहे की, डोणगाव आणि आरेगाव या दोन्ही गावांना जोडणाऱ्या या मार्गावर महत्वाची शैक्षणिक संस्था (शाळा) आणि पवित्र धार्मिक स्थळे आहेत. त्यामुळे दररोज शेकडो शाळकरी मुले आणि अबालवृद्ध या रस्त्यावरून ये-जा करतात. कच्च्या व खराब रस्त्यामुळे येथील नागरिकांना आणि वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अपघात आणि वाहतूक कोंडीची शक्यता लक्षात घेता, हा रस्ता दर्जेदार होणे अत्यंत गरजेचे आहे. वाहतुकीच्या आणि सुरक्षेच्या दृष्टीने सोयीचे व्हावे म्हणून प्रजिमा ११८ वर प्रामुख्याने दोन टप्प्यांत सिमेंट रस्ता बांधून देण्याची मागणी करण्यात आली आहे. यात: कि.मी. २१/५०० ते २१/९०० आणि कि.मी. २६/३०० ते २६/७०० या निश्चित अंतरादरम्यान तात्काळ सिमेंट रस्ता मंजूर करून त्याचे बांधकाम पूर्ण करण्यात यावे, अशी विनंती सावजी यांनी केली आहे. या संदर्भातील निवेदन सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांना सादर करण्यात आले असून, यावर शासन काय सकारात्मक निर्णय घेते, याकडे आता संपूर्ण परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# महिला सायकलपटूंची अस्मिता खेलो इंडिया जिल्हा लीग स्पर्धा संपन्न

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**चिखली दि.१६ :** जिल्हा सायकलींग असोसिएशनच्या वतीने यशस्वीरित्या सायकलिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. सदर आयोजनाबद्दल संघटनेचे जिल्हा सचिव नितीन जेऊघाले सर यांचे कौतुक व अभिनंदन करण्यात आले. जिल्ह्यातील जास्तीत जास्त महिला खेळाडूंनी सायकलिंग या खेळाकडे करिअर म्हणून बघावे, स्पर्धेमुळे महिलांना चांगले प्रोत्साहन मिळाले असे प्रतिपादन आमदार यांचे सहाय्यक सचिव संतोष शिंगणे यांनी केले.

बुलढाणा येथे पोखरी फाटा खामगाव रोड येथे राष्ट्रीय सायकलीग महासंघ, खेलो इंडिया,आणि सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र व बुलढाणा जिल्हा सायकलीग असोशियशन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच मुक्ताई कॉन्व्हेंट सुंदरखेड बुलढाणा, ग्रामीण पोलीस स्टेशन बुलढाणा, मा जिजाऊ अर्बन यांच्या सहकार्याने अस्मिता खेलो इंडिया वुमन्स जिल्हा सायकलींग लींग स्पर्धा दि.१३ जुन ला संपन्न झाली. स्पर्धेचे उद्घाटन बुलढाणा तहसीलचे नायब तहसीलदार सुनील आहीरे साहेब यांच्या हस्ते तर प्रमुख उपस्थितीमध्ये माननीय आमदार संजय भाऊ गायकवाड यांचे खाजगीस्वीय सहायक संतोष शिंगणे, उज्वला लांडगे मॅडम राज्य क्रीडा मार्गदर्शक, माजी मुख्याध्यापक प्रभाकर जाधव, मुक्ताई कॉन्व्हेंटचे सचिव राम गावंडे तथा संचालक संजय साखरे, जिल्हा रोलबॉल सचिव माधव मंडळकर , क्रीडा शिक्षक दिलीप लाडकर, गणेश सावळे सर, जीवन जाधव सर, आकाश बनसोड सर ( कोच), सुरज पवार सायकलिस्ट उपस्थित होते आहीरे साहेब यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून स्पर्धेची सुरुवात करण्यात आली. या स्पर्धेमध्ये विविध वयोगटा नुसार जवळपास ७० महिला खेळाडूंनी अस्मिता खेलो इंडियाच्या स्पर्धेत सहभाग घेतला. वयोगट १० ते १२ प्रथम स्वरा सुरज पवार, द्वितीय सोमश्री जयेश पाटील, तृतीय स्वरा नितीन इंगळे, वयोगट १४ मध्ये वर्ष प्रथम रक्षमा राहुल राऊत, द्वितीय भक्ती संदीप तायडे, तुत्तीय प्रांजल कवी जाधव. वयगोट १७ मध्ये प्रथम प्रगती प्रमोद राऊत, द्वितीय श्रावणी रमेश बावस्कर, तृतीय दिलीप चव्हाण. वयोगट १९ मध्ये प्रथम मृणाल संजय पेडोलसे, द्वितीय अपूर्वा कैलास लहासे, तृतीय आर्या अनिरुध्द गायकवाड. खुलागट प्रथम अस्मिता गजानन सोनुने, द्वितीय जानवी भगवान गाडे, तृतीय दामिनी विक्रमसिंग पवार या खेळाडूंना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

# चिखलीचे नामकरण रेणुका नगर करा: युवा सेनेची मागणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**चिखली दि.१६ :** शहराचे नाव हे रेणुकानगर करण्यात यावे, अशी आग्रही मागणी युवा सेना जिल्हाप्रमुख नंदू कऱ्हाडे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. शहरातून मिरवणूक काढून रेणूका मातेला पातळ अर्पण करण्यात आले.

रेणुका मातेच्या चरणी पातळ अर्पण केल्यानंतर मिरवणूक चिखली नगरपालिकेकडे प्रस्थान करती झाली. उपाध्यक्ष वैशाली कपिल खेडेकर यांना निवेदन देण्यात आले. महाराष्ट्रात चिखली शहराची ओळख ही रेणुका नगर म्हणून असून चिखलीचे ग्रामदैवत असलेली रेणुकामाता ही लाखो भाविकांचे श्रद्धास्थान आहे. अनेक भाविक चैत्र पौर्णिमेला वहन मिरवणुकीत सहभागी होऊन आपले नवस पूर्ण करतात. नवसाला पावणारी ही रेणुका माता म्हणून जिल्ह्यातील एक श्रद्धेचे स्थान बनले आहे. विशेष म्हणजे सर्वधर्मीय नागरिकांचा या वहन मिरवणुकीमध्ये समावेश असतो. निवेदन स्वीकारताना न.प. उपाध्यक्ष वैशाली खेडेकर यांनी यासंदर्भात तात्काळ ठराव घेऊन शासनाकडे मागणी करू व मागणीचा पाठपुरावा देखील करण्याचे आश्वासन उपस्थितांना दिले. यावेळी शिवसेना शहरप्रमुख श्रीराम झोरे, उपजिल्हाप्रमुख विलास सुरडकर, तालुकाप्रमुख किसन धोंडगे, युवा सेना शहरप्रमुख आनंद गैची, शिवाजी पवार, लालसिंग मोरे, नारायण वाणी, अशोक राजपूत, अण्णा देवकर, बंडू सरसे, किशोर डहाळे, वसंता अंभोरे, अशोक मोहिते, समाधान जाधव, संतोष देशमुख, छगन वानखेडे, शुभम वानखेडे, बंडू गार्डे, निवृत्ती घुबे, गजानन साखरे, गणेश कुडके, साजित, अरुण अंबासकर, रामराव अंभोरे, गजानन कुटे, अंकुश डहाके, भास्कर शेजोळ, विठ्ठल घुबे, लक्ष्मण इंगळे, कैलास इंगळे, दीपक जाधव, राजेश लोखंडे, संतोष देशमुख, सचिन जोशी, दीपक सोलाट, शेख सोहेल, राहुल वरवंदे, राजू कारले, पवन काळे, विशाल वानखेडे, विजय जाधव, प्रकाश काळे, विशाल ठेंग, आकाश नेवरे, कैलास गायकवाड, उमेश झोरे, समाधान गायकवाड आदी उपस्थित होते.

# दलित वस्तीत अवेळी व दूषित पाणी पुरवठयाबाबत एसडीओंना निवेदन

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**नांदुरा दि.१६:** तालुक्यातील शिरसोडी येथे दलित वस्तीत अवेळी व दूषित पाणी पुरवठा होत असुन त्याबाबत ग्रामस्थांनी उपविभागीय अधिकारी, नांदुरा यांना दिनांक १५ जून रोजी लेखी निवेदन दिले. मागील दोन महिन्यापासून नळगंगा धरणाचे पाणी काटी येथील टाकीत येते.त्यानंतर काटी, शिरसोडी विटाळी व धानोरा या गावांना तेथून पाणी पुरवठा करण्यात येतो. परतु शिरसोडी येथील दलित वस्तीत सोडण्यात येणारे पाणी दूषित तसेच त्यामध्ये पक्षांचे पंख, गाळ व पाण्याची दुर्गंधी येते.त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून साथीचे रोग पसरण्याची दाट शक्यता आहे. त्यावर प्रशासनाने त्वरित कारवाई करून नियमित व शुद्ध पाणी द्यावे अशी मागणी या निवेदनात केली आहे.

या निवेदनाची दखल न घेतल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल असा इशाराही ह्या लेखी निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. ह्या निवेदनावर विलास वानखडे, सुभाष वानखडे ,देवानंद वानखडे, सुनील वानखडे, एकनाथ वानखडे ,राष्ट्रपाल खराटे, गजानन वानखडे, हर्षवर्धन सरदार ,बाळू वानखडे, संतोष वानखडे ,दीपक वानखडे, संतोष गवई, अशांत वानखडे, गौरव वानखडे, पंकज वानखडे यांच्यासह ९२ ग्रामस्थांच्या सह्या आहेत. यावेळी अजय सावळे -मलकपूर, वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष अनिल धुंदळे, मिलिंद जाधव, गजानन वाघ, संघपाल नरवाडे इत्यादी उपस्थित होते.

# चौरासिया कन्स्ट्रक्शनवर कारवाईची मागणी: कार्यकारी अभियंत्यांची नोटीस

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**साखरखेर्डा दि.१६ :** साखरखेर्डा विकासाच्या नावाखाली राष्ट्रीय महामार्गावर कोट्यवधी रुपयांचा खर्च करत असताना, रस्त्यावर राबणाऱ्या गरीब मजुरांचा जीव मात्र सट्ट्यावर लावण्यात येत आहे. राहेरी पूल (खडकपूर्णा नदी पूल) परिसरातील देखभाल दुरुस्ती कामात मजुरांना हेल्मेट, जॅकेट, सेफ्टी बूट किंवा परावर्तित पट्टे न देता खुल्या डोक्याने वाहतुकीच्या धोक्यात ढकलण्यात येत असल्याची धक्कादायक बाब समोर आली होती. सर्वात भयावह म्हणजे, ट्रॅफिक कोनच्या जागी बिअरच्या बाटल्या रस्त्यावर मांडण्यात आल्या होत्या!या भयावह प्रकाराची बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर राष्ट्रीय महामार्ग विभाग, अमरावती यांच्या कार्यकारी अभियंत्यांनी तातडीने प्रतिक्रिया देत चौरासिया कन्स्ट्रक्शन कंपनीला कडक नोटीस बजावली आहे.

नोटीसमधील मुख्य मुद्दे (दिनांक १६/०६/२०२६):कामाच्या ठिकाणी दर्जेदार सुरक्षा साहित्य न वापरणे व कोणतीही सुरक्षा उपाययोजना नसल्याबाबत गंभीर तक्रार स्थानिक रस्ते वापरकर्ते व नागरिकांकडून प्राप्त झालेल्या तक्रारी.कंपनीने सार्वजनिक सुरक्षितता राखणे, वाहतुकीची सुरक्षित व्यवस्था करणे आणि उच्च दर्जाचे सुरक्षा साहित्य वापरणे ही त्यांची पूर्ण व अपरिहार्य जबाबदारी असल्याचे स्पष्ट करत, कंपनीला कडक शब्दांत खडसावले आहे.२४ तासांच्या आत लिखित स्पष्टीकरण सादर करण्याचे आदेश.सुरक्षा उपाययोजना न केल्यास काम बंद करण्याची तसेच आर्थिक दंड व कायद्याप्रमाणे कारवाईची स्पष्ट चेतावणी.नोटीसमध्ये स्पष्टपणे नमूद आहे की, कंपनीच्या या निष्काळजीपणामुळे मानवी जीविताला धोका निर्माण होत आहे आणि याची जबाबदारी पूर्णपणे ठेकेदाराची आहे.सामाजिक कार्यकर्ते दीपक कायंदे यांचे मत:एका अपघातानंतर चौकशी, निलंबन आणि श्रद्धांजलीचे नाटक केले जाते. पण अपघात टाळण्यासाठी काहीच का केले जात नाही? आज नोटीस आली, पण यापुढे प्रत्याक्षात काय कारवाई होते, हे पाहणे महत्त्वाचे आहे. मजुरांच्या जीवाशी होणारा हा खेळ थांबवला पाहिजे.''ही केवळ एका पुलाजवळची घटना नाही, तर सार्वजनिक बांधकाम विभागातील यंत्रणेच्या निष्काळजीपणाची, भ्रष्टाचाराची आणि कंत्राटदारांच्या मनमानीची जिवंत उदाहरणे आहेत. नियम कागदावरच राहिले तर विकास कसला? गरिब मजुरांचा जीव इतका स्वस्त का?मागणी:सार्वजनिक बांधकाम विभाग, कामगार कल्याण विभाग आणि मानवी हक्क आयोगाने तातडीने स्थळ पाहणी करावी.दोषी ठेकेदार, पर्यवेक्षक आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी.भविष्यात अशा प्रकारचे प्रकार पुन्हा घडू नयेत यासाठी कडक धोरण आखावे.कामगार सुरक्षा हे केवळ नियम नव्हे, तर मानवी हक्क आहे. नोटीस आली आहे, आता प्रत्याक्षात काम बंद, दंड आणि जबाबदारी निश्चित करणे गरजेचे आहे. अन्यथा, उद्या कोणत्या मजुराच्या कुटुंबावर आपत्ती कोसळेल याची जबाबदारी कोण घेणार?

**राजकारण** मेहकरवर मेहेरबानी, मग लोणारला सावत्र वागणूक का?

# लोणार विकास समितीवर आ.खरात यांची अखेर नियुक्ती

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**लोणार दि. १६ :** जागतिक कीर्ती लाभलेल्या लोणार सरोवर विकास समितीवर अखेर मेहकर-लोणार मतदारसंघाचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार सिद्धार्थ खरात यांची अधिकृत नियुक्ती करण्यात आली आहे. आमदारांच्या समर्थकांकडून या नियुक्तीचे सोशल मीडियावर जोरदार स्वागत केले जात असले, तरी लोणार तालुक्यातील सामान्य जनतेमध्ये मात्र यावरून तीव्र संभ्रम आणि आक्रमक नाराजीचा सूर उमटत आहे. 'आमदार साहेब, आता तरी लोणारकडे मेहकरसारखे लक्ष देणार की येथील परिस्थिती आहे तशीच वाऱ्यावर सोडणार?' असा थेट आणि रोकडा सवाल आता सामान्य लोणारकरांमधून उपस्थित केला जात आहे.

राजकीय वर्तुळात आणि जनतेत सध्या एकच चर्चा सुरू आहे की, आमदार सिद्धार्थ खरात यांचे संपूर्ण प्रेम फक्त मेहकर शहरावरच राहिले आहे. मेहकरच्या बस डेपोचे आधुनिकीकरण असो, कोट्यवधींचे अंतर्गत रस्ते असोत की इतर नागरी सुविधा, आमदारांनी तिथे निधीचा पाऊस पाडला मात्र, त्या तुलनेत जागतिक पर्यटनाचा दर्जा आणि युनेस्को मानांकनासाठी प्रस्तावित असलेल्या लोणार शहराला नेहमीच दुय्यम स्थान मिळाले. आमदारांचे सर्व लक्ष मेहकरवर केंद्रित असल्याने लोणारचा विकास गेल्या अनेक महिन्यांपासून संथ गतीने आणि ढिम्म प्रशासकीय कारभारात अडकला गेल्याचा थेट आरोप नागरिक करत आहेत.

लोणार सरोवराच्या पाण्याच्या पातळीत अलीकडे कमालीची वाढ झाली आहे. या वाढत्या जलपातळीमुळे सरोवराच्या काठावरील अनेक प्राचीन आणि ऐतिहासिक मंदिरे पाण्याखाली गेली आहेत, ज्याकडे आमदार खरात यांनी स्वतः विधिमंडळात लक्ष वेधले होते .याशिवाय, शहरातील ठप्प पडलेली १०६ कोटींची भूमिगत गटार योजना, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प आणि पर्यटनाची झालेली कमालीची दुरवस्था यांमुळे स्थानिक व्यावसायिक आणि नागरिक प्रचंड त्रस्त आहेत. यापूर्वीही केवळ बैठकांचा फार्स आणि आश्वासनांची खैरात झाली, मात्र प्रत्यक्षात जमिनीवर कोणतेही मोठे काम दिसले नाही. शासनाने लोणारच्या पुनरुज्जीवनासाठी आणि पर्यटनासाठी ४३४.६२ कोटी रुपयांच्या सुधारित जतन व विकास आराखड्याला प्रशासकीय मंजुरी दिली आहे, ज्याचा ॲक्शन टेकन रिपोर्ट थेट मुख्यमंत्री कार्यालयाने मागवला आहे .आजवर लोकप्रतिनिधींच्या उदासीनतेमुळे आणि शासकीय विभागांमधील समन्वयाच्या अभावामुळे हा निधी योग्य ठिकाणी खर्च होऊ शकला नाही. आता आमदार खरात स्वतः या उच्चस्तरीय विकास समितीवर अधिकृत सदस्य म्हणून नियुक्त झाले आहेत. त्यामुळे आता त्यांना प्रशासनाकडे बोट दाखवून कोणतीही सबब सांगता येणार नाही.

आमदार सिद्धार्थ खरात यांनी केवळ बैठका घेऊन कागदी घोडे न नाचवता, मेहकर सारखाच कामाचा धडाका आता लोणारमध्येही दाखवावा. सरोवराचे संवर्धन, ऐतिहासिक मंदिरांचे जतन आणि पर्यटकांसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा निर्माण करण्याचे प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावावेत, असे खुले आव्हान लोणारकरांनी दिले आहे. आमदारांची ही नियुक्ती लोणारच्या विकासाला खरोखरच नवी दिशा देणार की हा केवळ एक राजकीय स्टंट ठरणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# महाराणा प्रताप चौकाचे सौंदर्यीकरण तात्काळ सुरू करण्याची मागणी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**शेगांव दि १६ :** शहरातील खामगाव रोडवरील नगर परिषद हद्दीतील मध्यवर्ती महावितरण कार्यालयाजवळील हिंदूसूर्य महाराणा प्रताप चौकाचे सौंदर्यीकरणाचे काम गेल्या अनेक महिन्यांपासून रखडले असून प्रशासनाच्या दुर्लक्षाविरोधात सामाजिक कार्यकर्ते अमोलसिंह राजपूत व शहर-तालुक्यातील नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.या संदर्भात कर्तव्यदक्ष आमदार तथा माजी कामगार मंत्री डॉ. संजयभाऊ श्रीराम कुटे यांच्या माध्यमातून १५ जून २०२६ रोजी नगर परिषद मुख्याधिकारी यांना स्मरणपत्र सादर करण्यात आले.

स्मरणपत्रात नमूद करण्यात आले आहे की, नगर परिषदेच्या सर्वसाधारण सभेतील दि. १२ ऑक्टोबर २०१८ च्या ठराव क्र. २० नुसार महाराणा प्रताप चौकाच्या सौंदर्यीकरणाचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला होता. तसेच दि. ३ नोव्हेंबर २०२५ रोजी नगर परिषद प्रशासनाने जागा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाधिकारी बुलढाणा यांच्याकडे प्रस्ताव सादर केला होता. यानंतर संतनगरी शेगाव तीर्थक्षेत्र विकास आराखड्यांतर्गत चौकाच्या सौंदर्यीकरण विकास कामाचे भूमिपूजनही करण्यात आले. मात्र, प्रत्यक्ष कामाला अद्याप सुरुवात झालेली नाही. याबाबत अनेक वेळा प्रशासनाकडे निवेदने, तक्रारी व स्मरणपत्रे देण्यात आली. तसेच आमदार डॉ. कुटे यांनी क्रांतीज्योत महात्मा फुले नगर परिषद सभागृहातील आढावा बैठकीत पाच दिवसांत काम सुरू करण्याचे आदेश व आश्वासन दिले होते. तरीही चौकाचे काम अद्याप रखडलेलेच असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. प्रशासनाने दोन दिवसांत काम सुरू न केल्यास दि. १७ जून २०२६ रोजी महाराणा प्रताप जयंतीदिनी चौकात प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांच्या दालनात लोकशाही मार्गाने जनआंदोलन करण्यात येईल, असा इशारा स्मरणपत्रातून देण्यात आला आहे. सदर स्मरणपत्राच्या प्रती शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक तसेच आमदार डॉ. कुटे यांचे स्वीय सहाय्यक प्रकाशजी राऊत यांनाही माहितीसाठी देण्यात आल्या आहेत.

अजिंक्य भारत
# आपलं अमरावती
अमरावती, बुधवार १७ जून २०२६ www.ajinkyabharat.com

## थोडक्यात

### दारू विक्रेत्यांवर पोलिसांची कारवाई

अमरावती : वलगाव पोलिसांनी पुसदा येथे अवैध देशी दारूच्या होणाऱ्या वाहतुकीवर कारवाई केली. दरम्यान दोन चारचाकी वाहनांसह एकूण १ लाख ४५ हजार ६०० रुपयांची देशी दारू जप्त केली, तर तिघांवर गुन्हा नोंदवला. सिद्धार्थ गजानन मगर (१९), विरेंद्र रमेश शिरसाट (३९) व अतुल रामकृष्ण हरडे (४५) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. पुढील तपास पुलिस करीत आहे.

### अपघातातील जखमीचा उपचारादरम्यान मृत्यू

अमरावती : बोलेरो पिकअप वाहनाने जात असताना ९ जून रोजी ते वलगाव फाट्याजवळ पलटी झाले. त्यातील एकाला गंभीर दुखापत झाली. मात्र १३ जून रोजी उपचारादरम्यान त्यांचा जिल्हा सामान्य रुग्णालयात मृत्यू झाला. या प्रकरणी वलगाव पोलिसांनी मर्ग दाखल केला. पुढील तपास पुलिस करीत आहे.

### मुलाची व सुनेची सासुला मारहाण

अमरावती : पती पत्नीत वाद होत असल्याने सून नेहमीच माहेरी जाते. दरम्यान ती परत आली असता, सासूने याबाबत तिला हटकले. त्याचा राग आल्याने मुलाने आईला तिच्याच घरातून निघून जाण्यास सांगीतले, तर सुनेने केस ओढत लोटालोट केले. ही घटना अशोक नगर, नवी वस्ती बडनेरा येथे घडली.

### महिलेची लाखो रूपयांनी फसवणूक

अमरावती : ब्युटी पार्लरचा व्यवसाय करणाऱ्या एका महिलेची अज्ञात फोनधारक महिलेने १ लाख ११ हजार ११७ रुपयांनी ऑनलाइन फसवणूक केली. ही घटना व्हीएमव्ही मार्गावरील रेखा कॉलनी येथे घडली. तिच्या दोन वेगवेगळ्या खात्यातून अज्ञात फोनधारक महिलेने ही रक्कम परस्पर वळती केली. महिलेच्या तक्रारीवरून गाडगे नगर पोलिसांनी ऑनलाइन आर्थिक फसवणुकीचा गुन्हा नोंद केला.

### जुन्या वादातून युवकावर हल्ला

अमरावती : दोन दिवसांपूर्वी एका अज्ञातासोबत श्रीकांत सुभाष जगदळे (४५, रा. देशपांडे वाडी) याचा वाद झाला. त्याच वादातून अज्ञाताने जगदळे यांच्यावर धारदार शस्त्राने जीवे मारण्याच्या उद्देशाने वार करीत जखमी केले. ही घटना हिंदू स्मशानभूमीसमोरील गार्डनजवळ घडली. दरम्यान सागर पुंडलिक लांडगे (३६, रा. देशपांडे वाडी) यांच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### गणोजा देवी येथे युवकाला मारहाण

अमरावती : घराकडे बघून गावातीलच एकजण बडबड करीत होता. त्यामुळे युवकाने त्याला हटकले. त्याचा राग आल्याने त्याने जवळच पडलेल्या लाकडी फळीने युवकाला मारहाण करीत जखमी केले. ही घटना गणोजा देवी येथे घडली. जखमी सुनील रामकृष्ण कुरवाडे यांच्या तक्रारीवरून भातकुली पोलिसांनी उमेश पारीसे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### ओळखीच्या व्यक्तीकडून अल्पवयीनचा विनयभंग

चांदूर रेल्वे : परिचिताने खेळणाऱ्या मुलीला टिनपत्र्याच्या झोपडीत बोलावले. तेथे तिच्यासोबत असभ्य वर्तन करीत विनयभंग केला. ही बाब तिच्या एका नातेवाईकाच्या लक्षात आली. त्यांनी मुलीकडे विचारणा केली असता, तिने घडलेली बाब सांगीतली.

# आंतरजातीय विवाह योजनेच्या लाभार्थ्यांकरिता हवेत तीन कोटी

## दोन वर्षापासून ४२८ लाभार्थी ५० हजाराच्या प्रतिक्षेत

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.१६ :** राज्य शासनाच्या वतीने एकीकडे ठिकठिकाणी शासकीय कार्यालयीन कामाकरिता जातीचे दाखले मागितले जातात तर दूसरीकडे आंतरजातीय विवाह करुन जात नष्ट करण्यासाठी योजनेत अनुदानही दिल्या जाते. राज्य शासनाच्या वतीने आंतरजातीय विवाह करणाीया जोडप्यास शासनाकडून ५० हजार रुपयांचे अनुदान दिले जाते, परंतु जिल्ह्यातील शेकडो जोडप्यांना नोंदणी करुनही दोन वर्षापासून अनुदान मिळालेले नाही. जिल्ह्यात सन २०२२-२३ पर्यंत अर्ज केलेल्या लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळाला आहे, मात्र त्यानंतर अर्ज करणारे लाभार्थी आजही लाभ न मिळाल्याने वारंवार जिल्हा परिषदेमधील समाज कल्याण विभागाच्या चकरा मारत आहेत. ४२८ लाभार्थी या योजनेमध्ये मिळणाीया ५० हजार रुपये अनुदानाच्या प्रतिक्षेत आहे.



राज्याच्या सामाजिक न्याय विभागामार्फत १९५८ पासून आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्य केले जाते. यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, बौध्द विशेष मागासप्रवर्ग यापैकी एकाही व्यक्तीने सुवर्ण हिंदु लिंगायत, जैन व शीख या व्यक्तीशी विवाह केल्यास अथवा दोन वेगवेगळ्या प्रवर्गातील जोडप्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहन अनुदान दिले जाते. योजनेच्या लाभासाठी अर्ज केलेले ४२८ जोडप्यांना या योजनेतील अनुदान मिळालेले नाही. अनुदानाकरिता संबंधित जोडपे रोज कार्यालयाच्या चकरा मारत आहेत. सन २०२३-२४ मध्ये या योजनेकरिता ५३५ लाभार्थ्यांनी अर्ज केले होते त्यापैकी २७८ लाभार्थ्यांना अद्यापही अनुदान मिळालेले नाही.

> यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, बौध्द विशेष मागासप्रवर्ग यापैकी एकाही व्यक्तीने सवर्ण हिंदु लिंगायत, जैन व शीख या व्यक्तीशी विवाह केल्यास अथवा दोन वेगवेगळ्या प्रवर्गातील जोडप्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहन अनुदान दिले जाते.

सन २०२४-२५ मध्ये १५० लाभार्थी अनुदानापासून वंचित आहे. समाजकल्याण विभागाच्या वतीने या वर्षाकरिता ३ कोटी रुपयाची निधी अपेक्षित असल्याची मागणी शासनाकडे करण्यात आलेली आहे.

पत्नी-प्रियकराचा थरारक कट!

# प्रियकराच्या मदतीने पत्नीनेच पतीला संपविले



अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.१६ :** पाण्याच्या टाकीत कुजलेल्या अवस्थेत आढळलेल्या एका अनोळखी मृतदेहाच्या हत्येचा थरारक खुलासा पोलिसांनी केला असून, या प्रकरणात धक्कादायक माहिती समोर आली आहे. मृत व्यक्तीची ओळख अब्दुल रियाज अब्दुल अनीस (वय ३९, रा. अलीम नगर) अशी पटली होती. आता त्याच्याच पत्नीने आपल्या प्रियकराच्या मदतीने ही निर्घृण हत्या केल्याचे उघड झाले आहे. याप्रकरणी गुन्हे शाखेने मंगळवारी सकाळी मृत रियाजची पत्नी आणि तिचा प्रियकर मोहम्मद इक्राम उर्फ बाबू या दोघांना अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रियाजचा काटा काढण्यासाठी पत्नी आणि तिच्या प्रियकराने पूर्ण नियोजन केले होते. संपूर्ण परिसराची रात्रीच्या वेळी रेकी करण्यात आली होती. तसेच मृतदेह कुठे लपवायचा, याची जागाही आधीच निश्चित झाली होती. सुरुवातीला एका बंद पडलेल्या रुग्णालयात रात्रीच्या वेळी काही लोकांची वर्दळ असल्याने दोन दिवस हा प्लॅन कॅन्सल करावा लागला. अखेर २८ एप्रिलच्या रात्री १.३० वाजताच्या सुमारास त्यांना संधी मिळाली. घराच्या जवळच रियाजवर लाठीने जोरदार हल्ला करून त्याला मृत्यूच्या घाटात उतरवण्यात आले.

### असा लपविला मृतदेह

हत्या केल्यानंतर पुरावा नष्ट करण्यासाठी आरोपींनी रियाजचा मृतदेह एका पोत्यात भरला. त्यानंतर तो मृतदेह जवळच असलेल्या एका बंद पडलेल्या रुग्णालयाच्या छतावर नेण्यात आला आणि तिथल्या पाण्याच्या टाकीत फेकून देण्यात आला.१३ मे रोजी पाण्याच्या टाकीतून प्रचंड दुर्गंधी सुटल्याने हा सर्व प्रकार उघडकीस आला. मात्र, मृतदेह पूर्णपणे सडल्यामुळे त्याची ओळख पटवणे पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. पोलिसांनी बेपत्ता लोकांचे रेकॉर्ड तपासले. अखेर डीएनए चाचणीच्या अहवालानंतर तो मृतदेह अब्दुल रियाजचाच असल्याचे निष्पन्न झाले. मृतदेहाची ओळख पटताच गुन्हे शाखेने तपासाची चक्रे फिरवली आणि अवघ्या काही तासांतच हत्येचे गूढ उकलून रियाजची पत्नी आणि तिच्या प्रियकराला बेड्या ठोकल्या. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

# भातकुली-गणोजा देवी रस्ता प्रकरणात उच्च न्यायालयाचा दणका

## थकीत बिलांवर राज्य सरकारला फटकार

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.१६ :** भातकुली ते गणोजा देवी रस्ता विकास कामासाठी सुमारे तीन कोटी रुपये खर्च होऊनही ठेकेदाराला केवळ २० लाख रुपयांचे बिल अदा करण्यात आल्याच्या प्रकरणाची मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने गंभीर दखल घेत राज्य सरकारला खडे बोल सुनावले आहेत. तसेच या प्रकरणी १७ जूनपर्यंत लेखी स्पष्टीकरण सादर करण्याचे आदेश सरकारला देण्यात आले आहेत.

भातकुली ते गणोजा देवी या सुमारे आठ किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे बांधकाम ब्ल्यू सॉर्ट या ठेकेदारामार्फत सुरू असून, काम अंतिम टप्प्यात पोहोचले आहे. मात्र प्रशासनाकडून अत्यल्प निधी वितरित झाल्याने ठेकेदार आर्थिक अडचणीत सापडला असून,

निधीअभावी प्रकल्प

रखडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या संदर्भात उच्च



न्यायालय बार असोसिएशनचे माजी सचिव तथा अधिवक्ता अमोल जलतारे यांनी याचिका दाखल केली होती. यावर न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती राजेश पाटील वाकोडे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. याचिकाकर्त्यांच्या वतीने अधिवक्ता देवव्रत वांदे यांनी बाजू मांडली. सुनावणीदरम्यान न्यायालयाने राज्य सरकारला, रस्त्याचे बहुतांश काम पूर्ण झाले असताना ठेकेदाराची बिले प्रलंबित का ठेवण्यात आली ? असा थेट प्रश्न उपस्थित केला. सार्वजनिक हिताच्या विकास कामांमध्ये होणारा अनावश्यक विलंब हा विकास प्रक्रियेला अडथळा ठरत असून त्याचा फटका सामान्य नागरिकांना बसत असल्याचे निरीक्षणही न्यायालयाने नोंदवले. भाविकांच्या सोयीशी गणोजा देवी मंदिर हे विदर्भातील प्रमुख धार्मिक आणि ऐतिहासिक स्थळांपैकी एक असून येथे दररोज हजारो भाविक दर्शनासाठी येतात. दीर्घकाळापासून खराब अवस्थेत असलेल्या भातकुली-गणोजा देवी मार्गाच्या विकासाला भाविकांच्या सोयीसाठी प्राधान्य देण्यात आले होते. मात्र थकीत बिलांमुळे कामाच्या गतीवर परिणाम होत असल्याने भाविक व स्थानिक नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. तातडीने निधी देण्याची मागणी रस्त्याचे काम लवकर पूर्ण करून भाविकांना सुरक्षित आणि सुलभप्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ठेकेदाराची प्रलंबित बिले तातडीने मंजूर करण्यात यावीत, अशी मागणी स्थानिक नागरिक व भाविकांकडून होत आहे.

### अनैतिक संबंधाच्या संशयातून मारहाण

**वरुड, दि.१६ :** युवकाचे महिलेसोबत अनैतिक संबंध आहेत या संशयातून तिघांनी त्याला जबर मारहाण केली. ही घटना रोशनखेडा येथे घडली. जखमी प्रणव दिलीपराव बडोदेकर (२८) याने वरुड पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी दिगांबर वासुदेवराव नेवारे (४२), वासुदेवराव नेवारे (६२) व अन्य एक तिघेही रा. सुरळी यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला. मारहाणीची दुसरी घटना रजनीकुंड येथे घडली. शेण का उचलत आहे या कारणावरून दोघांनी महिलेला मारहाण करीत शिवीगाळ केली. तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. महिलेच्या तक्रारीवरून चिखलदरा पोलिसांनी गुन्हा नोंद केला.

# महागाई विरोधात भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे आंदोलन

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अमरावती, दि.१६ :** गॅस, पेट्रोल ,डिझेल तसेच जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किंमती विरोधात भारतीय कम्युनिस्ट पक्षाने आज जिल्हाधिकारी कार्यालयावर तीव्र आंदोलन केले. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये महागाई विरोधात आंदोलनाचे आवाहन करण्यात आले होते. आंदोलनानंतर मा.प्रधानमंत्री, भारत सरकार व मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांच्या नावे निवेदन सादर करण्यात आले. ते जिल्हाधिकारी अमरावती यांनी स्वीकारले.




यावेळी बोलताना पक्षाच्या नेत्यांनी सांगितले की ,केंद्र व राज्य शासनाच्या चुकीच्या आर्थिक धोरणामुळे महागाई सातत्याने वाढत असून सर्वसामान्य जनता शेतकरी ,शेतमजूर, असंघटित कामगार, महिला, युवक व ज्येष्ठ नागरिक यांचे जीवन संकटात सापडले आहे. पेट्रोल व डिझेलच्या दरवाढीमध्ये वाहतूक खर्च वाढवून सर्वच वस्तू महाग झाल्या आहेत. त्यामुळे जनतेच्या दैनंदिन खर्चात मोठी वाढ झाली आहे. इंधन टंचाईच्या काळात सुद्धा तेल उद्योगातील उद्योगपती अरबो रुपयाचा नफा कमवित आहेत. युद्धजन्य परिस्थितीचे चुकीचे आकलन व अमेरिकेपुढे नरेंद्र मोदींच्या नेतृत्वातील भाजप सरकारने लोटांगण घातल्यामुळे सर्वसामान्य जनतेवर ही परिस्थिती ओढवली आहे. देशांतर्गत इंधन टंचाईच्या काळातही सरकार बांगलादेश ला इंधन पूर्वीच होते. अमेरिकेच्या दबावामुळे इराण, रशिया सारखे परंपरागत इंधन पुरवठादार देशापासून सरकारने दुरावा निर्माण केला. त्यामुळे संकटात आणखी भर पडली.

सध्या शेतीच्या मशागतीचे दिवस सुरू असून शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात डिझेलची आवश्यकता आहे. मात्र वाढलेले इंधन दर व डिझेलची टंचाई यामुळे आधीच संकटात असलेल्या शेतकरी समुदायाच्या अडचणीत अधिकच वाढ झाली. त्यामुळे शासनाने तातडीने हस्तक्षेप करून महागाईला आळा घालावा.

शेतमशागती करिता शेतकऱ्याच्या. ट्रॅक्टरला प्रति दिवस दीडशे लिटर डिझेल पुरवठा करावा. अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी निवेदनाद्वारे घरगुती गॅस सिलेंडरच्या किमती तात्काळ अर्ध्यावर आणाव्या पेट्रोल व डिझेलवरील कर कमी करून इंधनाचे दर कमी करावे.

## आरक्षण प्रक्रियेत अनियमिततेचा आरोप; राज्यपाल, मुख्यमंत्री व निवडणूक आयोगाकडे तक्रार

# ग्रामपंचायत निवडणुकीत ओबीसी आरक्षणाची 'हत्या'

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नांदगाव पेठ, दि.१६ :** महाराष्ट्र राज्यातील आगामी ग्रामपंचायत निवडणुकांसाठी सुरू असलेल्या प्रभाग रचना व आरक्षण निश्चिती प्रक्रियेत गंभीर घटनात्मक व कायदेशीर त्रुटी असल्याचा आरोप राष्ट्रीय प्रधान मुखीया सरपंच संघाने केला आहे. या प्रक्रियेमुळे अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी), इतर मागासवर्गीय (ओबीसी) तसेच महिलांच्या घटनात्मक आरक्षणावर प्रतिकूल परिणाम होत असल्याचा दावा संघटनेने केला आहे.

या संदर्भात राष्ट्रीय प्रधान मुखीया सरपंच संघ, नवी दिल्लीचे राष्ट्रीय उपाध्यक्ष राहुल मारोतराव उके आणि महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष प्रमोद पांडुरंग सांगोले यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल, मुख्यमंत्री, राज्य निवडणूक आयुक्त, मुख्य सचिव तसेच ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव यांना ई-मेलद्वारे सविस्तर कायदेशीर निवेदन व तक्रार सादर केली आहे.

संघटनेने आपल्या निवेदनात नमूद केले आहे की, ग्रामपंचायत निवडणुकांमधील प्रभाग रचना आणि आरक्षण निश्चिती करताना भारतीय संविधानाच्या कलम २४३-डी मधील मूलभूत तत्त्वांचा तसेच सामाजिक न्यायाच्या संकल्पनेचा योग्य विचार करण्यात आलेला नाही. परिणामी, वंचित घटकांचे राजकीय प्रतिनिधित्व कमी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

संघटनेच्या मते, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी आणि महिलांसाठी राखीव जागा निश्चित करताना संबंधित प्रवर्गाच्या प्रत्यक्ष लोकसंख्येचा आधार घेणे आवश्यक असताना काही ठिकाणी केवळ चक्रानुक्रम (रोटेशन) पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. ही बाब संविधानाच्या उद्देशालाच बाधक असल्याचे निवेदनात म्हटले आहे. तक्रारीतील सर्वात गंभीर मुद्दा म्हणजे अनेक ग्रामपंचायतींमध्ये ज्या प्रभागांमध्ये अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमातीची लोकसंख्या शून्य आहे, अशा प्रभागांनाही आरक्षण लागू करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.संविधानाच्या कलम २४३-डी नुसार आरक्षण हे संबंधित प्रवर्गाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात असणे अपेक्षित असताना, प्रत्यक्ष लोकसंख्या नसलेल्या प्रभागांना आरक्षण देणे ही घटनात्मक तरतुदींची पायमल्ली असल्याचे संघटनेने म्हटले आहे. अशा प्रकारच्या आरक्षणामुळे आरक्षणाचा मूळ उद्देशच निष्प्रभ होत असल्याचा दावा करण्यात आला आहे.

संघटनेने आरक्षण निश्चितीच्या गणितीय प्रक्रियेवरही गंभीर आक्षेप घेतला आहे. निवेदनानुसार, आरक्षित जागांची संख्या निश्चित करताना १.४०, २.३३, ३.४५ यांसारख्या अपूर्णांक संख्यांना खालील पूर्णांकामध्ये रूपांतरित केले जात आहे. त्यामुळे राज्यभरातील हजारो आरक्षित जागा कमी होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या पद्धतीमुळे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी आणि महिलांच्या प्रतिनिधित्वात लक्षणीय घट होत असून, सामाजिक न्यायाच्या तत्त्वांवर त्याचा प्रतिकूल परिणाम होत असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.

संघटनेने आपल्या निवेदनात State of U.P. विरुद्ध Pawan Kumar Tiwari (२००५) या सर्वोच्च न्यायालयाच्या महत्त्वपूर्ण निर्णयाचा संदर्भ दिला आहे. या निर्णयामध्ये आरक्षणामुळे मिळणारे प्रतिनिधित्व कोणत्याही परिस्थितीत कमी होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केल्याचा उल्लेख करण्यात आला आहे.त्यामुळे आरक्षण निश्चिती करताना संबंधित प्रवर्गांचे प्रतिनिधित्व अबाधित राहील यासाठी कायदेशीर आणि न्यायसंगत पद्धतीचा अवलंब करणे बंधनकारक असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.

राष्ट्रीय प्रधान मुखीया सरपंच संघाने शासन व राज्य निवडणूक आयोगाकडे पुढील मागण्या केल्या आहेत.ज्या प्रभागांमध्ये संबंधित प्रवर्गाची लोकसंख्या शून्य आहे, त्या प्रभागांमध्ये लागू केलेले आरक्षण तात्काळ रद्द करण्यात यावे. आरक्षित जागा संबंधित प्रवर्गाची प्रत्यक्ष लोकसंख्या असलेल्या प्रभागांमध्ये वर्ग करण्यात याव्यात. अपूर्णांक गणनेमुळे आरक्षणाचे प्रतिनिधित्व कमी होणार नाही यासाठी न्यायसंगत व संविधानसुसंगत पद्धतीचा अवलंब करण्यात यावा.

### आंदोलन आणि न्यायालयीन लढ्याचा इशारा



राष्ट्रीय उपाध्यक्ष राहुल उके आणि प्रदेशाध्यक्ष प्रमोद सांगोले यांनी स्पष्ट केले आहे की, बहुजन समाज, अनुसूचित जाती-जमाती, ओबीसी आणि महिलांच्या घटनात्मक हक्कांवर गदा आणणारी कोणतीही प्रक्रिया सहन केली जाणार नाही. शासनाने या गंभीर बाबीची तात्काळ दखल घेऊन योग्य ती कार्यवाही न केल्यास राष्ट्रीय प्रधान मुखीया सरपंच संघ संविधानिक मार्गाने न्यायालयीन लढा उभारेल. तसेच राज्यभर लोकशाही पद्धतीने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही संघटनेने दिला आहे. संघटनेचे सविस्तर निवेदन राज्यातील सर्व संबंधित घटनात्मक व प्रशासकीय प्राधिकरणांना ई-मेलद्वारे पाठविण्यात आले असून, ग्रामपंचायत आरक्षण प्रक्रियेतील कथित अनियमिततेची तातडीने चौकशी करून हस्तक्षेप करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# माती वाहतुकीमुळे वाहनचालकांच्या डोळयात धूळ

## अपघाताचा धोका वाढला

अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**दर्यापूर, दि.१६ :** दर्यापूर शहरात सध्या मोठ्या प्रमाणात मातीची वाहतूक सुरू असून अनेक ट्रॅक्टर-ट्रॉली व डंपर खुलेआम नियमांचे उल्लंघन करत असल्याचे चित्र दिसून येत आहे. माती वाहून नेणाऱ्या वाहनांवर कोणतेही संरक्षणात्मक आच्छादन नसल्याने वाऱ्यामुळे माती आणि धुळीचे कण रस्त्यावर उडत आहेत. परिणामी ही धूळ वाहनचालकांच्या व पादचाऱ्यांच्या डोळयात जात असून अपघाताची शक्यता वाढली आहे.

विशेषतः दुचाकीस्वारांना या समस्येचा सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे. अचानक डोळयात धूळ गेल्यामुळे वाहनावरील नियंत्रण सुटण्याची शक्यता निर्माण होत असून किरकोळ अपघातांच्या घटनाही घडत असल्याची माहिती नागरिकांनी दिली. तसेच रस्त्यालगतच्या दुकानदारांनाही धुळीमुळे त्रास सहन करावा लागत आहे.नियमांनुसार माती वाहतूक करणाऱ्या वाहनांवर ताडपत्री किंवा अन्य संरक्षक आच्छादन असणे आवश्यक आहे. मात्र अनेक वाहनचालक या नियमांकडे दुर्लक्ष करत असल्याने नागरिकांमध्ये



नाराजी व्यक्त होत आहे. संबंधित विभागाने तात्काळ दखल घेऊन नियमभंग करणाऱ्या वाहनांवर कारवाई करावी व नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शहरवासीयांकडून होत आहे.

खुल्या माती वाहतुकीमुळे उडणारी धूळ नागरिकांच्या आरोग्यासह वाहतूक सुरक्षेलाही धोका निर्माण करत आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

## थोडक्यात

### हातगाडीवर अवैधपणे गॅस सिलिंडरचा वापर

अमरावती : खाद्य पदार्थांच्या हातगाडीवर कोणत्याही प्रकारची काळजी न घेता बेदरकारपणे विक्रेत्याने गॅस सिलेंडरचा वापर केला. त्यामुळे मानवी जीवित धोक्यात येण्याची शक्यता होती. ही बाब लक्षात घेत कोतवाली पोलिसांनी जयस्तंभचौकात कारवाई करीत उमेश साहेबराव डोंगरे (४९) याच्यावर गुन्हा दाखल केला.

### अल्पवयीन मुलीचा विनयभंग

अंजनगाव सुर्जी : अल्पवयीन मुलीला परिचित युवक नेहमीच फोन करून व समाज माध्यमावर चॅटिंग करीत तू मला आवडते. मला तुझ्याशी लग्न करायचे आहे, असे म्हणत सतत तिचा पाठलाग करतो. याबाबत मुलीच्या पालकांनी त्याला समजावले, तरीही तो मुलीचा पाठलाग करतो. पालकांच्या तक्रारीवरून अंजनगाव सुर्जी पोलिसांनी मोहम्मद शहीद मोहम्मद इसराईल (२५) याच्याविरुद्ध विनयभंगासह पोक्सोंतर्गत गुन्हा दाखल केला.

### मोबाईल चोरून खात्यातून उडविले पैशे

वरुड : मोर्शी तालुक्यातील शिरखेड ठाण्याच्या हद्दीतील विष्णोरा येथील चंद्रशेखर एकनाथराव चरपे (६३) यांनी वरूडच्या स्टेट बँक ऑफ इंडीया शाखेत त्यांचे बँक खाते उघडले होते. काही दिवसांपूर्वी चोरीला गेलेल्या त्यांच्या मोबाईलचा अज्ञात व्यक्तीने गैरवापर करून २३ फेब्रुवारी ते मार्च या कालावधीत मोबाईलमधील पीन व पासवर्डच्या आधारे ३४ वेळा व्यवहार करीत त्यांच्या खात्यातून एकूण १ लाख ८२ हजार २८२ रुपयांनी फसवणूक केली. याप्रकरणी चरपे यांनी वरूड पोलिसांत १२ जुन रोजी तक्रार दाखल केली.

### घरात घुसून महिलेचा विनयभंग

धारणी : शासकीय निवासस्थानात राहणाऱ्या महिलेच्या घरात घुसून एकाने तिचा विनयभंग केला. मला तुझ्यासोबत लग्न करायचे आहे. तुला पळवून न्यायला आलो आहे असे म्हणत जबरदस्तीने तिचा हात पकडून ओढताण केली. महिलेने धारणी पोलिसात धाव घेत तक्रार नोंदवली.

### युवकाला लोखंडी रॉडने मारहाण

चांदूर बाजार : जुन्या वादातून दोघांनी लोखंडी रॉडने युवकाचे डोके फोडले. ही घटना लंगोटे मंगल कार्यालयाजवळ घडली. अब्दुल वकील अब्दुल बशीर उमर (५५, रा. भैसदेही, जि. बैतुल) यांच्या तक्रारीवरून चांदूर बाजार पोलिसांनी मोहम्मद शफीक अब्दुल सईद (३१) व शेख जब्बार शेख शब्बीर (२५) दोघेही रा. चांदूर बाजार यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला.

### रखमाबाई गावंडे यांचे निधन

अंजनगाव बारी, दि.१६ :



बसपा पक्षाचे मिशनरी कार्यकर्ते, माजी उपसरपंचअंजनगाव बारी तथा युवा समाजसेवक ॲड. विलास देविदास गावंडे यांच्या मातोश्री दिवंगत रखमाबाई देविदास गावंडे (वय ८७ वर्षे), रा. अंजनगाव बारी यांचे आज दिनांक १६ जून २०२६ रोजी सकाळी ६.३० वाजता दु:खद निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, सुना, नातवंडे व मोठा परिवार असा आप्तपरिवार आहे. त्यांची अंत्ययात्रा बुधवार दिनांक १७ जून २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता त्यांच्या राहत्या घरून बौद्ध पुरा येथून निघणार आहे.

# कर्मचाऱ्यांच्या संपामुळे आरटीओ सेवा ठप्प!

## प्रलंबित मागण्यांवर शासनाची चालढकल; आरटीओ कर्मचाऱ्यांचा बेमुदत संपाचा एल्गार

अजिंक्य भारत | प्रतिनिधी




**अमरावती, दि.१६ :** मोटार वाहन आरटीओ विभागातील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांबाबत शासन व प्रशासनाकडून सातत्याने टोलवाटोलवी होत असल्याचा आरोप करत राज्यातील आरटीओ कर्मचाऱ्यांनी उद्या (दि. १६ जून) पासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे. या संपामुळे राज्यभरातील आरटीओ कार्यालयांमधील अनेक सेवा विस्कळीत होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, विभागाचा आकृतीबंध मंजूर होऊन साडेतीन वर्षांचा कालावधी लोटला असतानाही सेवा प्रवेश नियम अद्याप तयार करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे अनेक कर्मचारी पदोन्नतीपासून वंचित राहत असून त्यांचे आर्थिक तसेच सामाजिक नुकसान होत आहे. याशिवाय इतरही अनेक प्रलंबित प्रश्नांवर शासनाने कोणतीही ठोस कार्यवाही न केल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी कर्मचाऱ्यांनी यापूर्वी २ जून रोजी दोन तासांचे धरणे-निदर्शने तसेच ९ जून रोजी एक दिवसीय लाक्षणिक संप पुकारला होता. मात्र त्यानंतरही शासन व प्रशासनाकडून कोणतीही सकारात्मक भूमिका घेण्यात आली नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे.कर्मचाऱ्यांच्या बहुतांश मागण्या प्रशासन स्तरावरच निकाली निघू शकतात. यासाठी संघटनेने वारंवार पाठपुरावा करून आवश्यक कागदपत्रे सादर केली असतानाही प्रशासन मार्गदर्शनाच्या नावाखाली प्रस्ताव शासनाकडे पाठवून वेळकाढूपणा करीत असल्याची टीका संघटनेकडून करण्यात आली आहे.आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी काही दिवसांपूर्वी बैठक घेतली होती. मात्र त्या बैठकीचे इतिवृत्त अद्याप उपलब्ध करून देण्यात आले नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेबाबत कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष वाढला आहे.दरम्यान, संघटनेची तातडीची बैठक १३ जून रोजी आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सविस्तर चर्चा करून बेमुदत संपाशिवाय अन्य कोणताही पर्याय शिल्लक नसल्याची भूमिका व्यक्त केली. त्यानुसार १६ जूनपासून राज्यातील सर्व आरटीओ कर्मचारी बेमुदत संपावर जाणार असून त्याद्वारे शासनाविरोधातील आपला रोष व्यक्त करणार आहेत.शासन व प्रशासनाने प्रलंबित मागण्यांबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा कर्मचारी आंदोलनातून माघार घेणार नाहीत, असा इशारा संघटनेचे प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेत तातडीने प्रलंबित प्रश्न निकाली काढावेत, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही संघटनेच्या वतीने मोटार वाहन विभाग कर्मचारी संघटनेचे राज्य अध्यक्ष प्रकाश पाटील, सरचिटणीस सुरेंद्र सरतापे, राज्य उपाध्यक्ष तथा अमरावती विभागाचे अध्यक्ष अनिल मानकर, संदीप खवले, गजानन तनपुरे, सुनील गुल्हाने, दीपक पोटे, अमोल खिरोडकर,राहुल शिरसाठ, किशोर देशमुख, अभिजीत गावंडे, अक्षय राठोड, अमोल गंगाखेडकर, प्रमोद राजनेकर,अमोल माटोडे, साजिद अली, श्वेता वैद्य, रोहिणी दातार,मीनल गिऱ्हे, लता कानडे, अश्विनी चव्हाण, अमोल गंगाखेडकर, उमेश तिवारी,हर्षदा चव्हात, वृषाली महल्ले, वैशाली निंभोरकर, स्मिता सिरमलवार, प्रीती डोंगरे, मनोज खोब्रागडे, जयसिंग राठोड, नितीन मुखे,अनिल मेश्राम, अरुण वाघमारे, संदीप अडागडे, राजेश राऊत, आशिष माथुरकर, देवेंद्र कळमकर, उज्वल ठाकरे, राजेश पाटील, रवींद्र रुद्रकार, संतोष घ्यार, सुनील सोळंकी, प्रवीण तायवाडे, समीक्षा वारकरी, किशोर आडे,मीना मडावी, विनोद पिंगे,रामकृष्ण खंडारे, गजानन धुर्वे,संदीप राठोड,निखिल भेंडारे,सोहन हेमने, डेविन जुमळे, नितीन भेंडारे, शारदा हेडाऊ,, विशाल शिवनकर, स्वप्निल सहारे आदी राज्यातील कर्मचारी वर्गाने दिलेला आहे.

# माहुली येथे कायदेविषयक शिबीर




अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**दर्यापूर, दि.१६ :** तालुका विधि सेवा समिती व दर्यापूर वकील संघ यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक पर्यावरण दिन व बाल कामगार विरोधी दिनानिमित्त ग्राम माहुली धांडे येथे कायदेविषयक मार्गदर्शन शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबीराचे अध्यक्षस्थानी दर्यापूर येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्री सत्यवान डोके हे होते. आपण सर्वांनी मिळुन पर्यावरण संवर्धनाच्या गरजेचे त्यांनी प्रतिपादन केले तसेच बालकांना कामावर न पाठविता शाळेत शिक्षणासाठी पाठविण्याचे ग्रामस्थांना अवाहन केले. सदर शिबीराचे प्रास्ताविक ॲड. एन. जी. थर्डक यांनी केले तर सूत्रसंचालन ॲड. रियाज घाणीवाले यांनी केले. सदर शिबीरामध्ये ॲड. विद्यासागर वानखडे यांनी पर्यावरण संवर्धन व त्याबाबतच्या कायदेविषयक तरतुदी या विषयावर, ॲड. देवानंद पर्वतकर यांनी कौटुंबिक हिंसाचारापासून महीलांचे संरक्षण अधिनियमावर, ॲड. वैभव इंगळे यांनी बाल कामगार विरोधी कायदेविषयक तरतुदी या विषयावर व ॲड. आम्रपाली चौरपगार यांनी महिलाविषयक कायद्यांवर मार्गदर्शन केले. सर्वच विधिज्ञांनी अत्यंत सखोल असे मार्गदर्शन केले. पर्यावरण दिनाचे निमित्ताने ग्राम पंचायत कार्यालयाच्या आवारात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. सदर शिबीराच्या आयोजनाची उत्तम व्यवस्था माहुली धांडे ग्राम पंचायतच्या सरपंच सौ. उषाताई गवई व सचिव श्री राहुल चिटकूले तसेच दर्यापूर जिल्हा न्यायालयाचे नाझर श्री विनोद गवई तसेच न्यायालयीन कर्मचारी श्री शुभम चऱ्हाटे यांनी केली.

# तीर्थक्षेत्र लाखपुरीत भाविकांचा उसळला जनसागर



अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**दर्यापूर, दि.१६ :** मूर्तिजापूर व दर्यापूर तालुक्याच्या सीमेवर असलेल्या पूर्णा नदी तीरावर अधिक मास समाप्तीच्या शुभ-परवावर आलेल्या सोमवती अमावस्या निमित्त तीर्थक्षेत्र लाखपुरी ता. मूर्तिजापूर जि. अकोला येथे पूर्णा नदी तीरावर तसेच श्री भगवान लक्षेश्वर मंदिरात पश्चिम विदर्भातून भाविकांची प्रचंड गर्दी झाली. पितृदोष तसेच आपल्या पूर्वजांना मिळवण्याच्या विधीसाठी तीर्थक्षेत्र लाखपुरी येथे पूर्णा नदी तीरावर विशेष महत्त्व असल्यामुळे सोमवारी सकाळपासूनच भाविकांची मोठी गर्दी झाली.

भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेऊन श्री लक्षेश्वर संस्थानच्या युवा सेवाधारी ,पुरुष व महिला सेवाधाऱ्यांनी विविध उपाय योजना केल्या होत्या . पूर्णा नदी तीरावर पिण्यासाठी व स्वयंपाकासाठी टँकरद्वारे शुद्ध पाण्याची व्यवस्था , मंदिर परिसरात वाहन पार्किंग व्यवस्था , श्री लक्षेश्वर मंदिरात शुद्ध थंड पाणी , सुवासिक मसालेभात महाप्रसाद व्यवस्था , मंडप इत्यादी व्यवस्था भाविकांसाठी करण्यात आली होती . यामुळे भाविकांनी समाधान व्यक्त केले. सोमवारी सकाळी ५ वाजता पासुन रात्री १० वाजेपर्यंत श्री लक्षेश्वर मंदिरात भाविकांची दर्शनासाठी गर्दी होती . नदी परिसरात विविध विधी करिता ब्राह्मण , नाभिक बंधू मोठ्या संख्येने उपस्थित होते . यावेळी मुर्तीजापुर ग्रामीण पोलीस स्टेशन चोख बंदोबस्त होता अशी माहिती श्री लक्षेश्वर संस्थांच्या वतीने देण्यात आली आहे.

# सेवा प्रवेश नियम रखडल्याने पदोन्नतीचा प्रश्न गंभीर

## निदर्शने व लाक्षणिक संपानंतरही तोडगा नाही | आजपासून राज्यव्यापी बेमुदत आंदोलनाचा निर्णय

अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**अमरावती,दि.१६ :** रुख्मीणी नगर परिसरातील समस्यांबाबत युवक काँग्रेसने साधला स्थानिकांशी संवाद युवक कॉंग्रेसचे राष्ट्रीय सचिव नवज्योतसिंग संधू यांची विशेष उपस्थिती महाराष्ट्रातील प्रमुख महानगरांच्या स्थानिक समस्यांना वाचा फोडण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश युवक कॉंग्रेसतर्फे विशेष मोहीम राबविण्यात येत असून त्याचाच भाग म्हणून आवाज महाराष्ट्राचा, अमरावतीच्या परिवर्तनाचा ही मोहीम अमरावती शहरात राबविण्यात येत आहे. या मोहीमेअंतर्गत शहरातील रुक्मिणी नगर परिसरातील विविध समस्यांवर चर्चा करण्यासाठी स्थानिक नागरिकांशी संवाद साधण्यात आला.

यावेळी भारतीय युवक काँग्रेसचे सचिव व महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सहप्रभारी नवज्योतसिंग संधू, अमरावती विधानसभा युवक काँग्रेसचे अध्यक्ष वैभव देशमुख, जिल्हा युवक काँग्रेसचे कार्याध्यक्ष अनिकेत ढेंगळे, शहर युवक काँग्रेस उपाध्यक्ष नितीन काळे, माजी प्रदेश सचिव समीर जवंजाळ, प्रदेश महासचिव उत्कर्ष देशमुख, प्रदेश महासचिव अक्षय हेटे, प्रदेश सचिव अफजल बेरा, अंकुश डहाके, मोहीत भेंडे, शुभम बांबल, केदार भेंडे, आनंद बरडे, शंतनु देशमुख, आकाश गेडाम, प्रियल मोहोड, संकेत भेंडे, आकाश गेडाम, आनंद पाचघरे, नितीन तिडके, शाहू बोंडे, योगेश घोडेस्वार या युवक काँग्रेस पदाधिकाऱ्यांसह, माजी नगरसेविका जयश्रीताई डहाके, प्रदीप वानखडे, मंगेश उगले, धर्मेंद्र चंदेले, मनीष देशमुख, नितीन वाघमारे, गणेंद्र बोंडे, राजाभाऊ तिडके, नितीन वाघमारे, प्रशांत सोनारे, विजय डहाके, अतुल काळे, संदीप ठाकरे, पंकज गुल्हाने, आकाश घुईखेडकर, सुनील जुनघरे, अनंत देशमुख, शशिकांत बोंडे, रवी इंगळे, सचिन भनग, अश्विन भेंडे, छोटू देवळे यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आदित्य साबळेची सीआयएसएफमध्ये अधिकारी पदावर निवड

अजिंक्य भारत | प्रतिनिधी





**दर्यापूर, दि.१६ :** दर्यापूर येथील नवजीवन हॉस्पिटलचे संचालक डॉ. रवींद्र विठ्ठलराव साबळे व डॉ. माधुरी रवींद्र साबळे यांचे सुपुत्र आदित्य रवींद्र साबळे यांची केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल मध्ये अधिकारी पदावर निवड झाली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे दर्यापूर शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.नुकतेच त्यांनी आपले ट्रेनिंग पूर्ण केले आहे.

आदित्य यांनी कठोर परिश्रम, जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या बळावर हे यश संपादन केले आहे. देशसेवेचे स्वप्न उराशी बाळगत त्यांनी केलेल्या अथक प्रयत्नांना यशाचे फळ मिळाले असून त्यांच्या निवडीमुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

साबळे कुटुंबीयांच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील योगदानाची परंपरा पुढे नेत आदित्य यांनी मिळविलेले हे यश युवा पिढीसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# पावसाअभावी बळीराजाची धाकधूक वाढली

## पेरण्या खोळंबल्या, शेतकऱ्यांची नजर आकाशाकडे





अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**अंजनगाव बारी, दि.१६ :** जून महिन्याचा अर्धा कालावधी उलटून गेला तरी अमरावती जिल्ह्यासह ग्रामीण भागात समाधानकारक पाऊस झालेला नाही. त्यामुळे खरीप हंगामातील पेरण्या खोळंबल्या असून शेतकरी चिंतेत आहेत.

बी-बियाणे व खतांची खरेदी करून मशागतीची कामे पूर्ण झालेली असतानाही पेरणीयोग्य पाऊस नसल्याने शिवार ओस पडले आहे.दरम्यान, पुढील २४ ते ४८ तासांत उष्णतेची लाट येण्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता आणखी वाढली आहे. हवामान तज्ज्ञांच्या माहितीनुसार, 18 जूननंतर मान्सून पुन्हा सक्रिय होण्याची शक्यता असून महाराष्ट्रात दमदार पावसाचे संकेत आहेत.मात्र, एल निनोच्या प्रभावामुळे यंदा पावसाच्या वितरणात असमतोल राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. काही भागांत कमी पाऊस तर काही ठिकाणी अतिवृष्टी होऊ शकते. सध्या तरी अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत असून त्यांच्या नजरा आभाळाकडे लागल्या आहेत.

> बी-बियाणे व खतांची खरेदी करून सर्व तयारी पूर्ण केली आहे. मात्र पावसाअभावी पेरण्या रखडल्या असून आता प्रत्येक दिवस चिंता वाढवणारा ठरत आहे.
> **- राजाभाऊ वडतकर**

> शेतकऱ्यांनी घाईघाईने पेरणी करू नये. पुरेसा व सलग पाऊस झाल्यानंतरच पेरणी करावी. हवामान अंदाजावर लक्ष ठेवून योग्य नियोजन करणे गरजेचे आहे. **- डॉ. संदीप देशमुख**

> मान्सूनच्या प्रगतीसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होत असून पुढील काही दिवसांत पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांनी अधिकृत हवामान अंदाजाचे नियमितपणे पालन करावे.
> **- कृषी हवामान विभाग**

## १३७ वर्षांची अखंड परंपरा,९१० किलोमीटरचा पायी प्रवास; २५ जुलैला पंढरपूरात होणार आगमन

# पंढरीच्या ओढीने घुईखेडवरून वारकरी मार्गस्थ

अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**चांदूर रेल्वे, दि.१६ :** वारकरी संप्रदायाची श्रद्धा, भक्ती आणि परंपरा जपणारी घुईखेड येथील श्री संत बेंडोजी बाबा संस्थानची ऐतिहासिक पायी दिंडी १२ जून रोजी मोठ्या उत्साहात पंढरपूरकडे रवाना झाली. तब्बल १३७ वर्षांची अखंड परंपरा लाभलेल्या या दिंडीत घुईखेडसह परिसरातील शेकडो वारकरी सहभागी झाले असून २५ जुलै रोजी दिंडी पंढरपूर येथे पोहोचणार आहे.

नियमानुसार दिंडीने श्री संत बेंडोजी बाबा संस्थानातून प्रस्थान करून गावातील चंद्रभागा नदीपात्रात आगमन केले. येथे संत बेंडोजी महाराजांच्या पवित्र पादुकांचे विधिवत पूजन व आरती संस्थानचे खजिनदार दिनकरराव घुईखेडकर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर टाळ-मृदंगाच्या गजरात, हरिनामाच्या जयघोषात आणि भजन-कीर्तनांच्या सुरावटीत दिंडीने पंढरीच्या दिशेने मार्गक्रमण सुरू केले. घरदार, संसार आणि दैनंदिन चिंता बाजूला ठेवून वारकरी भक्तिभावाने या वारीत सहभागी झाले आहेत. घुईखेड ते पंढरपूर हा सुमारे ९१० किलोमीटरचा प्रवास वारकरी पायी पूर्ण करणार आहेत. विशेष म्हणजे पैठण आणि आळंदी मार्गे होणाऱ्या या वारीत सहभागी होणारे वारकरी संत ज्ञानेश्वर माऊली पालखी सोहळ्यासोबत आळंदी ते पंढरपूर असा आणखी सुमारे २६० किलोमीटरचा प्रवास करणार आहेत. एकूण ४७ दिवस चालणाऱ्या या धार्मिक सोहळ्यामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. संत ज्ञानेश्वर माऊली पालखी सोहळ्यातील २१ मानाच्या दिंड्यांपैकी श्री संत बेंडोजी महाराज संस्थान, घुईखेडच्या दिंडीला १७ वा मानाचा क्रमांक आहे. विदर्भातून सहभागी होणारी ही एकमेव मानाची दिंडी असल्याने तिचे विशेष महत्त्व आहे. संस्थानचा इतिहास १३३७ सालापर्यंत पोहोचत असून वारकरी परंपरेची ही अखंड ज्योत आजही तेवती ठेवली आहे.

दिंडी २५ जून रोजी पैठण येथे पोहोचणार असून २६ जूनला तेथून प्रस्थान करून ७ जुलै रोजी आळंदी गाठणार आहे. ८ जुलैपासून संत ज्ञानेश्वर माऊली पालखी सोहळ्यासह पुढील प्रवास सुरू होईल आणि २५ जुलै रोजी दिंडी पंढरपूर येथे दाखल होणार आहे. या कालावधीत विविध गावांमध्ये वारकऱ्यांसाठी निवास, चहा, नाश्ता आणि भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. दिंडी प्रस्थान सोहळ्यास संस्थानचे विणेकरी बाबाराव गोडबोले, प्रशांत घुईखेडकर, संजय काकडे, नंदू काकडे, यशवंत काकडे, मिलिंद घुईखेडकर, विश्वेश्वर गावंडे, पांडुरंग भोयर, दिलीप येवले, प्रफुल चनेकार, मुकुंद काकडे, गणेश गावंडे, किशोर मेहर, गजानन कोल्हे, किशोर येवले, अनिल शेंडे, रवी गिरी, संगम तायडे, बाळू मिर्झापुरे, मनोहर कोल्हे, कैलास सावंतकर गजानन फिस्के, मारुती वरखडे, मधु बोबडे, संजय चनेकार, पार्थ फिस्के, दादाराव कुडे, प्रमोद ढवळे, बबन कोठाळे, सुरेश पडघान, ज्ञानेश्वर इंगोले, संतोष देशमुख, गिरीश काकडे, अनिल टेके, मारुती शिवणकर, सुधिर भारती यांच्यासह शेकडो वारकरी आणि भाविक उपस्थित होते. भक्ती, समर्पण आणि सामाजिक ऐक्याचे प्रतीक मानली जाणारी ही ऐतिहासिक दिंडी यंदाही उत्साहात मार्गस्थ झाली असून पंढरीच्या वाटेवर हरिनामाचा गजर अखंड सुरू राहणार आहे.

## थोडक्यात



### यवतमाळात रक्तदाता गौरव सन्मान सोहळा उत्साहात

**यवतमाळ :** धैर्य सोशल वेलफेअर फाऊंडेशनतर्फे जागतिक रक्तदाता दिनानिमित्त रविवारी (दि. १४) यवतमाळ येथील रोटरी क्लब हॉलमध्ये भव्य गौरव सोहळा पार पडला. आमदार बाळासाहेब मांगुळकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात रक्तदात्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी फाऊंडेशनने गरजू रुग्णांसाठी 'ब्लड डोनर वेल्फेअर मिशन' या महत्वकांक्षी उपक्रमाची अधिकृत घोषणा करीत सामाजिक बांधिलकी जपली आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार बाळासाहेब मांगुळकर होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून भाई अमन, सुनील लांडगे, अनिरुद्ध बक्षी, योगेश देशमुख, डॉ. सारिका शहा, कमलेश बघेल व बिपीनभाऊ चौधरी उपस्थित होते. आमदार मांगुळकर यांनी फाऊंडेशनच्या कार्याचे कौतुक करीत सामाजिक कार्यकर्त्यांच्या समस्या सोडवण्याचे आश्वासन दिले. यावेळी मयूर काळे, मनोज तामगाडगे, शैलेश करीहार, सचिन मुधोलकर, पंकज पंडित, संतोष कडू व गिरीश अनंतवार यांसह अनेक रक्तदात्यांना विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. रक्तदान चळवळीला बळकटी देण्यासाठी हे मिशन सुरू करण्यात आले आहे. निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी यांनी या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे संचालन विजयकुमार बुंदेला यांनी केले, तर प्रास्ताविक प्रफुल बनसोड यांनी मांडले. कमलेश बघेल, अविनाश खोब्रागडे व टीमने कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. या उपक्रमामुळे रक्तदात्यांना नवी दिशा मिळणार आहे.

### आर्णी येथे १९ जून रोजी मोफत नेत्र तपासणी शिबिर

**आर्णी :** राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त शुक्रवारी (दि. १९) आर्णी येथील अंजली काकरी जाधव पेट्रोल पंप परिसरात सकाळी १० ते ३ या वेळेत भव्य मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले आहे. मनसे उपजिल्हाध्यक्ष सचिन येलगंधेवार व शहराध्यक्ष कपिल ठाकरे यांच्या पुढाकाराने व संयुक्त विद्यमाने हा आरोग्यदायी उपक्रम राबविला जात आहे. ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण या संकल्पनेतून मनसेतर्फे हा उपक्रम हाती घेतला आहे. शिबिरात नागरिकांची मोफत नेत्र तपासणी केली जाणार असून, मोतीबिंदू आढळल्यास शस्त्रक्रियाही मोफत केली जाईल. तसेच गरजू रुग्णांना मोफत चष्मे वाटप करण्यात येणार आहे. ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांना नेत्रविकारांवर वेळेवर उपचार मिळावेत आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, हा यामागचा मुख्य उद्देश आहे. ज्येष्ठ नागरिक व नेत्रविकारांची लक्षणे असलेल्यांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही समाजहिताचा विचार करून मनसेच्या कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला आहे. या उपक्रमाच्या नियोजनासाठी मनसेचे पदाधिकारी परिश्रम घेत असून, अधिकाधिक नागरिकांनी शिबिरात सहभागी होऊन डोळ्यांच्या आरोग्यासाठी या सुवर्णसंधीचा लाभ घेण्याचे आवाहन सचिन येलगंधेवार व कपिल ठाकरे यांनी केले आहे.



### पेसा मोबीलायझर्सचा आंदोलनाचा इशारा

**यवतमाळ :** जिल्ह्यात कार्यरत पेसा ग्रामसभा मोबीलायझर्स संघटनेने पांढरकवडा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आणि केळापूर-आर्णीचे आमदार राजू तोडसाम यांना निवेदन दिले. तीन ग्रामपंचायतींसाठी एक मोबीलायझर नेमण्याच्या शासनाच्या नवीन निर्णयामुळे सध्या कार्यरत कर्मचाऱ्यांवर अन्याय होणार असून, हा निर्णय मागे न घेतल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा संघटनेने दिला आहे. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी हा निर्णय मोबीलायझर्सच्या हिताच्या विरोधात असल्याचे म्हटले आहे. तुटपुंज्या मानधनावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्या धोक्यात आल्या असून, शासनाच्या या धोरणामुळे मोठ्या प्रमाणावर बेरोजगारी वाढेल, अशी भीती व्यक्त केली. यावेळी जोसना उईके, मीना उईके, शुक्ला तोडसाम, सुवर्णा धुर्वे, अर्चना मडावी, जोत्सना सोयाम, माला सोयाम, जोत्स्ना सोयाम, सुनीता सुरपाम, लक्ष्मी गेडाम, मंगला जुमनाके, लता जुमनाके यांच्यासह समस्त पेसा ग्रामसभा मोबीलायझर्स उपस्थित होते. शासनाने त्वरित हा निर्णय रद्द करण्याची मागणी केली आहे.

# 'ऑपरेशन टायगर'ने राजकारण तापले

## शिंदे सेनेचा प्रभाव वाढणार, स्थानिक राजकारणात राजकीय भूकंपाचे संकेत, पक्षबदलाच्या हालचाली सुरू

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

✦ फारुक अहेमद

**दिग्रस, दि. १६ :** राज्यात गाजत असलेल्या कथित 'ऑपरेशन टायगर'ची तीव्र झळ आता यवतमाळ जिल्ह्यापर्यंत पोहोचली असून, स्थानिक राजकारणात मोठ्या राजकीय भूकंपाचे संकेत मिळत आहेत. आगामी निवडणुका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या गणितांमुळे अनेक नेत्यांनी नव्या राजकीय पर्यायांच्या शोधात उडी घेतली आहे. या घडामोडींमुळे शिंदे सेनेचा जिल्ह्यातील प्रभाव अधिक बळकट होण्याची शक्यता वर्तवली जात असून, राजकीय वर्तुळात नेत्यांच्या संभाव्य पक्षबदलाच्या चर्चेने खळबळ उडाली आहे.

जिल्ह्याचे पारंपरिक राजकीय चित्र बदलण्याचे संकेत आता स्पष्ट होऊ लागले आहेत. राज्यातील 'ऑपरेशन टायगर' या कथित मोहिमेची चर्चा आता जिल्हास्तरावर पोहोचली असून, यामुळे राजकीय वर्तुळात मोठे धक्के मिळण्याची शक्यता आहे. स्थानिक पातळीवरील नेतृत्वामध्ये असलेली नाराजी आणि आगामी विधानसभा व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पाहता, अनेक दिग्गज नेते आता नव्या राजकीय समीकरणांच्या शोधात असल्याचे दिसते. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना (शिंदे गट) पालकमंत्री संजय राठोड यांच्या माध्यमातून जिल्ह्यात आपले संघटनात्मक जाळे वेगाने विस्तारत आहे. राजकीय अभ्यासकांच्या मते, सत्तेच्या केंद्राशी जवळीक साधणे आणि आपल्या मतदारसंघातील विकासकामांसाठी आवश्यक असलेला निधी मिळविणे, या उद्देशाने अनेक प्रभावी नेते शिंदे सेनेकडे आकृष्ट होत आहेत. यापूर्वीही अनेक मेळावे आणि जनसंपर्क अभियानांच्या माध्यमातून शिंदे सेनेने आपली ताकद दर्शवली आहे. जर काही बडे नेते पक्षात दाखल झाले, तर जिल्ह्यातील राजकीय समीकरणांचे पारडे पूर्णपणे बदलू शकते. विशेषतः जिल्हा परिषद, नगरपालिका आणि कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये वर्चस्व असणाऱ्या नेत्यांचा शिंदे गटातील प्रवेश, विरोधी पक्षांसाठी चिंतेची बाब ठरणार आहे. केवळ पक्षांतर करून निवडणुका जिंकणे कठीण असले, तरी जनतेचा विश्वास मिळविण्यासोबतच राजकीय बळकट करण्यासाठी ही रणनीती प्रभावी ठरू शकते. सध्या यवतमाळच्या राजकीय पटावर 'टायगर'च्या डरकाळीत आपला सूर मिसळण्याची तयारी एक मोठा नेता करीत असल्याची खात्रीलायक चर्चा आहे. येणाऱ्या काही आठवड्यांत होणारे अनपेक्षित निर्णय जिल्ह्यातील राजकारणाला कलाटणी देणारे ठरतील. कार्यकर्त्यांमध्ये उत्साह कायम ठेवणे आणि नाराज गटांना शांत ठेवणे ही सर्वच पक्षांपुढील मोठी कसोटी आहे. मतदारांच्या बदलत्या अपेक्षा आणि विकासाच्या मुद्द्यांवर आधारित हे राजकारण आता नव्या वळणावर आले आहे. यवतमाळच्या या राजकीय भूकंपाची तीव्रता आगामी काळात किती असेल, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

### शिंदे सेनेची वाढती सक्रियता

**जिल्ह्यात शिंदे सेनेने आपली पाळेमुळे घट्ट रोवण्यास सुरुवात केली आहे. पालकमंत्री संजय राठोड यांच्या नेतृत्वाखाली पक्ष संघटनात्मक पातळीवर अत्यंत आक्रमक झाला असून, वारंवार होणारे मेळावे आणि जनसंपर्क अभियान यामुळे कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह संचारला आहे. अनेक स्थानिक नेत्यांना विकासाच्या नावाखाली पक्षात सामावून घेऊन एक मोठी राजकीय शक्ती उभारण्याचा शिंदे गटाचा मानस असून, आगामी निवडणुकांमध्ये भाजपला सोबत घेऊन मोठी बाजी मारण्याची ही रणनीती असल्याचे मानले जात आहे.**

### राजकीय नेत्यांची द्विधा मनस्थिती

**तिकीट वाटप, पदवाटप आणि स्थानिक पातळीवरील गटबाजीमुळे अनेक पक्षांतील दिग्गज नेते सध्या पक्षात अस्वस्थ आहेत. आपल्या समर्थकांचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी आणि राजकीय भविष्य सुरक्षित करण्यासाठी हे नेते आता पक्षबदलाचा गांभीर्याने विचार करीत आहेत. 'ऑपरेशन टायगर'च्या निमित्ताने एक मोठे व्यासपीठ उपलब्ध होत असल्याने, येणाऱ्या काळात जिल्ह्यातील काही बड्या नेत्यांचे राजीनामे आणि शिंदे गटातील प्रवेश ही निश्चित मानली जात असून, राजकीय वर्तुळात त्याबाबत मोठी उत्सुकता आहे.**

**CAPTION** आंतरराष्ट्रीय योग दिन...



**यवतमाळ :** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त संदीप मंगलम येथे आज मंगळवारी (दि. १६) योग शिबिराचा उत्साह पहायला मिळाला. योग गुरू साहेबराव साखरे यांच्या मार्गदर्शनाखाली दीपक, संगीता साळेवे आणि विद्या खडसे यांच्या उपस्थितीत सुरू असलेले योगासने आणि प्राणायामाचे हे विलोभनीय दृश्य.

## रिमा तोडकर यांना 'व्हाइस ऑफ क्वीन' पुरस्कार

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**यवतमाळ, दि. १६ :** चंद्रपूर येथे रविवारी (दि. १४) आयोजित एस. के. फिल्म प्रोडक्शन आणि ब्लॅक गोल्ड म्युझिकल इव्हेंटच्या विदर्भस्तरीय कराओके गायन स्पर्धेच्या ग्रँड फायनलमध्ये यवतमाळच्या सेवा समर्पण प्रतिष्ठान संचालित दिव्यांग सेवा प्रकल्पाची अंध विद्यार्थिनी रिमा तोडकर हिने प्रथम क्रमांक पटकावित 'व्हाइस ऑफ क्वीन' पुरस्कार आणि २१ हजार रुपये रोख रक्कम मिळवून यवतमाळचा गौरव वाढवला आहे.



स्पर्धेत रिमा तोडकर हिने आपल्या सुरेल आवाजाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. या यशासाठी रिमा तोडकर हिला प्रशिक्षक डॉ. माणिकताई मेहरे, दत्ताजी देशपांडे आणि अपर्णा शेलार यांचे मार्गदर्शन लाभले. रिमा तोडकर हिच्या या कामगिरीबद्दल सेवा समर्पण प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रशांत बनगीनवार, उपाध्यक्ष सुरेश राठी, उपाध्यक्ष डॉ. आलोक गुप्ता, सचिव अनंत कौलगीकर, कोषाध्यक्ष दीपक बागडी तसेच दिव्यांग सेवा समितीचे कार्याध्यक्ष प्रज्वल तुमसरे आणि सदस्य सोनम ठाकरे यांनी तिचे कौतुक केले आहे. दिव्यांगत्वावर मात करत रिमा तोडकर हिने मिळविलेल्या या यशाचे सर्वस्तरातून अभिनंदन होत असून, तिच्या जिद्दीचे सर्वत्र कौतुक केले जात आहे. एका अंध मुलीने स्पर्धेत प्राविण्य प्राप्त केल्याने संपूर्ण यवतमाळ जिल्ह्यासाठी ही अत्यंत अभिमानाची बाब ठरली आहे.

## बुरुड समाज संघटनेची निवडणूक संपन्न




**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

यवतमाळ,दि.१६ : यवतमाळ जिल्हा बुरुड समाज संघटनेच्या वतीने आयोजित विदर्भस्तरीय कार्यकारिणीची निवडणूक रविवारी सिव्हिल लाईन्स येथील भावे मंगल कार्यालयात उत्साहात पार पडली. निवडणुकीत सर्वप्रथम मागील तीन वर्षांचा वार्षिक अहवाल आणि जमा-खर्च सादर करण्यात आला. त्यानंतर गुप्त मतदान पद्धतीने नवीन कार्यकारिणीची निवड प्रक्रिया पार पडली. या निवडणुकीसाठी संपूर्ण विदर्भातील अकराही जिल्ह्यांतून बुरुड समाज बांधव मोठ्या संख्येने यवतमाळ येथे एकत्र आले होते.

नवीन कार्यकारिणीत अध्यक्षपदी डॉ. ईश्वर चल्लेवार (नागपूर) तर उपाध्यक्षपदी रमाकांत सुलभेवार (यवतमाळ) आणि सुरेश पुट्टेवार (नागपूर) यांची निवड झाली. महासचिव म्हणून विवेक चिलविरेवार (नागपूर), संघटन सचिवपदी सौ. दिपांजली मंथनवार व निलेश कनकेवार यांची निवड करण्यात आली. तसेच सचिवपदी राहुल मोहितवार (उमरखेड), महिला सचिवपदी अनुराधा पल्लडवार, कार्यालयीन सचिव राजेश शेगावकर, युवा सचिव मोहित मादेवार, कोषाध्यक्ष राजेश सुलभेवार आणि अंकेक्षक म्हणून संजय मांजरे यांची निवड झाली.निवडणूक अधिकारी म्हणून निलेश सुलभेवार आणि डॉ. सुरेश पुट्टेवार यांनी काम पाहिले. याप्रसंगी नुकत्याच झालेल्या नगरपरिषद निवडणुकीत नवनिर्वाचित समाज सदस्यांचा भावपूर्ण सत्कार करण्यात आला. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी यवतमाळ जिल्ह्यातील शहर व तालुक्यातील सर्व बंधू-भगिनी, युवक-युवती तसेच बुरुड समाज बांधवांनी मोठ्या प्रमाणावर परिश्रम घेऊन मोलाचे सहकार्य केले.

## ऑनलाईन अर्जाच्या अटीविरोधात दिव्यांगांचा एल्गार

### १७ जूनला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**दिग्रस, दि.१६ :** दिव्यांगांसाठी असलेल्या ५ टक्के राखीव निधी योजनेच्या अर्ज प्रक्रियेत केवळ ऑनलाईन पद्धतीचा अवलंब केल्यामुळे गरीब व गरजू दिव्यांग बांधवांवर अन्याय होत असल्याचा आरोप करत अपंग जनता दलाने प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. योजनेसाठी ऑफलाईन अर्ज प्रक्रिया सुरू करण्याच्या मागणीसंदर्भात १३ मे २०२६ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन देऊनही कोणतीही कार्यवाही न झाल्याने १७ जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एकदिवसीय धरणे आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.



अपंग जनता दलाचे जिल्हाध्यक्ष दीपक गुलाब जाधव यांनी दिलेल्या निवेदनानुसार, जिल्ह्यातील अनेक दिव्यांग बांधव आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहेत. ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी सायबर कॅफे किंवा सेवा केंद्रांवर ३०० ते ४०० रुपये खर्च करावे लागत असल्याने अनेक पात्र लाभार्थी योजनांपासून वंचित राहत आहेत. राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये ऑफलाईन अर्ज स्वीकारण्याची सुविधा उपलब्ध असताना यवतमाळ जिल्ह्यात मात्र अशी व्यवस्था नसल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. या संदर्भात प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही कोणतेही लेखी उत्तर अथवा सकारात्मक निर्णय न मिळाल्याने दिव्यांगांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे अपंग जनता दलाचे नेते शेख अनिस यांच्या नेतृत्वाखाली १७ जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, आंदोलनादरम्यान कोणतीही अनुचित घटना घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित प्रशासनावर राहील, असा इशाराही संघटनेने दिला आहे. दिव्यांगांच्या न्याय्य मागण्यांकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन ऑफलाईन अर्ज प्रक्रियेला मान्यता द्यावी, अशी मागणी करण्यात येत आहे. 'दिव्यांगांच्या हक्कासाठी लढा तीव्र होणार का?' याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## जात प्रमाणपत्रासाठी कोळी महासंघाचे आंदोलन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**




यवतमाळ,दि.१६ : आदिवासी कोळी समाजातील विविध पोटजातींच्या बांधवांना जातीचे दाखले व जात वैधता प्रमाणपत्रे सुलभतेने मिळण्यासाठी कोळी महासंघाच्या वतीने मंगळवारी (ता. १६) यवतमाळ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले. शासनाने दोन वर्षांपूर्वी झालेल्या बैठकीतील निर्णयांची अंमलबजावणी न केल्यामुळे समाजात तीव्र नाराजी असून, या प्रलंबित मागण्यांसाठी संपूर्ण महाराष्ट्रात एकाच वेळी हे आंदोलन करण्यात आले.

आदिवासी कोळी समाजातील कोळी महादेव, मल्हार कोळी, टोकरे कोळी, डोंगर कोळी व ढोर कोळी या बांधवांना तसेच त्यांच्या रक्तनात्यातील नातेवाईकांना जातीचे दाखले आणि जात वैधता प्रमाणपत्रे सुलभरीत्या मिळावीत, या मागणीसाठी कोळी महासंघाच्या वतीने आंदोलन करून निवेदन देण्यात आले. यापूर्वी २० ऑक्टोबर २०२३ रोजी सह्याद्री अतिथीगृहावर तत्कालीन मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक महत्त्वाची बैठक पार पडली होती. या बैठकीला अनेक मंत्री, खासदार, आमदार आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांसह आदिवासी कोळी समाजाचे शिष्टमंडळ उपस्थित होते. या बैठकीत समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्यात आले होते. मात्र, या घटनेला जवळपास दोन वर्षे उलटूनही शासनाकडून या निर्णयांची किंवा बैठकीच्या इतिवृत्ताची अंमलबजावणी झालेली नाही. शासनाच्या या दिरंगाईमुळे संपूर्ण आदिवासी कोळी समाजात तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.कोळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष व माजी आमदार रमेशदादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली या विषयाचा सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. आगामी पावसाळी अधिवेशनामध्ये शासनाने कोळी समाजाचे हे प्रश्न मार्गी न लावल्यास संपूर्ण महाराष्ट्रभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा महासंघाचे युवा प्रदेशाध्यक्ष एड. चेतन पाटील यांनी दिला आहे. या आंदोलनात यवतमाळ जिल्हाध्यक्ष गजानन रासमवार, जिल्हा संपर्क प्रमुख अमोल गुंड्डलवार, पवन कुक्कलवार, किशोर हुरेराव, दयारामजी कांडेलकर, विनायकराव सोळंके, रमेश बोईनवार, विक्रम वल्लेवार, संजय राणे, प्रकाश यशवंते, दत्त मंदावार, दीपक टिप्पणवार, आशिष तोरडमल आणि चंद्रकांत जिन्नावार यांच्यासह सर्व तालुक्यांतील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शेतधुऱ्यावर पाणी जाण्यावरून वाद

**यवतमाळ, दि. १६ :** बारडतांडा शिवारात शेतातील धुऱ्यावर पाणी जाण्यावरून दोन शेतकरी गटांत वाद झाला आहे. या वादाचे रूपांतर धमकीमध्ये झाल्यामुळे पोलिसांनी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करून प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. फिर्यादी निलेश कैलास राठोड यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी योगराज केशव राठोड आणि प्रदिप ठाकुरसिंग पवार यांनी फिर्यादीच्या शेतात अनधिकृतपणे प्रवेश केला. त्यांनी नाली बुजवून फिर्यादीला धमकावले की, पुन्हा या विषयावर बोललास तर जीवे मारून टाकू. हे कृत्य संगनमत करून करण्यात आले असून, फिर्यादीच्या शेतीचे नुकसान करण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रकारामुळे ग्रामीण भागात शेतीतील बांधावरून होणारे वाद विकोपाला गेले आहेत. वडगाव जंगल पोलीस ठाण्यात या घटनेची नोंद झाली असून पोलीस आता अधिक कायदेशीर कारवाई करत आहेत.


## बाभुळगाव नगर पंचायत, बाभुळगाव.

जि. यवतमाळ - पिन ४४५१०१

दुरध्वनी क्रमांक :- ०७२०३ २७०२४१ ई मेल: npbabhulgaon@gmail.com

क्रमांक.नपंबा/कर विभाग/१६९/२०२६ दिनांक :- ११/०६/२०२६

### जाहीरनामा

सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, खालील अर्जदारांनी बाभुळगाव नगर पंचायत क्षेत्रातील मालमत्तेचे घर/खाली जागा नोंदणी वा मालमत्ता हस्तांतरण करण्या करिता नगर पंचायत कार्यालयात खालील रकान्यात नमूद कागदपत्रासह अर्ज सादर केला आहे. तरी नगर पंचायत अभिदप्तरी नोंदणी करण्या करिता आक्षेप/हरकती सादर करावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्या पासून ७ दिवसाच्या आत आवश्यक त्या कागदपत्रासह नगर पंचायत कार्यालयामध्ये सादर करावे. विहीत मुदती नंतर आलेले आक्षेप विचारात घेतल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी.

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव | मालमत्ता धारकाचे नाव | मालमत्तेचा तपशील | सादर केलेले दस्तऐवज |
|---|---|---|---|---|
| १. | सविता प्रशांत मुडे | रविंद्र जिवनदास काळपांडे | क्षे. १०८.७५ चौ.मी. (plno ५६/ब) | खरेदी खत क्र. ४११, दि. २७/०४/२०२६ |

(स्वाक्षरी)
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत, बाभुळगाव

## थोडक्यात

### महागडे साहित्य चोरीला

**यवतमाळ :** यवतमाळच्या जिरापुरे बिल्डिंगवरील टॉवरमधून अज्ञात चोरट्यांनी ४० हजार रुपये किमतीचे एअरटेल युनिट चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी अवधूतवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास सुरू आहे. १५ मे ते १६ मे या कालावधीत ही चोरी झाली. अज्ञात चोरट्यांनी टॉवरवरील मौल्यवान साहित्यावर डल्ला मारला आहे. फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून अवधूतवाडी पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. चोरीचा हा प्रकार समोर आल्यानंतर परिसरात खळबळ उडाली आहे.

### विटेने बेदम मारहाण

**यवतमाळ :** जखमीपहूर (ता. बाभुळगाव) येथे कुत्र्याने अंगणात घाण केल्याच्या कारणावरून झालेल्या वादात एकाला विटेने मारहाण करून गंभीर जखमी केल्याची घटना घडली. याप्रकरणी बाभुळगाव पोलीस ठाण्यात मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीच्या अंगणात आरोपीच्या कुत्र्याने नैसर्गिक विधी केली. फिर्यादीने कुत्र्याला हाकलले असता, याचा राग येऊन आरोपीने फिर्यादीसोबत वाद घातला. शिवीगाळ करत आरोपीने फिर्यादीच्या डोक्यावर विटेचा तुकडा मारून गंभीर जखमी केले. तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. फिर्यादीच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा नोंदवला असून पुढील तपास केला जात आहे. समाजात अशा प्रकारच्या क्षुल्लक कारणावरून होणाऱ्या वादांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असल्याचे चित्र आहे.


### बोरगडीत काठीने मारहाण

**पुसद :** तालुक्यातील बोरगडी येथे घरासमोरून जाण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून फिर्यादीला काठीने मारहाण करण्यात आली. याप्रकरणी पुसद शहर पोलीस ठाण्यात मारहाणीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींचा तपास सुरू आहे. आरोपींनी संगनमताने फिर्यादीच्या घरासमोर येऊन वाद घातला. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि आरोपींनी काठीने फिर्यादीच्या पाठीवर, हातावर व पायावर मारहाण केली. यात फिर्यादी गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेनंतर परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. फिर्यादीच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू आहे. अशा स्वरूपाच्या घटना टाळण्यासाठी पोलिसांनी कडक पावले उचलण्याची गरज व्यक्त होत आहे.

# जिल्ह्यात स्मार्ट मीटरला कडाडून विरोध

## महावितरणच्या कारभारावर नागरिकांचा संताप; सोसायट्यांनी मीटर बॉक्सला ठोकले टाळे

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि.१६ :** महावितरणने ग्राहकांना व्हॉट्सअॅपवर मेसेज पाठवून येत्या ४८ तासांत स्मार्ट मीटर बसविण्यात येणार असल्याची सूचना वजा कायदेशीर नोटीसच दिली आहे. यामुळे सर्वसामान्यांमध्ये प्रचंड खळबळ उडाली आहे. 'स्मार्ट मीटर बसविण्याची सक्ती करणार नाही', असे थेट वचन देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील जनतेला दिले होते. असे असतानाही महावितरण मात्र केंद्र सरकारचा कायदा पुढे करून राज्यातील जनतेला वेठीस धरत आहे. कोणत्याही परिस्थितीत स्मार्ट मीटर बसविण्याबाबत ग्राहकांवर सक्ती केली जात आहे. यामुळे शहरातील नागरिकांसह सोसायट्यांमधील कुटुंबांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाल्याचे चित्र दिसून येत आहे. या दुटप्पी धोरणामुळेमहावितरण विरोधात संताप व्यक्त केला जात आहे.

सध्या शहरात एकच चर्चा रंगली आहे, ती म्हणजे महावितरणने स्मार्ट मीटरसाठी पाठविलेला मेसेज आणि शहरातील सोसायट्यांनी मीटर बॉक्सला लावलेले टाळे. स्मार्ट मीटरच्या या सक्तीला नागरिकांचा आता तीव्र विरोध आहे. संतापलेल्या नागरिकांनी थेट मीटर बॉक्स सील करण्यापर्यंत मजल मारली आहे. 'आम्ही कोणत्याही दबावाला भीक घालणार नाही', अशी आक्रमक भूमिका वीज ग्राहकांनी घेतली आहे. प्रशासनाचा कितीही दबाव आला तरी स्मार्ट मीटर बसवून घ्यायचे नाही, यावर ग्राहक ठाम आहेत. यासाठी या सोसायट्यांनी एक नामी शक्कल लढवली आहे. इमारतीच्या तळमजल्यावरील मीटर बॉक्सच्या मुख्य ग्रीलला त्यांनी चक्क कुलूप लावले आहे. महावितरणचे कर्मचारी आले, तरी त्यांना मीटर बदलता येऊ नये, यासाठी ही व्यवस्था केली आहे. सोसायट्यांचा हा आक्रमक पवित्रा पाहून आता महावितरण प्रशासनाची चांगलीच गोची झाली आहे. काही राजकीय संघटनांनीही या प्रश्नात उडी घेतली असून स्मार्ट मीटर बसविण्याला जोरदार विरोध सुरू केला आहे. जर सर्वच हाऊसिंग सोसायट्यांनी असा 'टाळेबंद प्रयोग'केला, तर महावितरणला स्मार्ट मीटर बसविणे जवळपास अशक्य होणार आहे. सतत खंडित होणारा वीजपुरवठा आणि त्यात येणारी भरमसाठ लाईट बिले यामुळे त्यांचे कंबरडे मोडले आहे. त्यात आता ही स्मार्ट मीटरची सक्ती म्हणजे 'दुष्काळात तेरावा महिना'ठरत आहे. हा प्रकार म्हणजे ग्राहकांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखा आहे. याच तीन मुख्य मुद्यांवर रहिवाशांनी तेथील अधिकाऱ्यांसमोर आपला तीव्र संताप व्यक्त केला. लोकांचा इतका टोकाचा विरोध होत असला, तरी दबाव टाकून स्मार्ट मीटर बसविण्याचा सरकारचा छुपा हेतू असल्याचे ग्राहकांना वाटते. यामुळे जनतेत असंतोष वेगाने पसरत आहे. आता महावितरण प्रशासन आणि सरकार हा वाढता विरोध नेमका कसा हाताळणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

> **स्मार्ट मीटर बसविताना ग्राहकांना विचारात न घेणे हाच ग्राहकांशी एकप्रकारचा धोका आहे. या बाबीचा त्यांच्या आर्थिक स्थैर्यावरती थेट परिणाम होणार आहे. विधानसभेत देवेंद्र फडणवीस यांनी जो शब्द दिला होता की, स्मार्ट मीटरची सक्ती करू नये; परंतु केवळकंपनीला प्रॉफिट (नफा) कमवून देण्यासाठी हे स्मार्ट मीटर बसविले जात आहे. शासनाने ग्राहकांना न्याय द्यायला हवा.'**
>
> **-प्रा. पंढरी पाठे, यवतमाळ**

> **'राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत स्मार्ट मीटरबाबत सक्ती करणार नसल्याची घोषणा केली होती. यवतमाळ जिल्हा हा शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हा आहे. स्मार्ट मीटरची सक्ती करणे हे लोकहिताचे नाही. त्यामुळे ग्राहकांवर स्मार्ट मीटर बसविण्याबाबत महावितरणने सक्ती करू नये, हीच भूमिका युवा सेनेची आहे.'**
>
> **- प्रद्युम्न जवळकेर, जिल्हाध्यक्ष, युवासेना.**

> **'स्मार्ट मीटर बसविण्याविरोधात संघटना न्यायालयात गेली आहे. जनहित याचिका २०२५ मध्ये दाखल करण्यात आली आहे. जनहित याचिकेचा निकाल लागेपर्यंत आमच्याकडे स्मार्ट मीटर बसवू नये. वीज कायद्यानुसार मीटर कोणते लावायचे तो अधिकार ग्राहकांचा असतो. जर न्यायालयीन निकाल विरोधात गेला तर महावितरणने खुशाल स्मार्ट मीटर लावावे.'**
>
> **-प्रशांत उर्फ बापू दर्यापूरकर, वीज ग्राहक संघर्ष संघटना, यवतमाळ.**

# जाचक अटी रद्द करून सरसकट कर्जमाफी द्या

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची मागणी, कर्जमाफीसाठी तहसीलदारांना निवेदन

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**बाभूळगाव, दि. १६ :** येथे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्यावतीने तहसीलदार मीरा पागोरे यांना निवेदन देण्यात आले. शासनाने जाहीर केलेल्या कर्जमाफी योजनेतील जाचक अटींमुळे शेतकरी वंचित राहत असल्याने, या अटी रद्द करून सरसकट कर्जमाफी द्यावी, अशी मागणी या निवेदनाद्वारे पक्षाने केली आहे.

शासनाने सन २०१९ ते २०२६ दरम्यानच्या अल्पमुदत पीककर्जाची २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी करण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु, २०१९ च्या योजनेचा लाभ घेतलेल्या ३३ लाख शेतकऱ्यांना केवळ ५० हजार रुपयांचीच कर्जमाफी मिळणार असल्याने ते पूर्ण लाभापासून वंचित राहतील, असा आरोप पवन हजारे यांनी केला आहे. तसेच, ज्यांचे कर्ज २ लाखांवर आहे, त्यांनी वरची रक्कम भरल्याशिवाय लाभ मिळणार नाही, ही ओटीएसची अट अत्यंत जाचक आहे. प्रोत्साहनपर अनुदानासाठी सलग चार वर्षे नियमित कर्ज भरण्याची अट रद्द करावी, २०१९ च्या लाभार्थ्यांसाठी ५० हजारांची मर्यादा हटवावी, कागदपत्रांअभावी वंचित राहिलेल्या ६.५६ लाख शेतकऱ्यांना तत्काळ लाभ द्यावा, पीकविमा अटी रद्द करून १ रुपयात योजना सुरू करावी आणि पेरणीपूर्वी कर्ज खात्यांचे पुनर्गठन करून शेतकऱ्यांना मदत करावी, अशा प्रमुख मागण्या या निवेदनात करण्यात आल्या आहेत. सततची नापिकी आणि नैसर्गिक आपत्ती यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. या निवेदनावर पवन र. हजारे, संकेत भा. टोणे, गजानन पं. खराटकर, विनोद दे. खडसे, जहीर भाई, सुधाकर दातार, दिपक तातेड, मधुकर निवल, हरिहर विठ्ठलराव ढाकुलकर, सुर्यभान कावलकर, प्रविण पांडे, सुभाष राऊत व वसीम बेग मिर्झा यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे देण्यात आला आहे.

# रोपवाटिकेच्या कंपाऊंडला पडल्या भेगा

## बांधकामाच्या दर्जाचा प्रश्नचिन्ह, भ्रष्टाचाराची चर्चा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**दिग्रस, दि. १६ :** तालुक्यातील आरंभी आणि शिवनी वनविभागाच्या बिटमध्ये गेल्या एका महिन्यापासून रोपवाटिकेला लागून लोखंडी अँगलचे कंपाऊंड उभारण्याचे काम सुरू आहे. अंदाजपत्रकाकडे दुर्लक्ष करीत कंत्राटदाराने कमी सिमेंटचा वापर केल्यामुळे आणि क्युरिंग न केल्यामुळे बेडला मोठ्या भेगा पडल्या आहेत. यामुळे शासकीय निधीचा गैरवापर होत असून, परिसरातील नागरिकांनी या बांधकामाच्या दर्जावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

वनपरिक्षेत्र कार्यालय सातत्याने विविध कारणांनी वादाच्या भोवऱ्यात सापडत असते. आरंभी व शिवनी बिटमध्ये सुरू असलेल्या या कंपाऊंड कामात नियमांचे उल्लंघन होत आहे. खड्डे खोदण्यापासून ते सिमेंटच्या मिश्रणापर्यंत सर्वच बाबी निकृष्ट दर्जाच्या असल्याने बांधकामाचे अस्तित्व धोक्यात आले आहे. क्युरिंगअभावी बेडला पडलेल्या भेगा या भ्रष्टाचाराचा पुरावाच आहेत. फेटरी वन विभागात मागील वर्षी असाच प्रकार घडला होता, ज्याची दखल घेत तक्रार केल्यानंतर कंत्राटदारावर कारवाई झाली होती. आताही कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांच्या साटेलोट्यातून शासकीय तिजोरीची लूट सुरू असल्याचा आरोप होत आहे. काम निकृष्ट होत असल्याने गुणनियंत्रण विभागामार्फत तातडीने चौकशी करावी आणि संबंधित दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. वरिष्ठ वन संरक्षकांनी या प्रकरणात लक्ष घालून शासकीय पैशांचा अपव्यय थांबवावा, अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

# यवतमाळ - आर्णी मार्गावर अपघात, एक ठार

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**आर्णी, दि. १६ :** यवतमाळ ते आर्णी मार्गावरील जवळा फाटा परिसरात सोमवारी (दि. १५) रात्री ८.३० वाजताच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात दिग्रस येथील ५५ वर्षीय दुचाकीस्वार अब्दुल नूर अब्दुल मजीद यांचा मृत्यू झाला. यवतमाळहून दिग्रसकडे जात असताना यू-टर्न घेताना त्यांच्या दुचाकीची दुसऱ्या वाहनाशी जोरदार धडक झाल्याने ही दुर्दैवी घटना घडली आहे.

या अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतीचा प्रयत्न केला, परंतु गंभीर जखमी झालेल्या अब्दुल नूर यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. त्यानंतर मृतदेह आर्णी येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आला असून शवविच्छेदनासाठी शवागारात ठेवण्यात आला आहे. घटनेची माहिती मिळताच माजी विधान परिषद सदस्य ख्वाजा बेग आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस साजिद बेग यांनी ग्रामीण रुग्णालयात तातडीने भेट देऊन मृताच्या नातेवाईकांचे सांत्वन केले आणि आवश्यक समन्वयासाठी मदत केली. या दुर्दैवी घटनेमुळे दिग्रस परिसरात शोककळा पसरली आहे. अपघातामुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून, पोलिसांकडून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. अपघाताच्या नेमक्या कारणांचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून जबाब नोंदवण्याचे काम सुरू असून कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली जात आहे.

# शेतकऱ्यांच्या समस्यांसाठी काँग्रेस आक्रमक

## मारेगाव तहसीलदारांना निवेदन, चक्काजाम आंदोलनाचा इशारा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**मारेगाव, दि. १६ :** मारेगाव तालुका काँग्रेस समितीच्यावतीने अरुणा खंडाळकर यांच्या नेतृत्वात तहसीलदारांना निवेदन सादर करीत तालुक्यातील विविध समस्यांकडे लक्ष वेधले आहे. पांदणरस्त्यांची दुरवस्था, महागाई, खतांची दरवाढ आणि शेतकरी कर्जमाफी यासह विविध मागण्यांवर आठ दिवसांत कार्यवाही न झाल्यास काँग्रेसद्वारे चक्काजाम आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला असून, या निवेदनाद्वारे प्रशासनावर दबाव निर्माण करण्यात आला आहे.

तालुक्यातील शेतकरी आणि नागरिक सातत्याने भेडसावणाऱ्या समस्यांमुळे मेटाकुटीस आले आहेत. महागाईचा भडका, खतांच्या किमतीतील वाढ आणि इंधन दरवाढीमुळे सामान्य जीवन विस्कळीत झाले आहे. शासन केवळ दिशाभूल करणाऱ्या योजनांचा गाजावाजा करीत असल्याचा आरोप करीत, काँग्रेस आता ॲक्शन मोडवर आली आहे. निवेदनावेळी तालुका काँग्रेस समितीचे अध्यक्ष वसंतराव आसुटकर, कार्याध्यक्ष अंकुश माफुर, नगरसेवक आकाश बदकी, वसंत जिनिंग संचालक रवींद्र धानोरकर उपस्थित होते. यासोबतच युवा काँग्रेसचे समीर सय्यद, विनोद धोबे, तुळशिराम कुमरे, माजी पंचायत समिती सभापती गजानन खापने, सुरेंद्र काकडे, यादवराव पांडे, यादवराव काळे, गणू थेरे, सुनील सोमटकर, मारोती सोमलकर, मंगेश उईके आणि अरविंद वखनोर यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. आठ दिवसांत मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# देवसरीच्या पूरग्रस्तांचा 'एसडीओ' कार्यालयावर आज मोर्चा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**उमरखेड, दि. १६ :** तालुक्यातील देवसरी येथील पूरग्रस्त नागरिक आज बुधवारी (दि. १७) उपविभागीय अधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढणार आहेत. बाळदी रोडवर मंजूर झालेल्या जागेवरील पुनर्वसनाची प्रलंबित कामे प्रशासनाने तत्काळ पूर्ण करावीत, या प्रमुख मागणीसाठी हा मोर्चा आयोजित केला आहे. प्रशासनाच्या वेळकाढू धोरणामुळे संतप्त झालेल्या नागरिकांनी हक्कासाठी संघटित होऊन हा लढा उभारला आहे.

देवसरी येथील नागरिकांच्या सुरक्षित पुनर्वसनासाठी बाळदी रोडवर शासनाने जागा मंजूर केली. सरपंच मीनाक्षी सावतकर व उपसरपंच गजानन देवसरकर यांच्या सततच्या पाठपुराव्यातून येथे मूलभूत सुविधांचा आराखडा मंजूर झाला. काही विकास कामांना सुरुवात झाली असली तरी बहुतांश कामे अद्यापही प्रलंबित आहेत. सध्या पावसाळा सुरू होणार असल्याने नागरिक हल्ली वास्तव्य करीत असलेली जागा पूर्णपणे असुरक्षित आहे. लहान मुले आणि वृद्धांना घेऊन या मोजक्या जागेत राहणे कठीण झाले आहे. त्यामुळे रखडलेली कामे तत्काळ पूर्ण करण्याच्या मागणीचे निवेदन प्रशासक मीनाक्षी सावतकर यांच्या हस्ते उपविभागीय अधिकाऱ्यांना दिले जाणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून हा भव्य मोर्चा कार्यालयावर धडकणार आहे. वामनराव सावते, गजानन पाटील देवसरकर, तुळशीराम सावते, सुभाष सावते आणि अतुल देवसरकर हे मोर्चाचे प्रमुख मार्गदर्शक राहणार आहेत. अनेक वर्षांपासून रेंगाळलेल्या या गंभीर समस्येवर तोडगा काढण्यासाठी पूरग्रस्तांनी एकजुटीने लढा उभारण्याचा ठाम निर्धार केला आहे.

# महिला बचत गट सामाजिक, आर्थिक सक्षमीकरणाचे व्यासपीठ

## शीतल संजय राठोड; यशस्विनी लोकसंचलित साधन केंद्राची सर्वसाधारण सभा उत्साहात

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**यवतमाळ, दि.१६ :** महिला आर्थिक विकास महामंडळ (माविमं) अंतर्गत कार्यरत यशस्विनी लोकसंचलित साधन केंद्राची १६वी वार्षिक सर्वसाधारण सभा गंगा-काशी सभागृहात उत्साहात पार पडली. कार्यक्रमाचे उद्घाटन शीतल संजय राठोड यांच्या हस्ते पार पडले. याप्रसंगी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. यावेळी मान्यवरांचा वृक्ष, शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच संस्थेच्या सन २०२५-२६च्या वार्षिक अहवालाचे अनावरण करण्यात आले.

यावेळी बोलताना शीतल राठोड यांनी महिला बचत गट हे केवळ आर्थिक माध्यम नसून महिलांच्या सामाजिक व आर्थिक सक्षमीकरणाचे प्रभावी व्यासपीठ असल्याचे सांगितले. ही चळवळ अधिक बळकट करण्यासाठी सर्व महिलांनी एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाला सखी वन स्टॉप सेंटरचे व्यवस्थापक मीलन जगताप, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक सुशील गरूड, माविमंचे जिल्हा समन्वय अधिकारी सुनील सोगे, विविध बँकांचे जिल्हा समन्वयक, संस्थेच्या अध्यक्षा संगीता गायकवाड, व्यवस्थापक सुनंदा मानकर तसेच स्वयंसहाय्यता बचत गटांच्या महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. प्रास्ताविकातून सुनंदा मानकर यांनी संस्थेच्या विविध विकासात्मक उपक्रमांचा आढावा घेतला. केंद्राच्या कार्यक्षेत्रातील ४९ गावांमध्ये व शहर भागातील एकूण १,०५५ महिला बचतगटांमधील ११ हजार ६०५ महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले. ग्रामीण भागातील गरीब, गरजू, अनुसूचित जमाती, विधवा, घटस्फोटित, अल्पभूधारक व मजूर वर्गातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी विविध योजना, प्रशिक्षणे व उपजीविका प्रकल्प राबविण्यात येत आहेत. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात यशस्विनी लोकसंचलित साधन केंद्रामार्फत ५३८ बचत गटांना २२ कोटी ९० लाख ३५ हजार ७४५ रुपयांचे कर्ज उपलब्ध करून देण्यात आले. तसेच १,०४४ गटांमार्फत ३६ कोटी ८५ लाख ६५हजार रुपयांचे अंतर्गत कर्ज व्यवहार झाल्याची माहिती देण्यात आली. कार्यक्रमात महिला बचत गटांना अडीच कोटी रुपयांच्या कर्जाचे धनादेश वितरित करण्यात आले. यावेळी ५०० महिलांना परसबाग किटचे वाटप करण्यात आले व पर्यावरणाच्या संवर्धनासाठी ५० महिलांना शेवग्याचे झाड वाटप करण्यात आले. यावेळी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिला बचत गटांचा, उद्योजिकांचा तसेच प्रेरणादायी महिलांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. स्वतःचा व्यवसाय उभारून इतर महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणाऱ्या उद्योजिका प्रतिभा वाघमारे यांच्यासह अनेक महिलांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच संस्थेचे लेखापाल प्रवीण निर्मळकर यांचाही उत्कृष्ट कार्याबद्दल गौरव करण्यात आला. महिलांच्या नेतृत्व विकासासाठी, आर्थिक साक्षरता, बचत गट व्यवस्थापन, स्त्री-पुरुष समानता, कायदेविषयक जनजागृती, आरोग्य, हवामान बदल व कौशल्य विकास यांसारख्या विषयांवर विविध प्रशिक्षणांचे आयोजन करण्यात येत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी महिला बचत गटांच्या माध्यमातून महिलांचे आर्थिक सक्षमीकरण आणि सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यात माविमं व लोकसंचलित साधन केंद्रांची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे नमूद करत संस्थेच्या कार्याचे कौतुक केले.

### कुटुंबाच्या विकासात महिलांचे योगदान

**बचत गटांमुळे महिलांमध्ये आत्मविश्वास वाढला असून स्वावलंबनाची भावना बळकट झाली आहे. कुटुंबाच्या विकासात महिलांचे योगदान अधिक प्रभावी झाले असून आज महिला विविध क्षेत्रांत यशस्वीपणे कार्यरत आहेत. बचत गटांच्या माध्यमातून अनेक महिलांनी उद्योग-व्यवसाय उभारून स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली असल्याचे मत शीतल संजय राठोड यांनी व्यक्त केले.**


## जाहीर सूचना

**मी याद्वारे सर्व संबंधितांना सूचित करतो की, माझी सर्व शैक्षणिक कागदपत्रे, आधार कार्ड आणि पॅन कार्ड प्रमाणे माझे प्रचलित नाव सय्यद अमीन सय्यद अली (SAIYAD AMIN SAIYAD ALI) असे आहे. परंतु, माझ्या जुन्या पासपोर्टवर (पासपोर्ट क्रमांक : G-२२४६९७६) माझे नाव सय्यद अमीन सय्यद अली (SAYYAD AMIN SAYYAD ALI) असे नोंदविण्यात आले आहे.**

**तरी,' SAYYAD AMIN SAYYAD ALI' आणि 'SAIYAD AMIN SAIYAD ALI' ही दोन्ही नावे एकाच व्यक्तीची (म्हणजेच माझीच) असून, याबाबत मी हे जाहीर प्रकटन करीत आहे.**

**● घोषणाकर्त्याचे नाव ●**
**सय्यद अमीन सय्यद अली**
**SAIYAD AMIN SAIYAD ALI'**
**पत्ता: प्लॉट नं.४०, नागपूर रोड, गिलानी उद्यान, व्हीटीसी यवतमाळ (महाराष्ट्र-४४५ ००१**